म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 2029

केसरी

पुणे, बुधवार दि. १६ जुलै १९८० ·C (भरपूर आवृत्ति)

पृष्ठ ६ : किंमत : ३५ पैसे

१०० अंक : १९७

केसरीचे माजी संप


ग. वि. केतकर



तरुण भारत

पत्रकार-महर्षी ग. वि. केतकर

व्यासंगी, सव्यसाची पत्रकार



REFBK-0023467

समर्थ-साधनेती

प्रतिभावंत संपा

रविवार सकाळ

शीतादेवी

सं. निबंध.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा दंडणी भरावी लागेल.

12 MAY 1982

12 MAY 1982


1 AUG 1982

26 OCT 1984

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

संदर्भ निबंध
२९२१
२३४६७
१३।३।८२

पत्रकार-महर्षी ग. वि. केतकर


REFBK-0023467

संकलक
अरविन्द केतकर
साहाय्यिका
सौ. सुमन केतकर

प्रकाशक :
मिलिंद केतकर
१२ मयूरेश,
१३८–ब, ले. ज. रोड लगत
माहीम, मुंबई ४०० ०१६

□

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

जुलै १९८१

□

मूल्य पसतीस रुपये

□

मुद्रक :
म. बा. जोशी, बी. ए.
ज्ञानविलास छापखाना,
२७ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२

संकलकाचे निवेदन

ती. दादा गेल्यानंतर विविध वृत्तपत्रांत त्यांच्याविषयी आलेल्या लेखांची कात्रणं मी जमवली. तेव्हा ही संकलनाची कल्पना मनात आली. १९२१ ते १९८० हा सुमारे साठ वर्षांचा दीर्घ लेखनकाल आणि लेखनाचे वेगवेगळे विषय लक्षात घेऊन, प्रथम सर्व उपलब्ध लेखांची सूची तयार करण्याचं ठरलं. नंतर ही सूची, अल्पचरित्र आणि काही निवडक लेखांचं पुनर्मुद्रण एकत्रितपणे पुस्तकरूपानं प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला.

लेखांची सूची तयार करताना अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलं. बहुतेक वर्तमानपत्रं आणि नियतकालिकं यांच्या कार्यालयांत लेखसूचीचा अभाव आढळला त्यामुळे सर्व जुन्या फायली पाहणं क्रमप्राप्त होतं. ती. दादांचे लेख कोणत्या प्रकाशनात येत असत हे माहीत होतं; पण कोणत्या नियतकालिकात केव्हा येत होते तो काल निश्चित माहिती नसल्यामुळे पुष्कळदा संशोधनाची मेहनत जास्त आणि फळ कमी असं झालं. केसरी, मराठा आणि तरुण-भारत यांतल्या अग्रलेखांपैकी त्यांचे लेख निश्चित करण्यात श्री. हरिभाऊ कुळकर्णी, श्री. चं. प. भिशीकर आणि श्री. व. प्र. गीत यांचं मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाल्यामुळेच ते काम होऊ शकलं. या लेखसूचीत ती. दादांनी न लिहिलेला लेख असणं आणि त्यांनी लिहिलेले अनेक लेख नसण, हे दोन्ही दोष गृहीत धरून ती प्रसिद्ध केली आहे. वाचकांनी या बाबतीत आवश्यक सूचना केल्यास हे दोष पुढील आवृत्तीत काढता येतील.

पुनर्मुद्रणासाठी लेख निवडताना लेखांचे विषय, लेखनकाल आणि विविध प्रकाशनं यांना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला. पण हे कामही अवघड होतं. पुस्तकाची पृष्ठसंख्या विचारात घेऊन सर्वच गाजलेले लेख पुनर्मुद्रित करणं शक्य नव्हतं. तसंच सर्व नियतकालिकांतला निदान एक तरी लेख घेणंही अशक्य होतं. त्यांतल्या त्यात, १९२१ सालचा पहिला उपलब्ध लेख आणि १९८१ साली शेवटी प्रसिद्ध झालेला लेख यांचा समावेश करून साठ वर्षांना प्रतिनिधित्व दिल्याचा भास निर्माण केला आहे. लो. टिळकांचं तत्त्वज्ञान, म. गांधी, बॅ. सावरकर, श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या संबंधीचे लेख घेतले आहेत. राजकारण, भगवद्गीता, शुद्धी हे महत्त्वाचे विषय आणि विनोद, जादूचे चौरस, शब्द-शोध यांसारखे हलके-फुलके विषय, यांवरचे लेख निवडले आहेत. ही निवड उत्कृष्ट अथवा निर्दोष आहे असाही दावा नाही.

अल्पचरित्राविना हे पुस्तक अपुरं वाटलं असतं. ती. दादांविषयी 'आमचे दादा' असं लिहिणं सोपं असूनही, त्रयस्थपणे लिहिण्याचं धाडस केलं आहे. साहजिकच 'भावनांचा ओलावा' आणि कौटुंबिक भाग कमीत कमी आला आहे. ती. दादांविषयी आठवणींचा एक संग्रह पुस्तकरूपानं प्रसिद्ध करण्याचा श्री. रा. स. भट यांचा संकल्प असल्यामुळे या पुस्तकात आठवणी वगळल्या आहेत.

'आजचं वर्तमानपत्र ही उद्याची रद्दी' हा व्यवहार मान्य केला तरी वृत्त-पत्रातल्या लेखनाला तो लागू नाही. वर्तमानपत्री जगातलं लेखन लवकर विसरलं जातं. ते काही अंशी एकत्र करून, पुस्तकरूपानं एक प्रकारे ती. दादांचं 'स्मारक' निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे पुतळा उभारून केलेल्या स्मारकापेक्षा हे पुस्तकरूपाचं स्मारक 'अल्पमोली–बहुगुणी' ठरावं !

केसरीचे विश्वस्त आणि महाराष्ट्र राज्याचे ऊर्जामंत्री श्री. जयंतराव टिळक यांनी वेळात वेळ काढून या पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचे मनः-पूर्वक आभार मानून हे छोटंसं निवेदन संपवतो.

卐 卐 卐

ऋणनिर्देश

अशा संकलनात्मक पुस्तकाचं काम अनेकांच्या सहकार्यानंच पुरं होऊ शकतं. त्या साहाय्याची – महत्त्वाच्या दृष्टीनं कमी वा जास्त अशी – वर्गवारी करणंही योग्य ठरणार नाही. या ऋणनिर्देशात सर्वांचा समावेश करताना विशिष्ट अनुक्रम पाळलेला नाही, आठवतील तसे उल्लेख केले आहेत. अनवधानानं कोणाचा उल्लेख राहून गेला असल्यास क्षमस्व !

- केसरी व तरुण-भारत यांचा संपादकवर्ग.
- लेखांच्या पुनर्मुद्रणाची तत्परतेने अनुमती देणारे विविध नियतकालिकांचे संपादक.
- केसरी मराठा-ग्रंथशाळा, केसरी-सूची-केन्द्र, मुंबई--मराठी ग्रंथसंग्रहालय (संदर्भ शाखा),शासकीय विभागीय ग्रंथालय यांतील अधिकारी व कर्मचारी.
- श्री. बा. द. करकरे, श्री. बाळ जेरे, श्री. म. श्री. दीक्षित, श्री. रा. द. पणशीकर, श्री. रा. स. भट, डॉ. म. श्री. माटे, श्री. बाळाराव सावरकर, श्री. गो. ग. जोशी, श्री. ना. म. केतकर, डॉ. अ. ना. देशपांडे, श्री. वा ग. तळवलकर यांनी व्यक्तिशः सहकार्य दिले.
- प्रा. सौ. सिंधू नावलेकर (ग. वि. केतकरांची कन्या) व प्रा डॉ. भा. ग. केतकर (ग. वि. केतकरांचे ज्येष्ठ पुत्र) यांनी पुस्तकनिर्मितीस अनेक प्रकारे मदत केली.
- ज्ञानविलास छापखान्याने व श्री. बा. का. अभ्यंकर (प्रूफरीडर) यांनी स्वतःची जबाबदारी वेळेवर पार पाडली.

अल्पचरित्राविना हे पुस्तक अपुरं वाटलं असतं. ती. दादांविषयी 'आमचे दादा' असं लिहिणं सोपं असूनही, त्रयस्थपणे लिहिण्याचं धाडस केलं आहे. साहजिकच 'भावनांचा ओलावा' आणि कौटुंबिक भाग कमीत कमी आला आहे. ती. दादांविषयी आठवणींचा एक संग्रह पुस्तकरूपानं प्रसिद्ध करण्याचा श्री. रा. स. भट यांचा संकल्प असल्यामुळे या पुस्तकात आठवणी वगळल्या आहेत.

'आजचं वर्तमानपत्र ही उद्याची रद्दी' हा व्यवहार मान्य केला तरी वृत्त-पत्रातल्या लेखनाला तो लागू नाही. वर्तमानपत्री जगातलं लेखन लवकर विसरलं जातं. ते काही अंशी एकत्र करून, पुस्तकरूपानं एक प्रकारे ती. दादांचं 'स्मारक' निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे पुतळा उभारून केलेल्या स्मारकापेक्षा हे पुस्तकरूपाचं स्मारक 'अल्पमोली–बहुगुणी' ठरावं !

केसरीचे विश्वस्त आणि महाराष्ट्र राज्याचे ऊर्जामंत्री श्री. जयंतराव टिळक यांनी वेळात वेळ काढून या पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचे मनः-पूर्वक आभार मानून हे छोटंसं निवेदन संपवतो.

卐 卐 卐

ऋणनिर्देश

अशा संकलनात्मक पुस्तकाचं काम अनेकांच्या सहकार्यानंच पुरं होऊ शकतं. त्या साहाय्याची – महत्त्वाच्या दृष्टीनं कमी वा जास्त अशी – वर्गवारी करणंही योग्य ठरणार नाही. या ऋणनिर्देशात सर्वांचा समावेश करताना विशिष्ट अनुक्रम पाळलेला नाही, आठवतील तसे उल्लेख केले आहेत. अनवधानानं कोणाचा उल्लेख राहून गेला असल्यास क्षमस्व !

- केसरी व तरुण-भारत यांचा संपादकवर्ग.
- लेखांच्या पुनर्मुद्रणाची तत्परतेने अनुमती देणारे विविध नियतकालिकांचे संपादक.
- केसरी मराठा-ग्रंथशाळा, केसरी-सूची-केन्द्र, मुंबई--मराठी ग्रंथसंग्रहालय (संदर्भ शाखा),शासकीय विभागीय ग्रंथालय यांतील अधिकारी व कर्मचारी.
- श्री. बा. द. करकरे, श्री. बाळ जेरे, श्री. म. श्री. दीक्षित, श्री. रा. द. पणशीकर, श्री. रा. स. भट, डॉ. म. श्री. माटे, श्री. बाळाराव सावरकर, श्री. गो. ग. जोशी, श्री. ना. म. केतकर, डॉ. अ. ना. देशपांडे, श्री. वा ग. तळवलकर यांनी व्यक्तिशः सहकार्य दिले.
- प्रा. सौ. सिंधू नावलेकर (ग. वि. केतकरांची कन्या) व प्रा डॉ. भा. ग. केतकर (ग. वि. केतकरांचे ज्येष्ठ पुत्र) यांनी पुस्तकनिर्मितीस अनेक प्रकारे मदत केली.
- ज्ञानविलास छापखान्याने व श्री. बा. का. अभ्यंकर (प्रूफरीडर) यांनी स्वतःची जबाबदारी वेळेवर पार पाडली.

प्रस्तावना

'केसरी' चे ख्यातनाम संपादक श्री. गजाननराव केतकर यांचे जीवन-चरित्र त्यांच्या चिरंजीवांनी – अरविन्दरावांनी – प्रसिद्ध करण्याचे ठरविले हे अतिशय चांगले झाले. 'कवी' बद्दल लिहिताना 'कसा दिसे आननी' असा प्रश्न जसा विचारला गेला, तसेच पत्रकाराबद्दलही 'कसा असे मानसी' असे कुतूहल निर्माण झाले तर आश्चर्य नव्हे. चेहऱ्याइतकीच भाषेची शैली ही स्वभावनिदर्शक होय. 'स्टाईल इज दि मॅन' असे मनुष्याच्या स्वभावाबद्दल लिहिताना म्हटलेच आहे. लोकमान्यांची भाषाशैली व त्यांचे 'केसरी' तील लिखाण त्यांच्या स्वभावा-प्रमाणे निर्भीड, अकृत्रिम व प्रामाणिक असे! लोकमान्यांच्या शैलीचा त्यांच्या स्वभावाशी, त्यांच्या मतप्रतिपादनाशी व मतप्रतिपादन त्यांच्या कार्याशी जुळते असे. गजाननराव केतकरांनी जे लिहिले तेच तंतोतंत त्यांच्याही लिखाणास लागू होते; व त्यांच्या भाषेच्या खिडकीतून त्यांचे जीवनचरित्र अवलोकन करता येते.

गजाननरावांचे शिक्षण लोकमान्यांकडे गायकवाडवाड्यातच झाले. त्या वेळी लोकमान्यांचे दोन चिरंजीव रामभाऊ व बापू, बाबा विद्वांसांचे थोरले चिरंजीव महादेव व जगन्नाथमहाराज असा हा सवंगड्यांचा संच गायकवाडवाड्यात जमलेला होता. रस्त्याच्या बाजूचे इमारतीतील मोठ्या हॉलमध्ये लोकमान्यांचे ग्रंथसंग्रहालय होते व तीच या मुलांच्या अभ्यासाची जागाही होती. अभ्यासा-बरोबरच बलसंवर्धनाची व्यवस्थाही लोकमान्यांनी मागील बागेत मलखांब पुरून व व्यायामाचे इतर साहित्य आणवून केली होती. गजाननरावांनी बौद्धिक वाढीबरोबर शरीरसंपदाही याच काळात कमावली व ती दुर्धर अशा दम्याला तोंड देण्यास भावी काळात त्यांना उपयोगी पडली.

गजाननरावांचा पहिला लेख 'अ, ब आणि क' हा आनंद मासिकात प्रसिद्ध झाला तो असाच जगन्नाथमहाराजांनी त्यांना फसवून त्या मासिकाच्या संपादकांकडे पाठविल्यामुळे! त्या काळातील ही लिखाणाची स्फूर्ती या तरुणांना झाली याचे कारणही लोकमान्यांचे अग्रलेख ते लिहून घेणाऱ्याला सांगत असताना सतत कानावर पडल्यानेच! गजाननरावांप्रमाणेच श्रीधरपंतांनीही (बापू), 'पंत पडले व राव चढले' अशी एक सुंदर नाट्यच्छटा लिहिली व पुढे प्रसिद्धही झाली.

लोकमान्य विलायतेला गेले तेव्हा त्यांच्या सांगण्यावरूनच ते बडोद्याला बी. ए.च्या शेवटच्या वर्षासाठी गेले व पत्रकाराला कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे या

लोकमान्यांच्या सल्ल्यानेच त्यांनी मुंबईस एल्एल्. बी. केली. इंग्रजांच्या राज्यात पत्रकाराला प्रेस ॲक्टला तोंड देताना तारेवरची कसरत करावी लागे व त्यासाठी कायद्यातील खाचाखोचा माहिती असणे अगत्याचे होते. गजाननरावांना त्यांच्या या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग 'केसरी' चे संपादकत्व करताना खूपच झाला. अनेक वेळा त्यांचे लिखाण अवैधतेच्या रेषेला चाटून गेले आहे. 'आधी फाशी मग चौकशी,' 'देहान्त शासनाचे राष्ट्रीय बळी' आदि अग्रलेख ही त्यांच्या संपादकीय कौशल्याची जशी उदाहरणे आहेत, तशीच त्यांच्या कायद्याच्या ज्ञानाचा पुरेपूर उपयोग करून घेणाऱ्या चातुर्याचीही उदाहरणे ठरतात. कडयाच्या टोकावरून चालणारा माणूस किंवा दोरीवरून चालणारा डोंबारी जसे क्षणभर एखाद्याच्या हृदयाचे ठोके थांबवितो तशीच काहीशी स्थिती हे अग्रलेख वाचत असताना 'केसरी' वर प्रेम करणाऱ्या वाचकांची झाली असणार! तोल गेला की संपले! ही धास्ती ते मनी अग्रलेखांचे वाचन संपेपर्यंत बाळगत असणार! पण तोल जाऊ न देता आपला हेतू व सिद्धांत ठामपणे वाचकांच्या मनी बिंबवण्याचे चातुर्य गजाननराव केतकरांनी या अग्रलेखांतून दाखविले की ज्याचा उल्लेख न्याय-मूर्तींनाही करावा लागला. नहून त्याच विषयावरील अग्रलेखासाठी 'काळ' कडे जामीन मागितला गेला पण त्यापेक्षा धारदार व घणाघाती केसरीचे अग्रलेख मात्र न्यायालयात सुटते ना!

गजाननरावांनी आपल्या आयुष्याचे ध्येय पत्रकारिता हे ठरविलेच होते. त्यासाठीच त्यांनी आपल्या विद्यार्थी-जीवनात तयारी केली. विविध विषय वेगवेगळचा अंगांनी हाताळण्यात त्यांना आनंद वाटे. त्यांच्या अभ्यासाचे विषय होते गांधीवाद व गीता-तत्त्वज्ञान! आणि ते स्वाभाविकही होते. लोकमान्यांच्या निधनानंतर टिळक-मतप्रणालीवर गांधीवादाने मोठाच प्रच्छन्न हल्ला चढविला. गांधीवादातील अशास्त्रीयता जितक्या समर्थपणे तात्यासाहेब केळकरांनी चव्हाटचा-वर मांडली तितक्याच जोरकसपणे गजाननराव केतकरांनीही त्याचा प्रतिवाद केला. लोकमान्यांची भाषाशैली असो, कर्मयोगाचे तत्त्वज्ञान असो, प्रतिसहकारवाद असो, साऱ्यांचाच मूलग्राही अभ्यास 'केसरी'च्या संपादकपदी विराजमान होण्याची महत्त्वाकांक्षा धारण करणाऱ्याने करणे अगत्याचे होते व ते गजाननरावांच्या व्युत्पन्नमती बुद्धिमत्तेस केव्हाच अशक्य नव्हते. पण याव्यतिरिक्त हलकीफुलकी शब्दकोडी, विनोद-विमर्ष, जादूचे चौकोन आदि विषयही त्यांच्या लेखणीने कधी वर्ज्य मानले नाहीत. जे सुचेल ते लिहावे व सादर करावे ही पत्रकाराची मूळ प्रेरणा त्यांचे ठिकाणी असल्याने 'मी सोन्याचे टाकाने लिहीत नाही' असे परखडपणे अंगचोर किंवा लेखणीचोर सहसंपादकांना संपादकीय बैठकीत तोंडावर सांगण्यास त्यांनी कमी केले नाही. त्यांच्या या लिखाणाच्या हौसेमुळेच खरोखरी

ते ' केसरी 'तून ' तरुण-भारता 'त गेले. दैनिकात त्रिसाप्ताहिकापेक्षा अधिक लिहावयास मिळेल हा विचार त्यांच्या मनी प्रभावी होता; पण गजाननरावांची पत्रकारिता ' केसरी ' च्या कोंदणातच अधिक चमकली.

केसरीच्या संपादकपरंपरेत शोभणारे ते संपादक झाले याबद्दल कोणाचेच दुमत नाही लोकमान्यांना स्वभावतः लिहिण्याची हौस नव्हती. त्यांना ती गोष्ट केसरी–मराठा घेतल्यामुळे व आपल्या साध्यसाधनेसाठी करावी लागली. त्यांचे नातू गजाननराव केतकर यांना लिखाणाची हौस होती व त्यांनी आपली लेखणी टिळकमतप्रतिपादनार्थ तितक्याच निश्चयाने व स्पष्टवक्तेपणाने चालविली. एक गोष्ट खरीच की जग हे पुढे पुढे जात असते. बापाच्या खांद्यावर बसलेला मुलगा दूरवरचे क्षितिज पाहतो किंवा राजकीय भाषेत बोलावयाचे तर मागील जहाल पुढील काळात मवाळ बनतात ! ज्ञानाची क्षितिजेही विस्तारत जातात व ज्ञानवंताचे ज्ञानही भावी काळात तोकडे पडते. पत्रसृष्टीतही असेच होत गेले. भाषेत, विचारात, विषयात, ज्ञानात, पत्राच्या मुद्रणात, जुळणीत, संघटनेत फार मोठे बदल गेल्या दशकात झाले आहेत. पण पत्रकारितेचा, निर्भयपणाचा, निर्भीडपणाचा, ज्ञानार्जनाचा जो गाभा त्यात बदल झालेला नाही. केसरीच्या संपादकास तर लिखाणाबरोबर अनेक सार्वजनिक उपक्रमांत व चळवळीतही दाखल व्हावे लागते. ती केसरीची परंपरा आहे. लोकमान्यांनी जसे गीतारहस्य ' श्रीशाय जनतात्मने ' जनतेस अर्पण केले तसेच केसरीचा ट्रस्ट बनवून केसरीही लोकांना अर्पण केला. त्यामुळे केसरीच्या संपादकांना ते पद व्रत म्हणून स्वीकारावे लागते. त्या परंपरेतील, साखळीतील, रुद्राक्षांच्या माळेतील गजाननराव हे एक तेजस्वी वारस, भक्कम दुवा व रुद्राक्ष होते !

त्यांचे जीवनचरित्र त्यांच्या लिखाणातून त्यांच्या चिरंजीवांनी साकार केले याबद्दल धन्यवाद !

– ज. श्री. टिळक



१९४९ साली सत्कारप्रसंगी भाषण करताना



श्री. गजाननराव व सौ. सरस्वतीबाई




श्री. गजाननराव व सौ. अमलाबाई



श्री. गजाननराव केसरी–मराठा ग्रंथशाळेत

शुद्धिपत्रक

- गीताबीजाचे स्पष्टीकरण हा लेख ' गीता-बीज ' या पुस्तकातील आहे.
- साध्यानुकूल साधनविवेक या लेखांचे क्रमांक मुळात वेगळे आहेत. पृष्ठ ६६ वरील लेखाचा मथळा साध्यानुकूल साधनविवेक – ३ असा वाचावा.
- पृष्ठ ७९ वरील ' संकीर्ण विनोद विमर्ष ' हा लेखांक ५ होय.



ग. वि. केतकर यांचे हस्ताक्षर

अनुक्रमणिका

भाग १ : अल्पचरित्र

विषय	पृष्ठांक
अल्पचरित्र	१
लेखनशैलीचे रसग्रहण	२४

भाग २ : निवडक लेख


दोन महात्म्यांची अकल्पित कल्पित भेट	१
स्वराज्य पक्षाची कैफियत (लेखांक २)	८
कामात राम म्हणजे देवाची नित्य–पूजा	१३
गीताबीजाचे स्पष्टीकरण	१८
अलौकिक युगपुरुषाचे भीषण देहावसान	३३
आधी फाशी...मग चौकशी (लेखांक १)	३७
आधी फाशी...मग चौकशी (लेखांक २)	४१
आधी फाशी...मग चौकशी (लेखांक ३)	४५
राष्ट्रीय पापांचे तीर्थक्षालन	५०
साध्यानुकूल साधनविवेक–१	५५
साध्यानुकूल साधनविवेक–२	६१
साध्यानुकूल साधनविवेक–३	६६
सार्थ केळकरमत–विजय	७१
संकीर्ण विनोद विमर्ष ले. ५	७९
मृत्युंजय सावरकर	८७
कोंडीत सापडलेला आसाम	९१
खिश्चन देवदासींची करुण कहाणी	९५
माझ्या पिढीने पाहिलेल्या वृत्तपत्रांच्या पिढ्या	९७
२५ डिसेंबर ७४ : धर्मसाम्य दिवस	१००
गोमांस आणि माघमास	१०४
शुद्धीने हिंदूंचीही शुद्धी	१०८
शब्दशोध : ध्वजचिन्ह व वाहन	१११

विषय	पृष्ठांक
शब्दशोध : इंग्रजीचे सुप्त आक्रमण	११२
शब्दशोध : समाहारद्वंद्व समास	११३
शब्दशोध : मराठीतील प्रादेशिक प्रयोग	११४
स्वतः काही तरी करावे	११६
गीतेतला आवडता श्लोक	११९
जादूचे चौकोनावर संस्कार	१२०
केसरीची शंभर वर्षे : लोकजीवन आणि ' केसरी '	१२५
प्रश्नोक्त–उत्तर–माला	१३२

भाग ३ : लेख–सूचि

लेख–सूची वाचण्यापूर्वी	३
आठवणी–आत्मनिवेदन	५
धर्म : इस्लाम, ख्रिस्ती, बौद्ध, धर्मसमन्वय	७
धर्म : गीता	१२
धर्म : हिंदू, वेदवेदान्त, तत्त्वज्ञान	१६
राजकीय : जागतिक–परदेशी	२१
राजकीय : भारतीय	३५
राजकीय : हिंदुसभा, हिंदुत्व, शुद्धी, संघटन	८५
व्यक्ती	९०
व्यक्ती : लो. टिळक	९७
सामाजिक	१०१
साहित्य	१०५
साहित्य : भाषा	१०७
साहित्य : समालोचन	१०९
संकीर्ण	११४
केतकरांसंबंधी लेख	१२६
ग्रंथ–सूची	१२९
लेख–सूची : इंग्रजी	१३०

भाग १ : अल्पचरित्र



अल्पचरित्र

पत्रकार कै. ग. वि. केतकर यांचं हे अल्पचरित्र लिहिताना त्यांच्या आयुष्यात घडलेल्या घटना आणि त्यांचं कार्य यांची सुसंगत रचना केली आहे. घटनांचं महत्त्व आणि कार्याची महती यांचा जरूर तेथे उल्लेख केला आहे. चरित्रनायक म्हणून त्यांच्या राईएवढ्या चांगल्या गोष्टीला पर्वताचं रूप दिलेलं नाही अथवा डोंगराएवढ्या चुकांचं (?) समर्थन करण्याचाही प्रयत्न केलेला नाही ! काही प्रसंगी त्यांनी स्वत: सांगितलेल्या आठवणी किंवा आत्मनिवेदनं यांतील माहिती अथवा संदर्भ दिला आहे.

जन्म, कुल नि बालपण

गजाननरावांचा जन्म दि. ८ ऑगस्ट १८९८ रोजी पुण्यात लोकमान्य टिळकांच्या घरी (विंचूरकर वाड्यात) झाला. त्यांच्या मातु:श्री पार्वतीबाई या लोकमान्यांच्या ज्येष्ठ कन्या होत. त्यांचे वडील विश्वनाथराव हे नाशिकचे वकील श्री. गंगाधरपंत यांचे ज्येष्ठ चिरंजीव होत. (या ज्येष्ठ कन्येचा आणि ज्येष्ठ चिरंजीवांचा विवाह ज्येष्ठ महिन्यात झाला !) गंगाधरपंत हे नाशिकचे सुप्रसिद्ध वकील होते, काही काळ नाशिक नगरपालिकेचे अध्यक्ष होते. यांच्या स्मरणार्थ नाशिकचा ' केतकर टाऊन हॉल ' बांधण्यात आला आहे. गंगाधरपंतांची राजकीय मते ' रानडे ' पंथाची होती. ते काँग्रेसच्या अधिवेशनाला जात, तेथे त्यांची लोकमान्यांशी ओळख झाली होती. या ओळखीचं नंतर ' व्याही ' या नात्यात रूपांतर झालं असं म्हणता येईल. गजाननरावांचे वडील विश्वनाथराव तथा अप्पासाहेब हेही नाशिकमधले नामांकित वकील होते. ते नाशिक नगरपालिकेचे सलग नऊ वर्षे अध्यक्ष होते असा उल्लेख सापडतो. नाशिकचं केतकरांचं घर म्हणजे त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे एक मोठं संयुक्त कुटुंब होतं, अनेक गरजू नि निराधार नातलगांचा तो एक आधार होता.

गजाननरावांना त्यांच्या कुटुंबातील मोठी माणसं ' गणपती ' म्हणत (लोकमान्यांच्या मृत्युपत्रात याच नावानं उल्लेख आहे) आणि धाकटी भावंडे ' दादा ' म्हणत. मोठेपणी ते अनेकांना ' ग. वि. ' या आद्याक्षरांनी परिचित होते, पण त्यांचे सहकारी त्यांना ' गजाननराव ' अथवा ' दादासाहेब ' म्हणत. याच दोन नावांनी त्यांचा यापुढे उल्लेख केला आहे.

' बालपणीचा रम्य काल ' आणि ' मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ' या रूढ कल्पनांना खुद्द दादासाहेबांनीच ' माझे बालपण ' या नावानं लिहिलेल्या

आत्मनिवेदनात धक्का दिला आहे. ते म्हणतात, " मी अति हट्टी आणि रडका मुलगा होतो. घडीघडी आठवण्यासारखा हा रम्य काल आहे असं मला वाटत नाही. तसेच असला बावळा मुलगा पुढे पत्रकार आणि लेखक होईल असे कोणासही त्या वेळी वाटण्यासारखे नव्हते." 'खरे ते सांगावे, उगाच थापा मारण्यात अर्थ नाही – – – – ' या निवेदनात पुढे ते म्हणतात की, " अभ्यास व टापटीप ही मला (बालपणी) कधीच स्पर्श करू शकली नाहीत." शाळेच्या अभ्यासात ते जसे चमकले नाहीत तसे कधी अनुत्तीर्णही झाले नाहीत.

शालेय शिक्षण घेत असताना त्यांनी श्री. फाटक नावाच्या शिक्षकांकडून मलखांब आणि डबलबार या व्यायामप्रकारांचं शिक्षण घेतलं. यांपैकी डबलबारचा तरुणपणी त्यांनी सराव ठेवला; तसंच ते काही काळ न्यू इंग्लिश स्कूलमध्ये डबलबार शिकवत होते. तरुणपणी दमा असूनही त्यांचं शरीर कमावलेलं दिसे ते या डबलबारमुळेच.

मॅट्रिकच्या वर्गात असताना त्यांनी श्री. जोगळेकर यांच्याकडून संस्कृतचं खास शिक्षण घेतलं. श्री. जोगळेकर अंध होते. त्यांची स्मरणशक्ती आणि शिकवण्याची हातोटी फार चांगली होती. या संस्कृत शिकण्याचा त्यांना पुढे विविध संस्कृत ग्रंथांच्या अभ्यासासाठी उपयोग झाला

पुण्यात लोकमान्यांकडे

नाशिकच्या हायस्कूलमधून १९१४ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर तिथे कॉलेज नसल्यामुळे ते पुण्यास लो. टिळकांकडे रहावयास आले तेव्हा टिळकांचे वास्तव्य गायकवाडवाड्यात होते. त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या वार्षिक परीक्षा मार्चमध्ये बदलण्यात आल्या. त्यामुळे कॉलेजच्या पहिल्या वर्षासाठी गजाननरावांच्या ' तीन टर्म्स ' गेल्या. गायकवाडवाड्यातून फर्ग्युसन कॉलेजला ते तीन वर्षे पायीच जात-येत, असा त्यांनी एका आठवणीत उल्लेख केला आहे. या तीन वर्षांत त्यांचं वास्तव्य टिळकांकडे असल्यामुळे, अनेकदा लोकमान्य अग्रलेख सांगत असताना खोलीबाहेर बसून ऐकले. केसरी-मराठा ग्रंथालयात वाचनही केलं. १९१८ च्या मे महिन्यात ते लोकमान्याबरोबर सिंहगडावर राहिले होते. याच वेळी टिळक-गांधी भेटीना ते हजर होते. या त्यांच्या तीन-चार वर्षांच्या टिळक-सहवासाचा त्यांच्या मनावर कायमचा ठसा राहिला. त्यांनी इंटरच्या परीक्षेपर्यंत स्वतःच्या आवडीचा गणित हा विषय घेतला होता. नंतर बी. ए. साठी त्यांनी लोकमान्यांच्या सांगण्यावरून इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय घेतले.

सर्वसाधारणपणे, ' माझा पहिला प्रवास, ' – ' पहिला पगार ' इत्यादींना एक वेगळं महत्त्व दिलं जातं. गजाननरावांचा विद्यार्थीजीवनात प्रसिद्ध झालेला

'पहिला लेख' होता, 'अ, ब आणि क' या विद्यार्थ्यांना डोकेदुखी देणाऱ्या गणितातल्या व्यक्तींबद्दल. तो लेख आनंद मासिकात छापून आला, पण श्री. जगन्नाथ वासुदेव पंडित या नावाने ! श्री. जगन्नाथमहाराज त्या वेळी लोकमान्यांकडेच शिक्षणासाठी रहात होते. त्यांनी तो लेख गजाननरावांना न सांगता मासिकाकडे पाठवला आणि छापून आल्यावर मासिक त्यांच्या समोर ठेवलं.

लोकमान्यांच्या सांगण्यावरून (बहुधा, त्या वर्षी लोकमान्य विलायतेला जाणार होते म्हणून) बी. ए. च्या शेवटच्या वर्षासाठी गजाननराव बडोद्याला गेले तिथे महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहून त्यांनी पदवी-परीक्षा दिली; ती उत्तीर्ण झाल्यावर ते एल्एल्. बी. साठी मुंबईला आले. बी. ए. चे विषय जसे लोकमान्यांच्या सल्ल्याने ठरले, तसेच पत्रकाराला कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे या लोकमान्यांच्या सल्ल्यानेच एल्एल् बी. होण्याचे ठरले. वडील आणि आजोबा वकील होते ही वस्तुस्थिती–पण ते एल्एल्. बी. होण्याचे कारण नव्हे !

उच्च शिक्षण व सार्वजनिक जीवन

पदव्युत्तर शिक्षणासाठी मुंबईत असतानाच त्यांच्या लेखनाची आणि सार्वजनिक जीवनाची सुरुवात झाली. श्री. ब्रह्मनाळकरबुवा यांच्या श्रीहरिकीर्तनालय संस्थेचं प्रचारकार्य आणि कार्यवाहपद त्यांनी सांभाळलं. मुंबई व नाशिक इथे भरलेल्या 'कीर्तन संमेलना'त त्यांनी भाग घेतला. 'कीर्तन' मासिकात लेखन केलं आणि काही काळ त्याचं संपादकपदही भूषवलं. या कीर्तनकार्यात त्यांचा श्री. भिडे शास्त्री यांचा परिचय झाला

१ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्यांचं मुंबईला सरदारगृहात निधन झालं, तेव्हा गजाननराव आपल्या मातुःश्री व भावंडांसह तेथे गेले होते. लोकमान्यांच्या अस्थीचं विसर्जन त्यांनी प्रयागक्षेत्री जाऊन केलं.

ते एल्एल्. बी. च्या दुसऱ्या परीक्षेला बसण्यापूर्वी असहकारितेची चळवळ सुरू झाली. त्यात भाग घेण्यासाठी त्यांनी टर्म सोडून दिली. नंतर ते ऑक्टोबर १९२१ मध्ये एल्एल्. बी. ची दुसरी परीक्षा उत्तीर्ण झाले. तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना वकिली करण्यासाठी नाशिकला बोलावले. त्यांनी आपल्याला वकिली करायची नसून, पत्रकार व्हायच आहे असं वडिलांना कळवलं; तसं न केल्यास लोकमान्यांच्या सान्निध्यातलं आपलं वास्तव्य निरर्थकच ठरेल असंही सांगितलं. त्यांचा निग्रह लक्षात घेऊन वडिलांनी या निर्णयास संमती दिली.

पत्रकारितेचे धडे

वरील निर्णयाप्रमाणे त्यांनी १९२२ साली मार्च महिन्यात केसरी–मराठा संस्थेत उपसंपादक म्हणून प्रवेश केला. तेव्हा श्री. न. चिं. केळकर मुख्य संपादक होते. टिळक-चरित्र आणि समग्र वाङ्मय यांचं काम चालू होतं. गजाननरावांनी त्या वेळी लोकमान्यांच्या चरित्राच्या पहिल्या भागाच्या लेखनाचं काम, राजकीय लेखसंग्रहाची मुद्रिते तपासणं, आठवणींचे तीन खण्ड व टिळक सूक्ती-संग्रह मूळ प्रत वाचून त्यांचा संक्षेप करणं इत्यादी कामं केली. या कामांमुळे सहजपणे लोकमान्य टिळकांच्या भाषाशैलीचा अभ्यास झाला. तसंच त्यांना तात्यासाहेब केळकरांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारितेच्या क्षेत्रातला कार्यानुभव मिळाला असंही म्हणता येईल.

विवाह – संसारदक्ष पत्नी

गजाननरावांचा विवाह १९२२ साली मे महिन्यात नाशिकला झाला, नागपूरचे नामांकित सर्जन डॉ. परांजपे यांची कन्या कु. प्रेमला यांच्याशी. विवाहानंतर त्यांचं नाव सौ. सरस्वती असं अनुरूप ठेवण्यात आलं. त्या मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या होत्या. त्या वेळच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे त्यांनी पेटीवादन आणि भरतकाम यांत चांगली प्रगती केली होती. केतकरांच्या नाशिकच्या मोठ्या घरात त्या जबाबदारीने वागल्या आणि स्वतंत्र संसारात त्यांनी सर्वच जबाबदारी सांभाळली. यामुळे गजाननरावांना घरची कोणत्याही प्रकारची काळजी न करता सार्वजनिक आणि राजकीय कार्य करता आलं. सौ. सरस्वतीबाईंना त्यांच्या आईकडून भेट म्हणून दुमजली घर मिळालं होतं. त्या वेळच्या संपादकाच्या बेताच्या पगारातही काटकसर करून त्यांनी पुढे त्या 'दुमजली' चं 'चार-मजली' घर केलं. मुलं थोडी मोठी झाल्यावर घर सांभाळून लोकशाही स्वराज्य पक्षाची स्त्रीशाखा आणि राष्ट्रसेविका समिती यांचं कार्य केलं. याच क्षेत्रातल्या त्यांच्या एक सहकारी सौ. ताई आगाशे यांनी पुढे सौ. सरस्वतीबाईंच्या स्मरणार्थ 'जिजामाता बालक मंदिर' ही संस्था काढली; अजूनही ही संस्था अस्तित्वात आहे.

गीता-धर्म-मंडळ : डबलबार

श्री. भिडेशास्त्री हे श्री. ब्रह्मनाळकरबुवा यांच्या मृत्यूनंतर पुण्याला आले. त्यांच्यासह १९२४ मध्ये गजाननरावांनी गीता-धर्म-मंडळ स्थापन केलं. गीतेचे सारभूत श्लोक निश्चित करून गीताबीज हे छोटं पुस्तक प्रसिद्ध केलं (१९२४). या पुस्तकाचा खर्च वसूल झाल्यावर त्यांनी याच्या उरलेल्या सर्व प्रती गीता-धर्म-मंडळाला भेट म्हणून दिल्या. याची दुसरी आवृत्ती १९३० मध्ये निघाली, त्यात गीतेचे सारभूत ६१ श्लोक, त्यांचा अन्वयार्थ आणि ते ६१ श्लोक निवडण्याची

कारणमीमांसा 'स्पष्टीकरण' म्हणून दिली आहे. [यातला 'स्पष्टीकरणा' चा भाग या पुस्तकात पुनर्मुद्रित केला आहे.] गीतेचं तत्वज्ञान आणि मंडळ यांचं प्रसारकार्य यांत त्यांनी नेहमीच सक्रिय भाग घेतला. श्री. ज. स. करंदीकरांनी याच सुमारास गीताजयंतीची 'मार्गशीर्ष शुद्ध एकादशी' ही तिथी निश्चित केली. तेव्हा या दिवशी सर्वत्र गीता-जयंती हा उत्सव करण्याची गजाननरावांनी योजना मांडून तिचा प्रचार केला. या काळातल्या गीता-जयंतीनिमित्ताने लिहिलेल्या लेखांपैकी काही लेख 'मार्तंड' व 'प्रताप' या हिंदी नियतकालिकांतही आढळतात.

या काळात, म्हणजे १९२२ ते २५, गजाननरावांचं लेखन गीता, गीतारहस्य, गणेशोत्सव, निवडणुका - राजकारण अशा विविध विषयांवर झालं. त्यांनी १९२३ साली केसरीत लिहिलेले 'स्वराज्य पक्षाची कैफियत' चे २ ते ५ लेखांक नजरचुकीने (लेखन-साधर्म्यामुळे?) समग्र केळकर वाङ्मयात घेतले गेले. असे एकूण १६ लेख केळकर वाङ्मयात घेतले गेले, त्याचे एक छापील पत्रक श्री. म. म. केळकर यांनी नंतर प्रसिद्ध केलं. [पुस्तकात दिलेल्या लेखसूचीत अशा लेखांच्या मथळ्यानंतर '(केळ)' असा निर्देश केला आहे.] १९२५ साली त्यांनी केसरीत कै. सर सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांचा परिचय करून देणारी "सुरेन्द्र जीवन-स्मृती" ही अकरा लेखांची पहिली प्रदीर्घ लेखमाला लिहिली.

'डबलबार' या व्यायामप्रकारात गोडी नि गती असल्यामुळे या विषयावर गजाननरावांनी 'चित्रमयजगत्' मध्ये लेख लिहिले. यांचं एक सचित्र पुस्तक १९२५ मध्ये प्रसिद्ध झालं. या पुस्तकाच्या ज्या प्रती त्यांना 'प्रकाशन हक्क' या रूपाने मिळाल्या त्या त्यांनी 'महाराष्ट्र मंडळा' ला भेट दिल्या. कामाचा सर्व व्याप सांभाळून ते काही काळ या संस्थेत डबलबारच्या सरावासाठी जात होते.

काँग्रेसचे चिटणीस : तात्पुरते मुख्य संपादक

केसरी-मराठा संस्थेत आल्यापासून दादासाहेबांनी काँग्रेसच्या कार्यात सक्रिय भाग घेण्यास सुरुवात केली होती. त्याला मान्यता मिळून १९२७ मध्ये त्यांना महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचं चिटणीसपद मिळालं. त्यांनी काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या ध्येयप्रसारासाठी महाराष्ट्राचा दौरा केला. ते १९२९ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस समितीवर निवडून आले; हे सभासदत्व १९३४ पर्यंत होतं. त्यांनी युवक परिषदेत आणि मिरजेच्या शेतकऱ्यांच्या सत्याग्रहात भाग घेतला होता. काँग्रेसच्या लाहोर-अधिवेशनाला ते हजर होते, तेव्हा क्रांतिकारकांच्या निषेध करणाऱ्या ठरावाला त्यांनी विरोध केला.

१९२८ साली तात्यासाहेब केळकर सुमारे एक वर्षाच्या रजेवर गेले असता, दादासाहेब केसरीचे तात्पुरते मुख्य-संपादक झाले. या वेळी ते तात्यासाहेबांशी सर्व

लेखांविषयी चर्चा करीत आणि त्यांचा निर्णय मानत. या वेळचे त्यांचे गाजलेले लेख म्हणजे, 'प्रतियोगींच्या पुढे अतियोगी,' 'राजकारणाचे अंती रण आहे,' 'अंतिम रणाची दीर्घ सूचना' इत्यादी. या लेखांमुळे केसरीवर संकट येईल असं अनेकांना वाटलं; पण प्रत्यक्षात तसं घडलं नाही. तसं काही झालंच तर लोकमान्यांच्या आदर्शाप्रमाणे खटला लढवण्याची दादासाहेबांची तयारी होती. बॅ. सावरकरांच्या 'हिंदुपदपादशाही' या पुस्तकाच्या डॉ. सावरकरांनी केलेल्या मराठी भाषांतराला त्यांनी प्रस्तावना लिहिली.

केसरीत त्यांनी जुलै-ऑगस्ट १९२९ मध्ये लोकमान्य टिळकांच्या भाषाशैलीचा परत सखोल अभ्यास करून चार लेखांक लिहिले. हे लेख श्री. पां. के. शिराळकर यांना फार आवडले. त्यांच्या सूचनेवरून गजाननरावांनी या लेखांत भर घालून 'लो. टिळकांची भाषाशैली' हे पुस्तक लिहिलं आणि लेखनाचा मोबदला न घेता अ. वि. गृहाला प्रकाशनासाठी दिलं. याच्या कागद-छपाई-खर्चासाठी श्री. शिराळकर यांनी अ. वि. गृहाला देणगी दिली. हे पुस्तक १९३१ मध्ये प्रसिद्ध झालं

१९२५ ते १९२९ या काळात दादासाहेबांचं वास्तव्य पुण्यात श्री. शं. वि. गोखले यांच्या नागनाथपाराजवळच्या घरात भाडेकरू या नात्यानं होतं. नंतर ते, पूर्वी उल्लेख केलेल्या, दुमजली घरात – टिळक स्मारक मंदिराच्या मागे – रहायला गेले.

दौरे आणि कारावास

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी १९३० साली 'मिठाच्या सत्याग्रहा' साठी रत्नागिरी-कुलाबा भागाचा प्रचारदौरा केला. या वेळी म. गांधींशी त्यांची भेट झाली. मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल त्यांना व श्री. रामभाऊ मंडलिक यांना पेण गावी अटक होऊन नऊ महिन्यांची शिक्षा झाली. त्यांना ठाणे येथील तुरुंगात ठेवलं होतं.

नंतर काँग्रेसच्या कराचीं अधिवेशनात त्यांनी भगतसिंगादि क्रांतिकारकांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. म. गांधींचा विरोध असूनही ठरावाला श्री. सुभाषचंद्र बोस आदींचा पाठिंबा मिळाल्यामुळे तो ठराव थोडाफार फरक करून संमत झाला. १९३१ मध्ये त्यांनी 'दक्षिणी संस्थान प्रजापरिषदे' च्या वतीनं दक्षिणेत रामदुर्ग-पर्यंत व्याख्यानांचा दौरा केला. याच काळात त्यांनी केसरी-मराठामध्ये श्री. राजवाडे यांची सुटका व्हावी म्हणून लेख लिहिले.

नाशिकमध्ये चार वर्षे

दादासाहेबांचे वडील दि. ८ सप्टेंबर १९३१ रोजी निधन पावले. ज्येष्ठ पुत्र अथवा कुटुंबातील मोठा भाऊ या नात्यानं त्यांना सर्व जबाबदारी पार पाडणं

आवश्यक होतं. यामुळे केसरी-मराठा संस्था सोडूनच ते नाशिकला गेले. वडिलांची वकिली पुढे चालवणं हाच अर्थप्राप्तीचा मार्ग होता. त्यासाठी एल्एल्. बी. होऊनही वकिलीची सनद घेतलेली नव्हती ती प्रथम घेतली. तीन-चार वर्षं वकिली केली. त्यांच्याच भाषेत ' वकिलीचं सोंग ' केलं, कारण त्यात गोडी नव्हती.

या वेळी त्यांचे एक बंधू अनंतराव काँग्रेसच्या कार्यात भाग घेतल्यामुळे कारावासात होते. दुसरे बंधू विनायकराव हे ' ॲक्चुअरी 'साठी जर्मनीला गेलेले होते त्याखेरीज धाकटे बंधू शाळा-कॉलेजमध्ये शिकत होते. नाशिकचं मोठं घर, वडिलांचे देण्या-घेण्याचे व्यवहार आणि भावांची शिक्षणं हे सांभाळण्यात तीन-चार वर्षं गेली. त्यातच १९३२ च्या ऑर्डिनन्समुळे खुद्द गजाननराव दोन महिने तुरुंगात अडकले गेले !

या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत असतानाही त्यांनी किर्लोस्कर, तत्त्वज्ञान मंदिर, पारिजात, लोकसत्ता (नाशिक) इत्यादींत लेख लिहिले. नाशिकमध्ये एका शाळेजवळ दारूचा गुत्ता होता, तो तेथून हलवण्याच्या चळवळीत भाग घेतला. नाशिकच्या तुरुंगात अमृतलाल मुरारजी यांना मारहाण झाल्याची बातमी मिळवून त्याचा निषेध केला.

वीर बापू गायधनी यांनी आगीतून अनेकांची सुटका करताना स्वतःच्या प्राणाचं मोल दिलं. ही गोष्ट त्यांनी अनेक इंग्रजी वर्तमानपत्रांना कळवली. ती बातमी ' यंग इंडिया ' मध्ये देताना म. गांधींनी, " केसरीचे श्री. केतकर कळवतात की ..." अशी सुरुवात केली होती. [वास्तविक तेव्हा गजाननराव केसरीत नव्हते. पण ' केसरी'चे केतकर ' म्हणूनच परिचित होते.] त्या बातमीनंतर म. गांधींनी दोन ओळी लिहिल्या, त्यांचा आशय असा- " बापू गायधनी मरणानं जगत आहे. त्याचे माता-पिता, हयात असतील तर, त्यांनी या शूर पुत्राचा अभिमान बाळगावा. " वीर बापू गायधनी स्मारक योजना डॉ. गायधनी, गजानन-राव व इतरांनी सुरू केली, तिला म. गांधींच्या या दोन ओळींमुळे लोकांकडून जास्त प्रतिसाद मिळाला.

याच सुमारास डॉ. मुंजे त्यांच्या संकल्पित सैनिकी विद्यालयासाठी जागेच्या शोधात होते. गजाननरावांनी त्यांना केतकरांची आनंदवल्लीजवळची सुमारे ३५ एकर जमीन ते मागतील त्या (नाममात्र) दरानं देण्याचं आश्वासन दिलं. पुढे ' भोसला मिलिटरी स्कूल 'च्या इमारती बांधण्यासाठी हीच जमीन प्रथम डॉ. मुंजे यांच्या उपयोगी पडली. आसपासची जमीन नंतर ताब्यात आली.

परत केसरी–मराठा

नाशिकचा सर्व व्यवहार संपवून १९३५ च्या मे महिन्यात ते परत केसरी-मराठा संस्थेत, ' मराठा 'चे संपादक या नात्याने आले. हे संपादकत्व त्यांनी १९५० पर्यंत सांभाळलं. मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये लेखन करणाऱ्या फार थोडया पत्रकारांपैकी ते एक होते.

अनेक गोष्टींची साद्यंत माहिती मिळवून ती केसरी–मराठा पत्रांच्या वाचकांना लेखरूपानं सादर करण्याची त्यांची पद्धत होती. या काळात त्यांनी कॅलिफोर्नियातील प्रा. समरस यांच्याकडून अमेरिकेतील हिंदू क्रांतिकारक ' गदर पार्टी ' चा इतिहास मागवला. त्यावर मराठामध्ये लेखमाला लिहिली. लो. टिळकांनी पं. शामजी कृष्णवर्मा यांना लिहिलेली पत्रं फ्रान्समधील मि. राणा यांच्याकडून मिळवली आणि केसरीत प्रसिद्ध केली (३१–७–३६). मॅडम् कामा यांचा आद्य स्वातंत्र्य ध्वज आणि स्वातंत्र्यदिनाची घोषणा वाचकांना सादर केली. लंडनमधील ' अभिनव-भारत ' च्या सभासदांचं छायाचित्र मिळवून त्याला प्रसिद्धी दिली. हे सर्व केसरी कार्यालयात जपून ठेवलेले आहे.

लोकशाही स्वराज्य पक्षात प्रवेश करून गजाननरावांनी १९३६ मध्ये पक्षाचं कार्यवाहपद स्वीकारलं. लोकशाही पक्षातर्फे ' लोकमान्य वस्त्रदान समिती ' आणि तिचं आषाढी यात्रेबरोबर जाणारं वैद्यकीय पथक यांच्या कार्यात सहभागी झाले. बंगालमधल्या राजबंदिनींच्या सुटकेसाठी अर्ज पाठवून खटपट केली. पुण्यात १९३७ सालच्या मे महिन्यात झालेल्या ' सोन्या मारुती ' चळवळीचा प्रसार, त्यासाठी येणाऱ्या सत्याग्रहयांची व्यवस्था पाहणं हे काम त्यांनी केलं. यानिमित्तानं उभारलेला छोटासा निधी सुमारे रु. ३००।-- इतका जमला होता.

गजाननरावांना १९३७ मध्ये केसरी-मराठा संस्थेचं विश्वस्तपद मिळालं आणि ते त्यांनी जबाबदारीनं १९५० पर्यंत सांभाळलं.

भागानगरचा लढा

बॅ. सावरकरांच्या बुद्धिवादी विचारांशी सहमत होऊन त्यांनी हिंदुसभेच्या कार्यात भाग घ्यायला सुरुवात केली. त्या काळात लोकशाही स्वराज्य पक्ष, हिंदुसभा आणि रा. स्व. संघ अशा तीन भिन्न संस्था वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करीत असल्या तरी त्यांचे संबंध एकमेकांस पूरक होते असं म्हणता येईल. हैदराबाद संस्थानातल्या हिंदूंच्या धार्मिक अधिकारांच्या संरक्षणासाठी ' भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलन ' उभारण्यात बॅ. सावरकर आणि सेनापती बापट यांनी पुढाकार घेतला. आंदोलनाची सुरुवात सप्टेंबर १९३८ मध्ये झाली. या आंदोलनाला संस्थानी

प्रजेकडून मोठा प्रतिसाद मिळाला. प्रथम या लढ्यात सहभागी झालेली स्टेट काँग्रेस नंतर म. गांधींच्या मान्यतेच्या अभावी जानेवारी १९३९ ला त्यातून बाहेर पडली. या लढ्याचं प्रचारकार्य आणि व्यवस्था गजाननरावांकडे - पुणे केंद्र - कार्यालयातील समितीचे अध्यक्ष या नात्याने होती. ती त्यांनी उत्तम रीत्या पार पाडली. केसरीच्या दि. १८–११–३८ च्या एकाच अंकात त्यांचे या चळवळीच्या संबंधी तीन लेख सापडतात. या आंदोलनासाठी उभारलेला निधी त्या काळात रु. ४५,०००/– इतका मोठा जमला होता. या निधीचा चोख हिशेब ठेवून गजाननरावांनी लोकांचा विश्वास संपादन केला. ऑगस्ट १९३९ मध्ये जाहीरनामा निघून संस्थानी हिंदू प्रजेला नागरिक स्वातंत्र्याचे हक्क मिळाले तेव्हा हिंदुसभेनं हा लढा स्थगित केला

या आंदोलनानंतर दादासाहेबांची अखिल भारतीय हिंदुसभेच्या कार्यवाहपदी निवड झाली. भागानगर सत्याग्रह संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी 'हिंदुसंघटन निधी' या नावानं एक कायम स्वरूपाचा निधी उभारून अनेकांना वेळोवेळी मदत केली. हा निधी सुमारे रु. ३० ०००।-- इतका जमला होता. हिंदुसभेचे कोषाध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षं काम केलं; यामागे त्यांच्यावरचा लोकांचा विश्वास होता. हा विश्वास राखण्यासाठी त्यांनी क्वचित् प्रसंगी स्वतःचं उत्पन्न निधीत घातलं आहे. निधीतून स्वतःचं उत्पन्न काढण्याचं कसब (?) त्यांना कधीच जमलं नाही ! ते गमतीनं म्हणत, 'मी पैसे खाऊ शकत नाही याबद्दल सर्वांची खात्री झाली आहे !'

हिंदू–अनाथाश्रम

हिंदू आश्रमाचं नाव 'हिंदु-अनाथाश्रम' असं १९४० मध्ये करून हा आश्रम त्यांनी निराधार मुलांसाठी चालवला. श्री. ज. श्री. टिळक व श्री. ग. वि. केतकर या आश्रमाचे अनेक वर्षे संयुक्त कार्यवाह होते. या आश्रमासाठी स्वतंत्र निधी उभारून त्याची व्यवस्था गजाननरावांनी पाहिली. सुरुवातीची काही वर्षं देशदास रानडे या आश्रमात राहून मुलांची व्यवस्था पहात. नंतर श्री. वि. वा. भट व त्यांच्या पत्नी सौ. अंबूताई भट यांनी आश्रमात राहून सर्व व्यवस्था पाहिली. हा आश्रम 'मोठा' झाला नाही, तरी १९५४ पर्यंत काही गरजू मुलांना आधार होता.

हिंदी संमेलन : भोपटकर सत्कार

पुण्यात १९४० मध्ये हिंदी साहित्य संमेलन भरलं होतं. तेव्हा हिंदुस्थानी भाषेचा पुरस्कार करणाऱ्या गटाला विरोध करून गजाननरावांनी संस्कृतनिष्ठ-हिंदीच्या पुरस्कर्त्यांचं बहुमत तयार करण्यात पुढाकार घेतला. पुढे १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाल्यावरही राष्ट्रभाषा हिंदी असावी म्हणून त्यांनी प्रचार केला.

केसरीचे विश्वस्त आणि हिंदुसभेचे पुढारी श्री. ल ब. तथा अण्णासाहेब भोपटकर यांच्या षष्टचब्दीपूर्तीचा समारंभ १९४० मध्ये झाला. त्यात दादासाहेबांनी सहभाग घेतला आणि या निमित्ताने जमवलेल्या निधीची व्यवस्थाही पाहिली.

पाकिस्तान–विरोध : भागलपूर अधिवेशन

फेब्रुवारी १९४१ मध्ये पाकिस्तान - विरोधी परिषद दिल्लीला भरली होती. त्या परिषदेचं अध्यक्षपद गजाननरावांनी भूषवलं होतं. या प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणाचा सविस्तर वृत्तांत केसरीच्या दि. ७–२–१९४१ च्या अंकात पहायला मिळतो.

हिंदुसभेचं भागलपूरचं अधिवेशन डिसेंबर १९४१ मध्ये योजण्यात आलं होतं. त्याला प्रांतिक शासनानं बंदी घातली. हा बंदी-हुकूम मोडून तिथे अधिवेशन भरवण्याचं ठरलं. यासाठी सर्व स्वयसेवकांना तेथे पाठवण्याची व्यवस्था गजानन-रावांनी केली. तसंच या प्रसंगी त्यांनी अटक चुकवून सभा भरवली आणि अधिवेशनसमाप्ती जाहीर केली.

सावरकर–सत्कार : रणांगणावर गीता

बॅ. सावरकर यांचा षष्टचब्दीपूर्तीनिमित्त सत्कार १९४३ च्या मे महिन्यात झाला. यात गजाननरावांनी आवश्यक तो कार्याचा वाटा उचलला आणि या निमित्तानं जमा करण्यात आलेल्या निधीचं कामही त्यांनी पाहिलं.

गीता-जयंती उत्सव सुरू केल्यापासून त्याला थोरांची मान्यता मिळण्याची खटपट दादासाहेब करीत होते. याला यश येऊन १९४३ मध्ये थिऑसॉफिकल् सोसायटीचे श्री. अरुंडेल यांनी मान्यता दिली; तसंच १९४४ साली म. गांधींचीही मान्यता मिळाली. याच काळात, दुसऱ्या महायुद्धात भारताच्या पूर्व-आघाडीवरचे एक मेजर श्री. गुलझारीलाल कोहली यांना रणांगणावर सैनिकांना गीतेच्या प्रती वाटल्यास त्याचा उपयोग होईल असं वाटलं. त्यांनी यासाठी, गीता धर्म मंडळाचे चिटणीस या नात्यानं, गजाननरावांना लिहिलं. मंडळाच्या संग्रही असलेल्या गीतेच्या प्रती पाठवण्यात आल्या. जास्त प्रतींसाठी गजाननरावांनी केसरीच्या दि. ३१–१०–१९४४ च्या अंकातून वाचकांना आवाहन केलं. याला प्रतिसादरूपानं सुमारे १००० प्रती आल्या, त्याही सैनिकांना वाटण्यासाठी पाठवण्यात आल्या.

हिंदुत्वाची राष्ट्रीय मीमांसा

मराठामध्ये १९४५ साली लिहिलेल्या उल्लेखनीय लेखांत 'पोलिटिकल् डिमांडस् ऑफ हिंदुसभा' आणि 'फेल्युअर ऑफ गांधीझम्' यांचा समावेश करता येईल. याच काळातली त्यांची केसरीतली 'राष्ट्रमूल निष्ठांची टिप्पणी' ही लेखमाला

अशीच उल्लेखनीय आहे. केसरीतल्या अनेक हिंदुत्वविषयक लेखांचं–विशेषतः १९४१ सालातल्या – एक संकलित पुस्तक 'हिंदुत्वाची राष्ट्रीय मीमांसा' या नावानं १९४५ मध्ये प्रसिद्ध झालं. केसरीच्या दि. २१–११–१९४१ च्या अंकातल्या लेखाचा मथळा हाच होता, त्यावरूनच हे नाव दिलं गेलं.

मराठावर संकट

१९४७ च्या जानेवारीत मुंबई सरकारने मराठाकडून रु. ६०००/चा जामीन मागितला. तो मराठात प्रसिद्ध झालेले दंग्याचे वृत्तांत, भाषणांचा सारांश आणि एका पुनर्मुद्रित पत्राबद्दल मागण्यात आला होता. तीन महिन्यांनी सरकारनं तो जप्त केला आणि नवीन रु. २०,०००/–चा जामीन मागितला. या वेळी आक्षेपार्ह ठरवलेल्या पाच लेखांत एकही अग्रलेख नव्हता. हिंदुसभेचे अध्यक्ष, केसरीचे विश्वस्त आणि कायद्याचे सल्लागार श्री. ल. ब. तथा अण्णासाहेब भोपटकर यांचं एक पत्रक आक्षेपार्ह यादीत घालण्यात आलं होतं. या सरकारी संकटामुळे गजाननरावांपुढे गंभीर प्रश्न उभा राहिला की, आता मराठा चालवायचा की नाही ? आणि चालवायचा तर कसा ? त्यांना या बाबतीत सल्ला देणाऱ्या बॅ. सावरकरांच्या 'ऐतिहासिक' पत्रातला काही भाग पुढीलप्रमाणे :–

"– – – – आपण मराठ्याचे द्वारे केलेली हिंदुराष्ट्राची सेवा अितकी मोठी नि अितकी निस्पृह आहे की आज हिंदुराष्ट्राचे मराठा हे प्रत्यक्ष हृदयच झालेले आहे – – – – तरी विनंती ही की या प्रसंगी १) 'मराठा' आपण होऊन बंद करू नये.

२) मराठ्याचे धोरण बदलले असे होऊ नये – प्रसिद्ध तर कदापि करू नये.

३) आपण संपादकत्वाचे त्यागपत्र देऊ नये.

मग प्रश्न रकमेचा :– त्यासाठी हिंदुसंघटन निधीतून (ज्याचे ३०/४० सहस्र जमले आहेत तो) दहा सहस्र घ्यावे, नाही तर तो निधी तरी काय चाटायचा आहे ? अुरलेल्या रकमेसाठी एक विशिष्ट नि त्वर्य निधी याच तारणासाठी अुभारू. आपण निधी आरंभिताच माझा शंभराचा हप्ता मी धाडतो अुदाहरण म्हणून – – – – सरकारनं मराठा बंद करीतो 'मराठा' आपण होऊन बंद करणे नाही – – – – तरी कृतघ्नपणे कोणी भ्याडांनी वा भोळ्यांनी संकटाचे खापर तुमच्यावर फोडले तरी वैतागात संपादकत्व सोडू नये. अशाच वेळी एकमेकांना सचेतन करणे हे आप्तेष्टांचे कर्तव्य असते – – – – " सरकारी संकटातून मराठा यथावकाश बचावला !

स्वातंत्र्य : मुख्य-संपादक

३ जुलै १९४७ रोजी फाळणीचा निषेध म्हणून हिंदुसभेतर्फे हरताळाचं आवाहन करण्यात आलं. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. भारताला स्वातंत्र्य

मिळालं, पण फाळणीसह ! भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी किती प्रमाणात आनंदोत्सव करावा आणि कोणता ध्वज लावावा इत्यादींची केसरीतल्या 'भग्न-मूर्तीचे षोडशोपचार' या लेखात केलेली चर्चा उद्‌बोधक वाटते. स्वतंत्र देशासाठी, 'राष्ट्रभाषा हिंदी असावी, राष्ट्रगीत वंदे मातरम् असावं, राष्ट्रध्वज भगवा असावा आणि राष्ट्राचं नाव हिंदुस्थान असावं' असा प्रचार हिंदुसभेतर्फे करण्यात आला. त्याची प्रतिमा गजाननरावांच्या केसरीमधील त्या काळच्या लेखात सापडते. या वेळी हिंदुसभेतर्फे 'निर्वासित निधी' आणि 'मालवीय हिंदु-संघटन निधी' उभारले. हे अनुक्रमे सुमारे रु. १२,०००/– आणि रु. ३२,००० /– इतके जमले. निधीची व्यवस्था अर्थात गजाननरावांकडे होती.

१९४७ च्या ऑगस्ट महिन्यात गजाननराव केसरीचे मुख्य संपादक झाले; तेव्हापासून जून १९५० पर्यंत ते केसरी आणि मराठा या दोन्ही पत्रांचे मुख्य संपादक आणि संस्थेचे विश्वस्त होते. हा सुमारे तीन वर्षांचा काळ त्यांच्या वैयक्तिक आणि पत्रकारी जीवनात फार महत्त्वाचा ठरला ! पूर्वी, त्यांनी तात्यासाहेब केळकरांना विनोदाने, "Ketkar is Kelkar with a 'dash' " असं म्हटलं होतं, तो 'डॅश' या काळात दिसला !

अलौकिक युगपुरुषाचे भीषण देहावसान

३०-१-१९४८ रोजी म. गांधींच्या भीषण देहावसानाची बातमी आली. तो शुक्रवारचा दिवस होता. सकाळीच केसरीचा अंक प्रसिद्ध झाला होता. सायंकाळी गजाननरावांनी केसरीतील सहकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना तातडीनं कार्यालयात बोलावून घेतलं. थोड्या अवधीत केसरीचा खास अंक काढला. द्विसाप्ताहिक केसरीच्या, कार्यालयाच्या साप्ताहिक सुटीच्या दिवशी काढलेल्या या अंकासाठीची धावपळ आणि धडपड त्या परिस्थितीचा अनुभव असलेलेच समजू शकतील ! यातील अग्रलेख 'अलौकिक युग-पुरुषाचे भीषण देहावसान' हा वाचकांच्या हृदयाला भिडला. (या पुस्तकात पुनर्मुद्रित केला आहे.) या लेखांमुळे आणि गांधीजींच्या अनेक छायाचित्रांमुळे केसरीचा हा अंक हातोहात खपला. या अंकातच राष्ट्रीय दुखवटा म्हणून केसरी तेरा दिवस बंद राहील असं जाहीर करण्यात आलं. या समयोचित गोष्टींमुळे गांधी-वधोत्तर-परिस्थितीची झळ केसरीला लागली नाही असं मत अनेकांनी व्यक्त केलं. या 'अनेकांत' केसरीचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. ज. स. करंदीकर आणि बंदोबस्तासाठी आलेले पोलिस अधिकारी यांचाही समावेश होता.

पत्नीचा मृत्यू

दादासाहेबांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई यांचं १८-२-१९४८ रोजी अचानक निधन झालं. ते तेव्हा सुरक्षिततेसाठी केसरी कार्यालयातच रहात होते. निरोप

मिळताच ते घरी आले, पण तोपर्यंत सर्व संपलेलं होतं ! या घटनेविषयी एका आत्मनिवेदनात त्यांनी म्हटलं आहे " . . . . . गांधीवधोत्तर परिस्थिती व त्यायोगे माझ्या जीवाला संभाव्य धोका यांच्या योगाने तिचे हृदय व्यथित होत राहिले असले पाहिजे, असे साहजिकच मी व इतरांनीही अनुमान केले. पती गेल्यावर सती जाणाऱ्यांपेक्षा, 'पतीच्या जीवाला धोका आहे' या कल्पनेने हृदयावर दडपण येऊन प्राण सोडणारी सतीच नव्हे काय ? परंपरागत अभिजात हिंदुधर्माची मनाची भावनात्मक बैठक तिच्या मृत्यूने माझ्या मनावर खोलवर रुजली. "

या धक्क्यातून त्यांनी स्वतःला ' कर्मयोगी ' वृत्तीनं सावरून नित्याच्या कार्यात गुरफटन घेतलं. केसरीत ' आम्हास काय वाटते ?' या सदराखाली मार्मिक लेख लिहिले. तसेच तेव्हाचे ' हिंदुत्वाचा विकास आणि आभास,' ' जातीयतेचे खूळ आणि मूळ ', ' स्वराज्याची पहिली वर्षगाठ ' इत्यादी अनेक लेखही गाजले. बॅ. सावरकर आदींवर सरकारतर्फे खटले भरण्यात आले तेव्हा त्यांच्या न्यायालयीन बचावासाठी ' न्यायसाहाय्यनिधी ' उभारण्यात गजाननरावांनी पुढाकार घेतला. हे त्या वेळी एक धाडसच होतं. तसंच या निधीला त्यांनी ' सावरकर-साहाय्य-निधी' असं व्यक्तिगत स्वरूप न देण्यातही योजकता दाखविली. हा निधी त्यांनी जमविलेल्या सुमारे सतरा निधींमध्ये सर्वाधिक रु. ९०,०००।- जमला

संघबंदी प्रकरण

१९४८ साली सरकारनं राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली व सघ-चालक श्री. गोळवलकर गुरुजी यांना अटक केली. रा. स्व. संघानं तेव्हा आंदोलन केलं. गजाननरावांनी केसरीत ' आधी फाशी..... ...मग चौकशी ' या मथळ्याखाली तीन लेखांक लिहिले. नुसते लेख लिहून थांबले नाहीत, तर निर्माण झालेली कोंडी फोडण्यासाठी त्यांनी मध्यस्थ या नात्यानं सरदार पटेल व गोळवलकर गुरुजी यांच्या भेटी घेतल्या. या यशस्वी मध्यस्थीनंतर त्यांनी एक निवेदन केलं. त्यातला प्रामाणिक विनय वाखाणण्यासारखा वाटतो. ते म्हणतात; " या कामात श्री. व्यंकटरामन् शास्त्री आणि पं. मौलीचंद्र शर्मा यांचा मौलिक सहभाग होता. कामाची प्रेरणा पुण्याचे प्रा. त्र्यं भि. हर्डीकर यांच्याकडून मिळाली. रा. स्व. संघाच्या सर्वच कार्यकर्त्यांच्या मदतीमुळे प्रकृतिअस्वास्थ्य किंवा प्रवासाची दगदग जाणवली नाही. सरदार पटेल व त्यांचे सरकारी अधिकारी यांनी निगर्वी वर्तन करून विश्वासपूर्ण वातावरणात मनमोकळी चर्चा केली. श्री. गोळवलकर गुरुजींनी शांतपणे सर्व ऐकून जास्तीत जास्त सहकार्य दिलं. " गुरुजींची कारावासातून सुटका झाल्यावर पुण्यात झालेल्या जाहीर सत्काराच्या प्रसंगी त्यांनी गजाननरावांच्या मध्यस्थीबद्दल कृतज्ञतेचे उद्‌गार काढले. ही कृतज्ञता आणि गजाननरावांचं निवेदन यांच्या पार्श्वभूमीवर,

अनेकांनी या प्रकरणातलं त्यांचं श्रेय अनुल्लेखानं हिरावून घेण्याचा केलेला प्रयत्न फारच अनुचित वाटतो ! सर्व प्रकरण संपल्यावर केसरीत १९४९ मध्ये परत 'आधी फाशी.....मग चौकशी' या मथळ्याखाली त्यांनी आणखी तीन लेखांक लिहिले.

याच काळातले त्यांचे 'राष्ट्रीय स्वत्व संग्रह', संगती व विसंगती' 'अहिंसा सापेक्ष की निरपेक्ष' या मथळ्याखाली लिहिलेले लेख गाजले. 'साध्यानुकूल साधन विवेक' ही बारा लेखांची दीर्घ मालिका समाप्त केल्यानंतरही यावर आणखी लेख लिहिण्याची काही वाचकांनी विनंती केली होती. कै. तात्यासाहेब केळकरांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्तानं लिहिलेल्या 'सार्थ केळकर मत विजय' हा लेख वाचून एका केळकर-कुटुंबियानं भारावून अभिनंदन केलं आणि हा लेख वाचून परलोकातही तात्यासाहेबांच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू उभे राहतील असं म्हटलं ! (लेख पुनर्मुद्रित केला आहे.)

पहिला प्रकट सत्कार

गजाननरावांचा दि. २१-८-१९४९ रोजी टिळक स्मारक मंदिरात डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रकट सत्कार झाला. या प्रसंगी त्यांना बॅ. सावरकरांची चांदीची मूर्ती आणि रौप्यहार देण्यात आला. या सत्कारप्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणाचा सारांश असा :– "लोकोपयोगी कामे करणाऱ्याला आपले कार्य लोकांना आवडेल की नाही याचा पडताळा पाहणे आवश्यक असते. तो अशा प्रसंगाने मिळतो. आज या प्रसंगी कै. तात्यासाहेब केळकर आपल्यात नाहीत; त्यांना हा (शिष्याचा) सत्कार पाहून किती आनंद झाला असता याची नुसती कल्पना करणेच भाग आहे. तसंच आज या समारंभात सौ. सरस्वतीबाई नाहीत याचीही खेदकारक आठवण होते. केसरीचे विश्वस्त श्री. ज. स. करंदीकर आणि श्री. ल. ब. भोपटकर यांच्यासारखे कणखर खांब आणि केसरीचा खंबीर संपादकवर्ग सदैव माझ्या पाठीशी असल्यामुळेच मी काही जबाबदारीचे कार्य करू शकलो. मी जमवलेल्या नानाविध निधींचं श्रेय बॅ. सावरकरांनी जनतेत निर्माण केलेल्या हिंदुत्व-जागृतीत आहे. लो. टिळकांच्या घरी महाविद्यालयीन शिक्षणासाठी तीन-चार वर्षे राहिलो, त्या काळात माझा सार्वजनिकदृष्ट्या जन्म झाला असे मी मानतो." या त्यांच्या सत्काराच्या निमित्ताने अनेक वर्तमानपत्रांत लेख वा स्फुटे लिहून पत्रकारांनी व चाहत्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या होत्या.

द्वितीय विवाह – सामाजिक अस्पृश्यता

१९५० च्या एप्रिल महिन्यात, पाकचे प्रंतप्रधान लियाकत अली यांच्या नियोजित भारत–भेटीच्या वेळी, पुण्यातील अनेक हिंदुसभेच्या नेत्यांसह दादा-

साहेबांना येरवडा तुरुंगात जुलैपर्यंत स्थानबद्ध केलं होतं. इथेच १२ जून १९५० रोजी त्यांचा द्वितीय विवाह श्रीमती आल्वा रेडमंड यांच्याशी झाला. विवाहोत्तर सौ. अमलाबाई. त्यांचे पिता इंग्लिश व माता डच होती. यापूर्वी त्यांचे दोन विवाह झाले होते आणि दोन्ही विवाहबंधनांतून त्यांनी स्वतःच घटस्फोट मागून घेतला होता. त्यांचं शिक्षण आफ्रिकन् हायस्कूलचं झालं होतं. त्यांना अकाउंटन्सी, हॉर्टिकल्चर, ॲकॉर्डियन-वादन या क्षेत्रांत थोडीफार जाणकारी होती. त्या दक्षिण आफ्रिकेत असताना थिऑसॉफिकल् सोसायटीच्या सदस्या झाल्या होत्या. हिंदुधर्म-ग्रंथांचं त्यांनी वाचन केलं होतं आणि या विषयावर थोडंफार लेखनही करत होत्या. विवाहापूर्वीच त्यांनी धर्मांतर केलं होतं. या विवाहाला दादासाहेबांच्या मातुःश्रींनी अनुमती दिली होती. या विवाहाबद्दल प्रा. श्री. म. माटे यांनी सर्वप्रथम त्यांचं अभिनंदन केलं होतं असा उल्लेख सापडतो. या विवाहसंदर्भात बॅ. सावरकरांचं पत्र सुप्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी कृतिशील सुधारक या दृष्टीनं स्वागत केलं; विशिष्ट व्यक्तीची निवड वा पसंती ही वैयक्तिक गोष्ट मानून त्यावर मतप्रदर्शन केलं नाही. श्री. न. वि. गाडगीळ यांनी पत्रानं दादासाहेबांचं अभिनंदन केलं; त्यात दादासाहेबांच्या श्वशुरांनी केलेला द्वितीय विवाह तेव्हा त्यांना पसंत नव्हता याची आठवण करून देऊन कोपरखळी मारली आहे. हा द्वितीय विवाह यदृच्छया अथवा नियतीनं घडवून आणला असं दादासाहेबांनी आत्मकथनात म्हटलं आहे. या संबंधात त्यांची 'माझ्या विवाहाची सत्यकथा,' 'केतकर–रेडमंड राजी तो क्या करेगा मुरारजी,' 'अमला' इत्यादी निवेदनं प्रसिद्ध आहेत.

या सकारण वा विनाकारण गाजलेल्या विवाहाने त्यांच्या आयुष्यात काही स्थित्यंतरं घडली. केसरी-मराठाचं मुख्य संपादकत्व आणि विश्वस्तपद याचा त्यांनी राजीनामा दिला. या विवाहानंतर काही दिवसांनी दादासाहेब सौ. अमलाबाईंसह पुण्यातील डेक्कन जिमखाना भागात रहावयास गेले. त्यांचा दमा कमी झाला अथवा गेला; याचं श्रेय ते सौ. अमलाबाईंना देत. या विवाहानंतरचा चौदा वर्षांचा काळ म्हणजे १९५१ ते १९६४ – हा 'सामाजिक अस्पृश्यते'चा होता असं त्यांनी अनेक वेळा म्हटलं आहे.

मर्मभेद

१९४७ ते १९५० सालांतलं त्यांचं राजकीय लेखन खूपच गाजलं. यांतल्या काही निवडक लेखांचं 'मर्मभेद' या समर्पक नावानं पुस्तकरूपानं पुनर्मुद्रण झालं. त्या काळात हा लेखसंग्रह प्रसिद्ध करणं हे थोडंफार धाडसाचंच होतं. या धाडसाचे प्रकाशक आहेत श्री. ना. र. आठवले आणि मुद्रक श्री. व. वि. आपटे. गजानन-रावांच्या लेखनातली मर्मिकता, निर्भीडपणा आणि कायद्याच्या मर्यादांना स्पर्श

करून जाणं हे सर्व विशेष हा लेखसंग्रह वाचताना जाणवतात. 'देहान्त शासनाचे राष्ट्रीय बळी' या लेखाबद्दल जामीन मागण्यात आला होता पण तो कायद्याच्या कचाट्यातून सुटला !

लेखनधर्म

केसरी-मराठाच्या मुख्य संपादकत्वाचा त्याग केल्यानंतर गजाननराव १९५६ पर्यंत संपादकमंडळात होते. या बदललेल्या परिस्थितीमुळे त्यांच्या लेखनाच्या पद्धतीत किंवा विपुलतेत फरक पडला नव्हता. त्यांना सुचलेल्या सर्व विषयांवर ते लेख वा स्फुटं लिहीत. संपादक-मंडळाच्या बैठकीत जो विषय निवडला जाई, त्यावरचं लेखन ते पिशवीतून काढून मंडळापुढे ठेवत. केसरीच्या संपादक-मंडळात ते म्हणत, 'मी काही सोन्याच्या टाकाने लिहीत नाही. माझं लेखन चालूच असतं; उपयोगी असेल ते घ्या आणि प्रसिद्ध करा.' नको असलेलं लिखाण निर्विकारपणे ते नष्ट करत. प्रसिद्धीपेक्षा सतत मनन आणि लेखन करणं ते जास्त महत्त्वाचं मानत; आपण लिहिलेला प्रत्येक मजकूर प्रसिद्ध झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह नसे आणि नवोदित पत्रकार-तरुणांना ते असाच सल्ला देत.

तरुण-भारतचे संपादक

१९५६ साली काही काळ त्यांनी दै. भारतमध्ये आठवड्यातून दोन लेख लिहिले असल्याचा उल्लेख सापडतो. (दै. भारतचे अंक उपलब्ध नसल्याने हे लेख पुस्तकातल्या सूचीत घेता आले नाहीत.) १९५७ मध्ये नागपूरच्या 'तरुण-भारत'चं पुण्याहून स्वतंत्रपणे वेगळं प्रकाशन करण्याचं ठरल्यावर एका ज्येष्ठ पत्रकारांची संपादक म्हणून निकड होती. हे पद गजाननरावांना मिळालं. पूर्वी केसरीत असताना, आठवड्यातून दोनदा शांतपणे सर्व साधक-बाधक विचार करून अग्रलेख लिहिण्याची त्यांची सवय होती. तरुण-भारत दैनिक असल्यामुळें रोज नवीन घडलेल्या ताज्या घटनेवर थोड्याच वेळात अग्रलेख लिहावा लागे. हा बदल त्यांनी स्वीकारला. तरुण-भारतमधलं त्यांचं लेखन गुणसंपन्न असूनही फारसं गाजलं नाही असं म्हणावं लागेल. 'आम्हांस काय वाटते' हे केसरीतलं सदर त्यांनी तरुण-भारतातही चालू केलं. विविध राजकीय आणि इतर विषयांवर पूर्वीइतक्याच मार्मिकपणे लेखन चालूच होतं.

सर्पदंश नि प्रसंगावधान

१९५६ च्या सुमारास त्यांनी ऋण काढून पुण्यात पर्वतीमागे तुळशीबाग-वाले कॉलनीत छोटंसं घर बांधून त्याला 'चिंतन' असं नाव दिलं होतं. इथे

रहात असताना, दि. २६–२–६२ रोजी सायंकाळी कार्यालयातून घरी जाताना एका अत्यंत विषारी सापानं दंश केला प्रसंगावधान राखून त्यांनी पायाला जखम करून रक्तस्राव घडवला नि औषधयोजना केली. नंतर त्यांना वानवडीच्या रुग्णालयात उपचारार्थ ठेवलं होतं. या संकटातून प्रसंगावधान दाखवून सुखरूप पार पडल्यानंतर २–९–१९६२ रोजी त्यांच्या चाहत्यांनी एक छोटासा सत्कार-समारंभ घडवून आणला. चाहते आणि सहकारी यांनी या प्रसंगी गजाननरावांचं अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या या समारंभात बोलताना तरुण-भारतचे तेव्हाचे श्री. मनोहर कुंटे यांची बहुमोल मदत झाल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. घरासाठी घेतलेलं ऋण त्यांनी यथावकाश संपूर्णपणे फेडल्याचं समाधान श्री. गीत यांच्याकडे व्यक्त केलं

केतकर–कुल–सभेत

१९६१ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर श्री. रा. वा. केतकर यांनी अत्यंत परिश्रम घेऊन संकलन आणि संपादन केलेल्या ' केतकर कुल--वृत्तांता ' च्या प्रकाशनाचा समारंभ दादासाहेबांच्या हस्ते झाला या कुल-वृत्तांताला त्यांनी प्रस्तावना लिहिली आहे. यात त्यांनी काही ' ऐतिहासिक ' गोष्टींचा उल्लेख केला आहे. चित्पावन ब्राह्मणांबद्दल श्री. चापेकरांच मत दिलं आहे की, पारशी लोक जसे संजानल आले, यहुदी लोक जसे अलिबागेस आले, तसे चित्पावन खाली गुहागरास आले–. समुद्रकिनाऱ्यावर या तीन जाती बाहेरून, म्हणजे जलमार्गाने येऊन स्थायिक झाल्या. तसंच दुसरी गोष्ट म्हणजे– सर्व केतकरांचं मूळ आडनाव गाडगीळ होतं. केतकी गावी आले ते केतकर झाले आणि जवळच्या बिवली गावचे बिवलकर झाले. हे या प्रस्तावनेत वाचण्यापूर्वी बहुसंख्य केतकरांना माहीत नव्हतं.

लोकमान्यांची भाषाशैली : गीतार्थचर्चा

गजाननरावांनी पूर्वी १९३१ साली ' लो. टिळकांची भाषाशैली ' हे पुस्तक लिहून अ. वि. गृहाला प्रकाशनासाठी दिलं होतं. त्यानंतर त्यांनी परत ९३५ साली सह्याद्री मासिकात याविषयी लेख लिहिला होता. या पुस्तकाची आणि लेखाची सुयोग्य पुनर्रचना डॉ. बा. मो. कानिटकर यांनी केली. हे फेररचित पुस्तक ' लोकमान्यांची भाषाशैली ' या नावानं पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठानं प्रसिद्ध केलं.

गजाननरावांनी गीतेसंबंधी अनेक लेख लिहिले होते; त्यांचं गीताबीज हे छोटंसं पुस्तकही १९३० मध्ये प्रसिद्ध झालं होतं. त्यांच्या लेखांतले काही निवडक लेख आणि स्पष्टीकरणासह गीताबीज एकत्र करून ' गीतार्थचर्चा ' हे पुस्तक १९६३ साली ' अधिकारी प्रकाशना ' ने प्रसिद्ध केलं.

सत्यनारायण आणि राजकीय अस्पृश्यता

द्वितीय विवाहाप्रमाणे गजाननरावांच्या आयुष्याला परत कलाटणी देणारी गोष्ट म्हणजे, १२ नोव्हेंबर १९६४ ला गोपाळ गोडसे प्रभृतीच्या सुटकेनिमित्त आप्तस्वकीयांनी केलेल्या सत्यनारायण प्रसंगीचं त्यांचं भाषण. या खाजगी समारंभात त्यांनी आपल्याला गांधीवधाची पुसटशी जाणीव होती अशा अर्थाचे उद्‌गार काढले. या विधानाला देशभर प्रसिद्धी मिळून गहजब झाला. सरकारनं त्यांना अटक केली, पुढे खटलाही भरला. या वेळी त्यांनी तरुण-भारतच्या संपादकत्वाचा आणि त्या संस्थेतील नोकरीचाही राजीनामा दिला. सत्यनारायणप्रसंगी केलेलं भाषण, त्यातून उद्‌भवलेली स्थानबद्धता आणि खटला यासंबंधी गजानन-रावांनी नंतर लिहिलेले 'माझी स्थानबद्धता,' 'पुण्यातील सत्यनारायण प्रकरण' 'माझ्या स्थानबद्धतेची कारणमीमांसा' इत्यादी आत्मनिवेदनात्मक लेख वाचनीय आहेत.

दादासाहेबांना स्थानबद्ध करण्यात आल्यावर सौ. अमलाबाईंनी उपजीविकेचं साधन म्हणून डेक्कन-कॉलेजातील अमेरिकन इन्स्टिटचूटमध्ये नोकरी व नंतर राहण्याची जागा मिळवली. सुमारे एक वर्ष स्थानबद्धता भोगल्यानंतर, २९ नोव्हेंबर १९६५ ला गजाननरावांची सुटका झाली. १९६६ पासून १९७३ पर्यंत गजाननरावांचं वास्तव्य डेक्कन कॉलेजमधल्या जागेतच होतं. १९६७ च्या सुमारास सौ. अमलाबाईंनी डेक्कन कॉलेजमधील कँटीन चालविण्यास घेतलं. संशोधनासाठी येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांना योग्य खाद्यपदार्थ आणि 'वातावरण' देता येईल ही त्यामागची कल्पना. ज्याप्रमाणे १९५१ ते १९६४ या चौदा वर्षांत 'सामाजिक अस्पृश्यता' भोगली, त्याप्रमाणे १९६५ ते १९७८ या चौदा वर्षांत 'राजकीय अस्पृश्यते'चे अनुभव आले असे ते वारंवार म्हणत. ज्या संस्थांच्या संस्थापनात त्यांचा सहभाग होता किंवा ज्या संस्थांचं संचालकत्व त्यांनी सांभाळलं होतं त्यांतल्या काही संस्था आणि काही व्यक्ती गजाननरावांचा नामोल्लेख आणि सपर्क टाळत.

डॉ खानखोजे चरित्र

गजाननराव डेक्कन कॉलेजमध्ये रहात असताना १९६६ साली मे महिन्यात डॉ. पां. सी खानखोजे तेथून जवळ रहात असलेल्या त्यांच्या कन्येच्या घरी आले होते. गजाननरावांनी स्वतःच्या ६८ व्या वर्षी, ८१ वर्षांचे डॉ. खानखोजे यांच्या तीन-चार भेटी घेऊन त्यांचा जीवनवृत्तांत सविस्तरपणे जाणून घेतला. बोलण्याच्या ओघात सांगितलेली माहिती कालानुक्रमाने संगतवार रचली आणि ती खुद्द डॉ. खानखोजे यांच्याकडून तपासून घेतली. यावरून त्यांनी 'रणझुंजार डॉ. पां. सी. खानखोजे' यांचे चरित्र' हे पुस्तक लिहिलं. ते. श्री. शं रा. दाते

यांनी १९६६ मध्ये प्रकाशित केलं. यापूर्वी डॉ. खानखोजे यांच्या क्रांतिप्रयत्नाची माहिती आणि आत्मनिवेदनं प्रसिद्ध झाली होती, पण चरित्राची उणीव होती ती या पुस्तकानं भरून निघाली.

विश्वकोशात नि इतरत्र लेखन

वाईला 'विश्वकोशा'चं काम चालू होतं. तिथे १९७० साली काही काळ दादासाहेबांचं 'अभ्यागत संपादक' या नात्यानं महिन्यातून काही दिवस वास्तव्य होतं. विश्वकोशाच्या, मुख्यतः पहिल्या व दुसऱ्या खंडांतील, धर्म या विषयाच्या काही नोंदींचं त्यांनी समीक्षण केलं. तसंच पहिल्या आणि सातव्या खंडांतील काही नोंदींचं स्वतंत्र लेखनही केलं. याच काळात कलकत्त्याच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज' या संस्थेतर्फे तयार करण्यात येत असलेल्या 'डिक्शनरी ऑफ नॅशनल बायॉग्राफी' या ग्रंथासाठी महाराष्ट्रातल्या सुमारे २५ नामवंत व्यक्तींची चरित्रात्मक माहिती लिहिली. १९६५ नंतरचं दादासाहेबांचं लिखाण बहुधा राजकीय विषयांखेरीज इतर विषयांवरच चालू राहिलं. लेखन-धर्म पूर्वीचाच असला तरी त्याला आता उपजीविकेचं एक साधन असा व्यवहारी हेतूही चिकटला !

पत्रकार-संघात सत्कार

८ ऑगस्ट १९७१ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या १८ व्या वर्धापन-दिनानिमित्त (योगायोगानं गजाननरावांच्या ७३ व्या वाढदिवशी) त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावलं होतं. ज्येष्ठ पत्रकार या नात्यानं त्यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणाचा सारांश असा- " १९२१ ते १९६४ इतकी वर्षं मी श्रमिक पत्रकार होतो. आता 'मुक्त-पत्रकार' आहे. यानंतरच्या स्वरूपात 'लेख' आणि 'लेक' यांच्यात साम्य जाणवतं. लेक कोणाला द्यावी आणि दिल्या घरी तिला सुख लाभेल की नाही या चिंतेप्रमाणेच लेख कोणाकडे पाठवावा आणि पाठवल्यावर त्याला प्रसिद्धीसुख लाभेल की नाही याचा विचार करावा लागतो. यासाठी तारतम्य आणि विविध क्लृप्त्या यांची गरज पडते. मी अभिप्रायार्थ आलेली पुस्तकं संपूर्ण वाचत असे आणि वाचतो. त्यांतील माहिती किंवा ज्ञान एखाद्या स्वतंत्र लेखाकरता उपयोगी येऊ शकते. सर्व वृत्तपत्रं, साप्ताहिकं आणि मासिकं पाहून त्यांतला काही ग्राह्य भाग मी लेखनाचा विषय म्हणून उपयोगात आणतो पूर्वी वर्तमानपत्रं चालवणं हा संपादकाचा 'धर्म' मानला जात असे, आता वर्तमानपत्रं हा 'धंदा' झाला आहे. वृत्तपत्रं तिकडे लोक असं राहिलं नसून, लोक तिकडे वृत्तपत्रं असं झालं आहे. हे नवं युग आहे, अपघात, गुन्हे यांच्या बातम्यांना महत्त्व आलं आहे; खेळ-नाट्य-चित्रपट यांच्यासाठी

ऐसपैस जागा द्यावी लागते. एखादं 'स्फुट' परत छापलं तर वाचकांच्या लक्षात येत नाही, पण आठ दिवसांपूर्वीचं व्यंगचित्र परत छापलं तर वाचकांची पत्रं येतात. हल्ली 'संपादकीय' फारच थोडे लोक वाचतात. जुन्यांना आपल्या विचारांचा प्रसार करण्याचा उद्देश कायम ठेवून, मुक्त-पत्रकार या नात्यानं कालानुसार बनण्याचा मीही प्रयत्न करीत आहे!"

आर्थिक 'विपन्नता'!

१९७३ मध्ये सौ. अमलाबाईंनी चालवलेलं कॅन्टीन पुरेसं अर्थार्जन करून देत नव्हतं; मुक्त-पत्रकाराचं मानधनही निर्वाहाला पुरेसं नव्हतं. अशा परिस्थितीत दादासाहेब आणि अमलाबाई यांचे खर्चिक वृत्ती आणि काटकसर या विषयावर क्वचित् वाद होत, अर्थात् वादाला उग्र स्वरूप कधी आलं नाही किंवा 'विपन्नता'ही भयानक नव्हती. दादासाहेबांनी एका आत्मनिवेदनात म्हटलं आहे, "...माझी 'अन्नान्नदशा' कधीच नव्हती आणि नाही. ...केसरी आणि तरुण-भारत यांच्याकडून मला रीतसर प्रॉव्हिडंट फंड आणि ग्रॅच्युइटी मिळाली ... कॅन्टीनच्या व्यवहारात तोटा येई तो पुष्कळांशी आमच्या अव्यवहारीपणाने. त्या आठ वर्षांत (१९६५ ते १९७३) आवश्यकतेनुसार माझे बंधू, कन्या, पुत्र, इतकेच नव्हे तर इतर इष्टमित्रांचेही साहच्य मला झालेले आहे. .." 'विपन्नते'ची ही सविस्तर माहिती देण्याचं कारण इतकंच की, काही लोक त्यांच्या तथाकथित 'अन्नान्नदशे'-बद्दल जाहीरपणे नक्राश्रू ढाळत असत!

विभक्तता

अशा परिस्थितीत सौ. अमलाबाईंना हृदयविकाराचा त्रास सुरू झाला, तेव्हा त्या दादासाहेबांच्या सल्ल्यानं आणि संमतीनं आफ्रिकेतील पूर्वाश्रमीच्या मुलांकडे उपचारार्थ गेल्या. तेव्हापासून त्यांचा पत्र-व्यवहार सतत चालू होता–अगदी अखेरपर्यंत. ही वस्तुस्थिती असता, 'बाई त्यांना सोडून गेल्या' अशा शब्दांत काहींनी या घटनेचं वर्णन केलं आहे! सौ. अमलाबाई भारतात असताना दादासाहेबांच्या काही दूरच्या नातेवाइकांचा असाच समज होता, तर त्या आफ्रिकेला गेल्यावर इतरांचा 'गैरसमज' क्षम्यच मानावा लागेल! श्रीमती अमलाबाई आफ्रिकेत मुलांकडे आहेत व दादासाहेब गेल्यानंतरही त्यांचं पत्र आलं होतं.

खटला : आजार

सत्यनारायणप्रसंगीच्या भाषणातून स्थानबद्धतेमागून खटला १९७२ मध्ये भरला गेला. या खटल्याचं काम १९७२ ते १९७५ पर्यंत चालू होतं. गजाननरावांतर्फे या खटल्याचं काम मुख्यतः श्री. गोगटे, श्री. पाठक व श्री. परांजपे यांनी

पाहिलं. या खटल्याच्या बचावाच्या संदर्भात त्यांची या वकिलांशी पत्राने अथवा भेटीत, बचावाची दिशा आणि आनुषंगिक माहिती यांवर वारंवार चर्चा होत असे. याबद्दल बोलताना एकदा ते गमतीने म्हणाले की "म्हातारपणी कशाकरता जगायचं हा माझा प्रश्न सरकारनं सोडवला आहे. हा खटला जगण्याचा हेतू आणि विचाराला खाद्य असा दुहेरी उपयोगाचा आहे!"

१९७३ ते १९७५ दादासाहेबांचं वास्तव्य पूना गेस्ट हाऊसमध्ये होतं. अत्यंत साधी राहणी असल्यामुळे आप्तेष्टांची मदत आणि लेखांचं मानधन यांवर निर्वाह व्यवस्थित चालला होता. या काळात आणि नंतरही त्यांची व्यवस्था पूना गेस्ट होऊसचे श्री. सरपोतदार यांनी चांगली ठेवली होती. १९७५ मध्ये दादासाहेबांना पोटातील अल्सरमुळे त्रास होऊ लागला तेव्हा ते त्यांचे बंधू, डॉ. गोविंदराव यांच्याकडे अहमदनगरला रहायला गेले. तेथेच त्यांचं १९७८ अखेरपर्यंत वास्तव्य होतं. १९७८ मध्ये त्यांना काही काळ सौम्य काविळीचा आजार झाला. जून ७८ मध्ये त्यांच्या बंधूंच्या रुग्णालयात त्यांच्यावर हार्नियासाठी शस्त्रक्रिया करावी लागली.

सरकारतर्फे १९७२ मध्ये भरण्यात आलेल्या खटल्यातून त्यांची पुण्याच्या कोर्टानं जून ७५ मध्ये निर्दोष आणि निष्कलंक मुक्तता केली. सरकारतर्फे यावर अपील करण्यात आलं. हे अपील सरकारनं एप्रिल ७८ मध्ये अचानक काढून घेतलं.

दुसरा प्रकट सत्कार

पुण्यात श्री. गणपतराव नलावडे यांच्या अध्यक्षतेखाली गजाननरावांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त दि. २-८-१९७८ रोजी प्रकट सत्कार करण्यात आला. हा सत्कार घडवून आणण्यात त्यांचे चाहते श्री. रा. स. भट यांचा पुढाकार होता. या समारंभाची एक छोटी स्मरणिका श्री. भटांनी प्रसिद्ध केली. त्यात 'मला काय वाटते' या मथळ्याखाली गजाननरावांनी म्हटलं आहे, "... ८० वर्षे जगलो म्हणून लोकांना काही उपदेश करण्याची पात्रता आली असे मी मानीत नाही. माझा आदर्श म्हणून प्रौढीनं सांगण्यासारखं काहीही नाही. उपदेशाचे गंगौघ वाङ्मयातून वाहिले असता 'त्रैगुण्योद्भवमंत्र लोकचरितं' हे तसे आपल्या गतीने चालले आहे. मी पुढे पुष्कळ जगणार आहे असेही या प्रसंगाने म्हणावेसे वाटत नाही ... यानंतर हा सत्कार केल्याबद्दल लोकांना पश्चात्ताप व्हावा असेही काही नागमोडी वर्तन वा वक्तव्य माझ्याकडून होण्याचा संभव नाकारता येत नाही. 'अहं विशेषः' असे जवळ जवळ प्रत्येकाला वाटतेच, पण ते किंचित् सत्य असू शकते. ... सर्वभूतात्मभूतात्मा होणे आणि केवळ वैयक्तिक मुमुक्षत्वही

जोपासणे यांची सांगड कशी घालता येईल याचा मला प्रश्न पडतो. मी काही ध्येयाप्रत पोचलो नाही म्हणून इतरांना काही उपदेशस्वरूपाने सांगण्याचा मला अधिकार नाही. विचारार्थ मी काही गोष्टी मांडतो; पण तोच सर्वांचा विचार व्हावा आणि तसा झाला तरच लोकांचे कल्याण होईल असे मानणे हा खोटा अहंकार आहे. त्याचा पूर लोटलेला आहे. मी त्यात ओंजळही टाकू इच्छित नाही. ...'' या समारंभाने १९६४ पासून सुरू झालेल्या ' राजकीय अस्पृश्यते 'ची समाप्ती झाली. यानंतर त्यांचे इतरत्रही छोटे सत्कार--भाषणं इत्यादी कार्यक्रम झाले.

' निवृत्तिवेतन ' आणि समाधान


१९७८ च्या सप्टेंबर महिन्यात त्यांचे बंधू डॉ. गोविंदराव यांचे अचानक हृदयविकाराने निधन झाले. त्यानंतर काही महिन्यांनी दादासाहेब परत पूना गेस्ट हाऊसमध्ये रहायला आले. नागपूरला कन्येकडे आणि मुंबई-धुळ्याला मुलांकडे राहण्याचा त्यांनी प्रयोग केला. पण ते पुण्याशी जितके समरस झाले होते तितके इतरत्र होऊ शकले नाहीत. त्यांना १९७२ साली स्वातंत्र्यसैनिक म्हणून ताम्रपट मिळाला होता. पण ' निवृत्तिवेतन ' १९७९ मध्ये मिळू लागलं. हे मिळवण्याच्या प्रयत्नात त्यांना श्री. जयंतराव टिळक व केतकर सत्कार समितीचे श्री. रा. स. भट इत्यादींची मदत झाली होती. स्वातंत्र्यसैनिक म्हणून निवृत्तिवेतन मिळाल्यावर त्यांनी एका खाजगी पत्रात लिहिलं होतं – " – – – सरकारनं सात वर्षे उगीचच अडवून ठेवलेले पेन्शन द्यावे लागले हा माझा तिसरा जय आहे. खटला जिंकला, सरकारी अपील काढून घ्यावं लागलं हे पहिले दोन जय होत. ते पाहण्यासाठी मी धडधाकट उरलो हाही एक जयच ! – – –''

अखेर

वयाच्या ८२ व्या वर्षीही दादासाहेबांचं वाचन-लेखन, हिंडणं-फिरणं, सभा-वाचनालयांना भेटी देणं इत्यादी सुरळीत चाललं होतं. १९७९-८० मध्ये त्यांचं ' रविवार-सकाळ ' मधलं शब्दशोध या शीर्षकाखाली प्रसिद्ध होणारं लिखाण लोकप्रिय होतं. इतरत्रही विविध लेखन प्रसिद्ध होत होतंच. १० मे १९८० रोजी त्यांना भोपटकर जन्मशताब्दीच्या समारंभाचं अध्यक्षपद लाभलं होतं. – हेच शेवटचं अध्यक्षपद ठरलं ! या काळातच त्यांची प्रकृती बिघडू लागली होती, पण औषध घेऊन ते हिंडू-फिरू शकत होते. १ जून ८० ला त्यांच्या पुतण्याच्या विवाह-प्रसंगी त्यांची बहुतेक सर्व नातेवाइकांची भेट झाली - हीच त्यांची दुर्दैवाने शेवटची भेट ठरली ! श्री. जयंतराव टिळकांचा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात समावेश झाल्यावर केसरीवाड्यात झालेल्या सत्काराला दादासाहेब अगत्यानं उपस्थित

होते. दि. १२ ते १४ जुलै हे दोन-तीन दिवस त्यांना थोडं आजारपण आलं होतं, त्या वेळी केतकर कुटुंबाचे एक ऋणानुबंधी श्री शंकर जोशी यांनी जरूर ती सर्व मदत केली. 'शेवटी' धुळ्याला मुलाकडे जाण्याची त्यांची इच्छा होती, याला डॉ. भागवत यांनी संमती दर्शविली होती आणि श्री. जयंतराव टिळकांनी प्रवासाची व्यवस्था केली होती. पण पंधरा जुलै ८० ला पहाटे झोपेतच ते मृत्यूच्या आधीन झाले ! त्यांच्या 'कर्मभूमीत' त्यांना मृत्यू आला; अंत्यदर्शनासाठी त्यांना त्यांच्या 'कर्मस्थानी' - केसरी-मराठा-ग्रंथशाळेत - ठेवण्यात आलं होतं ! त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांची 'अंत्ययात्रा' न काढता, पुण्याच्या 'वैकुंठ'-मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

एक देशभक्त - स्वातंत्र्यसैनिक, गीतेचा कर्मयोगी प्रचारक, क्रियाशील सुधारक, प्रामाणिक निधिसंयोजक, निर्भीड आणि मार्मिक पत्रकार म्हणून त्यांची स्मृती सदैव राहील.



श्री. केतकरांच्या लेखनशैलीचे रसग्रहण

प्रा. अ. ना. देशपांडे आपल्या 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' (भाग दुसरा) यात लिहितात (पृष्ठ ७०१)--

" मर्मभेद (१९५०) हा ग. वि. केतकरांचा राजकीय लेखसंग्रह आहे. पाकिस्ताननिर्मिती आणि संघावरील बंदी हे दोन मुख्य विषय त्यांत चर्चिलेले आहेत. येथे भावनांना आवाहन नाही, येथे वाङ्मयीन गुणांची खूबसुरती नाही; येथे लडिवाळ लालित्य नाही, येथे जळजळीत तर्कशुद्ध विवेचकता आहे. 'मार्मिक' 'मार्मिक' हा शब्द अनेक वेळा आपण ऐकतो आणि वापरतो, पुष्कळ वेळा फारसा काटेकोरपणा न करता अनेक लेखकांना आपण मार्मिकतेचा गुण बहाल करतो; पण मार्मिकता--मर्मभेदकता अलीकडील कोणत्या लेखकाच्या लेखात ओतप्रोत आहे असे जर विचारले तर कोणताही मर्मज्ञ आणि प्रामाणिक वाचक मोठ्या उल्हासाने ग. वि. केतकरांचे नाव घेण्यास प्रवृत्त होणे शक्य आहे. केतकरांच्या लेखणीच्या मर्मभेदकतेची चुणूक पहावयाची असेल तर संघबंदीवरील " आधी फाशी ... मग चौकशी " हे त्यांचे तीन लेखांक अवश्य वाचून पहावे ! कवी कथाकार आपले म्हणणे वाचकांच्या गळी उतरवण्याकरिता आपल्या प्रतिपादनात अनेक वाङ्मयीन वशीकरणे वापरतात; पण प्राधान्याने युक्तिवाद चातुर्याचाच आश्रय करून आपले विवेचन वाचकांना पटविण्याचे सामर्थ्य असलेले लेखक थोडे सापडतात. अशा थोड्या लेखकांतच ग. वि. केतकरांचे स्थान आहे ! "

'केसरी'कार आपल्या अग्रलेखात लिहितात -

" . . . . कै. केतकरांच्या संपादकीय कर्तृत्वाला खरा साज चढविला तो त्यांच्या आग्रही आणि ठाम मतांमुळे; कोणाला पटो वा न पटो, आपली भूमिका धैर्याने मांडण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे, त्यांच्या स्वच्छ, स्पष्ट, लखलखीत शैलीमुळे, त्यांच्या जळजळीत शब्दांमुळे, त्यांच्या लेखनाच्या विलक्षण हौसेमुळे. . . आपण या विषयासंबंधी लोकांना काही सांगितलेच पाहिजे, या प्रश्नासंबंधीची एक वेगळी दृष्टी लोकांना दिलीच पाहिजे, या तळमळीतून त्यांनी लेखन केले . . . 'केसरी' च्या संपादकीय मंडळाच्या बैठकीत लेखनाविषयी विविध विषय सुचवले जात असताना त्या त्या विषयावर आपण या बैठकीपूर्वीच लिहून ठेवलेला मजकूर -- अहंकाराने नव्हे – कर्तव्यबुद्धीने केतकर टेबलावर ठेवीत . . . त्यांचे लेखन काळजाला जाऊन भिडे ते काही शब्दांच्या फुलोऱ्यामुळे नव्हे; त्यामागे आपल्या

विचारांसाठी कोणतीही किंमत मोजण्यासाठी लागणारा बेडरपणा उभा होता . . कै. केतकर या सहकाऱ्याला म्हणाले, ". . . . जर यदाकदाचित् लोकमान्य टिळक स्वर्गातून खाली आले आणि जर आपले सगळे लिखाण त्यांनी वाचले, तर त्यांना काय वाटेल, हा विचार नेहमी मी करीत आलो आहे . . . " कै. केतकरांचा आणखी एक विचारही समजून घ्यायला हवा. अलीकडेच त्यांनी म्हटले होते, ... " विचारार्थ मी काही गोष्टी मांडतो. पण तोच विचार सर्वांचा व्हावा आणि तसा झाला तरच लोकांचे कल्याण होईल असे मानणे हा खोटा अहंकार आहे." त्यांच्या लिखाणाला असलेली एक वेगळी व्यावहारिक मर्यादाही नोंद घेण्याजोगी आहे. कायद्याची मर्यादा सोडायची नाही, परंतु तिला असा स्पर्श करून जायचे की आता ही रेषा ओलांडली जाते की काय, असे वाचकांना वाटावे. अशा तऱ्हेने ते लिहीत . . . . त्यांच्या लेखणीतील आक्रमकता, बोचरेपणा, खोचकपणा यांना या काळातल्या लेखनात बहर आला आहे . . . अग्रलेखांची शीर्षकेही कै. केतकरांचे वेगळेपण सांगतात. फुटक्या राष्ट्राचे फुटके कपाळ, ' ' आठवणीतून गेलेल्या आठवणींची आठवण ' ही शीर्षके केतकरांची हे सांगायला नकोच . . . "

— केसरी दि १६–७–१९८०

पुण्याच्या ' तरुण भारत ' मध्ये म्हटलं आहे –

" . . . कायद्याच्या चौकटीत राहून कोणत्या मर्यादेपर्यंत ' मर्मभेदी ' मतप्रदर्शन करता येते, याचा जणू एक वस्तुपाठ त्यांनी उभा केला. त्यांची एखाद्या विषयाची चीरफाड करण्याची व त्याच्या मुळाशी जाऊन उद्‌बोधन करण्याची शक्ती खरोखर स्तिमित करणारी होती . . . . दादांचे लेखनावर खरोखरच मनापासून प्रेम होते. तो त्यांच्या विरंगुळ्याचा, हौशीचा व निष्ठेचाही विषय होता. अखेरपर्यंत ते स्फुट लिखाण करीत राहिले. अनेक विषयांवर चिंतन चालू असल्याने ' आम्हांस काय वाटते ' हे सांगण्याला त्यांची लेखणी नेहमी सिद्ध असे . . . त्यांना जे सत्य वाटले ते अप्रिय असले तरी सांगण्याचे साहस त्यांच्या ठायी प्रकटले . . . दादांचे आपल्या देशावर, धर्मावर आणि समाजावर निरतिशय आणि निःस्वार्थ प्रेम होते. त्याचाच आविष्कार त्यांच्या विविध लिखाणांतून झालेला दिसतो ..."

" . . . त्यांनी स्वतःची म्हणून स्वतंत्र शैली निर्माण केली होती. कठोर तर्कवाद हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य झाले. प्रतिपक्षाच्या चिंधड्या उडविण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत निर्माण झाले ते त्यांच्या या तर्कवादाने हे खरे असले तरी या तर्काला व्यासंगाची प्रचंड जोड होती. 'केसरी' च्या समृद्ध ग्रंथालयाचा कोपरा न् कोपरा त्यांच्या परिचयाचा होता व त्यातील ज्ञानकणांचा वापर ते शेवटपर्यंत आपल्या लिखाणात करीत असत. . . . इंग्रजीत लिहिणारे मराठी पत्रकार अगदी

हाताच्या बोटांवर मोजण्याइतके, त्यांत केतकरांचे स्थान होते हे त्यांच्या पत्रकारितेच्या संदर्भात आपण लक्षात ठेवले पाहिजे . . . तें हिंदुत्वनिष्ठ विचारवंत म्हणून विख्यात होते. पण इस्लाम, इसाई धर्म यांच्यावर टीका करताना, त्यांच्या चांगल्या बाजूचे रसग्रहणही ते तितक्याच समर्थपणे करीत. . . . "

— तरुण भारत, पुणे १६–७–८०

श्री. व. प्र. गीत म्हणतात –

" . . . वृत्तपत्रांतील अग्रलेख माहितीपूर्ण असावेत, विषयाची सांगोपांग चर्चा त्यात असावी, निर्भीड, तर्ककठोर विवेचन असावे हा त्यांचा आग्रह. तरुण भारतचे सुरुवातीचे तीन अग्रलेख लागोपाठ काश्मीर प्रश्नावर त्यांनी लिहिले. प्रत्येक लेखात नवा विचार नवा आक्रमक बिनतोड मुद्दा, नवी मांडणी असे. तो विषय त्यांनी जणू पिंजून काढावा . . . लोकांना धोक्याचा इशारा देऊन जागरूक करणे हे तर वृत्तपत्राचे काम आहे. एखादी घटना घडली की दुसरे दिवशी त्यावर अग्रलेख लिहिलाच पाहिजे असा आग्रह का ? त्यांचा नेहमी प्रश्न असे . . कदाचित् द्विसाप्ताहिक केसरीत स्वस्थपणे चिंतनशील विचारांची सवय असल्यानेही असेल, पण सकाळी वृत्तपत्रात आलेल्या घटनेवर दुपारी ११ वाजेपर्यंत अग्रलेख लिहिण्याची नाखुषी त्यांनी अनेक वेळा व्यक्त केली होती . . . . त्यांचे लेख एकटाकी, खाडाखोड नसलेले, स्वच्छ अक्षरांतील असत. शुद्धलेखनाबद्दल त्यांचा फार कटाक्ष असे . . . "

— रविवार पुरवणी, तरुण भारत, पुणे २०–७–८०

' महाराष्ट्र टाइम्स ' मध्ये म्हटलं आहे

" . . . केतकरांचे वैशिष्ट्य म्हणजे ते विद्वान नि शैलीदार संपादक होते धर्मशास्त्रापासून राज्यशास्त्रापर्यंत अनेक विषयांचे त्यांचे सतत वाचन चालू असे.. तथापि संपादकाला विद्वत्तेबरोबर शैली लागते आणि केतकरांना तेही वरदान लाभले होते. १९४७ ते ५० या काळात ते केसरीचे सपादक असताना त्यांनी लिहिलेले अग्रलेख त्यांच्या शैलीची तसेच कायद्याच्या कचाटचात न सापडण्याच्या कौशल्याची साक्ष देतात. लोकमान्यांच्या अग्रलेखांचे काही मथळेसुद्धा अविस्मरणीय ठरले, तद्वतच ' आधी फाशी मग चौकशी, ' ' कोणीकडून कोणीकडे ', ' देहान्त शासनाचे राष्ट्रीय बळी ' आदि केतकरांच्या अग्रलेखांचे मथळेही दीर्घकाल लक्षात राहतील . . . "


धावते जग, महाराष्ट्र टाइम्स, १६–७–८०

'लोकसत्ता'कार म्हणतात –

" . . . सार्वजनिक कार्याच्या तीर्थक्षेत्री एवढी तपश्चर्या केलेल्या ग. वि. केतकरांच्या लेखणीत अनुभवसिद्ध परिपक्वता नि ध्येयवादाची तेजस्विता ह्यांचा सुरेख संगम झाला नसता तरच नवल होते. टिळकांचा बुद्धिवादी रोखठोकपणा, सावरकरांची काव्यमयता नि विज्ञाननिष्ठा, गांधीजींची सुबोधता, भगवद्गीतेची समन्वयशीलता आणि या सर्वांचीच निर्भयता ह्यांचे सुसंवादी संमेलन केतकरांच्या लिखाणात झाले होते असे म्हटल्यास फारशी अतिशयोक्ती होणार नाही. . . .कोणी आपल्याला 'जातीय प्रतिगामी' म्हणतील म्हणून त्यांनी आपली प्रामाणिक मते दडवून ठेवली नाहीत . . . १९६४ नंतर विविध वृत्तपत्रांत ते नाना विषयांवर लिखाण करीतच राहिले; त्यांचा वाग्यज्ञ अगदी अखेरपर्यंत अखंड चालू होता "

लोकसत्ता, १६–७–८०





भाग २ : निवडक लेख

दोन महात्म्यांची अकल्पित कल्पित भेट

[१९१९ ते १९२२ पर्यंत श्री. ग. वि. केतकर हे मुंबई येथील श्रीहरि-कीर्तनालय या संस्थेचे कार्यवाह म्हणून काम करीत होते. या वेळी या संस्थेने चालविलेल्या 'कीर्तन' मासिकामध्ये ते लेख लिहीत असत. त्या वेळी महात्मा गांधी व महाराष्ट्र-संत श्रीतुकाराम यांच्या भेटीचा प्रसंग कल्पून वरील लेख त्यांनी लिहिला. तो कीर्तन मासिकाच्या डिसेंबर १९२१ त प्रकाशित झालेल्या अंकी (दुसऱ्या वर्षाचा बारावा अंक, भाद्रपद शके १८४३) प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखाचे स्वारस्य आज पाव शतकानंतरही त्या वेळी होते तसेच किंवा थोडे अधिकही आहे. म्हणून 'सह्याद्रि'चे वाचकांसाठी त्याचे समग्र पुनर्मुद्रण केले आहे.]

दुपारी, भर बारा वाजण्याचा सुमार होता. अशा वेळी मुंबईत गावदेवी येथे लॅबर्नम रोडवर शेट रेवाशंकर जगजीवन जव्हेरी यांच्या बंगल्याच्या तिसऱ्या मजल्यावरील एका खोलीत पूर्ण शांतता नांदत होती. बाहेर रस्त्यावरही या वेळी एक चिटपाखरू देखील फिरकत नव्हते. ही खोली बांधण्याच्या व रंग देण्याच्या वेळी केलेल्या नक्षीशिवाय, इतर कोणत्याही रीतीने शृंगारली नव्हती. मुंबईच्या घरांतून सिमेंटात फुटक्या कपबशांचे चिनी मातीचे तुकडे बसवून केलेल्या जमिनी पुष्कळ ठिकाणी दिसून येतात. वर निर्दिष्ट केलेल्या खोलीतील तक्तपोशी अशाच प्रकारे केलेली होती. खोलीच्या कडेने थोड्याशा साध्याच खुर्च्या टाकलेल्या होत्या. खोलीला बाहेरून येण्यास एकच दरवाजा होता व दुसऱ्या बाजूला रस्त्याकडे सज्जा काढलेला होता. दरवाजातून आत आल्यावर डाव्या हाताच्या कोपऱ्यात टेलिफोन बसवलेला होता. जवळच सूत काढण्याचे दोन चरखे व त्यांवर काढलेल्या सुताच्या काही लडी पडल्या होत्या. त्याच्या समोरच्या कोपऱ्यात खाली चटया व त्यांवर एक लहानशी प्रवासी गादी टाकली होती. गादीवर एक खादीची चादर टाकलेली असून सभोवताली इतस्ततः वर्तमानपत्रे, पुस्तके व कागदपत्रे पडली होती. गादीवर एक कृश व्यक्ती लिहिण्यात पूर्णपणे गढून गेलेली होती. कमरेला गुंडाळलेल्या एका जाड्याभरड्या खादीच्या पंचाशिवाय या व्यक्तीच्या अंगावर दुसरे वस्त्र नव्हते. शरीर कृश असले तरी त्यावर तपस्येचे दिव्य तेज झळकत होते. चेहऱ्याकडे पाहिले तर साधेपणा, सात्त्विकपणा व भूतदया यांचा हा मनुष्य मूर्तिमंत पुतळाच आहे की काय असा भास होई. वाचकहो, येथपर्यन्त केलेल्या वर्णनावरून ही दिव्य विभूति कोण, याबद्दल नामनिर्देश करण्याचे कारण नाही. आज प्रत्येक हिंदवासी मनुष्य याच महात्म्याच्या मूर्तीचे ध्यान करीत आहे. लोकमान्य इहलोक

सोडून गेल्यावर ज्या महात्म्याने राष्ट्राची राजकीय सूत्रे हातात घेऊन सर्व देशभर न भूतो न भविष्यति अशी चळवळ केली व प्रबळ राजसत्तेलाही त्राही भगवान करून सोडले आणि आपल्या अतुल तपःसामर्थ्याने सर्व देशबांधवांची एकी करून असहकारितेच्या सात्त्विक झगडचाची सिद्धता केली, त्या महात्म्याच्या मूर्तीचा हिंदवासियांना निदिध्यास लागावा यात नवल नाही. स्वराज्य असते तर अशा महात्म्यांनाच आम्ही देशाच्या अधिकाराची सूत्रे दिली असती. आजही ते देशाचे अनभिषिक्त राजेच आहेत. या अनभिषिक्त राजाचे हे साधेपणाचे वैभव पाहून मुद्राराक्षस नाटकात वर्णन केलेल्या चंद्रगुप्ताच्या साम्राज्याचा प्रधान आर्य चाणक्य, याच्या वैभवाची कोणास आठवण होणार नाही ?

उपशकलमेतद्भेदकं गोमयानाम्
वटुभिरुपहृतानां बर्हिषां स्तूपमेतत् ।
शरणमपि समिद्भिः दृश्यमाणाभिरामिः
विनमितपटलान्तं दृश्यते जीर्णकुड्यम् ॥

अर्थ :– "एकीकडे गोवऱ्यांचे तुकडे करण्याकरिता एक दगड व दुसरीकडे शिष्यांनी आणलेल्या दर्भांचा स्तूप पडलेला आहे आणि जुनाट कुडाच्या भिंतींच्या झोपडीचे छप्पर वाळत ठेवलेल्या समिधांच्या भाराने वाकलेले आहे."

असो. महात्माजी या वेळी "नवजीवन" करिता लेख लिहिण्यात गुंतले होते. खोलीत दुसरे कोणीही नव्हते व दुपारी तीन वाजेपर्यंत कोणांची भेटण्याची वेळही ठरलेली नव्हती. महात्माजींचे मन लेख लिहिण्यात पूर्ण एकाग्र झाले होते. असहकारयोगाबद्दल नाना तऱ्हेच्या शंकाकुशंकांचे समाधान हा या लेखाचा विषय होता व कित्येक शंकांच्या कुत्सितपणामुळे महात्माजींच्या अंतःकरणास खेद होत आहे असे स्पष्ट दिसत होते.

इतक्यात वाऱ्याने दार वाजावे असा आवाज झाला. त्याबरोबर महात्माजींची दृष्टी दाराकडे गेली; तो त्यांना दारातून एक अस्पष्ट आकृती पुढे येत आहे, असा भास झाला. महात्माजी आश्चर्यचकित मुद्रेने त्या आकृतीकडे टक लावून पाहू लागले. जसजसे ते त्या मूर्तीकडे पाहू लागले तसतशी ती अधिकाधिक स्पष्ट दिसू लागली. त्या मूर्तीचे ते तेजःपुंज सावळे रूप पाहून ही कोणीतरी स्वर्गीय विभूती असावी, अशी महात्माजींच्या मनाची खात्री झाली; पण ती कोण असावी याबद्दल मात्र त्यांस काहीच उलगडा होईना. भगवान् गोपालकृष्णांची मूर्ती त्यांच्या परिचयाची होती, पण या मूर्तीचे स्वरूप निराळ्याच प्रकारचे होते. नरसी मेहेता किंवा ख्राइस्ट, टॉल्स्टॉय व थोरो यांच्या मूर्तीही त्यांच्या परिचयाच्या होत्या. पण यांपैकी कोणत्याही मूर्तीशी या अकल्पित प्रगट झालेल्या विभूतीच्या साम्य

जुळेना. या आकृतीचा पोशाख महाराष्ट्रीय धर्तीवर होता. त्या सावळचा मूर्तीने महाराष्ट्रीय पद्धतीप्रमाणे डोक्याला पांढरे पागोटे गुंडाळले होते. अंगात पांढराच बंदाचा अंगरखा असून कमरेला महाराष्ट्रीय रीतीनेच धोतर गुंडाळलेले होते. गळचात तुळशीच्या माळा व कपाळी गोपीचंदनाचा ढळढळीत टिळा लाविला होता. एका हातात खांद्यावर टेकलेले भगवे निशाण व दुसऱ्या हातात टाळ होते.

महात्माजींच्या जागी जर एखादा महाराष्ट्रीय असता तर त्याने चिर-परिपाठाच्या 'अभंगवाणीने' व महिपतिबोवांच्या गोड चरित्रकथनाने पूर्ण परिचयाची झालेली तुकोबारायांची प्रेमळ मूर्ती चटकन् ओळखून त्यांच्या पायांवर लोटांगण घेऊन आनंदाश्रूंनी त्यांच्या चरणकमलांना स्नान घातले असते. महात्माजींनी ही कोणी महाराष्ट्रीय विभूती आहे असा अंदाज केला होता. त्यांनी नम्रतापूर्वक त्या दिव्य मूर्तीस नमस्कार करून हिंदी भाषेतच 'आपण कोण? कोठून आला?' असा प्रश्न विचारला.

हा प्रश्न ऐकल्याबरोबर इतका वेळपर्यंत धारण केलेलो गंभीरता बाजूस सारून किंचित् हास्यमुख करून हलक्या पण स्पष्ट व ओजस्वी स्वरात ती मूर्ती बोलू लागली–

"मी कोठून आलो हे सांगता येणार नाही; कारण मी सर्वत्रच आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, सर्व अणुरेणूंमध्ये मी भरून राहिलो आहे. मी नाही असे स्थानच नाही. मग मी कोठून येणार व कोठे जाणार? मी सर्वत्रच आहे. फक्त तुझ्या पुण्याईने माझे हे विशिष्ट रूप तुझ्यापुढे आज प्रकट होत आहे. ज्या वेळी हे स्वरूप जीवसृष्टीत नांदत होते त्या वेळेस याला 'तुकाराम' असे म्हणत."

"कोण तुकाराम!" गांधीजींनी पुनः एकवार नमस्कार केला. "होय, आपले काही अभंग मी भाषांतररूपाने वाचले आहेत. आपले भक्तिमय अंतःकरण त्यांत जागजागी दृग्गोचर होत असलेले मला आढळून आले. आपण परमेश्वराच्या जवळ गेलेले आहात अशी माझी दृढ भावना झाली. मी आरंभिलेल्या सात्त्विक असहकारितेच्या झगडचात मला आपल्यासारख्या साधुसंतांचे पाठबळ अवश्य पाहिजे."

"तुला सर्व साधुसंतांचे पाठबळ आहे व हे सांगून तुला प्रोत्साहन देणे यासाठीच आज मी सगुणरूपाने प्रकट होत आहे. हा तुझ्या तपाचा प्रभाव होय. माझा परमार्थाचा मार्ग हासुद्धा एक प्रकारचा सात्त्विक झगडाच होता.

आम्ही वीर झुंजार । करू यमदाढे भार
थापटिले भार । मोड झाला दोषांचा ।।१।।
झाला हाहाकार । आले हांकीम झुंजार
शंखचक्रांचे श्रृंगार । कंठी हार तुळशीचे ।।२।।
रामनामांकित बाण । गोपी लाविला चंदन
झळकती निशाणे । गरुड टके पताका ।।३।।
तुका म्हणे काळ । झालो जिकोनि निश्चल
पावला सकळ । भोग आम्हां आमचा ।।४।।

"कोणत्याही सात्त्विक झगडचाला निष्ठावान् अनुयायी लोकांची जरुरी असते आणि कोणत्याही काळी निष्ठावान् अनुयायी मिळणे फारच कठीण जाते.' कारण–

तेथे पाहिजे जातीचे । येरा गबाळांचे काम नाही ।।

"त्या काळी साधुत्वाचा वेष पांघरणारे पण आतून अत्यंत नीच असे बोके संन्यासी फारच बोकाळले होते, त्यांचाही मी कडक शब्दांनी निषेध केला."

संतचिन्ह लेवूनी अंगी । भूषण मिरविती जगी ।।
पडिले दुःखाचे सागरी । वाहावले ते भवपुरी ।।
आशापाशी बांधोनि चित्त । म्हणती आम्ही झालो मुक्त ।।
त्यांचे लागले संगती । झाली त्यांची तेच गति ।।
तुका म्हणे सांगो किती । जळो तयांची संगती ।।

महात्माजींना आपल्या बोलण्याचा अर्थ पूर्णपणे कळावा म्हणून ती दिव्य विभूती प्रत्येक शब्दाचा उच्चार स्पष्ट व सावकाश करीत होती. हळूहळू पुढे येण्याची क्रिया बोलतानाही चालू होती. महात्माजीही देहभान विसरून अगदी निश्चलपणे त्या मूर्तीकडे पहात होते. तिचा प्रत्येक शब्द त्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडत होता. महात्माजींना त्या वाक्यांचा अर्थ शब्दशः कळत नसला तरी त्यांतील भावार्थ त्यांच्या ध्यानात येत होता. भोंदू साधूंचे वर्णन ऐकून त्यांच्या तोंडून सहज पुढीलप्रमाणे उद्‌गार निघाले–

"असेच पोशाखी देशभक्त आजसुद्धा बरेच दिसतात. ते केवळ कीर्तीच्या आशेने माझ्या कार्यास वरवर पाठबळ देत आहेत अशा लोकांच्या अनुयायित्वाने माझ्या कार्याचे नुकसानच होणारे आहे. ढोंगाचा तर मला अत्यंत तिटकारा आहे. अप्रामाणिक मित्रापेक्षा प्रामाणिक शत्रूलाच मी जास्त पूज्य मानीन. स्वदेशीचा व साध्या राहणीचा प्रसार व्हावा म्हणून मी खादीचा प्रसार केला. पण लोक खादीचे नक्षीदार व वाजवीपेक्षा फाजील कपडे वापरू लागले. खादीचे कपडे पण ऐटदार

युरोपियन पद्धतीने शिवू लागले व त्याला निरनिराळ्या भपकेदार सोन्यामोत्याच्या गुंड्या लावू लागले. कोणी कोणी तर अस्सल विलायती खादी स्वदेशी म्हणून वापरू लागले व विकू लागले. अशा रीतीने कित्येकांनी खादीच्या प्रसाराच्या मूळ उद्देशास हरताळ फासला."

"मीही लोकांच्या चैनीच्या प्रवृत्तीस आळा बसावयासाठी सर्वांनी दर पंधरा दिवसांनी एकादशीचा उपवास करावा असा कळकळीचा उपदेश केला."

पंधरा दिवसा एक एकादशी । कां रे न करिशी व्रतसार ।
काय तुझा जीव जातो एका दिसे । फराळाच्या मीसे धणी घेसी ।
स्वहित कारण मानवेल जन । हरिकथा-पूजन वैष्णवांचे ।
थोडे तुज घरी होती उजगरे । देऊळासी का रे मरसी जातां ।
तुका म्हणे का रे सुकुमार झालासी । काय जाब देसी यमदूता ।

पण या एकादशी व्रताचा चैनी लोकांनी कसा विपर्यास केला पाहा. मन शुद्ध राहण्यासाठी उपवास करावा किंवा उपवास अगदीच करवत नसल्यास अल्प फलाहार करून सर्व वेळ परमेश्वराचे भजन-पूजन करावे, हा या व्रताचा मूळ उद्देश होता. पण हा उद्देश बाजूला राहून "एकादशी दुप्पट खाशी, तरी म्हणे मी उपाशी" असा प्रसंग आला आहे व कित्येक लोक लाडू-जिलब्या इत्यादी उपवासाच्या पदार्थांची रुचकर पक्वान्ने तयार करून त्यांवर यथेच्छ ताव मारतात आणि भजन-पूजनाला तर अजीबात रजा मिळते. अशी लोकांची प्रवृत्ती दूषित होत असल्यामुळेच संतांना एवढा खटाटोप पुनः पुनः करावा लागतो."

"या असहकारयोगाकरिता मी असाच प्रचंड उद्योग आरंभलेला आहे, व त्याला शेवटी पूर्ण यश येईल अशी माझी परिपूर्ण श्रद्धा आहे. पूर्वी राजकारण हा विद्वान् व श्रीमान लोकांनीच हाती घेण्यासारखा विषय समजला जात असे. मी राजकारण अगदी गरिबांच्या झोपडीपर्यंत नेऊन पोचवले आहे. मी राष्ट्रीय मंदिरात उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा भेद ठेविला नाही. राष्ट्रीय सभेच्या सभासदांची संख्या वाढून गरीब मनुष्याला देखील राष्ट्रीय सभेचे सभासद होता यावे म्हणून वार्षिक फक्त चार आणे वर्गणी ठेविली आहे. सर्वांना निर्भयतेचा उपदेश करून 'मरणाची भीती नाहीशी होणे हेच स्वराज्य' अशी स्वराज्याची सोपी पण अर्थपूर्ण व्याख्या करून टाकली."

आपल्या कार्यात कोठे चूक असल्यास या दिव्य विभूतीने ती दाखवून द्यावी, म्हणून महात्माजी आपल्या चळवळीच्या मूळ तत्त्वाचा पाढा त्या मूर्तीपुढे थोडक्यात वाचीत होते. स्वराज्याची व्याख्या ऐकून तुकोबारायांच्या तोंडावर थोडेसे हास्य मळकू लागले. ते म्हणाले –

" मरणाची भीती नाहीशी होणे ही परमेश्वर-प्राप्तीचीही पहिली पायरी आहे. परमार्थातला मोक्षमार्ग देखील फक्त शास्त्रीपंडितांसच उपलब्ध आहे, अशी समजूत होऊन बसली होती. ती मी पार बदलून टाकली आणि भक्तीच्या साधनाने लहान-थोर, उच्च-नीच हा भेदभाव न ठेवता मोक्षाचा मार्ग सर्वांस खुला करून दिला."

फोडिली भांडारे । माप घेवूनिया खरे ।।
केली हरिनामाची वरो । मागितले आता सरो ।।
देशात सुकाळ । झाला हारपला काळ ।।
घ्यावे धणीवरी । तुका म्हणे लहान थोरी ।।

प्रत्येक वारकऱ्याने पंढरीची वारी केलीच पाहिजे असा मी निर्बंध घातला दर आषाढात व कार्तिकात एकादशीस पंढरपुरास वारकरी संप्रदायाचा प्रचंड मेळा जमतो व–

एकमेकां साहय करू । अवघे धरू सुपंथ ।।

या न्यायाने सर्वच तरून जातात म्हणून

जाय जाय तू पंढरी । होय होय वारकरी ।।
साडोनिया वाळवंट । काय इच्छीसी वैकुंठ ।।
खांद्या पताकांचे भार । तुळशी माळा आणि अबीर ।।
साधुसंतांच्या दाटणी । तुका जाय लोटांगणी ।।

याप्रमाणे सर्वांनी या पंढरीच्या मेळचात सामील होण्याचा मी उपदेश केला. पूर्वी परमेश्वराचे कीर्तन करणे हेही फक्त विद्वानांचे काम होऊन बसले होते; पण मी ते साधन सर्वांना सुलभ करून टाकले व भक्तीच्या या भोळचा भाविकांस निर्मळ मार्गात यात्किंचितही भेदाभेद ठेविला नाही. सगळ्यांना पाचारण केले.

या रे या रे लहान थोर । हीन याती भलते नर । येथे सर्वांसी अधिकार ।। "

महात्माजींच्या मनामध्ये आपल्या मार्गात कोठे चूक होत असेल तर ती या महात्म्याने सांगावी अशी इच्छा होती. म्हणून ते मध्येच म्हणाले–

" एकंदरीत तुम्हीही मजप्रमाणेच आपल्या कार्याचा प्रसार सामान्य जनतेत केला. तुमच्या व माझ्या कार्यातील साम्य मला आतापर्यंतच्या तुमच्या भाषणाने पूर्णपणे कळून चुकले आहे. पण मला आपल्याकडून एकच आशीर्वाद पाहिजे आहे. माझ्याकडून वारंवार हिमालयाएवढचा चुका होतात. त्यांची पुनरावृत्ती होऊ नये. "

या वेळी ती तुकाराम महाराजांची आकृती पुढे येत येत सज्ज्याच्या दरवाजापर्यंत आली होती. चुकांबद्दलचा उल्लेख ऐकून त्यांनी जरा आवाज चढवून उत्तर दिले –

" चुका हव्या व्हायच्याच. तुझ्यासारख्यांच्या चुकांनी झाले तर देशाचे कल्याणच होईल. दहा-बारा हिमालयांऐवढे कार्य केले म्हणजे त्यात एखाद्या हिमालयाएवढी चूक सहज पचून जाते, आणि चूक झाल्यानंतर त्याबद्दल जर मनःपूर्वक पश्चात्ताप वाटला, तर त्या चुकीचे परिमार्जन होते – 'अनुतापे दोष जाय । न लागता निमीष ।।' तुझे आणि माझे कार्य तत्त्वतः एक पण स्वरूपतः कालभिन्नत्त्वामुळे भिन्न झाले आहे, आणि असे असल्यामुळेच तुझ्या कार्यास साधुसंतांचा पूर्ण आशीर्वाद आहे. निश्चय आणि परमेश्वराच्या ठिकाणी दृढ विश्वास या दोन गोष्टी असल्या म्हणजे कोणत्याही मार्गात सिद्धी ही ठेवलेलीच आहे– "

इतक्यात जिन्यामध्ये पावलांचा आवाज झाला. त्याबरोबर –

निष्ठावंत भाव भक्तांचा हा धर्म ।
निर्धार हे वर्म चुको नये ।।

ही शेवटची 'अभंगवाणी' सद्गदित स्वराने उच्चारून ही विभूती सज्ज्याच्या दारावाटे नाहीशी झाली. महात्माजी दाराकडे शून्य दृष्टीने पहात होते. इतक्यात जिन्यातून स्वामी आनंद हे काही महत्त्वाचे कामाचे कागदपत्र घेऊन आले. महात्माजी असे शून्य दृष्टीने दाराकडे का पहात आहेत, याचे प्रथमतः स्वामीजींस आश्चर्य वाटले; पण कदाचित् लेखाबद्दल काही विचार चालले असतील असे म्हणून ते काहीच बोलले नाहीत. त्यांनी आणलेले कागदपत्र महात्माजींपुढे ठेवले व महात्माजींचा नित्यक्रम रोजच्याप्रमाणेच चालू झाला. पण अजूनही कधी कधी रेवाशंकर जगजीवन यांच्या घरी दुपारच्या वेळी दिसलेल्या दिव्य दृश्याची त्यांना स्मृती होते व त्यामुळे त्यांचा उत्साह द्विगुणितच होतो.

---

* शं. ग. दाते सूचीत मथळा असा आहे सह्याद्रित 'कल्पित' शब्द नाही.

– सह्याद्रि, मार्च १९४८.

स्वराज्य पक्षाची कैफियत

काही शंकांचे समाधान

आँ. इं. काँ. कमिटीच्या ठरावामुळे यापुढे आक्षेप-निरसनाचे अप्रिय व विध्वंसक काम करण्याची विशेष जरुरी न राहता नवा स्वराज्य पक्ष, किंवा त्यालाच बीजभूत असलेला जुना काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्ष, यांच्या उद्देशांची चर्चा करण्याच्या विधायक व शांततामय कार्यास अनुकूल वातावरण कसे उत्पन्न झाले आहे हे गेल्या अंकातील लेखात सांगितलेच आहे. स्वराज्य पक्षाची व काँग्रेस – डेमोक्रॅटिक पक्षाची अशा दोनही उद्देशपत्रिका जनतेपुढे आहेतच. पण या उद्देश-पत्रिकांमधून या पक्षांचे धोरण सूत्ररूपाने मांडलेले असल्यामुळे, आस्थेवाईक जिज्ञासूंच्या मनात देखील तदनुषंगिक असे अनेक प्रश्न उभे राहतात व त्यांचा योग्य खुलासा करणे जरूर होते. कुत्सितपणे व विध्वंसनाच्या दृष्टीने आक्षेप घेणाऱ्याच्या आघातास प्रत्याघात करणे हे काम जितके उभयतांस मनःक्षोभ उत्पन्न करणारे व तामस, तितकेच कार्यतत्पर व उत्तेजनाच्या दृष्टीने प्रश्न करणाऱ्या जिज्ञासूंना उत्तर देणे हे काम उभयतांस सात्त्विक व संतोषदायक ठरते.

प्रथम काँग्रेसमध्ये स्वराज्य पक्ष हा निराळा पक्ष काढण्याची जरुरी काय हा प्रश्न उत्पन्न होतो. काँग्रेसमध्ये निराळा पक्ष उत्पन्न करून कार्य करणे हे काँग्रेसनिष्ठेच्या व राष्ट्रहिताच्या दृष्टीने गौणच होय. स्वराज्यपक्षीय पुढाऱ्यांस केवळ अनिर्वाह पक्ष म्हणून तो मार्ग स्वीकारावा लागला. स्वतः काँग्रेसने कौन्सिलांतर्गत प्रतिकार हा स्वराज्याच्या अनेकविध साधनांपैकी एक साधन म्हणून मान्य केला म्हणजे स्वराज्य-पक्षाच्या स्वतंत्र अस्तित्वाची जरुरी राहणार नाही. स्वराज्य-पक्षीयांना आपला पक्ष कायमचा निराळा ठेवण्याची इच्छा नाही. कौन्सिलप्रवेशास काँग्रेसची मान्यता मिळणें म्हणजेच स्वराज्य-पक्षाचे मरण होय व एखाद्या इच्छामरणी मनुष्याप्रमाणे हे मरण शक्य तितके जवळ येऊन हा पक्ष अल्पायुषी व्हावा अशीच उलट त्या पक्षाच्या अनुयायांची इच्छा आहे. याला पूर्वीचा एक समर्पक दृष्टान्त द्यावयाचा म्हणजे होमरूल लीगचे स्वतंत्र अस्तित्व व व स्वतंत्र कार्य चालू होते. पण जेव्हा स्वतः काँग्रेसनेच ते ध्येय मान्य केले, तेंव्हा होमरूल लीग ही स्वतंत्र संस्था न राहता ती एक काँग्रेसच्या कार्याची अंमलबजावणी करणारी व काँग्रेसला पोषक अशी उपसंस्था झाली. त्या वेळी जसे होमरूल लीगने चार पावले काँग्रेसच्या पुढे जाऊन आपले निशाण रोविले, तसेच स्वराज्य पक्षाने आज शब्दप्रामाण्याच्या अरुंद कोंडीत अडकलेल्या काँग्रेसच्या पुढे

जाऊन कौन्सिलप्रवेशाचे निशाण रोविले आहे. ज्या वेळी काँग्रेस या कोंडीतून सुटून पुढे येईल त्या वेळी स्वराज्य पक्षाचे निशाण काँग्रेसचेच निशाण होईल. त्याला निराळेपणा राहणार नाही. आज ज्याप्रमाणे खादी प्रसारक संघ किंवा राष्ट्रीय शिक्षण कार्यालये या काँग्रेसला पोषक अशा, पण तिच्या कार्याची फक्त एक बाजू उचलणाऱ्या संस्था आहेत, त्याप्रमाणेच स्वराज्य पक्ष हाही राष्ट्रीय सभेचा कौन्सिल-प्रतिकार-संघ बनेल. सारांश, स्वराज्य पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व हे काँग्रेसच्या कुढेपणावर अवलंबून आहे, ज्या वेळी काँग्रेसचे धोरण व्यापक स्वरूपाचे होईल त्या वेळी स्वराज्य पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व राहणार नाही.

स्वराज्य पक्षाच्या काँग्रेसनिष्ठेची स्पष्ट कल्पना त्याच्या जाहीरनाम्यातील कलमे वाचताच कोणासही येण्यासारखी आहे. या जाहीरनाम्यात प्रथमच असे नमूद केले आहे की, या पक्षाला सर्व न्याय्य व शांततामय मार्गांनी स्वराज्य मिळविणे हे काँग्रेसचे ध्येय मान्य आहे. त्यापुढे अनत्याचारी अहसकारितेच्या तत्त्वासही त्यात मान्यता दर्शविली आहे. मात्र या तत्त्वाची अंमलबजावणी करताना, विवेचक बुद्धीचा उपयोग करून त्याचे कुढचा कर्मठपणात पर्यवसान होऊ नये, एवढी खबरदारी हा पक्ष घेणार आहे. असहकारिता म्हणजे सरकारास कोणत्याही प्रकारे साहाय्य न करणे होय, व तीत प्रतिकारी चळवळीचाही समावेश होऊ शकतो, असे या पक्षाचे म्हणणे असून तेही या जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद करून ठेवलेले आहे. या जाहीरनाम्याच्या पाचव्या कलमात स्वराज्य पक्ष कौन्सिलात जाऊन काय करणार याचेही क्रमवार दिग्दर्शन केलेले आहे. हा पक्ष लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली व प्रांतिक कौन्सिले यांमध्ये निवडून येण्याकरिता राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार उभे करील. ते निवडून आले म्हणजे हा पक्ष आपल्या मागण्या ठरवून व सरकारास कळवून त्या मान्य करण्यास योग्य मुदत देईल. या मुदतीत या मागण्या सरकार मान्य न करील तर या पक्षाचे निवडून गेलेले लोक सर्वव्यापी व अव्याहत विरोध करून कौन्सिलचे कार्य चालविणे शक्य तितके अशक्य करून टाकतील. ज्या वेळी प्रतिपक्षावर हल्ला करावयाचा असतो त्या वेळी आपल्या पक्षाचे डावपेच प्रतिपक्षाच्या हालचालींवर अवलंबून ठेवावे लागत असल्यामुळे याविषयी वर दिले आहे त्यापेक्षा जास्त रेखीव स्वरूप तूर्तच देता येणे शक्य नाही.

स्वराज्य पक्ष हा कौंसिलांतर्गत विरोधावर विशेष जोर देणारा असल्यामुळे त्याला कौन्सिलपक्ष हे नाव एका दृष्टीने अन्वर्थक आहे. पण तर्गत प्रतिरोधाच्या विध्वंसक कार्याशिवाय दुसरे विधायक असे कार्यच नाही असे जर कोणी भासवीत असेल तर ती मात्र चूक होय. विधायक कार्यक्रमांतील खादीची नवीन बाब वगळली तर बाकीच्या बाबी, म्हणजे हिंदू–मुसलमानांची एकी, अस्पृश्यतानिवारण, वगैरे

बाबींचा पूर्वी काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाच्या जाहीरनाम्यातही अंतर्भाव केलेलाच होता आणि नवीन स्वराज्यपक्षाच्या जाहीरनाम्यांतील ९ व्या कलमात काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमांतील सर्व बाबींना या पक्षाचा पूर्ण पाठिंबा मिळेल असे स्पष्ट लिहिले आहे. या कार्यक्रमाशिवाय म्युनिसिपालिटचा व स्थानिक स्वराज्यसंस्था काबीज करणे (क. ६) मजूरसंघ स्थापन करणे. (क. ७), ब्रिटिश मालावर बहिष्कार घालणे. (क. ८) निरनिराळचा जातींच्या व धर्माच्या लोकांत एकोपा राहावा म्हणून परस्परांच्या हक्काबद्दल एक सर्वराष्ट्रीय योजना (नॅशनल पॅक्ट) तयार करणे (क. १०) आशियाटिक राष्ट्रांचा ऐक्य संघ प्रस्थापित होण्यास मदत करणे. (क. ११) व परराष्ट्रीय चळवळीचे पुनरुज्जीवन करणे या गोष्टी काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमाला भरीस घालून, हा स्वराज्य पक्षाचा जाहीरनामा विधायक दृष्टीने देखील काँग्रेसच्या कार्यक्रमांपेक्षा जास्त व्यापक स्वरूपाचा केलेला आहे हे कोणासही दिसून येईल. काँग्रेसच्या कोणत्याही कार्यास स्वराज्य पक्षाचा विरोध नाही. स्वराज्य पक्षाचे सर्व पुढारी व्यक्तिशः विधायक कार्यक्रमाचे आचरण करीत आहेत, व त्या कार्यक्रमास शक्य ती मदत देत आहेत. कायदेभंगास आज राष्ट्र असावे तितके तयार नाही असे स्वराज्य पक्षाचे म्हणणे असून पुष्कळ ना-फेर पक्षीय पुढाऱ्यांचेही तसेच मत आहे. पण राष्ट्रीय लढ्यातील एक शस्त्र या नात्याने स्वराज्य पक्ष कायदेभंग मानण्यास तयार आहे, व तसे या जाहीरनाम्यात नमूदही केलेले आहे. आता कौंसिलच्या चळवळीवर स्वराज्य पक्षाचा जितका भर आहे तितका तूर्त इतर चळवळींवर नाही हे उघड आहे. पण विधायक कार्यक्रमात सुद्धा जर खादी प्रसारक संघाचे लोक राष्ट्रीय शिक्षणास प्रत्यक्ष अशी मदत फारशी काही करीत नाहीत, फक्त सहानुभूती दाखवितात, किंवा राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यात अविरतपणे गढलेले लोक खादीच्या कार्यास वैयक्तिक आचरणाशिवाय जास्त मदत करीत नाहीत, त्याचप्रमाणे स्वराज्य पक्षाचे लोकही व्यक्तिशः विधायक कार्यक्रम प्रत्यक्ष आचरून त्यास सहानुभूती दाखवितात, व विधायक कार्यक्रमाच्या निरनिराळचा शाखांत कार्य करणाऱ्या लोकांस उलट अशीच आमच्या कौंसिलांतर्गत प्रतिरोधाच्या कार्याविषयी तुम्ही सहानुभूती ठेवा अशी मागणी करतात. प्रत्येक व्यक्तीला किंवा संघाला सर्वच कार्ये स्वतः एकदम करता येणे शक्य नाही. प्रत्येकाने आपापला विशेष भाग उचलावा व बाकीच्यांशी पूर्ण सहानुभूती ठेवावी म्हणजे झाले. असे करण्यास स्वराज्य पक्ष तयार आहे व प्रतिपक्षाकडून असल्याच सहानुभूतीची मागणी करीत आहे. पण ती दाखविण्याइतके औदार्य अजून ना-फेर पक्षात उत्पन्न झाले नाही ही दुर्दैवाची गोष्ट होय. ती ज्या दिवशी होईल व कौंसिलातील लढाईस स्वराज्याच्या अनेक मार्गांपैकी एक मार्ग अशी मान्यता मिळेल त्या दिवशी खादी-

प्रसारक संघ, राष्ट्रीय शिक्षण कार्यालय किंवा अस्पृश्यतानिवारक मंडळ, त्याप्रमाणेच स्वराज्य पक्ष हा एक काँग्रेसचाच कौंसिल कार्यकारी संघ बनेल. असे आज नाही तर उद्या होईलच अशी स्वराज्य पक्षाची खात्री असल्यामुळे, त्याची काँग्रेसनिष्ठा अढळ आहे; व "काँग्रेसमधून फुटून का निघत नाही" असे तुसडेपणाने विचारून दूर लोटण्यास काँग्रेसमधील कित्येक बांधव तयार असताही, त्या पक्षाला काँग्रेस सोडण्याची इच्छा होत नाही; आणि म्हणूनच त्याने आपल्या नियमावलीत स्वराज्य पक्षाच्या सभासदाने काँग्रेसचे सभासद असले पाहिजे असा प्रथमारंभीच नियम घालून ठेविलेला आहे.

वर केलेल्या विवेचनावरून स्वराज्य पक्ष व ना-फेर पक्ष यांमध्ये ना-फेर पक्षाच्या अनुदारपणाशिवाय दुसरा कोणताही आडपडदा नाही असे दिसून येईल. स्वराज्य पक्ष आणि मवाळ पक्ष यांच्यात दक्षिणोत्तर ध्रुवांइतके अंतर असून ना-फेरवाला पक्ष हा उभयतांच्या मध्यभागी आहे. स्वराज्य पक्ष कौन्सिलात जाऊ इच्छितो एवढ्यावरूनच तो मवाळ झाला आणि आज नाही उद्या हे स्वराज्य पक्षीय 'नवे मवाळ' मवाळ पक्षात विलीन होणार असे म्हणणे हे नुसते हास्यास्पदच नसून अशक्य आहे. शक्यताच पाहू गेल्यास प्रतिकारशून्य ना–फेरवाले हेच मवाळात विलीन होऊन जाणे बरेच संभवनीय आहे. स्वराज्य पक्ष हा मवाळ पक्षाहून भिन्न आहे व तो भिन्नच राहणार हे सिद्ध करणारी अनेक प्रमाणे दाखविता येतील. स्वतः मवाळ पक्ष तसे म्हणण्यास तयार नाही. सरकार व सरकारपक्षीय वर्तमानपत्रे, स्वराज्य पक्ष कौन्सिलात येऊन जो अनर्थ उडेल तो न व्हावा म्हणून मवाळ पक्षास जागृत करीत आहेत. यावरून सरकारही हे दोन पक्ष अगदी भिन्न मानते. कौंसिलातील कोणतीही अधिकाराची जागा स्वीकारावयाची नाही, ही प्रतिज्ञा मवाळ पक्ष कधीही मान्य करणार नाही. सार्वत्रिक विरोधाचे तत्त्वहि मवाळांस मान्य होणार नाही. मवाळ हे आता काँग्रेस नाश पावणार म्हणून आनंदाने टाळ्या पिटीत आहेत. पण स्वराज्य पक्ष, काँग्रेसमधील काही कुढे व तुसडे बंधू बाहेर ढकलीत असताही, काँग्रेसमधून जाऊ इच्छित नाही, व उक्ती आणि कृती यांच्यातील फारकतीमुळे काँग्रेसचे जे वजन कमी होत आहे ते होऊ नये म्हणून आटोकाट प्रयत्न करीत आहे. मवाळ पक्ष हा कायदेभंगास प्राण गेला तरी संमती देणार नाही. स्वराज्य पक्षाने कायदेभंगाचा अंतर्भाव आपल्या कार्यक्रमात केला असून राष्ट्राची तयारी होईल त्या वेळी त्याचा पुकारा करण्यास तो इतर काँग्रेसवाल्यांबरोबरच पुढे येईल.

बदललेली परिस्थिती व गेल्या तीन वर्षांचा अनुभव यांच्या आश्रयावर, स्वराज्यसंपादनाच्या अनेक साधनांपैकी कौन्सिले काबीज करून तद्द्वारा नोकरशाहीवर हल्ला करण्याचा मार्ग काँग्रेसने त्याज्य मानू नये एवढे प्रतिपादन केल्या-

मुळे जर स्वराज्यपक्षीय लोक मवाळ ठरू लागतात, तर एके काळी अत्याचाराचा उपदेश करणारे जे लोक आज अनत्याचाराचे शांतिपाठ म्हणत बसले आहेत, त्यांनाही हे अति मवाळ झाले असे का म्हणू नये? जर मवाळ पक्षीय लोक काँग्रेस मानतील, कायदेभंगाचे व असहकारितेचे तत्त्व मान्य करतील, कोणत्याही अधिकाराच्या जागा स्वीकारावयाच्या नाहीत असे कबूल करतील, सार्वत्रिक विरोध व अडवणूक यांस संमती देतील, तर ते स्वराज्य पक्षाच्या जवळ येतील हे खरे. पण असे केल्यावर त्यांचा मवाळपणा तरी कोठे राहिला? सारांश, मवाळ पक्ष व स्वराज्य पक्ष या दोन पक्षांच्या तत्त्वांत आणि कार्यपद्धतीत जमीन-अस्मानाइतके अंतर आहे, व ते वरवर पहाणारास देखील इतके स्पष्ट दिसणारे आहे की स्वराज्य पक्षास नवे मवाळ म्हटल्याने कोणाचीही दिशाभूल होणे शक्य नाही. कावळा आणि कोकीळ हे दोनही काळे असले तरी वसंत समय प्राप्त झाला असता कावळा तो कावळा आणि कोकीळ तो कोकीळ ठरतो. त्याप्रमाणेच प्रत्यक्ष कौन्सिलांतर्गत अडवणुकीच्या लढ्यास सुरुवात झाली म्हणजे मवाळ व स्वराज्य पक्षीय हे कसे निराळे हे उघडपणे दिसून येणार आहे. स्वराज्य पक्षाच्या कार्याचे हे सामान्यतः दिग्दर्शन झाले. हे कार्य मवाळ, सरकार व कट्टे ना-फेरवाले यांच्या विरोधामुळे अत्यंत बिकट असल्यामुळे ते अंमलात कोणत्या पद्धतीने आणले पाहिजे याचा विचार करणे जरूर आहे.

केसरी, दि. १२–६–१९२३

कामात राम म्हणजे देवाची नित्य-पूजा

ही सृष्टी ज्याने निर्माण केली व ज्याच्यापासून सर्व प्राणिमात्र निर्माण झाले तो देव किंवा ईश्वर. देवाचे हे थोडक्यात पण साधे असे वर्णन सर्वांना कळण्यासारखे आहे किंवा सांगण्याच्या अगोदरच प्रत्येक विचारी माणसाला ते कळलेलेच आहे. या सर्वांना कळण्यासारख्या व कळलेल्या देवाची भक्ती, पूजा किंवा उपासना कशी करावी असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात उत्पन्न होतो. कारण थोर मनुष्याबद्दलचा आदरभाव किंवा महत्त्वाच्या प्रसंगासंबंधाची महत्त्वबुद्धी ही काहीतरी प्रत्यक्ष दिसणाऱ्या देखाव्याने, समारंभाने अगर कृतीने व्यक्त करावी असे प्रत्येकाला वाटत असते. केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीने पाहिल्यास हा समारंभ निरुपयोगी असा वरवर पाहणाऱ्यास वाटतो खरा. पण त्यायोगे भावनेचे पोषण होते व मनुष्याच्या मनाला समाधान प्राप्त होते. या दोन्ही गोष्टींचा उपयोग त्याला सर्व व्यवहारात होतो.

देवाच्या पूजेचे प्रकार अनंत आहेत. स्वभावभेदाने त्यात कमीजास्ती असे प्रकार होतात ते निराळेच. पण सर्व पूजेमध्ये हेतू पाहिला तर एकच; देवाला जे प्रिय ते करावे. म्हणजे आपल्या प्रयत्नांत प्रयत्नाधीन नसलेल्या अशा ज्या काही थोड्या गोष्टी असतात, त्या देवाच्या दयेने आपल्याला अनुकूल होतील. व्यवहारात एखाद्या अडचणीत सापडलेला व हताश झालेला, केवळ परमेश्वराला जाणण्याच्या इच्छेने आराधना करणारा, किंवा आपला काहीतरी लाभ व्हावा अशी इच्छा बाळगणारा, अगर परमेश्वराला जाणल्यावर कर्तव्य म्हणून उपासना चालविणारा असे भक्तांमध्ये अनेक भेद आहेत. यांत शेवटी वर्णन केलेला भक्त व त्याची उपासना ही सर्वात चांगली.

देवाला प्रिय गोष्ट कोणती ? त्याने दिलेल्या शरीराचा व जन्माचा त्याने केलेल्या जगाला अधिकात अधिक उपयोग होईल असे आचरण करणे हीच त्याला सर्वांत अधिक प्रिय गोष्ट होय. उपासनेचा कोणताही प्रकार, त्यात मनामध्ये भक्ती ठेवली असता, देवाला पोचतो हे खरे. पण त्यांतल्यात्यात स्वतःचे काम चांगल्या रीतीने – म्हणजे लोकांची व त्या काम करणाऱ्याचीही उन्नती होईल अशा रीतीने केले म्हणजे ती परमेश्वराची सर्वांत चांगली पूजा होते

या जगातील आपले काम नीट रीतीने करणे हीच परमेश्वराची उत्तम पूजा. या पूजेचा विधी किंवा रीत समजण्यासाठी या जगात जे थोर पुरुष होऊन गेले त्यांचे 'जन्म व कार्य' म्हणजे त्यांच्या वेळची परिस्थिती व त्या परिस्थितीत

त्यांनी केलेले कार्य – यांचे वाचन व मनन करावे. या जगातील चांगल्या गोष्टींचे संवर्धन करणे व वाईट गोष्टी नाहीशा करणे हेच सर्व थोर लोकांच्या प्रयत्नाचे सार आहे. हे नीट कळण्यासाठी श्रेष्ठ व्यक्तींची चरित्रे नुसती वरवर वाचून भागावयाचे नाही, तर त्यातले खरे मर्म समजून घेतले पाहिजे. श्रेष्ठ पुरुषाचे बोलणे, चालणे, व्यवहार, आचरण इत्यादी कसे असते हे सर्व नीट समजून घ्यावे.

थोर व जाणत्या माणसाचे एक लक्षण असे की, लोक त्याला कंटाळत नाहीत व तो लोकांना कंटाळत नाही. म्हणजे तो आपले वर्तन लोकांमध्ये असे ठेवतो की, त्यायोगे लोकांना तो हवासा वाटावा, नकोसा वाटू नये किंवा त्याच्या बोलण्याचा व कृतीचा वीट येऊ नये. त्याचप्रमाणे उलट या जाणत्या माणसाच्या मनामध्ये लोकांसंबंधाने तुच्छतेची अगर तुसडेपणाची भावना असू नये.

प्रत्येक मनुष्याचा जगातील अनेक व्यक्तींशी संबंध येतो. अशांमध्ये काही लोक ज्ञानाने व योग्यतेने त्याच्यापेक्षा खालच्या दर्जाचे व काही वरच्या दर्जाचे असतात. या प्रत्येकापासून त्याला काही अपेक्षा असते, उपयोग असतो व या सर्वांना त्याच्यापासून काही अपेक्षा असते. या जगाचा व्यवहार परस्परावलंबी आहे. त्या व्यवहारात श्रेष्ठ व कनिष्ठ, लहान व मोठे, राजा व प्रजा, धनी व नोकर, शिक्षक व विद्यार्थी, वडील व लहान या उभयतांचे परस्परांसंबंधी काही कर्तव्य असते व हे कर्तव्य दोघांनीही योग्य जाणीव ठेवून पार पाडले तरच समाजाचा व्यवहार सुव्यवस्थित रीतीने चालेल. मनुष्य समाजाच्या अगदी बाल्यावस्थेपासून अशीच परस्परावलंबी व्यवस्था चालत आली आहे व हे परस्परावलंबित्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठ व्यक्तींनी परस्परांशी सहकार्य करून समाजाचे गाडे आपल्याला सुरळीत चालवावयाचे आहे हे नेहमी ध्यानात ठेवले पाहिजे, आणि हे जो मनुष्य करणार नाही तो पापी व समाजाला निरुपयोगी होय. 'परस्परांची सहकारिता असण्याची या जगात जरुरी नाही. जो तो हवे तसे वागण्यास मोकळा आहे' असे मानून व्यवहार करणारा मनुष्य समाज–विध्वंसक व दुष्ट ठरेल.

या परस्परावलंबी व सर्वांच्या सहकारितेने चालणाऱ्या समाजाच्या व्यवहारात सहकारितेच्या बुद्धीने प्रत्येकजण वागला तर व्यवहार नीट चालेल. अशा रीतीने वागण्याची जबाबदारी जाणत्या माणसावर विशेष आहे. म्हणून त्याने निरलसपणाने आपले काम करून इतरांना चांगले वळण लावले पाहिजे. त्यांच्यापुढे भलत्याच कल्पना मांडून ते कर्तव्यच्युत होतील असे वर्तन जाणत्या माणसाने करता कामा नये.

लोकांमध्ये वागताना जर त्यांच्या मनात उद्वेग म्हणजे तिरस्कार उत्पन्न करण्यासारखे कोणी वर्तन करील तर परस्परांच्या सहकारितेने होणाऱ्या कामात व्यत्यय येईल, आणि असे सर्वच लोक वागू लागले तर समाजाची घडी विसकटून जाईल. यासाठी, ज्यांना स्वतःसाठी असे काही करावयाचे राहिलेले नाही त्यांनीसुद्धा ह्यापुढेही समाजाची घडी विसकटू नये याबद्दल खबरदारी बाळगली पाहिजे. या सहकारितेच्या व्यवहारासाठी लोकांत उद्वेग अगर तिरस्कार उत्पन्न होऊ न देता व लोकांसंबंधी तुसडेपणाची वृत्ती न बाळगता त्याने वागले पाहिजे.

एखाद्या मनुष्याच्या संबंधाने इतरांच्या मनामध्ये आदर उत्पन्न व्हावयाचा तर त्याचे 'बोलणे व चालणे' हे चांगले असावे. खरे पण हिताचे असे बोलावे, पण तेही तिरस्कार उत्पन्न न होता व आवडीनें लोकांनी ऐकावे अशा रीतीने- त्याचप्रमाणे स्वतःला जे काम करावयाचे त्यासंबंधाने जी पुस्तके असतील ती त्याने वाचून त्यांचे चांगले ज्ञान संपादन केलेले असावे.

वागणुकीमध्ये आग्रहीपणा नसावा. प्रत्येक कामामध्ये कष्ट हे आहेत. अर्थात बिनकष्टाचे व मानाचे तेवढेच काम मी करीन असा आग्रह कोणी धरू नयें. आणि नेहमी 'मी असे केले, तसे केले' किंवा 'मी केले म्हणूनच झाले' असे बोलू नये. धिमेपणाने व निरलसपणानें आपापले काम बजावावे. असे काम करणारा मनुष्यच उत्तम होय.

ज्या वेळेला काम सांगणारा मनुष्य जाणता असेल व काम करवून कसे घ्यावयाचे याची पद्धत त्याला माहीत असेल आणि प्रत्यक्ष काम करणाराही नेहमी तत्पर असेल त्या वेळी त्या कामात चांगल्या प्रकारचे यश हे ठेवलेलेच आहे असे समजावे.

समाजातील कोणतेही काम असो, जोपर्यंत ते निरलसपणाने व आपले कर्तव्य म्हणून एखादा मनुष्य करीत आहे तोपर्यंत ते चांगलेच आहे. कारण कोणत्याही कामाची योग्यता काम करणाऱ्याच्या बुद्धीवर अवलंबून असते.

त्या कामाच्या बाहेरून दिसणाऱ्या स्वरूपावरून ते क्षुल्लक मानू नये. कोणतेही काम पत्करताना आपल्या स्वभावाचा विचार करावाच. पण आपल्या स्वभावाला सर्वस्वी जुळेल असे काम मिळणे अगर सापडणे कठीण. प्रत्येक कामात तुमच्या स्वभावाच्या दृष्टीने अडचणीचा वाटणारा असा काही ना काही भाग असणारच पण आस्थापूर्वक प्रयत्न व तत्परता यांचे योगाने त्याला आपल्या स्वभावाची अडचण नाहीशी करता येते. कोणत्याही कामाच्या बाबतीत त्यातील जे तज्ज्ञ असतील त्यांच्याकडून आदरपूर्वक व त्यांचे उपयोगी पडून माहिती

मिळवावी. पण पुढे स्वतःच्या अनुभवाने व प्रयत्नाने या बाहेरून मिळवलेल्या ज्ञानाचे प्रत्यंतर मिळवीत मिळवीत व ते ज्ञान पक्के करीत गेल्यानेच त्या कामातील यश प्राप्त होईल हे लक्षात ठेवावे. अखेर प्रयत्नाची सिद्धी स्वतःवरच अवलंबून आहे, म्हणून आपणच आपले शत्रू किंवा मित्र आहोत.

मनुष्याने महत्त्वाकांक्षा धरावी, पण ती अन्याय्य नसावी. यासाठी सर्व प्रकारचे सामर्थ्य संपादन करावे. न्याय्य महत्त्वाकांक्षा व त्यासाठी मिळवलेले व उपयोगात आणलेले सामर्थ्य ही देवाला आवडतात. दुसऱ्याचा हेवा करून त्याला खाली ओढण्यासाठी स्वतःला फाजिल ताण देऊन श्रम करणारा मनुष्य मूर्ख व हट्टी होय. या माणसाच्या श्रमाने देवालाही दुःख होते.

आपले काम नेहमी नीटपणे करता येण्यासारखी शरीराची व मनाची स्थिती असली पाहिजे. यासाठी जेवण, खेळणे, करमणूक, काम, झोप या सर्व गोष्टींत व्यवस्थितपणा व नियमितपणा पाहिजे. हा नियमितपणा ठेवला नाही तर ही देवाची पूजा आपल्या हातून चांगली होणार नाही. आपले आयुष्य वाढेल, शरीरात जोम राहील, मन आनंदात राहील व वीट उत्पन्न होणार नाही अशा रीतीने पौष्टिक व ताजे अन्न खावे. शिळे, अपचनकारक, अतिशय तिखट वा खारट किंवा अतिशय कढत असे अन्न खाऊ नये.

कोणत्याही कामात यश येणे हे, काम करण्याचे ठिकाण, साधने, काम करणारा मनुष्य, प्रयत्न व बरा-वाईट काल इत्यादी गोष्टींवर अवलंबून असते. यातील सर्वच गोष्टी मनासारख्या असतील असे नाही. अर्थात स्वतःचा प्रयत्न शक्य तेवढा करणे, त्यात कसूर न करणे एवढेच प्रत्येकाने पहावे. यशाने हुरळून जाणे व अपयशाने नाउमेद होणे या दोन्ही गोष्टी कशा वेडेपणाच्या आहेत, हे वर दिलेल्या विचाराने समजून येईल.

कोणतेही कार्य करण्यापूर्वी आपले स्वतःचे सामर्थ्य, त्या कार्याचे होणारे परिणाम विशेषतः त्याच्या योगाने दुसऱ्याला उपद्रव होण्याचा संभव आहे की काय इत्यादी गोष्टींचा नीट विचार करावा. हा विचार न करता केलेले काम देवाला आवडत नाही.

अशा रीतीने आपले काम करीत असताना बुद्धी स्थिर ठेवावी, तिची चल-बिचल होऊ देऊ नये. यासाठी आपले मन व इंद्रिये ही आपल्या ताब्यात पाहिजेत. हाव किंवा मनःसंताप इत्यादी विकारांनी मनावरील व इंद्रियांवरील आपला ताबा नाहीसा होतो. अर्थात मन व इंद्रिये किंवा एकंदर शरीर आपल्या म्हणजे विवेकाच्या ताब्यात ठेवून वागविले पाहिजे. याकरिता या विकारांशी एक प्रकारे झगडावे लागते. मन व इंद्रिये ही आपल्याला स्वतःच्या कार्यापासून

परावृत्त करण्याच्या बाजूला ओढ घेत असता त्यांना मागे ओढले पाहिजे. या कामात यश मिळवायाचे तर आपण देवाच्या पूजेसाठी हे करीत आहोत ही जाणीव सारखी मनात ठेवावी.

या पद्धतीने देवाची पूजा करीत असता त्यात काही विघ्न येत नाही. मध्ये काही कारणाने खंड पडला तर पुनः पहिल्यापासून सुरुवात करावयास नको. पूर्वी झालेल्या प्रयत्नाचा फायदा शिल्लक रकमेसारखा पुढील जमाखर्चाचे वेळी उपयोगी पडेल, आणि सर्व यथासांग झाले म्हणजेच देवाला पोचेल असे नाही. जेवढे केले तितक्याचे श्रेय मिळेलच. केलेल्या श्रमाच्या मानाने फार मोठे समाधान लाभेल. याप्रमाणे सतत देवाची पूजा केल्यास 'कसे होईल, काय होईल?' ही विवंचना राहणार नाही

ही पूजा करताच मन शुद्ध होत जाऊन देवाचे स्वरूप आपोआप त्या माणसाला कळत जाईल. काही निमित्ताने आपण मूर्ती पुढे ठेवून देवाची पूजा करतो. पण हचा नित्य-पूजेने सर्वस्व, सर्व आयुष्य देवाला अर्पण केल्यासारखे होते. म्हणून ही सर्वात मोठी व सर्वात चांगली पूजा होय.

जगण्यासाठी आपण श्वासोच्छ्वास व चलनवलन करतो, शरीराच्या पोषणासाठी अन्न मिळवतो व खातो, समाजासाठी म्हणून काही कर्तव्य करतो, दुसऱ्याला दयाबुद्धीने मदत किंवा साहच्य करतो व स्वतःच्या उन्नतीसाठी व्यायाम, वाचन इ. अभ्यास करतो, या सर्व कामांचा या पूजेत समावेश होतो.

मूर्तीची नैमित्तिक पूजा एका ठिकाणी करावयाची तर ही नित्यपूजा सर्वत्र असलेल्या परमेश्वराची होय. या देवाचे हातपाय, डोळे, डोके, तोंड, कान इत्यादी अवयव सर्वत्र आहेत. ही सर्वाकार देवाची सर्व कृतींनी केलेली पूजा होय. तशी ती होते व देवाला पोचते असा अनुभव पूर्वीच्या लोकांचा आहे व त्या पूर्वीच्या लोकांनासुद्धा त्यांच्याही पूर्वीच्या लोकांनी तो सांगितला आहे. तुम्हीही ती पूजा करून पहा. पूजा सांगावयास येणारे ब्राह्मण संस्कृत पोथी घेऊन पूजा सांगतात. आतापर्यंत सांगितलेली नित्यपूजा ही गीतेच्या संस्कृत पोथीच्या आधारेच सांगितलेली आहे. त्यातील प्रत्येक विधीला गीतेच्या संस्कृत श्लोकाचा आधार आहे. ज्याने गीता वाचली असेल त्याला हे आधार सहज सापडतील. ज्यांनी वाचली नसेल त्यांना आधार सांगूनही काय उपयोग? म्हणून ते आधार सांगितले नाहीत इतकेच! कोणीही आस्थेवाईक व प्रामाणिक मनुष्याने–पुरुषाने, स्त्रीने अगर मुलाने-ही पूजा करावी. ती गरिबाला व श्रीमंताला सारखीच करता येते. कोणत्याही परिस्थितीतल्या माणसाला ती करण्यात अडचण नाही.

याबद्दल मला दक्षिणा पाहिजे. ती इतकीच की ही पूजा वाचणाऱ्याने इतरांनाही सांगावी. मात्र ज्याला आस्था व जिज्ञासा नाही त्याला मुळीच सांगू नये.

–किर्लोस्कर, दीपावली १९२९

गीताबीजाचे स्पष्टीकरण

गीतेचे बीज कसे सापडले

व्यापक दृष्टीने मानवी कर्तव्याचा विचार करून त्यास वैयक्तिक व सार्वजनिक दृष्टचा श्रेयस्कर असा मार्ग दाखवणारा, गूढ तत्त्व-विचाराची व्यवहाराशी ब नीतीशी सांगड घालणारा, सर्वमान्य, सर्वसंग्राहक, तेजस्वी व निःसंदिग्ध असा ग्रंथ भगवद्गीतेखेरीज दुसरा नाही. हा ग्रंथ जुन्या परंपरेमध्ये प्रतिष्ठा पावला आहे, आणि आधुनिक विद्वानांनाही तो आदरणीय वाटतो. आधुनिक बौद्धिक युगामध्ये बुद्धिवादाला इतका पटणारा असा दुसरा धर्मग्रंथ नाही.

अर्थात् धार्मिक शिक्षण अगर ज्ञान, किंवा नीतिशिक्षण यांचे बाबतीत हिंदुधर्मीयांत तरी या ग्रंथाला अग्रस्थान मिळाले आहे यात नवल नाही. हा समग्र ग्रंथ सातशे श्लोकांचा आहे व त्यांत अनेक परंपरागत तत्त्वज्ञानांच्या व पंथांच्या दृष्टीने विस्तृत विवेचन केलेले आहे. हल्लीच्या काळात एवढा मोठा ग्रंथ अभ्यासण्यास सर्वांस वेळ नाही. शिवाय गीतेवर अनेक दृष्टींच्या पंडितांनी आजपर्यंत परिश्रम केलेले असल्यामुळे त्या भिन्न-भिन्न मतांचे आकलन करून निश्चित व खरा अर्थ ठरविणे हे पुष्कळांच्या आवाक्याबाहेरचे आहे.

यासाठी गीतेमधील काही थोडे श्लोक निवडून काढून ते रूढ करण्याचे प्रयत्न आजपर्यन्त अनेक झालेले आहेत. पण असे श्लोक जो तो आपापल्या रुचीप्रमाणे व मताप्रमाणे निवडून काढतो व ही निवड करण्याचे कारण "मला ते आवडतात अगर महत्त्वाचे वाटतात" याशिवाय दुसरे काही सांगण्यासारखे नसते. आणि एकाला जे आवडतील व महत्त्वाचे वाटतील तेच दुसऱ्याला तसे वाटत नाहीत. म्हणून गीतेचे थोडक्यात सार काढण्याचे प्रयत्नही भिन्न होतात.

"गीता-बीज" काढण्याचा हा प्रयत्न वरील प्रयत्नांहून भिन्न आहे. त्याला केवळ स्वरुची अथवा महत्त्वबुद्धी एवढेच कारण नाही. तर सार निवडून काढण्याची एक विशिष्ट पद्धती या गीता-बीजांत अनुसरली आहे व ती प्रत्येकास पटवून देता येण्यासारखी आहे. वैयक्तिक आवड ही इतर लोकांना पटवून देता येत नाही, युक्तिवाद पटवून देता येतो. यामुळे इतर केवळ आवडीच्या प्रयत्नांपेक्षा "गीता-बीज" हा संक्षिप्तिकरणाचा प्रयत्न अतिमान्य व रूढ होण्यासारखा आहे.

पूर्वाचार्यांचा आधार

गीतेतील मुख्य सिद्धांत थोडक्यात सांगणारा महत्त्वाचा भाग कोणता याबद्दल काही गोष्टी सर्वमान्य होण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ, श्रीमत् आद्य शंकराचार्य यांनी दुसऱ्या अध्यायाच्या ११ व्या श्लोकापासून अठराव्या अध्यायाच्या ६३ व्या श्लोकापर्यंतच गीतेचा मुख्य भाग मानला. भाष्याचे उपक्रम व उपसंहार या श्लोकांवर लिहिले आहेत. अशा रीतीने त्यांनी एकंदर सहाशे सत्तावीस श्लोकांचाच भाग गीतेतील शास्त्रीय विवेचनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला आहे. म्हणजे गीतेतील असा मुख्य भाग निवडून काढण्याची व त्याला महत्त्व देण्याची कल्पना अगदीच अपरिचित अशी नाही.

गीतेच्या चौथ्या अध्यायाचे प्रारंभी भगवान श्रीकृष्णांनी आपल्या योग-मार्गाची परंपरा सांगितली आहे. त्यावर श्रीशंकराचार्यांनी भाष्यात अशा अर्थाचे विधान केले आहे की, " हा जो दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायांत योग सांगितला त्यात सर्व वेदांत परिसमाप्त झाला व हाच या दोन अध्यायांत सांगितलेला योग पुढे सर्व गीतेत वर्णन केलेला आहे. " चौथ्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकात, ' मी आज तो जुना परंपरेने आलेला योग तुला सांगितलेला आहे, असे भूतकाल-वाचक विधान आहे. पाचव्या अध्यायाचे प्रारंभी जो तुलनात्मक प्रश्न अर्जुनाने विचारला आहे त्यावरूनही या योगमार्गाचे मूळ स्वरूप-कथन या प्रश्नाच्या पूर्वीच झाले असले पाहिजे हे उघड होते.

सारांश, श्रीशंकराचार्यांच्या मताने गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या ११ व्या श्लोकापासून तिसऱ्या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकांपर्यंतच्या ११५ श्लोकांमध्ये गीतेचा महत्त्वाचा व मुख्य भाग आहे हे दिसून येते. त्याचप्रमाणे तिसऱ्या अध्यायाच्या ३६ व्या श्लोकात अर्जुनाने एक प्रश्न केला आहे, त्याच्या उत्तरासाठी ३८ ते ४३ श्लोक आलेले आहेत. या श्लोकावरील भाष्यामध्ये आचार्यांनी अशा आशयाचे विधान केले आहे की, ' पूर्वी हाच अर्थ निराळ्या रीतीने सांगितला असला तरी तोच संक्षिप्त व निश्चितपणे ऐकण्याकरता अर्जुनाने हा प्रश्न विचारला आहे व त्याच्या उत्तरात पूर्वीच सांगितलेले विवेचन पुनः संक्षिप्तपणाने केलेले आहे.

यामुळे ३६ ते ४३ पर्यंत तिसऱ्या अध्यायातील अखेरचे आठ श्लोक पुनरुक्तीच्या स्वरूपाचे उघड ठरतात. त्याच्या पूर्वीचे ३३ ते ३५ हे श्लोकही भगवंतांनी सांगितलेल्या मार्गानुसार लोक का आचरण करीत नाहीत, भलत्या

मार्गाने का जातात याचे कारण सांगतात. आचार्यांनी ३३ व्या श्लोकावरील भाष्यामध्ये हेच दर्शविले काहे. यामुळे आचार्यांच्या मते ३३ ते ३५ हे तीन श्लोकही गीतेच्या योगमार्गाच्या स्वरूपकथनाच्या बाहेर पडतात. कारण सर्व मार्ग सांगितल्यावरच 'लोक या मार्गाचे आचरण का करीत नाहीत ?' हा प्रश्न उद्‌भवतो.

याप्रमाणे दुसऱ्या अध्यायाच्या ११ व्या श्लोकापासून तिसऱ्या अध्ययाच्या ३२ व्या श्लोकापर्यंत गीतेचा मुख्य महत्त्वाचा भाग आहे, हे आचार्यांच्या भाष्याच्या आधारावरूनच दिसून आले. म्हणजे हा १०४ श्लोकांचा गीतेचा गाभा किंवा मुख्य भाग मानण्याला आपल्याला पूर्वाचार्यांचा आधार मिळतो. तिसऱ्या अध्यायाचे ३१ व ३२ हे श्लोक पाहिले तर त्यांत गीतेच्या मार्गाप्रमाणे जे आचरण करतात त्यास काय फल मिळते व जे त्याप्रमाणे आचरण करीत नाहीत, त्यांस काय फल मिळतें या गोष्टी सांगितल्या आहेत. म्हणजे अन्वयव्यतिरेकाने ही फलश्रुतीच सांगितली आहे.

मध्येच फलश्रुती का ?

फलश्रुती ही ग्रंथाचे अखेरीस यावयाची व तशी ती गीतेच्या अखेरीस आली आहे. पण ग्रंथाचे मध्येच ही फलश्रुती का ?' माझ्या या आता सांगितलेल्या ' मताप्रमाणे वागणाऱ्या व न वागणाऱ्या लोकांना उद्देशून ही व्यापक फलश्रुती आहे. नुसता एखाद्या विशिष्ट गोष्टीचा हा फलनिर्देश नाही. यावरूनही हेच दिसते की या ठिकाणी भगवंतांनी आपल्या मताचे संक्षेपतः स्वरूपकथन संपले असे मानले आहे. म्हणूनच उभय दृष्टीने फलश्रुती येथे आली आहे.

या फलश्रुतीच्या पूर्वीचा तिसऱ्या अध्यायातील तिसावा श्लोक पाहिला तर तोही समारोपात्मक असाच आहे. म्हणजे विवेचनाच्या अखेरीस सर्व विवेचनाचे सारभूत असे विधान येते त्या नमुन्याचा हा तिसावा श्लोक आहे. याच भगवंतांच्या ' मता ' ला पुढे चौथ्या अध्यायात " हा योग मी सांगितला " व " हेच उत्तम रहस्य आहे " असे भगवंतांनी म्हटले आहे. यावरून भगवंतांचे किंवा गीतेचे मत, गीतेचा योग किंवा रहस्य हे या १०४ श्लोकांत समाविष्ट झालेले आहे हे दिसून येते.

अठराव्या अध्यायाचे अखेरीस संजयाने गीतेतील भगवान श्रीकृष्णाच्या सर्व उपदेशास ' योग ' हेच नाव दिले आहे. हा योग सांगण्यास खरी सुरुवात कोठून झाली हे आता पाहिले पाहिजे. या दृष्टीने दुसऱ्या अध्यायाचा ३९ वा श्लोक महत्त्वाचा आहे. कारण त्यात असे स्पष्ट म्हटले आहे की, आतापर्यन्त तुला 'सांख्य'

मार्गानुसार ज्ञान सांगितले, आता 'योग' मार्गानुसार ज्ञान सांगतो ते ऐक. योग हा शब्द गीतेत प्रथम याच ठिकाणी आला आहे.

"हा योग मी तुला सांगितला." असे चौथ्या अध्यायात श्रीकृष्णांनी म्हटले, ते कोणत्या भागाला उद्देशून म्हटले, या प्रश्नाला उत्तर द्यावयाचे तर ते असेच द्यावे लागेल की, दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासून तिसऱ्या अध्यायाच्या ३२ व्या श्लोकापर्यंतच्या भागालाच उद्देशून भगवान श्रीकृष्णांनी "हे माझे मत, हा योग तुला सांगितला व हे उत्तम रहस्य होय" ही विधाने केलेली आहेत. दुसऱ्या अध्यायाच्या ११ व्या श्लोकापासून तो ३९ व्या श्लोकापर्यंतचा भाग या रहस्यात अंतर्भूत होत नाही, हे उघड आहे.

हेच 'गीतेचे' रहस्य

यावरून दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासून तिसऱ्या अध्यायाच्या ३२ व्या श्लोकापर्यन्त ६६ श्लोकांत गीतेचे 'उत्तम रहस्य,' श्रीकृष्णाचे 'मत' व गीतेत सांगितलेला 'योग' संक्षेपतः व मूलतः आलेला आहे. दुसऱ्या अध्यायाच्या ४० व्या श्लोकात, "या मार्गात एकदा सुरुवात केली असता झालेल्या कार्य-भागाचा नाश होत नाही, अडथळा येत नाही व अल्पशा आचरणानेदेखील मोठ्या भयाचे निवारण होते" असे म्हटले आहे. हा श्लोक एखाद्या मार्गाचे कथन करण्याचा उपक्रम किंवा प्रारंभ या बुद्धीने योजलेला आहे हे उघड दिसते.

गीतेचा मुख्य महत्त्वाचा भाग अशा रीतीने या दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायांत आलेला आहे असे मानल्याशिवाय, तिसऱ्या अध्यायाचे ३१–३२ श्लोकांत मध्येच फलश्रुती का आली आणि चौथ्या अध्यायाचे प्रारंभी भगवान श्रीकृष्णांनी आपल्या मार्गाची ऐतिहासिक परंपरा का सांगितली व "हा योग तुला सांगितला." व "हेच उत्तम रहस्य होय." अशी विधाने का केली याचा उलगडा होणेच शक्य नाही आणि हीच गोष्ट इतर अनेक प्रमाणांवरून सिद्ध होते.

लोकमान्य टिळकांनी गीतारहस्याच्या विषयप्रवेश प्रकरणात, गीतेत बुडचा मारून स्वतःच्या आवडीचे श्लोक निवडून काढण्याऱ्या लोकांचे प्रयत्न निरुपयोगी असे मानले आहेत. पण 'गीता-बीज' काढण्याचा प्रयत्न त्यात अंतर्भूत होत नाही. ते प्रयत्न केवळ रुचिनिष्ठ आहेत. गीता-बीज काढण्याचा प्रयत्न सर्वांना पटण्यासारख्या युक्तिवादावर अवलंबून आहे. लो. टिळकांनी गीतारहस्यात उपक्रम, उपसंहार, अर्थवाद, अपूर्वता, उपपत्ती इ. गोष्टींचे विवेचन केले आहे आणि मूळ मुख्य उपपत्ती व अपूर्वता शोधून काढणे हे लो. टिळकांच्या पद्धतीतही आवश्यकच ठरते.

गीतारहस्याचा आधार

गीतारहस्यात अखेरीस जी गीताध्याय-संगती दिली आहे, तिच्यामध्ये 'गीतेच्या सर्व उपपादनाचे मूळ दुसऱ्या अध्यायात आलेले आहे' असे म्हटले आहे, आणि गीतेचा अभिप्रेत असलेला जो कर्मयोग मार्ग, त्याचे विवेचन दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासून सुरू झाले, असेच मानले आहे. तिसऱ्या अध्यायाच्या ३१ व ३२ या श्लोकांना 'अन्वय-व्यतिरेकाने सांगितलेली फलश्रुती असे नाव रहस्यकारांनीच दिले आहे. आणि या फलश्रुतीवरून 'गीतेतील प्रतिपाद्य विषय काय ते पुरे व्यक्त होते' असे रहस्यसंजीवनात लिहिले आहे. याचेपुढील भागाला 'याच कर्मयोगनिरूपणाच्या परिपूर्त्यर्थ आलेले विवेचन' असेच त्यांनी नाव दिले आहे.

रहस्यसंजीवनाच्या अनुक्रमणिकेमध्ये लो. टिळकांनी तिसऱ्या अध्यायातील ३९ व्या श्लोकाचा आकडा देऊन 'कर्मयोगाच्या प्रतिपादनाची सुरुवात' असे म्हटले आहे. चौथ्या अध्यायाच्या प्रारंभी टिळक लिहितात की "आयुष्यक्रमणाचा हा मार्ग म्हणजे निष्ठा अर्जुनाला नवी सांगितली अशी शंका येऊ नये म्हणून या मार्गाची प्राचीन गुरुपरंपरा प्रथम सांगतात." यावरून 'अपूर्व' अशी वाटण्यासारखी गोष्ट गीता ग्रंथामध्ये या दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायांत आली आहे हे उघड दिसते.

सातव्या अध्यायाच्या प्रारंभी "योग आचरीत असता ज्याप्रमाणे तुला माझे (परमेश्वराचे) ज्ञान होईल ते सांगतो." असे म्हटले आहे. यापुढे १८व्या अध्यायाच्या अखेरपर्यन्त जे ज्ञानविज्ञान सांगितले ते ६ व्या अध्यायापर्यन्त सांगितलेल्या कर्मयोगाच्या परिपूर्त्यर्थ व समर्थनार्थ आहे असे गीताध्याय-संगतीत टिळकांनी लिहिले आहे. यावरूनही गीतेचा रहस्यात्मक गाभा पहिल्या सहा अध्यायांत असला पाहिजे अशीच टिळकांची कल्पना आहे.

आणि ही गोष्ट स्वाभाविक क्रमालाही अनुसरूनच आहे. आपला निश्चित म्हणून एक मार्ग सांगणाऱ्या गुरूकडे जिज्ञासू शिष्य 'निश्चित श्रेय' काय ते सांगा असे विचारण्यास गेला तर, गुरू प्रथम निःसंदिग्ध रीतीने व थोडक्यात आपला मार्ग सांगेल व त्यानंतर त्या संक्षेपात केलेल्या स्वरूपकथनावरून शिष्याला ज्या शंका येतील त्यांचे निरसन करील, आपल्या मार्गाचा बारीकसारीक सर्व तपशील सांगेल व इतरांशी तुलना करील. गीतेच्या मार्गाचे संक्षेपतः कथन पहिल्या सहा अध्यायांतच कोठे तरी असणे हे या दृष्टीने स्वाभाविक ठरते.

गीतेची प्रवेशपरीक्षा

तिसऱ्या अध्यायाच्या ३१ व ३२ या श्लोकात जी फलश्रुती आलेली आहे तशा प्रकारची फलश्रुती एकदम ग्रंथाचे अखेरीस (अ. १८, श्लो. ७१) आलेली आहे, मध्ये कोठेही आलेली नाही. गीतेने सांगितलेल्या मार्गाचा अधिकारी श्रद्धा व अनसूया म्हणजे 'आस्था व सरळपणा', या गुणांनी युक्त असावा लागतो. ही विशेषणांची जोडी तिसऱ्या अध्यायाच्या ३१–३२ श्लोकांत आलेली आहे. तशी ती मध्यंतरी कोठेही आलेली नसून एकदम १८ व्या अध्यायाच्या अखेरीस आलेली आहे, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

दुसऱ्या अध्यायाच्या ११ व्या श्लोकापासून ३९ व्या श्लोकापर्यन्तचा भाग गीतेच्या या बीजातून का वगळला याची दुसरी कारणेही सांगता येतील. गीतेत प्रतिपाद्य विषय योग हा आहे. हे चौथ्या अध्यायाच्या प्रारंभीच्या श्लोकावरून व्यक्त होते, तसेच संजयाच्या अखेरच्या उद्‌गारांवरूनही व्यक्त होते. या योगाचा उपदेश करण्यास दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासूनच सुरुवात होते हे एक प्रमाण वर सांगितले आहेच. मग असा प्रश्न येईल की ११ ते ३९ पर्यन्त श्लोक आले ते कशाकरिता ?

याचे एक उत्तर असे की, अर्जुन 'युद्ध सोडून भिक्षा मागणे बरे' असे म्हणत होता. म्हणजे एक प्रकारे सांख्य मार्गाकडे त्याचा कल दिसत होता. म्हणून प्रथम या सांख्य मार्गाच्या दृष्टीने पाहिले तरीही युद्ध करणे हा क्षत्रियाचा स्वधर्म म्हणून त्याचे आचरण केले पाहिजे हे अर्जुनाला सांगितले. पण ही सांख्य बुद्धी 'मे मतम्' माझे स्वतःचे खरे मत व उत्तम रहस्य म्हणून सांगितलेली नाही. माझे मत किंवा उत्तम रहस्य किंवा योग या शब्दांनी वर्णन केलेल्या भागाची सुरुवात दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासूनच होते. पूर्वी दुसरे काही सांगितले ते भगवंतांच्या स्वतःच्या मतापैकी किंवा रहस्यांपैकी नव्हे; ते अर्जुनाच्या भाषणात दिसून येणाऱ्या अर्जुनाच्या मताला उद्देशून सांगितलेले आहे.

त्याचप्रमाणे ११ ते ३९ या दुसऱ्या अध्यायातील श्लोकांमध्ये सुमारे आठ–दहा वेळा अर्जुनाच्या 'शोक' भावनेसंबंधाचा उल्लेख आहे. शोक करू नकोस, शोक करणे योग्य नाही, असे सांगण्याकरिता ११ ते ३९ पर्यंतच्या श्लोकांमध्ये विवेचन आहे. या विवेचनाचा उद्देश शोक घालवण्याचा आहे. अर्जुनाचे मनामध्ये शोक व मोह (धर्मसंमोह) उत्पन्न झाले होते. पण त्यांपैकी शोकाची भावना केवळ तात्कालिक होती. कर्तव्याकर्तव्याचा पेच मात्र या शोकभावनेपेक्षा स्थिर होता.

मोहनाशन हेच मुख्य कार्य

निश्चित काय करावे हे ऐकून या मोहाचा नाश होणार होता. अर्जुनाचा मोह नाहीसा करणे हेच गीतेचे मुख्य कार्य आहे; शोक नाहीसा करणे हे नव्हे. "मोहोऽयं विगतो मम" (अ. ११ श्लो. १) व "नष्टो मोहः" (अ. १८, श्लो. ७३) या अर्जुनाच्या उक्तींवरून व "कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय" (अ.१८,श्लो. ७२) या श्रीकृष्णाच्या उक्तीवरून मोहनाशन हेच गीतेच्या उपदेशाचे मुख्य कार्य आहे. 'शोक करू नको' असे विधान दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासून पुढे कोठेही आलेले नाही. शेवटी १८ व्या अध्यायात "ब्रह्मभूतः न शोचति" (श्लो ५४) व "माशुचः" (श्लो. ५५) यांत शोकाचा उल्लेख असला तरी तो बांधवहत्येच्या शोकासंबंधाचा नाही.

सारांश, दुसऱ्या अध्यायातील ११ ते ३९ श्लोकांपर्यन्तचे विवेचन खरे पाहिले तर अर्जुनाची शोकाची तात्कालिक भावना घालविण्यासाठी आलेले आहे. ही भावना घालवून अर्जुनाची मनोभूमिका कार्याकार्यविवेचन ऐकण्यास तयार केलेली आहे. ३१ ते ३८ हे श्लोक सांख्य-बुद्धीच्याप्रमाणे देखील युद्धकर्म केले पाहिजे. हे सांगण्यासाठीच आहेत आणि अर्जुन त्या दृष्टीने विचार करीत होता म्हणून ते आले आहेत. या ३१ ते ३८ पर्यंतच्या श्लोकांना शंकराचार्यही "प्रासंगिक उपदेश" असेच म्हणतात हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे.

दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासून तिसऱ्या अध्यायाच्या ३१ व ३२ या श्लोकांपर्यंतच्या विवेचनाचे दोन सारखे भाग पडतात. या दोन भागांत मिळून गीतेत सांगितलेल्या योगाचे मानसिक उन्नतीचे अंतरंग व त्याचे आचरणात्मक बहिरंग वर्णिले आहेत. या सर्व विवेचनात युद्धाचा उल्लेख शेवटी एकदाच आलेला आहे व तोही प्राप्तकर्म कर अशा अर्थीच आलेला आहे. अर्जुन युद्धकर्मापासून लागणारे पाप कसे टळेल याच्या विवंचनेत होता. पण भगवंतांनी त्याला अशी एक रीत सांगितली की, ज्यायोगे कोणत्याच कर्माचा बंध लागणार नाही. अंतरंगात कोणत्या प्रकारची बुद्धी ठेवून व व्यावहारिक बहिरंगांत कोणत्या प्रकारची दृष्टी ठेवून कर्मबंधापासून मुक्त होता येते ही सामान्य व सर्वत्र उपयोगी पडणारी युक्ती भगवंतांनी सांगितली

योगाचे अचल स्वरूप

अर्जुन एक विशिष्ट उदाहरण म्हणून सोडवावयास गेला होता, पण गुरू व्यापक बुद्धीचा असल्यामुळे त्याने अशी एक सामान्य रीत सांगितली की, ती कोणत्याही प्रकारच्या कर्माच्या बाबतीत उपयोगी पडेल. गीतेचे हे ज्ञान, युद्ध-

प्रसंगी योद्धयाला युद्धकर्माबद्दलचा पेच पडला असताना सांगितलेले असले तरी, सर्व मनुष्यजातीला स्वकर्तव्य ठरविण्याचे बाबतीत उपयुक्त झाले ते श्रीकृष्णाच्या या व्यापक दृष्टीमुळेच होय.

चौथ्या अध्यायामध्ये गीतेतील योग विवस्वान्, मनू, इक्ष्वाकू या परंपरेने चालत आल्याचे सांगितले आहे. आता विवस्वानाने मनूस अगर मनूने इक्ष्वाकूस हा योग सांगितला त्या वेळी अनुक्रमे मनूला व इक्ष्वाकूला 'युद्ध करावे का न करावे' असाच पेच पडलेला असेल असे म्हणता येत नाही. विश्वरूपाचे दर्शन देण्याचे सामर्थ्यही विवस्वान् अगर मनू यांच्यात होते असे कोठे लिहिलेले आढळत नाही. अर्जुनाच्या मनात ज्या शंका उद्भूत झाल्या त्याच मनू व इक्ष्वाकू यांच्या मनात उत्पन्न झाल्या असतील असेही म्हणता यावयाचे नाही.

अर्जुन जसा शस्त्र टाकून देऊन भिक्षा मागण्यास प्रवृत्त झाला होता तसेच मनू व इक्ष्वाकू हे झाले असतील असे नाही. त्यांचे उपदेश-प्रसंग निराळे असतील. या निरनिराळ्या प्रसंगांतून एकच योग सांगितला जात असता त्याचे आनुषंगिक खुलासे, तुलना ही त्या त्या प्रसंगानुसार निरनिराळी आलेली असतील. सांख्य मार्गाशी तुलना गीतेत वारंवार आलेली आहे. ती अर्जुनाचा कल उपदेश करण्याचे वेळी सांख्य मार्गाकडे होता म्हणून आलेली आहे. योगाचे जे मूळ स्वरूप या सर्व परंपरेत अखंड राहिले असेल, ते अंतरंगात बुद्धियोग व बहिरंगात लोकसंग्रही आचरण हेच होय. भगवान श्रीकृष्ण स्वतः कर्मयोगाचा उपदेश करीत असल्यामुळे गीतेत ज्या ठिकाणी 'मयि' असे पद असेल त्या ठिकाणी विवस्वान् व मनू यांनी "ईश्वरे" असेच पद योजले असले पाहिजे.

हे योगाचे स्वरूप दुसऱ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकापासून तिसऱ्या अध्यायाच्या ३१–३२ श्लोकांपर्यंत संक्षेपतः आलेले आहे. त्यांत मध्येच अर्जुनाने सांख्य दृष्टीने विचारलेला प्रश्न व त्याच्या उत्तरात एका श्लोकात दोन निष्ठांची केलेली तुलना यांनी तिसऱ्या अध्यायाचे पहिले तीन श्लोक व्यापले आहेत. पुढे चौथ्या श्लोकापासून भगवंतांनी आपल्या योगाच्या मूळ स्वरूपाचे कथनाचा क्रम अनुसरला आहे. हे तीन श्लोक योगाच्या मूळ-स्वरूप-कथनातून वगळण्यास हरकत नाही. त्याचप्रमाणे स्थितप्रज्ञासंबंधाचा अर्जुनाचा प्रश्नही इतका क्रमप्राप्त आहे की तो गाळून वाचल्यास संदर्भ मुळीच सुटत नाही. त्याचप्रमाणे दुसऱ्या अध्यायातील ३९ वा श्लोक हा दोन विवेचनांतील दुव्यासारखा आहे. योगमार्गाच्या कथनास सुरुवात खरी ४० व्या श्लोकात झाली आहे. या चाळिसाव्या श्लोकापासून तिसऱ्या अध्यायाच्या ३१-३२ श्लोकांपर्यंत ६५ श्लोक होतात. त्यांतून वर सांगितलेल्या अर्जुनाच्या प्रश्नाचे तीन श्लोक व भगवंतांच्या प्रासंगिक तुलनात्मक उत्तराचा एक असे चार श्लोक वगळले म्हणजे राहिलेल्या ६१

श्लोकांत श्रीकृष्णाच्या मताचे, योगाचे अगर उत्तम रहस्याचे संक्षेपतः व मुद्देसूद असे एकत्र विवेचन आढळते. याचेच नाव 'गीताचे बीज' होय.

आता तिसऱ्या अध्यायातील ३१-३२ हे फलश्रुतीचे श्लोक तरी 'गीता-बीजा' त का घेतले असे कोणी विचारील. हे श्लोक घेण्याचे कारण असे की, या मार्गाची अल्प परंतु आवश्यक अशी प्रवेशाची अट त्यात दिली आहे. ज्याला आस्था असेल व जो प्रामाणिक असेल त्या प्रत्येकास या मार्गाचे आपल्या शक्ती-प्रमाण फल मिळेल. पण ज्याच्यात आस्था व प्रामाणिकपणा नसेल त्याला या मार्गात प्रवेश नाही, हे एक महत्वाचे तत्त्व या फलश्रुतीत निर्दिष्ट केलेले आहे.

गीतेचा इतर भाग

गीताबीजाचे ६१ श्लोक निवडून काढले म्हणजे बाकीचे गीतेतील श्लोक निरर्थक किंवा प्रक्षिप्त आहेत असे दर्शविण्याचा हेतू मुळीच नाही. ज्याला संपूर्ण गीता वाचावयाची असेल त्याने ती संपूर्ण वाचावी, पण ज्याला इतकी सवड नसेल, त्याने गीतेचा मुख्य महत्त्वाचा भाग थोडक्यात कोणता असे विचारल्यास, त्यास गीतेतील हे ६१ श्लोक दाखविता येतील.

शिवाय, संपूर्ण गीता समजून घेणाऱ्या लोकांनाही या गीताबीजाचा एका दृष्टीने चांगलाच उपयोग होईल. तो असा की, गीतेचे तात्पर्य काय हे ठरविताना हे ६१ श्लोक मुख्य मानून त्यांत वर्णिलेल्या योगासंबंधी आनुषंगिक खुलासे, स्पष्टी-करणे, तपशील इ. गोष्टी सर्व गीतेत कशा सांगितल्या आहेत हे त्यांस आढळून येईल. गीता हा वृक्ष कल्पिला तर त्याचे मूळ या गीताबीजात कसे आहे हे त्यांस समजल्याने गीतेचे तात्पर्य चांगल्या रीतीने त्यांच्या मनावर ठसेल.

सामान्य माणसांप्रमाणेच शास्त्री-पंडितांनाही गीताबीज काढण्याचा हा प्रयत्न उपयुक्त वाटेल. कारण हे ६१ श्लोक मुख्य आहेत आणि यांत जे सांगितलेले आहे तेच सर्व गीतेत आहे असे सिद्ध झाल्यावर वादाचे क्षेत्र ७०० श्लोकांइतके विस्तृत न राहता या ६१ श्लोकांपुरतेच मर्यादित होईल. उपक्रम-उपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद व उपपत्ती ही जी मीमांसकांची तात्पर्यनिर्णयाची साधने आहेत, त्यांचा हेतू तरी ग्रंथातील मुख्य भाग कोणता व गौण कोणता हे ठरविण्याचाच आहे. तोच हेतू निराळ्या मार्गाने पण अधिक सुलभतेने या गीता-बीजाच्या प्रयत्नाने साध्य होणारा असल्यामुळें, पंडितांनाही हा प्रयत्न उपयुक्त असाच आहे.

गीतेच्या सातव्या अध्यायातील पहिला श्लोक पुढीलप्रमाणे आहे –

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ।।

या श्लोकावरून भगवंताचा योग आचरण करीत असता भगवंताचे संपूर्ण ज्ञान कोणत्या प्रकारे व कसे होते याचेच वर्णन तेथून सुरू झाले आहे असे स्पष्ट दिसते. येथपासून १८ व्या अध्यातील " इति ते ज्ञानमाख्यातं " हचा श्लोकापर्यंत हेच ज्ञान अनेक अंगांनी व अनेक दृष्टींनी वर्णिलेले आहे, आणि ४, ५ व ६ या अध्यायांमध्ये योगातील ज्ञान समत्व, चित्तैकाग्रत्व आणि क्रम इत्यादी गोष्टींचेच आहे. या स्पष्टीकरणावरूनही गीताबीजाच्या ६१ श्लोकांतच भगवंताच्या योगाचे मुख्य विधान आहे हे लक्षात येईल.

गीता-बीजाचे महत्त्व

गीतेत तिसऱ्या अध्यायानंतर पुढे अनेक मार्गांचे विवेचन आले आहे. श्रेय-प्राप्तीच्या कोणत्याही मार्गास सर्वस्वी टाकाऊ न म्हणता, त्यातील दोष दाखवीत न बसता, त्यातील गुणांचा व योगांशी अनुकूल असलेल्या भागाचा संग्रह करावयाचा आणि या गुणांचाही शक्य तितका गौरव करावयाचा आणि तरीही आपला मुद्दा सोडावयाचा नाही, असे गीतेचे धोरण आहे. तामस, आसुरी, असूयावान्, मिथ्याचारी अशा लोकांना गीतेने मनसोक्त दूषणे दिली आहेत. पण आस्थेवाईक, प्रामाणिक पण श्रेयप्राप्तीच्या भिन्न मार्गाने जाणाऱ्याला होईल तितके गौरविले आहे. या धोरणामुळेच गीता ही सर्वांना प्रमाणभूत, वंद्य व प्रिय झालेली आहे. पण यामुळेच तिच्या निश्चित अभिप्रायाबद्दल लोक घोटाळ्यात पडतात व गीता ही एकच मार्ग सांगण्याकरिता लिहिलेली नसून, तो एक सर्वमार्ग-संग्रह आहे असे त्यांना वाटते. अशा लोकांनी गीता-बीज कोणते हे निश्चित करण्याकरिता वर प्रमाणे दिली आहेत ती काळजीपूर्वक पहावीत. आणि ज्या योगाला उद्देशून संजयाने " योगं योगेश्वरात् साक्षात् कृष्णात् कथमतः स्वयम् " असे उद्‌गार काढले व ज्यावरून गीतेला ' योगशास्त्र ' हे नाव रूढ झाले तो योग म्हणजे या बीजाच्या श्लोकात सांगितलेला लोकसंग्रहयुक्त बुद्धियोगच होय अशी त्यांची खात्री होईल. तशी खात्री झाली म्हणजे गीतेत इतर मार्गांचें विवेचन आले आहे ते या योगाला पोषक व आनुषंगिक म्हणून किंवा त्याला निश्चित करण्यासाठीच आले आहे हे दिसून येईल. सारांश, संपूर्ण गीता वाचताना कित्येकांचा जो घोटाळा होतो तोही गीताबीज समजून घेतल्याने टळेल.

योगमार्गाचे मूळ कथन या बीजामध्ये झाल्यावर, इतर त्या संबंधाने पुष्कळच शंकांचे निरसन, तुलनात्मक स्पष्टीकरण व तपशील पुढे गीतेत आलेला आहे. बुद्धियोगात सांगितलेले गुण संपादन करण्याची साधने, लोकसंग्रहकारक कर्माचे प्रकार, कर्मातील अनेक अंशांचे विवेचन, योग आचरीत असता जे ज्ञानविज्ञान प्राप्त होते त्याचे वर्णन इ. गोष्टी या योगाच्या स्पष्टीकरणार्थच पुढे सांगितलेल्या

आहेत. गीताबीजाची कल्पना बरोबर आली तर पुढील विवेचनांचे हे संबंध सहज लक्षात येण्यासारखे आहेत.

तात्पर्य–निर्णयाचे चांगले साधन

गीचेचा **उपक्रम** म्हणजे युद्धभूमीवर अर्जुनाला झालेला विषाद व **उपसंहार** म्हणजे अर्जुनाची युद्ध करण्याची पुनः सिद्धता, यांना जुळणारे असेच या बीजाचे तात्पर्य आहे. या बीजात सांगितलेल्या योगाचीच पुढे "युक्तः समाचरन्", "योगी भवार्जुन", "योगमात्तिष्ठोत्तिष्ठ" इ. अनेक प्रकारांनी पुनरुक्ती किंवा **अभ्यास** झालेला आहे. हा लोकांमधून लुप्त झालेला योग नव्याने अर्जुनास प्रथम सांगितला व हेच उत्तम रहस्य होय असे स्पष्ट विधान या बीजानंतर लगेच आलेले असल्यामुळे यात गीतेच्या विवेचनातील **अपूर्वता** आहे. गीतेचे **फल** म्हणजे अर्जुनाची युद्धप्रवृत्ती तिला अनुसरूनच या बीजातील उपदेश आहे. या बीजाचा निर्णय व ज्ञान झाल्यावर पुढील विवेचनातील **उपपत्ती** कशी जुळवावयाची व अर्थवादात्मक भाग कोणता समजावयाचा तेही सुलभ होणारे आहे. सारांश, जुन्या पद्धतीने गीतेचा अभिप्राय समजून घेण्यालाही गीताबीज हे एक चांगले साधन मानता येईल.

अर्जुनाला सांगितलेला मार्ग

"गीतेमध्ये अर्जुनाला काय सांगितले आहे?" असा नेमका प्रश्न केला तर त्याला श्रीशंकराचार्य व टिळक यांचे उत्तर एकच येईल. आचार्य या उत्तराला अशी टीप जोडतील की, "अर्जुन हा अज्ञानी व कर्माधिकारी असल्यामुळे त्याला त्याच्या अधिकाराप्रमाणे चित्तशुद्धिद्वारा ज्ञानप्राप्तीसाठी हा कर्मयोग मार्ग सांगितला." तसे का होईना, पण अर्जुनाला हा जो त्याच्या अधिकाराप्रमाणे मार्ग सांगितला त्याचे सूत्ररूपाने स्वरूपवर्णन कोठे आहे असे विचारले तर ते याच बीज–श्लोकांत आहे असे सर्वांनाच म्हणावे लागेल. अर्थात् गीतेत अर्जुनाला काय सांगितले हे ज्यांना थोडक्यात समजून घ्यावयाचे आहे त्या सामान्य लोकांना ते गीताबीजातच सूत्ररूपाने आढळेल.

अर्जुनापेक्षा अधिक योग्यतेचा पुरुष असता तर त्याला भगवंतांनी काय सांगितले असते, याचा विचार अर्जुनास सांगितलेली गीता वाचतानाच ज्यांना करावासा वाटतो अशा विशाल बुद्धीच्या लोकांचे जे वाद आहेत, त्यांत न पडणाऱ्या सामान्य माणसांना तरी गीतेचे 'उत्तम रहस्य' गीताबीजातच आहे असे सांगण्यास मुळीच हरकत नाही. 'सर्वकर्मसंन्यासपूर्वक आत्मज्ञान' हेच एकमेव मोक्षसाधन मानणाऱ्यांनाही चित्तशुद्धीसाठी साधन म्हणून जो 'कर्मयोग' मानावा लागतो, त्याचे थोडक्यात स्वरूप कोठे आहे असे विचारले तर त्यांनाही या गीताबीजाकडेच बोट दाखवावे लागेल.

'हजारो मनुष्यांत एखादा सिद्धीसाठी प्रयत्न करतो व अशा प्रयत्न करणाऱ्या हजारो मनुष्यांत एकालाच खरे ज्ञान प्राप्त होते' हे गीतेचे वचन प्रमाण मानले तर 'कर्माधिकारी' या स्थितीच्या पलीकडे गेलेले व अर्जुनापेक्षाही वरच्या पायरीचे लोक किती आढळतील? त्यांनी काय करावे न करावे हा केवळ व्यवहारातील तात्त्विक (ॲकॅडेमिक) प्रश्न आहे. ज्या शिष्याला ग्रंथात उपदेश केला त्या शिष्याच्या इयत्तेतील लोकांनाच तो उपयोगी व तेच तो हाती घेतात. त्याच्या वरच्या इयत्तेतील जे असतील अगर त्या इयत्तांना काय काय सांगावयाचे हे समजून घ्यावयाचे असेल तर हे अर्जुनाच्या इयत्तेचे पुस्तक त्यांनी हाती न घेतलेलेच बरे.

पण ज्यांना गीतेमध्ये श्रीकृष्णांनी अर्जुनास श्रेयप्राप्तीचा कोणता मार्ग सांगितला हे जाणून घेऊन तो आचरणात आणावयाचा असेल त्यांनी हा बीजात सांगितलेला मार्गच समजून घेतला पाहिजे. या मार्गात जगाच्या व्यवहाराला परमार्थमय बनविण्याची युक्ती भगवंतांनी सांगितली आहे. बुद्धी निर्मल करून लोकसंग्रह बुद्धीने स्वतःचे कर्तव्य करण्यातच माणसाला अभ्युदय व निःश्रेयस् म्हणजे इहपर कल्याण साधता येते. जगाचा व्यवहार सोडून देऊन निराळा म्हणून परमार्थाचा कार्यक्रम करण्याची जरुरी या योगमार्गात रहात नाही. आणि हा व्यवहार शुद्धबुद्धिनियत अला असला म्हणजे तो परमार्थाच्या आड न येता त्यास पोषकच होतो.

गीतेच्या श्रेष्ठत्वाचे बीज

अर्थात या मार्गाने परमार्थ व व्यवहार, या बऱ्याच जणांनी भिन्नास्पद अशा ठरविलेल्या, गोष्टींची सांगड घातलेली आहे. व्यावहारिक उपयुक्तता किंवा सामुदायिक ऐहिक कल्याण व वैयक्तिक परम श्रेय किंवा पारमार्थिक ध्येय यांचा उत्कृष्ट समन्वय या बुद्धियोगयुक्त लोकसंग्रहाच्या मार्गामध्ये घातलेला आहे. परमार्थ सांभाळून व्यवहार करणे व व्यवहार सांभाळून परमार्थ करणे व तोही एकसमयी करणे इतक्या गोष्टी या मार्गाने साध्य होतात. जीव, जगत् व जगदीश या त्रयीपलीकडील द्वैताद्वैताचा वाद सोडला तरी, प्रत्यक्ष दिसणारे जग व अप्रत्यक्ष पण बुद्धीला प्रतीत होणारा जगदीश या दोहोंकडे जीवाचा ओढा असतो. जगदीशाकडे जावयाचे तर जग अजीबात सोडले पाहिजे किंवा जगाकडे पहावयाचे असेल तर जगदीशाचा विचार सोडला पाहिजे असे आत्यंतिक तत्त्वज्ञान जीवापुढे आले. म्हणजे तो भांबावून जातो. पण ज्या पावलांनी जगत्कल्याणाचा मार्ग आक्रमावयाचा त्याच पावलांनी जीव जगदीशाकडेही जातो व तो कसा हे गीतेने दाखविले आहे. या मार्गाचे थोडक्यात स्वरूप या गीताबीजामध्ये सांगितलेले आहे.

गीताबीजाचा थोडक्यात आशय

पूर्वार्ध–योगाचे अंतरंग

याप्रमाणे हे ६१ श्लोक क्रमशः वाचले असता भगवान श्रीकृष्णांच्या योग-मार्गाचे, मताचे व उत्तम रहस्याचे अंतरंग व बहिरंग ही क्रमशः कळून येतात. या मार्गात अधिक्रमाचा नाश नाही, म्हणजे मध्येच थांबून पुनः सुरुवात केली तर मागचे आचरण फुकट गेले असे होत नाही. या मार्गात निश्चयस्वरूप स्थिरबुद्धीचे महत्त्व आहे. भोग आणि ऐश्वर्य यांच्यात गढून गेलेल्या व त्यांतच सर्वस्व मानणाऱ्या लोकांची बुद्धी स्थिर होत नाही, ती चंचल राहते किंवा तिला अनेक फाटे फुटतात. पूर्वीच्या काळी वैदिक काम्य कर्मात गढलेले लोक असे चंचल बुद्धीचे असत. पण कोणत्याही काळात असे भोगैश्वर्यप्रसक्त लोक असतातच. या उपभोगात गढून न जाता, त्यांच्या आसक्तीपासून अलिप्त, सुखदुःखादि द्वंद्वांनी चलबिचल होऊ न देणारा आत्मज्ञानवान्, धृत्युत्साह-समन्वित व योगक्षेमाबद्दल निश्चिंत असाच योगी असतो. सर्वत्र पाणीच पाणी झालेले असता विहिरीची जितकी आवश्यकता राहील, तितकीच ज्ञान व विज्ञान संपादन केलेल्या कोणत्याही मनुष्याला (ब्राह्मणस्य विजानतः) भोगैश्वर्यासंबंधाने आवश्यकता राहील, (म्हणजे मुळीच राहणार नाही). मनुष्याचा अधिकार कर्म करण्याचा आहे, त्याचे फल मिळणे न मिळणे हे केव्हाही त्याच्या हातचे नसते; म्हणून कर्मफलाचा हेतू ठेवू नये व कर्म न करण्याचा आग्रह धरू नये. यश येवो वा अपयश येवो, कर्मासंबंधीची आग्रहबुद्धी सोडून म्हणजेच योगबुद्धीने कर्मे करावी. यशापयशाविषयी समत्वालाच योग हे नाव आहे. या बुद्धियोगाच्या दृष्टीने कर्माला गौणत्व आहे. अर्थात बुद्धियोगाचा आश्रय करावा. कर्माच्या फलहेतूचा आश्रय करणारे दुर्बल होत. या योगमार्गाप्रमाणे समत्वबुद्धीचे स्थितप्रज्ञ पाप व पुण्य या दोहोपासून अलिप्त असतात. कोणत्याही कर्माचे बंधन त्यांना लागत नाही, म्हणून बुद्धियोग संपादन करून कर्मे करावी. हेच कर्मातील कौशल्य आहे. असे स्थितप्रज्ञ पुरुष कर्माच्या फलाशेचा त्याग केल्यामुळे जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन निर्विकार अशा ब्रह्मपदाला जातात. ज्यावेळी बुद्धी सुख-दुःखांपासून उत्पन्न होणाऱ्या मोहापासून सुटते, तेव्हा सर्व प्रकारच्या जुन्या-नव्या भोगांसंबंधी वैराग्ययुक्त होते उपभोगांच्या वर्णनाचे श्रवण करण्याने चंचल झालेली बुद्धी जेव्हा सम होईल तेव्हाच बुद्धियोग प्राप्त होतो. मनातील विषयवासना पूर्णपणे काढून टाकून स्वतःविषयी स्वतःचे ठिकाणी संतुष्ट असणारा, सुखाविषयी निःस्पृह व दुःखाविषयी अनुद्विग्न असणारा, अभिलाषा-भीती-क्रोध हे ज्याने टाकलेले आहेत असा, सर्व बाबतींत निर्लोभ राहणारा, बरेवाईट प्रसंग प्राप्त झाले असता हर्ष-विशाद न मानणारा तोच स्थितप्रज्ञ होय. कासव ज्याप्रमाणे आपले अवयव आवरून घेते त्याप्रमाणे तो इंद्रिये विषयांपासून आवरून घेतो.

मनात विषयासंबंधी आसक्ती राहिली असता, बाह्यतः विषयोपभोग बंद केल्याने, विषय जरी बाजूला पडले तरी, त्यांच्याबद्दलची आवड मनात असतेच. पण आत्मज्ञानाने ही आवड देखील शिल्लक रहात नाही. विचारी पुरुषाने देखील केवळ बाह्यतः असे नियमन केले तरी त्याच्या मनाला इंद्रिये जबरदस्तीने ओढून नेतात. त्यांचा संयम करून ईश्वरपरायण बनावे. इंद्रिये ज्याच्या ताब्यात येतील तोच स्थितप्रज्ञ होऊ शकतो. सामान्य माणसे विषयांच्या आकर्षणाने त्यांचेच चिंतन करू लागतात. त्यायोगे त्या विषयाचा ओढा उत्पन्न होतो. मग ते हवेसे वाटू लागतात. या इच्छेला प्रतिबंध झाला म्हणजे मनात संताप व अविचार उत्पन्न होतो आणि अशा रीतीने बुद्धीची स्थिरता नाहीशी झाली म्हणजे त्यांचा सर्वप्रकारे नाश होतो. उलट इंद्रिये, रागद्वेषरहित करून व ताब्यात ठेवून वागणाऱ्या शुद्ध अंतःकरणाच्या पुरुषाला समाधान प्राप्त होते व त्याच्या सर्व दुःखांचा नाश होऊन त्याची बुद्धी निश्चल बनते. बुद्धियोगविरहित पुरुषाला स्थिरबुद्धी नाही व आत्मज्ञानाचा संस्कार नाही, म्हणून त्याला शांती व सुखही मिळत नाही. मन इंद्रियांच्या मागे जाऊ लागले म्हणजे, समुद्रात वाऱ्याने जशा नावा भलतीकडे वाहवत जातात त्याप्रमाणे ते मन बुद्धीसह भलत्या मार्गाला लागते. विषयासक्त पुरुष ज्या प्रसंगी जागृत राहतो, काळजी घेतो, त्या उपभोगासंबंधी संयमी पुरुष बेफिकीर असतो. उलट ज्या बुद्धियोगासंबंधाने विषयासक्त पुरुष बेफिकीर असतो, त्यासंबंधी संयमी पुरुष काळजी घेतो. समुद्रात चोहोकडून नद्यांचे पाणी भरत असतानाही तो मर्यादा सोडत नाही, तसाच संयमी पुरुष उपभोगाचे योगाने चलित होत नाही, पण उपभोगपरायण मनुष्याची स्थिती याच्या उलट असते, म्हणून संयम्याला जशी शांती लाभते तशी उपभोगपरायण माणसाला लाभत नाही. सर्व विषयवासनांचा त्याग करून निरिच्छ, ममत्वशून्य व निरभिमानी रीतीने जो आपले कर्तव्य करीत राहतो त्यास शांती मिळते. हीच स्थिरबुद्धीची पूर्णावस्था होय व अगदी अंतकाली जरी ही प्राप्त झाली तरी मनुष्य मुक्त होतो.

उत्तरार्ध—योगाचे बहिरंग

कार्याला आरंभच न करण्याने मनुष्य निष्कर्म होतो असे नाही व प्राप्त कर्म सोडल्याने सिद्धी मिळते असे नाही. कारण कोणीही झाला तरी तो क्षणभर देखील कर्मविरहित असा होऊ शकत नाही. जगरहाटीप्रमाणे व सृष्टिनियमाप्रमाणे त्याला कर्म करावे लागते – मग त्याची इच्छा असो वा नसो. कर्मेंद्रियांना हट्टाने आवरून मनातून त्या इंद्रियांच्या कृत्यांचे स्मरण करणारा मनुष्य ढोंगी होय. पण ही इंद्रिये मनाच्या ताब्यात ठेवून जो कर्माचरण करितो तोच श्रेष्ठ होय. शरीराचे व्यवहार कर्माखेरीज चालणार नाहीत, म्हणून अकर्मापेक्षा कर्म करीत राहिलेले चांगले, हे कर्म शुद्धबुद्धीने नियंत्रित असे असले पाहिजे. यज्ञ म्हणजे उपासना बुद्धीने सृष्टि-

गीताबीजाचा थोडक्यात आशय

पूर्वार्ध–योगाचे अंतरंग

याप्रमाणे हे ६१ श्लोक क्रमशः वाचले असता भगवान श्रीकृष्णांच्या योग-मार्गाचे, मताचे व उत्तम रहस्याचे अंतरंग व बहिरंग ही क्रमशः कळून येतात. या मार्गात अधिक्रमाचा नाश नाही, म्हणजे मध्येच थांबून पुनः सुरुवात केली तर मागचे आचरण फुकट गेले असे होत नाही. या मार्गात निश्चयस्वरूप स्थिरबुद्धीचे महत्त्व आहे. भोग आणि ऐश्वर्य यांच्यात गढून गेलेल्या व त्यांतच सर्वस्व मानणाऱ्या लोकांची बुद्धी स्थिर होत नाही, ती चंचल राहते किंवा तिला अनेक फाटे फुटतात. पूर्वीच्या काळी वैदिक काम्य कर्मात गढलेले लोक असे चंचल बुद्धीचे असत. पण कोणत्याही काळात असे भोगैश्वर्यप्रसक्त लोक असतातच. या उपभोगात गढून न जाता, त्यांच्या आसक्तीपासून अलिप्त, सुखदुःखादि द्वंद्वांनी चलबिचल होऊ न देणारा आत्मज्ञानवान्, धृत्युत्साह-समन्वित व योगक्षेमाबद्दल निश्चित असाच योगी असतो. सर्वत्र पाणीच पाणी झालेले असता विहिरीची जितकी आवश्यकता राहील, तितकीच ज्ञान व विज्ञान संपादन केलेल्या कोणत्याही मनुष्याला (ब्राह्मणस्य विजानतः) भोगैश्वर्यासंबंधाने आवश्यकता राहील, (म्हणजे मुळीच राहणार नाही). मनुष्याचा अधिकार कर्म करण्याचा आहे, त्याचे फल मिळणे न मिळणे हे केव्हाही त्याच्या हातचे नसते; म्हणून कर्मफलाचा हेतू ठेवू नये व कर्म न करण्याचा आग्रह धरू नये. यश येवो वा अपयश येवो, कर्मासंबंधीची आग्रहबुद्धी सोडून म्हणजेच योगबुद्धीने कर्मे करावी. यशापयशाविषयी समत्वालाच योग हे नाव आहे. या बुद्धियोगाच्या दृष्टीने कर्माला गौणत्व आहे. अर्थात बुद्धियोगाचा आश्रय करावा. कर्माच्या फलहेतूचा आश्रय करणारे दुर्बल होत. या योगमार्गाप्रमाणे समत्वबुद्धीचे स्थितप्रज्ञ पाप व पुण्य या दोहोपासून अलिप्त असतात. कोणत्याही कर्माचे बंधन त्यांना लागत नाही, म्हणून बुद्धियोग संपादन करून कर्मे करावी. हेच कर्मातील कौशल्य आहे. असे स्थितप्रज्ञ पुरुष कर्माच्या फलाशेचा त्याग केल्यामुळे जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन निर्विकार अशा ब्रह्मपदाला जातात. ज्यावेळी बुद्धी सुख-दुःखांपासून उत्पन्न होणाऱ्या मोहापासून सुटते, तेव्हा सर्व प्रकारच्या जुन्या-नव्या भोगांसंबंधी वैराग्ययुक्त होते उपभोगांच्या वर्णनाचे श्रवण करण्याने चंचल झालेली बुद्धी जेव्हा सम होईल तेव्हाच बुद्धियोग प्राप्त होतो. मनातील विषयवासना पूर्णपणे काढून टाकून स्वतःविषयी स्वतःचे ठिकाणी संतुष्ट असणारा, सुखाविषयी निःस्पृह व दुःखाविषयी अनुद्विग्न असणारा, अभिलाषा-भीती-क्रोध हे ज्याने टाकलेले आहेत असा, सर्व बाबतींत निर्लोभ राहणारा, बरेवाईट प्रसंग प्राप्त झाले असता हर्ष-विशाद न मानणारा तोच स्थितप्रज्ञ होय. कासव ज्याप्रमाणे आपले अवयव आवरून घेते त्याप्रमाणे तो इंद्रिये विषयांपासून आवरून घेतो.

मनात विषयासंबंधी आसक्ती राहिली असता, बाह्यतः विषयोपभोग बंद केल्याने, विषय जरी बाजूला पडले तरी, त्यांच्याबद्दलची आवड मनात असतेच. पण आत्मज्ञानाने ही आवड देखील शिल्लक रहात नाही. विचारी पुरुषाने देखील केवळ बाह्यतः असे नियमन केले तरी त्याच्या मनाला इंद्रिये जबरदस्तीने ओढून नेतात. त्यांचा संयम करून ईश्वरपरायण बनावे. इंद्रिये ज्याच्या ताब्यात येतील तोच स्थितप्रज्ञ होऊ शकतो. सामान्य माणसे विषयांच्या आकर्षणाने त्यांचेच चिंतन करू लागतात. त्यायोगे त्या विषयाचा ओढा उत्पन्न होतो. मग तें हवेसे वाटू लागतात. या इच्छेला प्रतिबंध झाला म्हणजे मनात संताप व अविचार उत्पन्न होतो आणि अशा रीतीने बुद्धीची स्थिरता नाहीशी झाली म्हणजे त्यांचा सर्वप्रकारे नाश होतो. उलट इंद्रिये, रागद्वेषरहित करून व ताब्यात ठेवून वागणाऱ्या शुद्ध अंतःकरणाच्या पुरुषाला समाधान प्राप्त होते व त्याच्या सर्व दुःखांचा नाश होऊन त्याची बुद्धी निश्चल बनते. बुद्धियोगविरहित पुरुषाला स्थिरबुद्धी नाही व आत्मज्ञानाचा संस्कार नाही, म्हणून त्याला शांती व सुखही मिळत नाही. मन इंद्रियांच्या मागे जाऊ लागले म्हणजे, समुद्रात वाऱ्याने जशा नावा भलतीकडे वाहवत जातात त्याप्रमाणे ते मन बुद्धीसह भलत्या मार्गाला लागते. विषयासक्त पुरुष ज्या प्रसंगी जागृत राहतो, काळजी घेतो, त्या उपभोगासंबंधी संयमी पुरुष बेफिकीर असतो. उलट ज्या बुद्धियोगासंबंधाने विषयासक्त पुरुष बेफिकीर असतो, त्यासंबंधी संयमी पुरुष काळजी घेतो. समुद्रात चोहोकडून नद्यांचे पाणी भरत असतानाही तो मर्यादा सोडत नाही, तसाच संयमी पुरुष उपभोगाचे योगाने चलित होत नाही, पण उपभोगपरायण मनुष्याची स्थिती याच्या उलट असते, म्हणून संयम्याला जशी शांती लाभते तशी उपभोगपरायण माणसाला लाभत नाही. सर्व विषयवासनांचा त्याग करून निरिच्छ, ममत्वशून्य व निरभिमानी रीतीने जो आपले कर्तव्य करीत राहतो त्यास शांती मिळते. हीच स्थिरबुद्धीची पूर्णावस्था होय व अगदी अंतकाली जरी ही प्राप्त झाली तरी मनुष्य मुक्त होतो.

उत्तरार्ध—योगाचे बहिरंग

कार्याला आरंभच न करण्याने मनुष्य निष्कर्म होतो असे नाही व प्राप्त कर्म सोडल्याने सिद्धी मिळते असे नाही. कारण कोणीही झाला तरी तो क्षणभर देखील कर्मविरहित असा होऊ शकत नाही. जगरहाटीप्रमाणे व सृष्टिनियमाप्रमाणे त्याला कर्म करावे लागते – मग त्याची इच्छा असो वा नसो. कर्मेंद्रियांना हट्टाने आवरून मनातून त्या इंद्रियांच्या कृत्यांचे स्मरण करणारा मनुष्य ढोंगी होय. पण ही इंद्रिये मनाच्या ताब्यात ठेवून जो कर्माचरण करितो तोच श्रेष्ठ होय. शरीराचे व्यवहार कर्माखेरीज चालणार नाहीत, म्हणून अकर्मापेक्षा कर्म करीत राहिलेले चांगले, हे कर्म शुद्धबुद्धीने नियंत्रित असे असले पाहिजे. यज्ञ म्हणजे उपासना बुद्धीने सृष्टि-

चक्राला आधारभूत असे कर्म. हे यज्ञाचे चक्र जगदुत्पत्तीपासून चालले आहे. समाजातील श्रेष्ठ व कनिष्ठ व्यक्ती एकमेकांच्या त्यागपूर्वक कर्माने परस्परांचे आधार होत असतात. कर्मनिष्ठ सहकारितेने सर्वांचे म्हणजे समाजाचे कल्याण साधते. या चक्राचे जो अनुवर्तन करणार नाही, त्याचे जीवन व्यर्थ होय. परम ज्ञानी पुरुषाला स्वतःपुरती कोणतीच आशा नसते, म्हणून स्वतःसाठी त्याला काही करावे लागत नाही. यासाठी नेहमी कर्तव्यकर्म अनासक्त चित्ताने आचरीत रहावे. या आचरणानेच परम-सिद्धी मिळते. अशाच सतत कर्तव्याचरणाने जनकासारख्या राजर्षींनी परमश्रेय मिळविले.लोकव्यवहार चांगला चालण्यासाठी व लोकांची उन्नती होण्यासाठीही कर्तव्याचरणाची आवश्यकता आहे. भगवान श्रीकृष्णांना स्वतःला काही मिळवावयाचे किंवा स्वतःसाठी काही करावयाचे उरले नव्हते. तरीही त्यांनी कर्म सोडले नाही; कारण त्यांनी जर निरलसपणे लोककार्य करून लोकांना उत्तम धडा घालून दिला नसता तर लोक त्यांच्याप्रमाणेच स्वस्थ बसले असते व त्यांची अवनती झाली असती. म्हणून, कर्मात गढून स्वार्थबुद्धीचा मनुष्य ज्या कळकळीने व उत्साहाने करतो, तशाच उत्साहाने निःस्वार्थबुद्धीच्या स्थितप्रज्ञांनी लोककार्य करावे. त्यांनी अज्ञ समाजाला भलत्या मार्गाला लावू नये. स्वतःच्या उदाहरणाने त्यांस सत्कर्माचा धडा द्यावा. प्रकृतीच्या गुणांनी म्हणजे सृष्टिनियमाप्रमाणे सर्व कर्मे घडत असतात. मी कर्ता आहे असे मानणे हा अहंकार होय. खरे तत्त्व जाणणारा मनुष्य सृष्टीच्या नियमाप्रमाणे घडामोड चालली आहे हे जाणून त्यात अहंभावाने गढून जात नाही. अल्पज्ञ लोक अशा अहंभावनेने गढून जात असतात. त्यांना तत्त्वज्ञाने भलत्या मार्गाला लावू नये, सारांश, सर्व कर्मे परमेश्वराला अर्पण करण्याच्या बुद्धीने अध्यात्मचिंतन करीत. आसक्ती व अहंकार सोडून, अविचल चित्ताने आपले प्राप्तकर्तव्य करीत रहावे. हे श्रीकृष्णाचे मत किंवा योग होय. याप्रमाणे जे मनुष्यप्राणी वागतील त्यांना पुण्याचरण घडून उत्तम गती प्राप्त होईल. मात्र त्यांच्यात आस्था व प्रामाणिकपणा पाहिजे. उलट आस्था न ठेवता कुत्सित बुद्धीचे जे लोक या मार्गाचे आचरण करणार नाहीत, त्यांना कोणत्याही प्रकारचे ज्ञान प्राप्त न होता ते अधोगतीस जातील.



अलौकिक युगपुरुषाचे भीषण देहावसान

"जेव्हा मी गांधींचा विचार करतो, तेव्हा माझ्यापुढे ख्रिस्त उभा राहतो. कारण ते ख्रिस्ताचे जीवन जगत आहेत; ते त्याचे शब्द बोलत आहेत. ते दुःख सहन करीत आहेत, ते प्रयत्न करीत आहेत आणि एखादे दिवशी तरी ईश्वराचे राज्य या भूमीवर यावे या ध्येयासाठी ते देहत्याग करतील."

– जे. एच्. होम्स.

काल शुक्रवार दि. ३० ला सायंकाळी पाच वाजता नव्या दिल्लीमध्ये महात्मा गांधी हे सायंप्रार्थनेच्या व्यासपीठाकडे जनसमुदायाने दुभंग होऊन करून दिलेल्या मार्गाने जात असतानाच त्यांच्यावर एकामागून एक अशा चार गोळ्या झाडण्यात आल्या. गांधीजींना भीषण स्वरूपाच्या जखमा होऊन ते खाली पडले लगेच त्यांना चार-पाच माणसांनी उचलून बिर्ला भवनात नेले व दार बंद करून घेतले. डॉक्टरांना तातडीने पाचारण करण्यात येऊन डॉक्टर आले; पण इतक्या अमानुष क्रूरतेने गोळीबार चार वेळा झाला असल्याने त्यांचा काय उपाय चालणार ? ५ वाजून ४० मिनिटांनी त्यांचे प्रोणोत्क्रमण झाले.

देशाचे व्यथित हृदय

ज्या आत्म्याच्या संवेदना जाणण्याविषयी जगातील साधू आणि तत्वज्ञ हे अपूर्व आकर्षणाने आणि कुतूहलपूर्ण आदराने सारखे प्रयत्नशील असत, तो महान् आत्मा विश्वात्म्यात विलीन झाला. जी आत्मज्योती १९१७–१८ सालापासून गेली तीस वर्षे हिंदुस्थानच्या भूमीवरून देशी-विदेशी डोळ्यांना सतत खेळविणारी आण चमकवणारी होती ती जगच्चालक प्रकाशांत विलीन झाली. ज्याने आपल्या जीवनकलेच्या विकासाने सर्व देश तीस वर्षे मंत्रमुग्ध करून ठेवला व सर्व जगातील जाणत्यांना चकित केले, ज्याच्या शब्दांसाठी हजारो थोर व्यक्ती व त्यागी जीव आपले सर्वस्व वेचण्यास उत्सुक असत, त्याच्या या अचानक नि भीषण अन्ताने देशाचे हृदयच प्रचंड मंथनाने ढवळून नि पिळवटून निघाले.

राष्ट्रनियतीची झेप

रेडिओवरून ही भयानक घटना सर्वत्र देशाच्या कोनाकोपऱ्यामध्ये पोचली. कित्येकांनी ती वार्ता ऐकून सुन्न मनाने रेडिओच बंद केले. मोठमोठ्या गावांतून रस्त्यांत लोक वेड्यासारखे 'का हो, रेडिओवर वार्ता आली ही खरी काय ?' असे

विचारीत नि ऐकत घोळक्याने उभे राहून विषण्ण मनाने एकमेकांकडे पहात निःश्वास टाकीत. काही शब्द सुचणे किंवा बोलणे याच्या पलीकडची ही घटना, केवळ एकमेकांच्या खिन्न मुखांनी एकमेकांस पोचतील त्या संवेदनांनी निःशब्दपणे ती कळत होती. महात्मा गांधी गेले. राष्ट्राच्या जीवनाच्या प्रचंड ओघाचे एक केंद्रस्थान आता प्रेरणारहित झाले. आता, "वेडे होऊ नका, शांत रहा," हे लोकांना कोणी सांगावयाचे? १५ ऑगस्टचे जे काय स्वातंत्र्य मिळाले ते यासाठीच मिळावयाचे होते काय? राष्ट्रनियतीला गेल्या सहा महिन्यांत जे रक्ताचे अर्घ्य आणि असंख्य प्राणांचे बलिदान दिले त्याने तिची पिपासा शमली नाही. अखेर देशातील सर्वोच्च स्थानावर या भीषण नियतीची झेप पडली. या देशाच्या भविष्यकाळात काय काय भवितव्ये लिहिली आहेत या विचाराने राष्ट्रातील विचारी नि जबाबदार व्यक्तींची मने कातर आणि आंदोलित होतील अशा प्रकारची ही राष्ट्र-पुरुषाची भीषण हत्या आहे.

आततायी कृत्य

१९२० पासूनचे गांधीजींचे या देशातील चरित्र हे एक महाभारत आहे. ते काही केवळ एक राजकारणी पुरुष नव्हते. केवळ राजकारणाच्या मापानेच त्यांच्या विभूतिमत्त्वाचे मूल्य करणे म्हणजे एकाच क्षेत्रात सर्व गंगाप्रवाह संपला असे समजण्यासारखे आहे. त्यांनी राष्ट्रीय आणि जागतिक जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये स्वतःच्या उंच व्यक्तिमत्त्वाचे ठसे उमटवले आहेत. त्यांच्या भौतिक देहावर हल्ला करणाऱ्या घातकी बेभान जीवाला त्यांचा हा सार्वत्रिक जीवन-प्रभाव नाहीसा करणे शक्य नाही. त्याला राष्ट्राच्या कृतज्ञ स्मृतीमध्ये गांधीजींचे असलेले निरुपम अग्रस्थान नाहीसे करणे तर शक्य नव्हतेच; पण उलट त्याने आपल्या आततायीपणाच्या काळ्याकुट्ट पार्श्वभूमीने ते उज्ज्वल आणि अधिक उंच करून ठेवले आहे.

गांधीजींच्या गेल्या वाढदिवसाच्या प्रसंगी आम्ही म्हटले होते की, ते पूर्वीच्या काळी जन्मले असते तर धर्मप्रवर्तक झाले असते आणि धर्मप्रवर्तकांमध्येही जे राजे किंवा सम्राट आणि धर्मप्रवर्तक असे पूर्वीच्या काळी झाले त्यांच्या मालिकेत त्यांना उच्च स्थान प्राप्त झाले असते. प्रो. केज यांनी म्हटल्याप्रमाणे "म. गांधींनी बुद्ध-ख्रिस्तापासून टॉलस्टॉयपर्यंतच्या एकंदर विभूतींनी आणि तत्त्वज्ञान्यांनी आचारात आणि विचारात पुरस्कारलेल्या मार्गांना आजकालच्या परिस्थितीत उपयोगी पडेल असे तात्त्विक नि व्यावहारिक रूप दिले."

रवीन्द्रनाथ टागोर यांनी म्हटल्याप्रमाणे "आमच्या पौर्वात्य संस्कृतीचें अंतिम ध्येय गांधींच्या रूपाने अवतरले आहे....यज्ञाला स्वतःला मनुष्यरूप

घ्यावेसे वाटले आणि तो गांधींच्या रूपाने अवतरला. " आणि शेवटी राष्ट्राच्या स्वातंत्र्योत्तर अंतःकलहाच्या भीषण यज्ञामध्ये त्यांची आहुती पडली. १९४२ च्या लढ्याच्या वेळी त्यांनी जळजळीत उद्‌गार काढले होते की, देशामध्ये अराजकाचा हुताशन पेटला तर त्यात माझी प्रथम आहुती पडेल. पण धूर्त इंग्रज राज्यकर्त्यांनी अराजक, आपल्या अंगावरचे चुकवून, देशातून पाऊल काढता काढता अंतःकलहाच्या रूपाने देशाच्या अंगावर ढकलले. देशाच्या फाळणीला नामानिराळे राहून त्यांनी प्रोत्साहन दिले. त्या फाळणीपासून झालेल्या क्षोभाच्या वणव्यात देश होरपळून निघत असता गांधीजी तो वन्ही शांत करण्याची आपल्या विशिष्ट साधनमार्गांनी पराकाष्ठा करीत होते.

अखेर नियतीने दावा साधला

थोड्याच दिवसांपूर्वी प्रार्थनेच्या वेळी दिल्लीत बाँबस्फोट झाला, त्यावर अनेकांनी लिहिले की, हे चिन्ह ठीक नव्हे. गांधीजींच्या रक्षणाची काळजी घेतली पाहिजे. त्याप्रमाणे रक्षकांची व्यवस्था वाढवण्यात आलीही होती. त्यानंतर गांधीजींच्या वैद्यकीय सल्लागारांनी त्यांना प्रकृतिस्वास्थ्यासाठी वर्ध्याला जाऊन महिनाभर राहण्याचा सल्ला दिला होता. त्यायोगे दिल्लीच्या सध्याच्या भयानक परिस्थितीतून ते महिनाभर बाहेर राहतील आणि आणखी काही अनिष्ट प्रकार टळतील असे वाटले. पाकिस्तानाच्या निर्मितीने ज्या कत्तली झाल्या त्यांतून निघालेला मूर्तिमंत लोकक्षोभच निर्वासितांच्या लोंढ्याच्या रूपाने दिल्लीला लोटला होता. तिकडचे पाकिस्तानी आक्रमण चालूच होते. असे असता या क्षोभाचा वणवा लोकांना प्रवचनांनी आणि शिकवणींनी शांत करून थांबवण्याचा एकाकी यत्न करण्यास उभा राहिलेला हा महापुरुष पाहून, त्याच्या सुरक्षिततेसंबंधाने मन साशंक होई. अमृतसरला पंडित नेहरू गेले असता तेथे हँडग्रेनेड एका शीखाच्या हाती सापडले ही वार्ताही पोटात धस्स करणारी होती. पण नियती टाळू म्हटले तरी टळत नाही. या भयानक गोष्टीने देशाच्या पुढे काय काय नष्टचर्य ओढवणार आहे याची कल्पना करवत नाही. महात्मा गांधींचे थोर अनुयायी आणि शिष्य यांनी आपल्या गुरूची शांतता, निश्चल पण करारी वृत्ती, महान प्रसंगात त्यांच्यात चमकणारी स्थिरबुद्धी या वेळी आठवावी आणि या देशाला अनिष्टातून तारावे. शंकडो वर्षांत या राष्ट्रावर आला नाही असा भीषण आपत्तींचा लोंढा गेल्या १५ ऑगस्टपासून या राष्ट्रावर लोटला आहे. त्यात १९४८ च्या जानेवारीच्या अखेर देशाच्या दुर्दैवाने कळसच केला ! ईश्वर त्यांना या वेळी प्रसंगोचित मानसिक सामर्थ्य देवो.

राष्ट्रीय देव्हाऱ्यातील पूज्यस्थान

महात्मा गांधींनी या देशासाठी जन्मभर " आत्मयज्ञ " केला. या देशाचा सध्याचा भीषण अतःकलह पाहून ते क्षणोक्षणी विव्हल होत. पण या भयानक घडीमध्ये शेवढी त्यांचीच आहुती पडली. अनेक थोर विभूतींनी मंडित अशा या राष्ट्राच्या देव्हाऱ्यात महात्मा गांधींचे स्थान पूजनीय राहील, कृतज्ञतापूर्वक त्या हुतात्म्याला वंदन करून, त्याच्या पुण्याईने भावी अनर्थातून राष्ट्रनौका सुरक्षित नेण्याचे सामर्थ्य त्यांच्या शिष्यांना लाभो अशी इच्छा व्यक्त करून, काही न सुचणाऱ्या आणि हताश करणाऱ्या मनःस्थितीतच हा लेख आम्ही संपवितो.

–केसरी, दि. ३१ जानेवारी १९४८

आधी फाशी .... मग चौकशी

(लेखांक पहिला)

रा. स्व. संघाचे प्रमुख श्री गोळवलकर गुरुजी यांनी अपेक्षा केल्याप्रमाणेच संघावरील बंदी चालू ठेवण्याचा हिंद सरकारचा निर्णय गेल्या दि. १३ ला बाहेर पडला. त्यासंबंधी हिंद सरकारने जे पत्रक प्रसिद्ध केले त्यात म्हटल्याप्रमाणे, गुरुजींना परत नागपूरला म्हणजे पूर्वस्थळी पोचविण्याची व्यवस्था करण्यात आली. पण तेथे गेल्यावर मात्र त्यांना दिल्लीस जाण्याच्यापूर्वीची मर्यादित स्वतंत्रताही प्राप्त झाली नाही ! कारण दिल्लीस जाण्यापूर्वी ते बंदिवासातून मुक्त झाले होते. फक्त नागपुरातून बाहेर जावयाचे नाही एवढ्यापुरतेच त्यांच्यावर बंधन होते. दिल्लीहून परतल्यावरही तशाच स्थितीत त्यांना पुनः नागपूरला राहू दिले असते तर काय बिघडले असते, हे आम्हांस समजत नाही. कारण काय असेल ते असो, पण संघावरील बंदी उठवण्याच्या संबंधात अखेरचा नकार मिळाल्यानंतर त्यांना नागपुरात मोकळे राहू देणे हेही मध्यप्रांत सरकारला अनिष्ट वाटले ! म्हणून दिल्लीची वारी करून नागपूरला येताच गुरुजींची तडक बंदिवासात पुनः रवानगी करण्यात आली. ते संघाला मोकळे करायला गेले, पण ते कार्य न साधता स्वतः तेच बंदीत पडले.

गंजलेल्या शस्त्राचा उपयोग

मध्यप्रांतात जो नवा सुरक्षा कायदा प्रचलित आहे, त्यामध्ये चौकशीविना बंदिवासाला ६ महिन्यांची मुदत घातलेली आहे, म्हणून गुरुजींना पूर्वी नाइलाजाने सोडावे लागले होते. पण आता पुनः अटक करताना तसली काही कालमर्यादाही राहू नये अशी सावधानता नागपूर सरकारने बाळगली आहे; कारण विमानातून उतरताच केलेली ही नवी अटक १८१८ च्या तिसऱ्या रेग्युलेशनखाली आहे असे समजते. पिनल कोडाच्या १२४, १४४ इत्यादी जुन्या राजवटीतील नामवंत कलमांप्रमाणेच लजपतराय आणि अजितसिंह, तसेच अश्विनीकुमार दत्त प्रभृती सात बंगाली पुढारी यांना बंगभंगाच्या चळवळीत याच रेग्युलेशनान्वये पकडल्यामुळे देशात खळबळ उडाली होती. 'हे जुने गंजलेले कायदेशीर शस्त्र आता फेकून द्या' अशी जुन्या नोकरशाहीला राष्ट्रीय लोकांनी सतत विनंती केली होती. पण त्या गंजलेल्या शस्त्राचा राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या वातावरणातही अचूक रामबाण उपयोग होईल असे १९४७ च्या पूर्वी स्वातंत्र्यवाद्यांना सांगितले असते तर त्यांना ते खरेही वाटले नसते. अघटित घटना घडत असता माणसे स्वतःच्या अंगाला चिमटा घेऊन

आपण जागृत आहोत, स्वप्न पहात नाही, अशी खात्री करून घेत असल्याचे गोष्टीतून वर्णन करतात. आजच्या स्वातंत्र्यामधील गुरुजींच्या अटकेसारख्या काही अघटित सरकारी कृत्यामुळे असाच चिमटा घेऊन आपण स्वातंत्र्याच्या सत्यसृष्टीत आहोत याची खात्री करून घेण्याची पाळी येत आहे !

आक्षेपांच्या कोलांटचा

सघावर बदी घालणारे पहिले सरकारी पत्रक आणि ती बंदी काढता येत नाही यासंबंधाने गेल्या दि. १३ ला निघालेले शेवटचे पत्रक यांची तुलना केली असता असे स्पष्ट दिसून येते की, पहिल्या दि. ४ फेब्रुवारीच्या पत्रकात खून, लुटालूट, जाळपोळ, दहशतवाद इत्यादी जे भयानक आरोप संघावर करण्यात आले होते ते निमुटपणे या दुसऱ्या पत्रकात गाळण्यात आलेले आहेत. आता संघावर आरोप असा आहे की, संघाची कार्यपद्धती संघ सोडीत नाही आणि त्या पद्धती-मुळे असे एक वातावरण निर्माण होते की, त्यायोगे " पूर्वीप्रमाणे भयानक प्रकार घडतील. " या मोघम उल्लेखाचा अर्थ उघडच असा होतो की त्या पद्धतीमुळे उत्पन्न होणाऱ्या वातावरणामुळे गांधीजींचा खून झाला. इतर आणखी काय भयंकर प्रकार घडले ते लोकांना समजलेले नाहीत आणि त्यांच्यापुढे ते पुराव्यानिशी मांडण्याची सरकारलाही आवश्यकता वाटत नाही ! तिरंगी राष्ट्रध्वज आणि धर्मातीत राज्य यांना गुरुजींनी मान्यता दिली. पण ती मान्यता त्यांचे अनुयायी पाळतील की नाही याविषयी सरकारने संशय व्यक्त केला आहे ! सत्ता हाती असल्यामुळे आणि लोक हुकूमशाही कारभाराला बहुतांशी अनुकूलच असल्यामुळे असले परस्परविरोधी आक्षेप घेण्याचीही सरकारला खंत वाटत नाही. कारण एकीकडे संघात लोकशाहीची अंतर्व्यवस्था नसून एका नेत्याच्या आज्ञा पाळण्याची हुकूमशाही व्यवस्था आहे असा आक्षेप संघावर अलीकडे सारखा घेण्यात आला; आणि आता बरोबर उलट तोंड फिरवून गुरुजींच्या आज्ञा स्वयंसेवक मानतील की नाही याविषयी संशय प्रकट करण्यात आला आहे !! जातीच्या सुंदरांना जसे काहीही चालते तद्वतच जातीच्या हुकूमशाहींना हवे तसे आत्मविरोध दडपून चालवता येतात हेच खरे !

खोट्या प्रचाराची मोहीम

पण या संबंधात मध्यवर्ती आणि प्रांतिक मंत्र्यांपेक्षा बाहेरचे उपद्व्यापी लोकच अधिक दोषी आहेत असे आम्हांस वाटते. कारण वृत्तपत्रे, सभा, काँग्रेस समित्या इत्यादींमधून संघावरील बंदी उठवू नये अशी चळवळ करण्यात आली. बंदी घालताना सरकारी पत्रकात जे भयानक आरोप करण्यात आले ते सिद्ध करणारा काहीतरी पुरावा सरकारने लोकांपुढे मांडला पाहिजे, ही गोष्ट या उपद्व्यापी

चळवळचांनी ध्यानात घेतली नाही. ते सरकारी आरोप खरे असोत वा खोटे असोत, एकंदरीने संघाचे अस्तित्व हानिकारक वाटते म्हणून बंदी चालूच ठेवावी, असा या लोकांच्या मागणीचा इत्यर्थ होता. तसेच संघाच्या गुप्त हालचाली चालू आहेत इत्यादी वार्ता याच गटांकडून सारख्या प्रसृत होत होत्या आणि अद्यापीही येत आहेत. त्यामध्ये सूक्तासूक्त असे काहीच पाळले जात नाही. उदाहरणार्थ, अलीकडचीच एक बातमी पहा. कल्याण येथे काही लोकांना पकडल्यानंतरही अजून बाहेर असलेले संघीय लोक राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना त्रास देत आहेत, अशी मुंबईच्या एका दैनिकाच्या वार्ताहराने बातमी दिली आहे. त्याने असेही ठोकून दिले आहे की, कल्याणचा एक भाग हा हिंदुसभावाल्यांचा बालेकिल्ला असून, त्यांच्याशी सहमत नसणाऱ्या लोकांना ते अतिशय त्रास देत आहेत असे म्हणतात. आमचे गृहमंत्री खोटचा वार्ता उठवणाऱ्यांवर कडक उपाययोजना करू असे बोलतात मात्र; पण संघाविरुद्ध किंवा हिंदुसभेविरुद्ध वर्तमानपत्रांतून वरील प्रकारच्या खोटचा बातम्या प्रकट होत असताना देखील त्यांना कोणत्याही प्रकारे प्रतिबंध सरकार करीत नाही.

पश्चात्‌बुद्धीचा उदय

आता संघावरील बंदी हडसून खडसून पक्की झाल्यानंतर ही बंदी चालू ठेवण्याबद्दल सतत प्रचार करणाऱ्या मुंबईच्या 'फ्री प्रेस' दैनिकाला एक प्रकारची पश्चात्‌बुद्धी आठवली आहे ! संघासंबंधी अलीकडे लिहिलेल्या एका स्फुटात हे पत्र म्हणते की, "संघावरील बंदी चालू राहिल्याने आम्हांस आनंद झाला आहे हे आम्ही लपवून ठेवीत नाही. पण संघावर अन्याय झाला, असे पुष्कळांचे मत झालेले दिसते आणि ते वाढते आहे म्हणून सरकारने संघाविरुद्ध निश्चित आरोपपत्रक प्रसिद्ध करावे आणि त्या आरोपांचा पुरावाही लोकांपुढे मांडावा. एरवी संघाला निष्कारण हुतात्मेपणा प्राप्त होईल !" या पश्चात्‌बुद्धीवरून एक गोष्ट दिसते की, असा काहीच पुरावा पुढे नसता हे पत्र आजवर संघाची बंदी चालू ठेवण्याचा प्रचार करीत होते. आरोपीवर आरोप सिद्ध न होताच त्याला फाशीची शिक्षा दिल्यानंतर आणि ती देण्याची सतत मागणी केल्यानंतर, या मागणी करणाऱ्यांनी आता या खुनाचा काय असेल तो पुरावा पुढे यावा असे म्हणणे हे जितके विपरीत दिसते तितकी ही 'फ्री प्रेस' ची उक्ती विपरीत आहे.

आधी शिक्षा मग पुरावा

वृत्तपत्रीय आणि नागरिक स्वातंत्र्याच्या संबंधाने अत्यंत काळजी दाखवण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या 'फ्री प्रेस' सारख्या वृत्तपत्राला जेथे आधी शिक्षा कायम आणि मागून पुरावा, हा उलटा व्यवहार सांगण्यास किंचितही जनलज्जा अथवा

मनलज्जा वाटत नाही तेथे इतरेजनांची काय कथा ? पण आता 'फ्री प्रेस' ची ही मागणी सरकारकडून मानली जाण्याचाही संभव नाही. इतर पत्रेही संघ वाईट आहे म्हणून बंदी चालू ठेवावी, असे मोघम प्रतिपादन करतात. इतकेच नव्हे तर, बंदी उठवणे म्हणजे एक प्रकारे संघाला सरकारी 'मान्यता' मिळाल्यासारखे होते असलीही पोचट विधाने करण्यास त्यांना क्षिती वाटत नाही. 'आम्हांस जातीयता नको, बिनधार्मिक राज्य पाहिजे आणि या गोष्टीला संघाचे अस्तित्व बाधक आहे, असे गृहीतकृत्य धरून संघावरील बंदी चालू ठेवल्याबद्दल सरकारला ही पत्रे धन्यवाद देत आहेत. खून, दरोडे, जाळपोळ इत्यादी गोष्टी संघामुळे झाल्या म्हणून घातलेली बंदी, आता ते काहीही सिद्ध होत नसले तरी, भयानक गोष्टी शक्य होण्याचे वातावरण तो निर्माण करतो असला मोघम आक्षेप घेऊन चालू ठेवण्यात आलेली आहे. या कृत्याला अभिनंदनीय समजणारे लोक जेथे आहेत, तेथे खऱ्या अर्थाने नागरिक स्वातंत्र्य आणि लोकशाही नांदणे हे फार कठीण आहे, असे आमचे मत आहे. एकीकडे हे स्वतः अशा प्रकारे हुकूमशाहींला प्रोत्साहन देणारे आचरण करीत असता, त्यांनीच उलट संघावर नाझीपणाचा आरोप करणे हे विपरीत होय.

संघटन-स्वातंत्र्याची गळचेपी

मूळ ज्या संघटनेच्या विशिष्ट अनुकरणाने रा. स्व. संघ बनविण्यात आला ती बालचमूंची संस्था घ्या. तिचा अंतर्गत व्यवहार लोकशाहीचा आहे काय ? म्हणजे बालचमू संस्थेची धोरणे बालचमूंची मते घेऊन ठरविण्यात येतात काय ? मुक्ति फौज, थिऑसॉफिकल सोसायटी इत्यादी अनेक संस्था अशा आहेत की त्यांमध्ये एक प्रमुख व जवळ जवळ सर्वाधिकारी असतो आणि आपल्या मागून येणाऱ्या प्रमुखांची नेमणूकही बहुधा तोच करीत असतो. हिंदुस्थानात काम करण्याच्या अनेक मिशनरी संस्था त्या त्या धर्मापुरत्या मर्यादित आहेत. या संस्था आणि त्यांच्या कार्यपद्धती कोणास मान्य असोत वा नसोत, त्यांच्यायोगे देशाचे हित होते की अहित होते याविषयी दुमत असू शकेल; पण जोपर्यंत त्या कायद्याला धरून वागत आहेत तोपर्यंत त्यांना बंदी करणे म्हणजे संघटन स्वातंत्र्यावर आक्रमण करण्यासारखे आहे. भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, यांच्या इतक्याच तोलाचा संघटन स्वातंत्र्य हा एक जागतिक मान्यता पावलेला नागरिक अधिकार आहे. पण त्याची सीमा फक्त स्वतःच्या आवडत्या मतापुरतीच आहे आणि पलीकडे नाही असे मानणारे लोक जेथे पुष्कळ आहेत, तद्विरुद्ध मताच्या लोकांना हे नागरिक स्वातंत्र्य मुळीच लाभत नाही. हे संघावरील बंदीच्या खेदकारक घटनेवरून दिसून येते.

– केसरी, दि. १९–९–१९४८.

आधी फाशी.... मग चौकशी

(लेखांक दुसरा)

कायदा पाळणाऱ्यांना प्रायश्चित्त !

संघावर बंदी झाली त्याच वेळेस तो विसर्जित केल्याची घोषणा गुरुजींनी बंदीवासातूनच केली, आणि ती सर्व संघीयांनी मानली. आता सरकार बंदी पक्की करणार असे चिन्ह दिसताच कोणत्याही प्रकारे निर्बंधभंग करू नका असा आदेश आगाऊच गुरुजींनी सर्व संघीयांना दिला, तोही त्यांनी मानला. तत्पूर्वीही जेव्हा जेव्हा आजच्या सरकारने किंवा पूर्वीच्या ब्रिटिश सरकारने संचलनबंदी किंवा मेळाव्याला बंदी केली तेव्हा तेव्हा ती संघाने, कित्येक वेळेला त्रास सोसूनही, पाळलेली आहे. गुरुजींनीही तुरुंगातून सुटल्यावर नागपूरची स्थानबद्धतेची अट पाळली आणि दिल्लीस गेल्यावर तेथील मॅजिस्ट्रेटने घातलेले निर्बंध पाळले. यावरून प्रचलित सरकारचा कायदा मानावयाचा या संघाच्या ठरीव धोरणाचे कोठेही उल्लंघन झाल्याचे सरकारला दाखविता येणार नाही. पण कायदा काटेकोरपणे पाळणाऱ्यांना हवे तसे दडपून टाकून तो मोडणारांना मात्र कधीकधी आजचे सरकार हळुवारपणे वागवतें.

असंभाव्य आक्षेप

संघाच्या सदस्यांची मोठी संख्या वारंवार उल्लेखण्यात येते. पण त्यामध्ये पाच वर्षांच्या मुलांपासून तो साठ वर्षांवरील म्हाताऱ्यांपर्यन्त सर्वच लोक येतात, हे कोणी ध्यानात घेत नाही. या सर्व संघटनेने दरोडे, जाळपोळ इत्यादी गोष्टी केल्या असे वाक्य कागदावर लिहिता येते; पण प्रत्यक्ष त्याचा काय अर्थ करावयाचा हें कोडेच आहे. बरे, संघात असलेले बाल, वृद्ध आणि तरुण हे देखील काही चोवीस तास संघाच्या हातात असतात असे नाही. बालांना आणि तरुणांना त्यांचे पालक आणि शिक्षण संस्थाधिकारी यांच्या कामात गेलेला वेळ वगळून इतर काही थोडा वेळ राहील तोच संघाकडे देता येतो. सर्व सभासदांना भोवतालच्या जगतातून उचलून दूर कोठे तरी नेऊन संघ त्यांच्यावर काही किमया करतो असेही मानणे चुकीचे होय. संघ जेथे राजकारणातच पडत नाही, तेथे तो धर्मिष्ठ किंवा हिंदू राज्याचा पुरस्कार करतो हे म्हणणेही टिकाऊ नाही.

कुकल्पनांचा खेळ

संघाची प्रार्थना पूर्वी मराठी होती. पुढे महाराष्ट्र प्रांताबाहेर संघाचा विस्तार झाल्यामुळे सर्वत्र ती संस्कृत करण्यात आली. या प्रार्थनेवरून कोणालाही धर्मिष्ठ राज्याचे ध्येय किंवा जातीयता ही दाखवता येणार नाहीत. उलट संस्कृत भाषा पत्करून सर्व प्रांतांची प्रांतीयता एकत्र आणण्याचा संघाचा प्रयत्न दिसतो. गणवेष, संचलन, शारीरिक खेळ यांतून जो वेळ उरेल त्यात संघाचे बौद्धिक असावयाचे. बाहेरच्या जगात, शाळेत, वाचनालयात, चित्रपटगृहांत, अनेक गोष्टींचे संस्कार संघाच्या सभासदांवर होत असतात त्यामानाने संघाच्या बौद्धिकाचा वेळ हा अत्यल्पच समजला पाहिजे. संघाच्या बाहेरचे संघीयांचे आचरण संघ कधीच निर्बंधित करीत नाही. संघीयाने अमुक शाळेत जावे, जगाच्या व्यवहारात अमुकच वेष करावा, अमुकच नाटके पाहावी, अशी काही बंधने संघ घालीत नाही आणि संघ घालू शकत नाही. असा विश्लेषणात्मक विचार केला असता संघ म्हणून जे एक काल्पनिक भयानक चित्र काही लोकांनी उभे केले आहे, तो सर्व कुकल्पनांचा खेळ आहे असे म्हणावे लागते !

गुप्तपणाचा आरोप

गुप्तपणे कामे करण्याचा संघावरील आक्षेपही काही अज्ञानाने व काही दुष्टपणाने घेतला जातो. छापील घटना आणि कार्यक्रमांची वृत्तपत्रीय जाहिरात यांच्याखेरीज संघटना किंवा संस्थाच असू शकत नाही अशी आधुनिकांची समजूत झालेली असते. एकीकडे आपल्या प्राचीन संस्कृतीच्या चिवटपणाची प्रशंसा करीत असता दुसरीकडे त्या संस्कृतीतून चालत आलेल्या बिनबोभाट संघटन-पद्धतीचे अनुकरण किंवा पुनरुज्जीवन करणाऱ्या संघासारख्या नमुनेदार संस्थेवर 'गुप्त' पणाचा खोटा आरोप करण्यात येत आहे. तसे म्हटले तर आज कितीतरी "गुप्त" संस्था या देशात आहेत. आज अनेक भजनी मंडळे नि आखाडे बोटभरही चिठ्ठी न छापता आणि सभा, मतनोंदणी, नियमदुरुस्ती, मतभेद, आयव्ययाला मान्यता-वृत्तांत प्रसिद्धी इत्यादी आधुनिक संस्थांचे 'सोहाळे' न करता चालल्या आहेत. करपात्री स्वामींचा धर्मसंघ, यात्रेकरूंची व्यवस्था करणारी काळीकमळीवाल्यांची संस्था, जागोजाग वार्षिक यात्रेकरूंच्या व्यवस्था करणाऱ्या ठरीव संघटना या सर्व 'घटना, नियम, प्रसिद्धी' इत्यादी आधुनिक बोभाटचावाचून चालू आहेत. हीच प्राचीनपद्धती संघाने उचलली. त्याचे ज्यांना कौतुक वाटत नाही त्यांची मैदानी भाषणातील "भारतीय संस्कृती"ची स्तुती आंधळेपणाने लोकांना केवळ झुलविण्यासाठी असते असे का म्हणू नये ?

संघाचा आदर्श

छापील संसारापासून संघ प्रथमपासून अलिप्त राहिला तो काही 'गुप्त'-पणासाठी नव्हे; कारण संघाचे बहुतांश कार्यक्रम उघड्या मैदानावर चालतात. सामारंभिक कार्यक्रमांना प्रेक्षक म्हणून येण्यास मुक्तद्वार असते. संघाची शिबिरे चालविण्यास व संघाचे इतर कार्यक्रम चालविण्यास 'लोकाश्रय' अनेक प्रकारे लागतो. कायदेशीर सत्ता कोणतीच नसताना असा आश्रय मिळवावयाचा तर लोकांना संघाचे कार्य समजून व पटवून दिल्यावाचून तो आश्रय मिळणे शक्य नाही, यामुळे संघाला समाजाशी मिळून मिसळून चालावे लागते. संघाकडून गुप्त-रीत्या भयानक कृत्ये झाली असती तर सर्वसामान्य शांततावादी जनसमाजाचा पाठिंबा त्यास इतका भरघोस मिळालाच नसता. म्हणून खून-दरवडे यांसारखी घोर कृत्ये करण्याचे मनात आणणे देखील संघाला संभवनीय नव्हते. गेल्या फेब्रुवारीत अनेक स्थानिक संघचालकांच्या नि स्वयंसेवकांच्या समक्ष त्यांच्या घरांवर सामुदायिक जाळपोळीचे आक्रमण चालू असता त्यांनी कोठेही काडीमात्र प्रतिकार केला नाही ! प्रथम तोंडी विनवणी केली व ती मानली गेली नाही तेव्हा "तुम्हांला काय करावयाचे ते करा. आम्ही त्याला काडीचाही प्रतिरोध करणार नाही," असे क्षुब्ध समुदायाला सांगून संघाधिकारी बाजूस झाले ! गांधीजींची शिकवण मोठ्या प्रमाणावर आचरणात आल्याचे खरे ठळक नमुने कोणी गोळा केले तर त्यात संघाच्या या नमुन्याची वरच्या क्रमांकातच गणना करावी लागेल !

स्टॅलिनचे हिंदी अवतार

आता बंद नि विसर्जित झालेल्या संघाचे "लोक" गुप्तपणे संघाचे कार्यक्रम करतात अशी ओरड चालू झाली आहे. ती ऐकून आम्हांस आमच्या काही पूर्वग्रहांत दुरुस्ती करावी लागणार आहे. मतविरोधी लोकांवर खटले भरून क्रमशः त्यांचे जिवानिशी निर्मूलन करणाऱ्या स्टॅलिनला आम्ही 'राक्षसी' समजत होतो. पण ती इच्छा पूर्णपणे 'मानवी' आहे अशी संघाविरुद्ध उसळलेल्या हिंदुस्थानातील 'मानव्या'चे प्रदर्शनावरून आमची निश्चिती झाली ! तसेच 'हीन' मानलेल्या जातीत जन्मला तो आमरण हीनच समजला पाहिजे या जुन्या कल्पनेवरील आमचा रागही बराच कमी झाला ! कारण तोही आता मानवी प्रकारच आम्हांस वाटू लागला आहे. संघ विसर्जित झाला तरीही भूतपूर्व संघीय व्यक्तींना संघीयत्व चिकटून जिवंत राहते अशा कल्पनेने आज मानवधर्मीय गांधीनिष्ठ वृत्तपत्रांतून निंदात्मक लिखाण येत आहे.

वृत्तपत्रांतून संघावर हवे ते लिहावे; त्याला सरकार काही मर्यादा घालीत नाहीच; पण जनलज्जेचीही मर्यादा त्याला उरली नाही. त्यांचे नमुने पहा.

" संघाचे लोक संध्याकाळच्या अंधारात (मध्यरात्रीच्या नव्हे) अद्याप शिवाजी उद्यानासारख्या सार्वजनिक स्थळी वर्तुळे करून बसतात, प्रचलित विषयांची चर्चा करतात ! " हे एक संघाच्या 'गुप्त' कार्यक्रमाचे वर्णन मुंबईच्या एका इंग्रजी दैनिक पत्रात आले होते. केवढी ही भयानक गोष्ट ! ती उजेडात आणल्याबद्दल गृहमंत्र्यांनी या वार्ताहराला प्रकटपणे सुवर्णपदक द्यावे ! ही मंडळी संध्याकाळी एकत्र जमून चित्रपट-तारकांच्या अंतःपुरांची नि धावत्या विवाहांची चर्चा न करता प्रचलित राजकारणाची चर्चा करतात हा केवढा तरी त्यांचा अपराध ! स्वातंत्र्य मिळाल्यावर आता केवळ राजयंत्राची स्तुतिस्तोत्रे किंवा कलाविलासादि गोष्टी लोकांनी बोलाव्या त्याऐवजी प्रचलित राजकीय गोष्टी एकत्र बसून चर्चिणे हा केवढा तरी स्वातंत्र्य धोक्यात आणण्याचा दुष्ट उद्योग जन्मजात संघीयांनी चालविला आहे !

नवी 'गुन्हेगार' जात

अशा रीतीने संघावर चालू असलेल्या काही आक्षेपांचा निरास करण्याला उपरोधिक विडंबन हीच एक पद्धती उपलब्ध आहे. गंभीरपणे त्याचा प्रतिवाद करू म्हटले तरीही त्यातून विनोदच निर्माण होण्याचा संभव. सरकारने बंदी केली, गुरुजींनी संघ-विसर्जन केले; तरीही भूतपूर्व संघीय व्यक्तींच्या कपाळावर संघीयपणाची तप्तमुद्रा संघाच्या हितशत्रूंनी कायमची ठोकलेली दिसते. या लोकांचे आक्षेप टाळावयाचे तर भूतपूर्व संघीय मंडळींनी आता आपण एक गुन्हेगार जात ठरलेलो आहोत असे समजून वागावयास पाहिजे. रस्त्यातून जाताना समोरासमोर आल्यास त्यांनी एकमेकांची तोंडे चुकविली पाहिजेत ! संघाने ज्या मुलांना नियमितपणे सायंकाळी क्रीडांगणावर खेळ खेळण्याची संवय लावली त्या मुलांनी आता ते खेळ क्रीडांगणावर खेळणे म्हणजे लगेच संघाचा 'गुप्त कार्यक्रम' होतो ! आता त्यांनी म्हाताऱ्यांप्रमाणे घरी बसून 'ब्रिज' खेळावे किंवा झकपक पोशाख करून सामुदायिक आकर्षणासाठी फिरण्याची उद्याने अथवा रस्ते यांच्यात खुशाल विहार करावा. कारण आता स्वातंत्र्य आले ! पूर्वी राजद्रोहाची शिक्षा भोगून आलेल्या माणसाला रस्त्यातून जाताना त्याचे जुने स्नेही अथवा ऋणानुबंधी लोक घाबऱ्याघाबऱ्या तोंड चुकवीत असल्याचा अनुभव येई; कारण सरकारी गुप्तचरांपैकी एखाद्याने हा साध्या स्नेहाचा किंवा ओळखीचा प्रकार पाहिला तरी नोकरीवर किंवा पेन्शनवर गदा यावयाची भीती होती. आता स्वकीय सरकारच्या आणि त्याच्या पाठीराख्या वृत्तपत्रांच्या स्वयंभू गुप्तचरांची अशीच भीती भूतपूर्व संघीयांनी बाळगावी अशी या प्रकरणातील अनेक आगलाव्यांची इच्छा आहे, असे स्पष्ट दिसते.

केसरी, २३–११–४८

आधी फाशी . . . मग चौकशी

(लेखांक तिसरा)

संस्था–व्यक्ती–विवेक

एखाद्या छापखान्याला किंवा वृत्तपत्राला काही विशिष्ट आक्षेपार्ह मजकूर छापल्यामुळे बंदी झाली आणि त्या वर्तमानपत्राचा उरलेला कागद विकत घेऊन कोणी दुसरे वर्तमानपत्र काढले किंवा त्या बंदी झालेल्या छापखान्याचे खिळे दुसऱ्या कोणी विकत घेतले तर त्या गोष्टीचा डोळ्यांत तेल घालून सुगावा काढून ते वर्तमानपत्र किंवा तो छापखाना गुप्त रीतीने चालू आहे असे म्हणण्याचा अप्रयोजकपणा कोणी करीत नाही मार्गावरील विशिष्ट संघर्ष –– स्थान टळावे म्हणून, पायी सामुदायिक यात्रेला बंदी झाली असता तेच लोक आगगाडीच्या डब्यातून जातात. अशा एका डब्याच्या खिडकीतून आत डोकावून 'ही पहा बंद केलेली यात्रा गुप्तपणे चालू आहे' असे कोणी म्हणत नाही. संघाचे गुप्त कार्यक्रम चालू आहेत, अशी ओरड करणारे लोक याच नमुन्याचा अप्रयोजकपणा करीत आहेत. विसर्जित रझाकारसंस्थेचे काही घटकही माणसाळण्याची निश्चिती करून घेऊन निजामशाहीत मोकळे सोडण्यात येत आहेत. शांत असलेल्या संघीयांसंबंधी मात्र अशा प्रकारचे तारतम्य दाखवण्यात येत नाही.

संघीय व्यक्तींचा द्वेष

एखाद्या लोकोपयोगी संस्थेमध्ये अनेक कार्यकर्ते जमतात. ती संस्था जर काही कारणाने बंद झाली तर त्यातले लोक आपली मूळ देशहिताची बुद्धी ही काही त्याबरोबरच विसर्जन करीत नाहीत तर निराळ्या मार्गाने देशहिताचे उद्योग आरंभतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात असहकारितेच्या चळवळीत जन्मास आलेल्या ज्या राष्ट्रीय शिक्षण-संस्था कालांतराने बंद पडल्या, त्यांतील लोकांनी बाहेर नंतर काय केले, याचा इतिहास पाहिला तर ही गोष्ट कळून येईल. वृत्तपत्र-व्यवसाय, पुस्तक-लेखन आणि प्रकाशन, व्यायामशाळा, आश्रम, विद्यार्थी-वसतिगृहे किंवा आरोग्यालये अशा अनेक संस्था या राष्ट्रीय शाळांमधून बाहेर पडलेल्या शिक्षकांनी काढलेल्या आहेत. तीच गोष्ट थोड्याफार अंशाने १९०७–८ सालच्या दडपशाहीत बंद झालेल्या राष्ट्रीय शिक्षण-संस्थांतील लोकांनी केलेली आहे. अर्थात् जर त्याच राष्ट्रीय शिक्षण-संस्थेतल्या शिक्षकाने व्यायामशाळा

काढली तर पूर्वीच्या ओळखीने पूर्वीच्या त्यांच्या विद्यार्थ्यांचे साहाय्य व्यायामशाळेस होईल. राष्ट्रीय शिक्षण-संस्था बंद करणाऱ्या ब्रिटिश सरकाराने देखील त्यातील शिक्षक बाहेर पडल्यानंतर त्यांनी केलेल्या इतर सार्वजनिक कार्यांचे वैषम्य मानले नाही. संघावर बंदी होऊन दोन-तीन महिने गेल्यावर त्यातील कार्यकर्ते अर्थातच दुसरे जनसेवेचे उद्योग पाहू लागले. कोणी वृत्तपत्रे काढली, कोणी चालू वृत्तपत्रांत जागा पत्करल्या, कोणी विद्यार्थ्यांतून खेळाची आवड तरी चालू राहावी म्हणून क्रिडामंडळे काढली. ज्यांचा सार्वजनिक कार्याचा जिव्हाळा हेच जीवन-ध्येय होते असेच निष्ठावान लोकसेवक रा स्व. संघामध्ये एकत्र झाले होते ही गोष्ट यावरून सिद्ध होते. पण ज्यांना संघ ही गुन्हेगार जात ठरवावयाची आहे त्यांना हे संघीयांचे नवे उद्योगही हाणून पाडावयाचे आहेत; आणि म्हणूनच " संघाच्या गुप्त हालचाली चालू आहेत " इत्यादी ओरड त्यांनी सुरू केलेली आहे. ही अत्यंत खुनशीपणाची, व्यक्तिविद्वेष आणि राष्ट्रकार्यघातक अशी ओरड आहे.

या चर्चेचे हेतू

संघावरील बंदी झाल्यानंतर संघविरोधी काँग्रेसनिष्ठांतून संघाबद्दल खोटा प्रचार गेले चार-पाच महिने चालू आहे. बंदी उठविण्याबाबत सरकारशी संघीयांचे बोलणे चालू आहे असे समजल्यावरून या खोट्या प्रचाराचा प्रतिवाद करण्याचे काम पुढे करता येईल या हेतूने आम्ही या संबंधात स्तब्ध राहिलो होतो. आमच्या कोणाच्याही लिहिण्याने या सरकारी हृदयपालटाच्या प्रयत्नात बाध येऊ नये ही इच्छा अशा रीतीने स्तब्ध राहण्याचे कारण होती. या गोष्टीचा एकदा सोक्षमोक्ष झाल्यावरच, मध्यन्तरीच्या काळात मोकाटपणे संघावर जे अन्यायाचे आरोप केले जात होते. त्यांसंबंधी आपले विचार मांडावे असा आमचा संकेत होता. तदनुसार आता यथा काल आम्ही हे सर्व मनात ठेवलेले विचार या लेखमालेच्या द्वारे प्रकट करीत आहोत. त्यातील हेतू संघाचे लवकरच पुनरुज्जीवन होईल असा मुख्यतः नाही; कारण सध्याच्या सत्ताधाऱ्यांची आणि त्यांच्या बाहेरील पाठी-राख्यांची मनोवृत्ती पाहता नजीकच्या काळात संघाचे पुनरुज्जीवन शक्य होईल असे आम्हांस वाटत नाही. पण निदान संघाच्या कार्यक्रमांतील जे आक्षेपरहित आणि उपयुक्त भाग होते ते सुटकरीत्या, स्वतंत्रपणे अथवा इतर मान्य संस्थांमार्फत कोणी चालविले तर त्यावर नसते संशय घेऊन कोणी शस्त्र धरू नये आणि संघीयांची देशहितबुद्धी इतर रीतीने उपकारी होण्याच्या पंथाला लागली असेल तर केवळ दूषित पूर्वग्रहाने त्यांच्यावर आघात होऊ नयेत, हा या लेखमालेचा एक उद्देश आहे. दुसरा उद्देश असा की, लोकशाही आणि नागरिक अधिकार यांच्या जग-मान्य तत्त्वापासून च्युत होऊन स्वकीय सरकारने काही भावनावशतेने आणि काही

बाहेरच्या खोडसाळपणाच्या प्रेरणेने हुकूमशाही करीत सुटू नये असे आम्हांस वाटते. या गोष्टीचे तारतम्य जनतेच्या नीट ध्यानात येण्यास रा. स्व. संघावरील बंदीची साधकबाधक चर्चा ही उपयुक्त ठरणारी आहे अशी आमची समजूत आहे. हा दुसरा उद्देश होय. वृत्तपत्रकार या नात्याने जेथे अन्याय दिसत असेल तेथे तो उघडपणे लोकांच्या पुढे विशद करून मांडणे या सर्वसामान्य कर्तव्याची जाणीव हीही या चर्चेच्या मुळाशी अर्थात् आहेच.

पश्चात्‌बुद्धीचा अपुरेपणा

" आधी फाशी .. ...मग चौकशी ! " हा जो मथळा आम्ही दिला तो ' फ्री प्रेस ', ' नवशक्ती ' इत्यादी वृत्तपत्रांनी सरकारजवळ असलेला पुरावा आता तरी पुढे यावा अशी आडपडद्याने बिचकत बिचकत जाणीव व्यक्त केली त्यावरून. पण नुसता पुरावा पुढे यावा ही इच्छा देखील पूर्ण चौकशीची द्योतक नाही. जर ' फ्री प्रेस ' ने असे म्हटले असते की, सरकारी पुरावा पुढे यावा आणि त्याचा प्रतिवाद करण्याची संघीयांना संधी मिळावी तर ती संपूर्ण न्यायबुद्धी झाली असती. पण तशी न्यायबुद्धी या वृत्तपत्रांनी व्यक्त केलेली नाही. संघाला संस्था या नात्याने फाशी दिल्यावर आणि ती शिक्षा कायम केल्यावर मागाहून निदान चौकशीचा एक भाग म्हणजे फिर्यादी पक्षाच्या वकिलाचे आरोपपत्रक आणि त्याचा पुरावा एवढा तरी आता पुढे यावा एवढीच ही पश्चात्‌बुद्धी आहे. तीही संघावर अन्याय झाला त्याचे निराकरण व्हावे म्हणन पुढे आलेली नाही ! झालेले सर्व न्याय्यच झाले असे त्यांचे मत; पण संघीयांना ' हौतात्म्य ' मिळू नये हीच काय ती त्यांची मुख्य काळजी ! म्हणजे पुरावा पुढे न करताही फाशी दिलेल्या संस्थेचे मृत्युलेख देखील गौरवपर होऊ नयेत ही त्यांच्या मनात राहिलेली खुमखुम. पण ही अर्धवट पश्चात्‌बुद्धी एका गोष्टीचे स्पष्ट गमक आहे. ती ही की, संघ बुडाल्याबद्दल आनंद मानणाऱ्या या सर्व लोकांजवळ संघावर सरकारने प्रथम कलेल्या भयंकर आरोपांच्या संबंधात यत्किंचित्‌ही पुरावा नाही; कारण तो असता तर त्यांनी त्यांच्या वृत्तपत्रांतून दिला असता व त्या पुराव्याची भिक्षा सरकारजवळ मागण्याची पाळी त्यांच्यावर आली नसती.

चतकोर मागणीही अमान्य

दुर्दैव असे आहे की, सरकारला संघबंदीच्या कामी प्रोत्साहन देणारे लोक देहान्त शिक्षेनंतरही जो चतकोर न्याय मागतात तोही आता त्यांच्या सरकारजवळ शिल्लक उरलेला नाही. गुरुजींनी पं. नेहरू आणि सरदार पटेल यांच्याशी केलेला या संबंधातील पत्रव्यवहार जाता प्रसिद्ध झाल्याने ही गोष्ट स्पष्ट होत आहे. तो

प्रसिद्ध झाल्यानंतर त्याच्यापुरताच लेखाला मथळा द्यावयाचा तर "फांशी गेलेल्या संस्थेला चौकशीचा चतकोर भाग म्हणजे जो आरोपांचा पुरावा तेवढाही पुढे येण्याची अशा उरली नाही." अशा अर्थाचा काही तरी मथळा द्यावा लागेल. चतकोर भाग आम्ही म्हणतो याचे कारण असे की, कोणत्याही चौकशीमध्ये आरोप करणारांचे निवेदन आणि पुरावा हा एक भाग, त्या पुराव्याची छाननी करण्यास आरोपिताला संधी देणे हा दुसरा भाग, स्वतंत्ररीत्या अगर इतररीत्या त्या आरोपांचा निरास करण्यास आरोपीस संधी देणे हा तिसरा भाग आणि हे सर्व त्रयस्थ न्यायाधिशाने तोलून निर्णय करणे हा चौथा भाग होय. शिक्षा कायम झाल्यानंतर या चार भागांपैकी पहिला भाग तरी प्रकट व्हावा अशी 'फ्री प्रेस' ची इच्छा ! पण सरकार त्याच्याही पुढे जाऊन तेवढाही चतकोर तुकडा जनतेपुढे टाकण्यास सिद्ध नाही किंवा तसे काही आपले कर्तव्य आहे ही जाणीवही त्यांच्या गाबी नाही.

विवेकबुद्धीचे विसर्जन

या बाबतीत कित्येक विरोधकांना साधा विवेक राहिलेला नाही किंवा त्याचे हेतुपूर्वक विसर्जन करण्यात आले आहे असे दिसते. संघबंदीच्या पहिल्या सरकारी पत्रकात स्पष्ट म्हटले होते की, संघाचे जे उघड उद्देश आहेत ते सरकारला मान्यच आहेत. अर्थात् हे उघड उद्देश सोडून तद्व्यतिरिक्त इतर काही आक्षेपार्ह गोष्टी संघाने केल्या असा आरोप, काही पुरावा पुढे न करताच सरकार करीत आहे शारीरिक शिक्षण, शिस्तीची चाड, आपले व्यक्तित्व विसरून सामुदायिक हितासाठी समाजाशी एकजीव होणे या हेतूने संघाचे जे सोज्वळ कार्यक्रम चालू होते ते भूतपूर्व संघीयांनी संघाची चिन्हे न घेता आणि प्रार्थनादि विधी न करता केले तर कित्येकांचे माथे फिरते याला काय म्हणावे ? या मामुली गोष्टीसाठी का संघ बंद झाला ? "इंग्रजांच्या दुष्ट राज्यपद्धतीचा द्वेष करावा पण इंग्रज व्यक्तीचा द्वेष करू नये" ही शिकवण ज्या देशात गांधीजींनी आजन्म दिली तेथे संघ विसर्जित झाल्यावर त्यातील व्यक्तींचाही द्वेष चालू ठेवणाऱ्यांचे सार्वजनिक जीवनात प्राबल्य होते हे विलक्षण नव्हे काय ? चांगले कोणते आणि वाईट कोणते याचा, निदान. सरकारी पत्रकात छापून आलेला तरी, विवेक या लोकांनी ठेवू नये हे आश्चर्य होय !

नमुनेदार आक्षेप

यांपैकी एका निंदकाने म्हटले आहे की, 'गुरुजी' हे उपपद हिटलरच्या 'फ्यूहरर' या उपपदाशी समानार्थक आहे मग असे लिहिण्याच्या द्वेषमूलक भरात 'सानेगुरुजी व आपटे गुरुजी हे कोणत्या नाझी पंथाचे फ्युहरर ?' असा प्रश्न कोणी

विचारील याचेही त्यांना भान राहिले नाही ! दुसऱ्या एकाने संघावरील बंदी उठविणे म्हणजे पं. नेहरूंचे अनुयायित्व सोडून गोळवलकर गुरुजींचे अनुयायित्व देशाने करण्यासारखे आहे, असे म्हटले आहे. या गोष्टी म्हणताना, संघावरील बंदी ही काही गुन्हेगारीच्या घोर कृत्यांचा आरोप करून झालेली आहे ही गोष्ट हे लोक पूर्णपणे विसरून गेले आहेत. ती गुन्ह्यांची यादी हे केवळ दाखवावयाचे शोभेचे दात होते; पण खरी बंदी संघाची विचारसरणी मारण्यासाठी झाली असे गृहीत धरून हे सर्व आक्षेप चालू आहेत ! या आक्षेपांनी हे लोक सरकारला पाठिंबा देऊ इच्छित असतील कदाचित्; पण परिणामदृष्ट्या ते आपल्या प्रिय सरकारलाच अप्रामाणिक ठरवीत आहेत, याचे त्यांना भान नाही. या लोकांचा विवेक गांधीजींच्या चितेच्या धुरामुळे मलिन झाला असे वाटून ती गोष्ट आम्ही काही काल क्षम्य समजत होतो; गांधींसारख्या महान् नेत्यांचा वध थोडा वेळ विवेक नि दुःखदायिकाचा तोल सुटल्यास तो क्षम्य मानण्यासारखी असामान्य घटना होती; पण आता त्या चितेतील चंदनाबरोबर काही लोकांच्या विवेकाचीही रक्षा झाली की काय असे आम्हांस वाटू लागले आहे.

संघावरील बंदी याच लोकांनी खरोखर आता चालू केली आहे; आणि सरकार हे केवळ निमित्तमात्र आहे. कारण प्रांतिक मतप्रदर्शनावरून प्रांतिक सरकारे बंदी चालू ठेवा असे म्हणू लागली. म्हणूनच मध्यवर्ती सरकारात बंदी उठविण्याबद्दल जी काय अत्यल्प अनुकूलता होती तीही या प्रांतिक दडपणाने नाहीशी झाली. या क्रमाने गोष्टी चालल्यास या देशातील लोकशाहीचा खेळखंडोबा होऊन निर्भेळ हुकुमशाही येथे प्रस्थापित होण्यास फारसा अवधी लागणार नाही. संघाची संघटना गेली तरी संघाची ध्येये आणि विचारसरणी ही मात्र अशा नुसत्या दडपशाहीने नाहीशी होणे शक्य नाही. त्या विचारसरणीमध्ये जर कोणाला दोष वाटत असेल तर तो त्यांनी मतपरिवर्तनाच्या लोकशाहीला मान्य असलेल्या पद्धतीने खुशाल दाखवावा. या विचारसंघर्षात जे योग्य असेल ते टिकेल. संघाच्या ध्येयाच्या टिकाऊपणावर ज्यांचा विश्वास आहे ते भारतीय संस्कृतीच्या तत्त्वज्ञानानुसार म्हणतील की संघाच्या संघटनेचा देह जरी नष्ट झाला किंवा अंतर्धान पावला तरी संघाचा उज्ज्वल ध्येयवाद व नागरिक-चारित्र्याचे आदर्श शिक्षण, या गोष्टी आत्म्याप्रमाणे अमरच राहणार आहेत.

-- केसरी दि. २६-११-४८

राष्ट्रीय पापांचे तीर्थक्षालन

गेल्या आठवड्यात दि. २५ व दि. २७ ला सरदार पटेल यांना काशी आणि प्रयाग या दोन प्राचीन भारतीय तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी बनारस हिंदू विश्वविद्यालय आणि अलाहाबाद विश्वविद्यालय यांजकडून 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही उच्च पदवी देण्याचे समारंभ झाले. या दोन्हीही प्रसंगी सरदारांनी जी भाषणे केली ती मामुली प्रासंगिक स्वरूपाची नसून आत्मनिवेदनपर आणि मागील पिढीचा जिव्हाळ्याचा निरोप पुढील राष्ट्रपिढीला सांगून ठेवण्याच्या तळमळीने भरलेली अशी झाली. क्षेत्राच्या ठिकाणी आयुष्याच्या पापपुण्याची झडती द्यावी लागते असे म्हणतात, किंवा रोम येथे जाऊन मोठ्या धर्मगुरूपुढे आपल्या आयुष्यातील प्रमादांचे क्षालन करण्यासाठी धर्मनिष्ठ ख्रिस्ती लोक आत्मनिवेदन करीत. अशाच प्रकारचे आपल्या एकंदर राष्ट्रीय आयुष्याचे प्रांजल आत्मनिवेदन सरदार पटेल यांनी या दोन भाषणांतून केले आहे

सरदारांची स्पष्टोक्ती

या आत्मनिवेदनात स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे पहिले वर्ष या नात्याने गेल्या वर्षात घडलेल्या गोष्टींना विशेष महत्त्व पटेलांनी दिले हे साहजिकच होय. सरदार हे स्पष्टवक्तेपणाबद्दल प्रसिद्धच आहेत. दोन्हीही क्षेत्रांतील भाषणांमध्ये प्रथमच सरदारांनी सांगून टाकले की, "विश्वविद्यालयाकडून विद्वत्ताविषयक पदवी घेण्याच्या वेळी साजेलसे विद्वत्तापूर्ण भाषण न करता एक साधा रोखठोक बोलणारा मनुष्य म्हणून मी बोलणार आहे." याप्रमाणे त्यांनी गतवर्षातील आणि चालू देशस्थितीसंबंधाच्या कित्येक गोष्टी कोणताही आडपडदा न ठेवता सांगितल्या. काँग्रेसचे आणि सध्याच्या राजवटीचे दोषदर्शन करणारे लोक जे अनेक मुखांनी म्हणताना आज दिसतात, ते सर्व सरदार पटेल यांनी एकमुखाने तितक्याच स्पष्टपणे सांगितले. आज लोकांमध्ये स्वराज्याला घातक अशा ज्या अनिष्ट प्रवृत्ती दिसतात त्यांचेही निर्भीड दिग्दर्शन केले आणि आपल्या मताप्रमाणे सध्याच्या परिस्थितीतून उन्नतीकडे जाण्याचे मार्गही त्यांनी सांगितले.

सध्या चालू आहेत त्या सर्व घटना यथायोग्य रीतीने चालू आहेत अशी एक प्रकारची भोळसर समाधानी वृत्ती उत्पन्न करणे म्हणजेच काय ते प्रचलित सरकारचे पाठीराखेपण करणे असा विचित्र अर्थ ज्या लोकांनी डोक्यात घेतलेला आहे, त्यांनी सरदारांच्या या भाषणांचे मननपूर्वक वाचन करावे, म्हणजे त्यांचा

बराच भ्रमनिरास होईल अशी आमची समजूत आहे. ज्याप्रमाणे पंडित नेहरूंची मद्रासकडील भाषणे तात्त्विक दृष्टीने महत्त्वाची होती, तशीच आज जो संकीर्ण व्यवहार आवरण्याचे काम राष्ट्रावर येऊन पडले आहे ते नीट रीतीने पार पाडण्याच्या दृष्टीने सरदार पटेल यांची ही दोन भाषणे महत्त्वाची ठरतील.

सौदा महाग पडला

बनारस येथे केलेल्या भाषणात सरदार पटेल यांनी सांगितले की, " आपणांस स्वातंत्र्य हवे असेल तर फाळणीला मान्यता देणे अटळ होते. ती फाळणी मान्य केली नसती तर देशाचे असंख्य तुकडे झाले असते. हा निर्णय मुख्यतः आपण प्रथम घेतला व नंतर इतरांना मान्य करण्यास लावला. " यावरून फाळणी हे स्वातंत्र्याचे मूल्य दिले आणि ती पत्करल्यामुळे स्वातंत्र्य मिळाले हा श्री. न. वि. गाडगीळ यांनी सांगितलेला कार्यकारणभाव साधारण होता असे दिसते. फाळणीतून भयानक गोष्टी निर्माण झाल्या हे पटेलांना मान्यच आहे. पण फाळणी पत्करली नसती तर त्यापेक्षाही कल्पनातीत आपत्ती हिंदुस्थानावर आल्या असत्या असे पटेल यांचे म्हणणे आहे. याचा अर्थ दोन वाईट गोष्टींतील त्यांतल्या त्यात कमी वाईट गोष्ट उचलावयाचो असा बिनतोड प्रश्न त्या वेळी सरदार पटेलांसारख्या राष्ट्रधुरीणापुढे होता. मात्र कमी वाईट म्हणून जे पत्करले त्याच्या परिणामांचा नीट अंदाज त्यांना आला नाही. एरवी पंजाबमधील भयानक संघर्ष आणि सिंध व पूर्वबंगाल-मधून अद्यापि चालू असलेले बिगरमुसलमानांचे निर्वासन या गोष्टींचा अनपेक्षित-पणा वेळोवेळी सरकारी प्रवक्त्यांकडून प्रकट झाला नसता. पहिले अनपेक्षित घडल्यानंतर तरी तत्सदृश इतर 'अनपेक्षिते' कोणकोणती ओढवणार याचा तत्काळ अंदाज करून त्यांनी त्यांची व्यवस्था योजावयास पाहिजे होती; पण तसे झाले नाही. एरवी आज पूर्वबंगालमधून चाललेले निर्वासन म्हणजे जणू काय एखादे अचानक उद्भवलेले वादळ असे मानण्याची सरकारी प्रवक्त्यांची प्रवृत्ती दिसते तशी दिसली नसती. फाळणी पत्करून स्वातंत्र्यप्राप्ती हा सौदा ज्यांनी केला व जे स्वातंत्र्य-उत्सवात तोंडे उजळ करण्यास पुढे आले त्यांनी आता कमरा कसून या निर्वासितांच्या प्रश्नाची योग्य निरवानिरव करणे प्राप्त आहे.

टीका, सरकार सुधारण्यासाठी असते

त्याच भाषणात सरदारजींनी म्हटले आहे की, 'सरकारवर नुसतीच टीका करू नका; कारण हे सरकार तुमचेच आहे. तुम्हांला ते काढून दुसरे केव्हाही आणता येईल.' पण हे सरकार बदलावयाचे तर त्याचे दोष दिसल्याशिवाय हा बदल कसा घडून येणार ? आज लोकशाहीचे तंत्र देशाने पत्करले आहे आणि असे लोकशाही सरकार बहुसंख्य लोकांना नापसंत वाटले तरच ते बदलले जाण्याचा

संभव; एरवी ते आपण होऊन जात नाही. सरकार चुका करते तो गोष्ट सरदार पटेल यांनी मान्य केली. मग या चुका वेळोवेळी सरकारच्या आणि लोकांच्याही निदर्शनास आणणे हे काम लोकशाहीच्या तंत्राला अत्यंत आवश्यक आहे. ही टीका केवळ सरकार बदलण्यासाठीच हवी असते असेही नव्हे तर सुधारण्यासाठीही हवी असते. डोळस रीतीने सरकारी धोरणाच्या इष्टानिष्टतेची छाननी करणारी जनता ही लोकशाही राखण्यास अत्यंत आवश्यक आहे. लोकांकडून अशी टीका झाल्याने सरकारचे हात सबळ होत नाहीत असे दाखवले जाते, पण ते खरे नाही. हैदराबादचा प्रश्न त्वरेने सोडवला पाहिजे असे अधीर लोकमत प्रकट झाले ते होताना अर्थातच सरकारच्या तत्पूर्वीच्या चालढकलीवर टीकाही झाली. पण यामुळेच शेवटी जो त्वरेने निजामीत हस्तक्षेप केला तो करण्यास सरकारला बळ आले नाही काय ? काश्मीरचा प्रश्न यूनोपुढें नेण्यात झालेली चूक टीकाकारांनी दाखविली, त्यामुळेच हैदराबादचा प्रश्न तेथे येऊ द्यावयाचा नाही हा निग्रह पक्का होण्यास साहाय्य झाले हे मान्य करावयास पाहिजे. 'सरकारचे हात सबळ करा' याचा अर्थ सरकारच्या चुकांकडे डोळेझाक करा असा करणे चुकीचा होय. तसा तो केल्याने सरकारचे हात खरे सबळ होणार नाहीत.

पूर्वी स्वराज्यासाठी चळवळ करताना असे प्रतिपादन केले जात असे की, आम्हांस चुका करण्यासाठीही स्वराज्य हवे. आम्ही चुका करू, त्या आमच्या आम्ही निस्तरू आणि अशा चुका दुरुस्त करीत त्यापासून धडे घेत आम्ही आमची उन्नतीच करून घेऊ. सरदार पटेल यांनीही सांगितले की, आम्ही आमच्या चुकांपासून धडे घेतले पाहिजेत. त्या चुकांचाच आग्रह धरून चालता उपयोगी नाही. सरदारांचे हे वाक्य सर्वच मंत्र्यांनी नि अधिकाऱ्यांनी ध्यानात घ्यावे. परकी नोकरशाही खोटच्या इभ्रतीला बळी पडून आपल्या चुकांचेही हट्टाने समर्थन आणि दृढीकरण करीत असे. ती गोष्ट स्वराज्यात होऊ नये. दुर्दैवाने, चुका करणे हा जसा मनुष्यस्वभाव आहे, तसाच त्या मान्य न करता त्या तशाच चालू ठेवणें हाही मनुष्यस्वभाव आहे. पण आत्मपरीक्षणाची दृष्टी सतत जागृत ठेवून राज्यसूत्रधारांनी या दुसऱ्या सामान्य मनुष्यस्वभावाला बळी न पडता काहीतरी असामान्य बनले पाहिजे.

ही सुधारणा होण्यास सरदारांचे प्रयाग येथील भाषण विशेष उपयोगी पडणारे आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय या दोन्ही क्षेत्रांत राष्ट्राला शक्तीची कशी आवश्यकता आहे आणि ही शक्ती राष्ट्रात उत्पन्न करण्यासाठी आपण काय केले पाहिजे यासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले. संस्थाने हिंदुस्थानात आणली या गोष्टीबद्दल सरदारांना श्रेय देतात ते न नाकारता त्यांनी सांगितले की, 'झाल्या गोष्टीत समाधान मानून बसण्यासारखी स्थिती नाही. विलीन झालेल्या संस्थानांतील अनेक भाग इतके मागासलेले आहेत की, त्यांना लोकशाहीच्या दृष्टीने

स्वतंत्र हिंदुस्थानच्या समपातळीवर आणण्यासाठी पुष्कळच प्रयत्न व्हावयास पाहिजे."

काशी क्षेत्रातील भाषणात त्यांनी सांगितले की, 'देशाच्या विच्छेदनानंतर ज्या आपत्ती आल्या आणि चुका झाल्या, त्यांचा साक्षात परिणाम महात्मा गांधींच्या वधात झाला. जगापुढे लाजेने खाली मान घालावी अशा आमच्या चुका झाल्या आणि गांधीजींचा खून करणारा मनुष्य आपल्यांतीलच एक निघाला, हीही अत्यंत लज्जास्पद गोष्ट झाली या चुकांपासून आपण धडे घेतले पाहिजेत आणि त्याच त्या चुका करीत राहण्याचा आग्रह धरता उपयोगी नाही. सध्याची राष्ट्रातील अनिष्टे पाहता एकंदर परिस्थिती अशी आहे की, यापुढे आपणांकडून दक्षतेने व्यवहार न घडल्यास अशी एखादी चूक होईल की, ज्यायोगे राष्ट्र अधोगतीच्या मार्गाला लागेल आणि ते त्यातून वर निघू शकणार नाही.' सर्वात महत्त्वाच्या मुद्द्याचा हा एक इशारा सरदारांनी दिला.

काश्मीरबाबतची चूक

आमच्या मते झालेल्या कित्येक चुका अशा आहेत की, त्यांच्या परिणामांची परंपरा अजून संपली नाही. अर्थात नवीन चुका न करणे याबरोबरच जुन्यांचे परिणाम निस्तरणे ही गोष्टही आज करावयाची आहे. फाळणीचे परिणाम अद्यापि राष्ट्राला भोवत आहेत. तसेच त्यानंतर काश्मीर प्रकरणात आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे, म्हणजे 'यूनो'च्या सुरक्षासमितीकडे धाव घेण्यात जी चूक झाली, त्यातून अजून बाहेर पडता आलेले नाही. उलट त्या एका चुकीमुळे हैदराबादचा प्रश्नही कोणत्यातरी रीतीने सुरक्षा समितीपुढे आणण्याची पाकिस्तानची सारखी धडपड चालू आहे. सुरक्षा समितीचे कमिशन हिंदुस्थानात आल्यानंतर त्या कमिशनला पाकिस्तानचा खोटेपणा व त्याचे आक्रमण या दोन्हीही गोष्टी दिसून आल्या तरी त्यांनी त्याबद्दल त्याच वेळी सुरक्षा समितीला जागे केले नाही. तसेच या कमिशनचा वृत्तांत पाकिस्तातच्या विरुद्ध असताना देखील अद्यापि 'रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति' असे संथपणाने बोलण्यापलीकडे सुरक्षासमिती देखील काही करावयास तयार नाही हे तिच्या परवाच्या बैठकीवरून दिसून आले. पुनः या कमिशनने हिंदुस्थानात जाऊन पुनः सलोख्याचा प्रयत्न करावा असा तेथे ठराव झाला. यामुळे पाकिस्तानी प्रवक्त्यांनी पुनः एकदा हिंदुस्थानाकडून नवेच आक्रमण जोरात चालू झाले आहे अशी ओरड चालू केली आहे. हैदराबादचा प्रश्नही तेथे उपस्थित केला, त्यावेळी हा प्रश्न तेथे आणण्यास आत्यंतिक विरोध दर्शवून हिंदी प्रतिनिधी उठून गेले; तरीही सुरक्षा-समितीची स्थितप्रज्ञता ढळली नाही ! त्यांनी त्या प्रश्नावरील चर्चा पुढे ढकलली म्हणजे पुनः ही एक टांगती तलवार हिंदुस्थानच्या डोक्यावर राहिलीच.

काश्मीर प्रकरण सुरक्षासमितीकडे नेण्यात झालेल्या चुकीमुळे हा एक दुसरा उपद्रव भरीस पडला आहे.

सरदार पटेल म्हणाले की, " गांधीजींनी व मी एकाच वेळी जग सोडण्याचे आपसांत ठरवले होते. गांधीजी गेल्यामुळे मलाही त्यांच्या मागोमाग जावेसे वाटले. पण गांधीजींच्या प्रेरणेने त्या निश्चयापासून परावृत्त होऊन उरलेल्या आयुष्यात सध्याच्या आगीबाणीच्या प्रसंगी राष्ट्राची सेवा शक्य तितकी करण्याचे ठरवले. " या त्यांच्या उद्‌गारावरूनच त्यांची ही भाषणे कोणत्या मनोवृत्तीने झाली आहेत हे दिसून येते. राष्ट्रीय तीर्थक्षेत्रांत त्यांनी राष्ट्रीय पुण्य तेवढे पदरात घेऊन राष्ट्रीय पापांचा इन्कार न करता दोहोंचाही झाडा दिला. त्यांतील पुण्यांश राष्ट्राच्या संपूर्णपणे पदरात पाडून घेणे आणि पापाची पुनरावृत्ती टाळणे, या मार्गानेच राष्ट्राने गेले पाहिजे. तो मार्ग क्रमण्याच्या कामी सरदार पटेल यांचा प्रामाणिकपणा आणि मनोधैर्य यांचे अनुकरण राष्ट्राने करणे अवश्य आहे.

–केसरी, दि. ३०–११–१९४८

2029
23900
निबंध
93/3/12
शाखा (स्थळ प्रत)

साध्यानुकूल साधनविवेक

(लेखांक पहिला)

पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेतील आणि मुंबईच्या अमर-हिंद व्याख्यानमालेतील आपल्या व्याख्यानात आचार्य स. ज. भागवत यांनी लो. टिळकांच्या तत्त्वज्ञानात राहून गेलेला एक दोष किंवा अपुरेपणा दाखविला. तो असा की, टिळकांच्या कर्मयोगामध्ये लोकसंग्रहाचे ध्येय साध्य करण्यासाठी जी साधने उपयोगात आणावयाची त्यांच्या शुद्धाशुद्धतेचा नीट विचार झाला नाही. यामुळे पुढे वाटेल ती अशुद्ध साधने वापरणाऱ्यांना टिळकांची साधन-शुद्धिसंबंधाची उपेक्षा हा एक आधार सापडला. तत्त्वज्ञानमंडनात झालेल्या बीजभूत उपेक्षेमुळे टिळकांच्या नावावर अशुद्ध साधनांचा उपयोग करण्याचा वृक्ष फोफावला.

विकृत कर्मयोग्यांचा आधार

टिळकांच्या गीतारहस्याचा आधार घेऊन, साधनांचा विवेक करणे हे दुर्बलतेचे लक्षण आहे, असे मानणारे लोक महाराष्ट्रात आहेत असे आचार्य भागवत म्हणतात आणि त्यांना 'घातक कर्मयोगी', 'विकृत कर्मयोगी' व 'फॅसिस्ट' अशी विशेषणे ते देतात. या लोकांनी साधनांच्या शुद्धतेचा प्रश्न गौण ठरविला आणि गीतारहस्याचा आधार घेऊन साधनांची निर्द्वंद्वता व अबैध मार्ग यांचा पुरस्कार केला. गीतारहस्यात देखील हा आधार कसा मिळतो हेही आचार्यांनी सांगितले, ते असे :– टिळकांनी 'साधू पुरुषाने लोकसंग्रहासाठी असाधू वर्तन केले तरी चालेल' असे मत मांडले आणि त्याचे समर्थन करताना अशुद्ध साधने हा समाजातील अपूर्णतेचाच एक परिणाम आहे असे त्याचे कारण दिले. त्याच गीतारहस्यात साधू पुरुषाने साधू मार्गाने आपले काम साधले पाहिजे असेही लोकमान्यांनी सांगितले. म्हणजे टिळकांचे विवेचन संदिग्ध आहे असेही भागवत पुढे म्हणाले. टिळकांनी दोन्ही मार्गांत संदिग्धता ठेवली आणि त्यांच्या अनुयायांनी त्यांपैकी सोयीचा तेवढा अशुद्ध मार्ग उचलला असा आचार्यांचा थोडक्यात निष्कर्ष आहे.

हे मत मांडताना टिळकांसारख्या थोर विभूतीवर मोठा दोषारोप करण्याचे युक्तीने टाळून त्यांच्या अनुयायांवर खापर फोडण्याचे वैचारिक सौजन्य आचार्य भागवत यांनी का दाखविले हे आम्हांस समजते. पूज्य मानल्या गेलेल्या व्यक्ती-संबंधाने आक्षेप प्रकट करताना अशी काही जपणूक अनेक वेळा सोयीची म्हणून

पत्करावी लागते. कारण एरवी पूज्य व्यक्तीवर आरोप करणारा म्हणून एखाद्या मतप्रतिपादकाच्या मताचा विचार करण्यासच सामान्य लोकांची मने अनुकूल रहात नाहीत.

वादाचे मूळ स्वरूप

आचार्य भागवतांच्या पुण्याच्या व्याख्यानाच्या वेळी समारोप करताना अध्यक्ष आचार्य जावडेकर यांनी वादाचे मूलभूत स्वरूप स्पष्ट करून सांगितले. ते असे की, गीतारहस्यात साधनशुद्धी नाही याचे कारण गीताग्रंथच मुळी क्षात्रप्रवृत्तीच्या अर्जुनासाठी सांगितलेला आहे. याचा अर्थ असा की, साधनशुद्धीच्या अभावाबद्दलचा दोष मूळ गीतेचाच आहे, म्हणजे अर्थात् श्रीकृष्णापर्यंत पोहोचतो. म्हणूनच आचार्य जावडेकर म्हणाले की, "आजच्या परिस्थितीत श्रीकृष्णापेक्षा गौतम बुद्धाचाच जास्त अभ्यास झाला पाहिजे." वादाचे हे टोक श्रीकृष्ण आणि गौतमबुद्धापर्यंत आचार्य जावडेकरांनी नेले, हे आमच्या मते अत्यंत सुसंगत असेच आहे. बुद्धाचा अभ्यास ज्यांना आज अधिक ग्राह्य वाटत आहे, त्यांनी श्रीकृष्ण, टिळक, आणि गीतारहस्य यांच्यासंबंधी कोणतीच उठाठेव करू नये हे फार चांगले. श्रीकृष्णादिकांचा विचार अनुल्लेखानं त्यांनी बाजूला सारावा आणि बुद्धाची विचारसरणी सरळपणे लोकांपुढे प्रचारार्थ मांडावी, म्हणजे सगळाच घोटाळा वाचेल.

आचार्य भागवतांनी उपस्थित केलेला आणि जावडेकरांनी स्पष्ट केलेला हा वाद अभूतपूर्व असा नाही. लोकमान्य टिळक विद्यमान असतानाच हा वाद उत्पन्न झालेला होता. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या वर्षात महात्मा गांधींशी त्यांनी पत्ररूपाने जो वाद केला तो भागवत यांनी मांडलेल्या मुद्द्यावरच होता. तत्पूर्वी टिळकांचे राजकीय चळवळीचे मार्ग हे संधिसाधू आणि साध्य चांगले असले तर वाटेल ते हीन साधन राबविणारे असे होते, असा आक्षेप टिळकांचे राजकीय प्रतिपक्षी घेत असत. या राजकीय प्रतिपक्षीयांमध्ये महात्मा गांधींचे गुरू ना. गोखले हे असल्यामुळे गांधीजींच्या मनावरही या आक्षेपाची छाप होती. १९२० च्या प्रारंभी, म्हणजे अमृतसरच्या काँग्रेसनंतर, गांधीजींनी आपल्या 'यंग इंडिया'-मध्ये त्या अधिवेशनाबद्दल एक लेख लिहिला. त्यात असे म्हटले की, अमृतसर, काँग्रेसमध्ये टिळकांचे वर्तन त्यांच्या धोरणाशी सुसंगत असेच होते. कारण 'end justifies the means' म्हणजे साध्य चांगले असले तर वाटेल त्या वेड्यावाकड्या साधनाचे त्यायोगे समर्थन होऊ शकते, असे टिळकांचे राजकीय धोरण आहे. गांधीजींनी घेतलेल्या या आक्षेपाला किंवा प्रकट केलेल्या चुकीच्या समजुतीला टिळकांनी पत्रद्वारे उत्तर दिले. हे उत्तर गांधीजींनी त्या वेळी यंग इंडियातच समग्र प्रसिद्ध केले आहे. हे टिळकांनी गांधींना लिहिलेले अखेरचे महत्त्वाचे पत्र पूर्वी

अनेक वेळा आम्ही केसरीत व मराठ्यात उद्धृत केलेले आहे त्या पत्रात टिळकांनी गांधीजींना लिहिले होते की, " चांगले साध्य असेल तर वाटेल ती साधने राबवून घ्यावीत हे आपण माझ्या राजकीय धोरणाचे केलेले वर्णन बरोबर नाही. 'अक्रोधेन जयेत् क्रोधं' हा बुद्धाचा मार्ग आणि 'ये यथा मां प्रपद्यंते' ह. श्रीकृष्णाचा मार्ग, हे दोन्ही प्रामाणिक असले तरी राजकारण हे साधूंचे क्षेत्र नसल्याने या क्षेत्रात बुद्धापेक्षा श्रीकृष्णाचा मार्ग अधिक श्रेयस्कर असे मानले पाहिजे यालाच मी राजकारणात प्रतियोगी सहकारिता म्हणतो आणि याचा अधिक तात्त्विक खुलासा तुम्हांला गीतारहस्यात आढळेल !" या पत्रातील मूळ इंग्रजी पुढीलप्रमाणे आहे :

लो. टिळकांचे म. गांधींना पत्र

" I am sorry to see that in your article on the Reforms Resolution in the last issue, you have represented me as holding that I considered ' everything fair in politics, I write this to you to say that my view is not correctly represented therein. Politics is a game of wordly people and not of ' sadhus ' and instead of of the maxim ' Akkoden jine kkodem ' as preached by Buddha, I prefer to rely on the maxim of Shri Krishna ' Ye yatha mam prapadyante Tam Tathaiva bhajamyaham. ' That explains the whole difference and also the meaning of my phrase Responsive Co-operation, ' Both methods are equally honest and righteous but the one is more suited to this world than the other. Any further explanation about the difference will be found in my Gita-rahasya. "

- Young India
Jan. 28, th 1920.

टिळकांच्या या उत्तरामध्ये बुद्धाच्या मार्गासंबंधाने आदरबुद्धी ठेवूनही तात्त्विकदृष्ट्या आपल्या विवेकबुद्धीला कोणती गोष्ट अधिक ग्राह्य वाटते हे स्पष्टपणे दाखविले आहे. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी वरच्या भूमिकेवरून हा तात्त्विक वाद केला. पण अशीच त्यांच्या अनुयायांची भूमिका रहात नसल्यामुळे त्याला हीनपणाचे किंवा हमरीतुमरीचे स्वरूप येते. टिळकांनी या वादाचे स्वरूप ' टिळक विरुद्ध गांधी ' असे न ठेवता ' श्रीकृष्ण विरुद्ध बुद्ध ' असे त्यांचे स्वरूप दाखविले. यालाही कारण या वादात प्रचलित वैयक्तिक भावनांना मिसळू देऊ नये आणि मूळ तात्त्विक वादाचे स्वरूप गढूळ होऊ नये हा त्यांचा हेतू होता. शुद्ध नीतिनियमन आणि समाजव्यवहार यांची सांगड कशी घालावयाची हा यातला मूळ तात्त्विक प्रश्न आहे. त्याचे विवेचन करताना कोणाला निष्कारण

विकारवश होण्याचे कारण नाही आणि सिद्धांत स्पष्टपणे मांडण्याच्या वेळी कोणाची व्यर्थ प्रतिष्ठा सांभाळण्याचेही कारण नाही.

टिळकांचे राजकारण आणि तत्त्वज्ञान

टिळकांनी गांधीजींना लिहिलेल्या अखेरच्या पत्रात आपल्या राजकीय धोरणाचा अधिक खुलासा गीतारहस्यात आढळेल असे स्पष्ट म्हटले आहे. यावरून हे स्पष्ट दिसते की, टिळकांच्या सामान्य आयुष्यात वागण्याचे धोरण एक आणि राजकारणात दुसरे असा भेद नव्हता. आणि 'प्रतियोगी सहकारिता' हे एक विशिष्ट कालाचे धोरण नसून त्यांनी आपल्या एकंदर आयुष्यात जे मूलभूत तत्त्वज्ञान निश्चित केले त्यावरच ते धोरण आधारलेले होते. आपल्या धोरणाचा खुलासा गीतारहस्यात मिळेल या दाखल्याचा आणखी खुलासा सांगावयाचा तर, गीतारहस्यातील 'कर्मजिज्ञासा' हे दुसरे प्रकरण आणि 'सिद्धावस्था व व्यवहार' हे बारावे प्रकरण यांतच मुख्यतः हा खुलासा आढळेल, असा सांगता येईल. टिळकांचे राजकारणात एक धोरण आणि खाजगी व्यवहारात एक धोरण होते, असा अलीकडे काही लोकांनी समज करून घेतला आहे. टिळकांनी गांधींना लिहिलेल्या वरील पत्रावरून तो निर्मूल ठरतो. गीतारहस्यातील वर निर्देशिलेल्या दोन प्रकरणांत विशेषतः 'सिद्धावस्था व व्यवहार' या प्रकरणात या विषयाची सांगोपांग छाननी टिळकांनी केली आहे.

दुरुपयोगाची दुहेरी भीती

कोणतेही विवेचन एखाद्याने अर्धेमुर्धे वाचले तर वाटेल त्या गोष्टीसंबंधाने गैरसमज होऊ शकेल. पण प्रतियोगी किंवा सापेक्ष नीतिधर्म यांचा पुरस्कार केला असता हवे ते करण्यास त्यायोगे लोकांना सबब मिळेल हा आक्षेप लक्षात घेऊन त्याला उत्तरही टिळकांनी गीतारहस्यातच दिले आहे. आपल्या पापकर्माच्या समर्थनार्थ चांगल्या गोष्टींचा दुरुपयोग करावयाचा या लोकप्रवृत्तीच्या आघातातून कोणाचाच उपदेश सुटलेला नाही. निरपवाद अहिंसेचा उपदेश देखील अनेकांना आपला आळस, भित्रेपणा व जीवबचावू वृत्ती या गोष्टींवर पांघरूण घालण्यास उपयोगी पडला आहे. निरपवाद नीतिनियम आणि प्रतियोगी किंवा सापेक्ष नीतिनियम या दोहोंची सबब सांगून लोकांनी केलेला दुरुपयोग पाहिला तर निरपवाद नियमांचाच दुरुपयोग अधिक होतो आणि घातकही ठरतो असे दिसून येईल. सापवाद नीतिनियम कोणी आपल्या दुर्वर्तनाचे समर्थन करण्यासाठी पुढे करू लागला तर युक्तिवादाने त्याचे तारतम्य चुकले असे दाखवता येते आणि हे तारतम्य सामान्य बुद्धीला कळण्यासारखे असते. निरपवाद नीतिनियम हे श्रद्धेय

निष्ठेप्रमाणे चालविले जात असल्यामुळे युक्तिवादाला तेथे जागाच उरत नाही. म्हणून त्यांचा दुरुपयोग फारच बिनधोकपणे छद्मी आणि कपटी माणसाला करता येतो.

तत्त्वतः अंतिम स्वरूपाचे जे नीतिनियम असतील त्यांचे महत्त्व आपण कमी करतो असा गैरसमज कोणी करून घेऊ नये, याविषयी टिळकांनी आपल्या विवेचनात फारच काळजी घेतली आहे. या बाबतीत उतारे घेऊ लागलो तर गीतारहस्याची सर्वच प्रकरणे उद्धृत करावी लागतील. पण उदाहरणादाखल काही ठळक उतारे घेणे प्राप्त आहे. 'सिद्धावस्था आणि व्यवहार' या प्रकरणात रहस्यकार लिहितात–

नीतिनियमांचे परमावधीचे स्वरूप

"भूमितीशास्त्रात सांगितल्याप्रमाणे रुंदीशिवाय सरळ रेघ किंवा सर्वांशी निर्दोष वर्तुळपरीघ जरी कोणास काढता आला नाही, तर तेवढ्यामुळे सरळ रेघेची किंवा शुद्ध वर्तुळाची शास्त्रीय व्याख्या जशी चुकीची किंवा निरर्थकही होत नाही, तद्वत् सरळ व शुद्ध नीतिनियमांची गोष्ट आहे. शिवाय एखाद्या गोष्टीचे परमावधीचे शुद्ध स्वरूप कोणते याचा आधी निश्चय केल्याशिवाय व्यवहारात त्या गोष्टीची जी अनेक रूपे नजरेस पडतात, त्यात सुधारणा करणे किंवा सारासार विचारांती त्यातील तारतम्य ओळखणेही शक्य नाही व त्यासाठीच बावन्नकशी सोने कोणते याचा सराफ प्रथम निर्णय करीत असतो. दिशा दाखवणारे होकायंत्र किंवा ध्रुवतारा यांच्याकडे दुर्लक्ष करून अफाट समुद्रावर लाटा आणि वारा या दोहोंचेच तारतम्य पाहून गलबतावरील खलाशी दर वेळी आपल्या गलबताचे सुकाणू धरू लागले तर त्यांची जी स्थिती होईल, तीच नीतिनियमांचे परमावधीचे स्वरूप लक्षात न आणता केवळ देशकालाप्रमाणे वागणाऱ्या मनुष्याची झाली पाहिजे. दुष्ट व लोभी लोकांच्या समाजात अहिंसा, सत्य वगैरे नित्य नीतिधर्म पूर्णपणे पाळता येत नाहीत हे खरे; पण त्याचा दोष या नित्यधर्मास देणे योग्य नाही. सूर्याच्या किरणांनी एखाद्या पदार्थांची सावली सपाट प्रदेशावर सपाट आणि उंचसखल जागेवर उंचसखल पडते, म्हणून ती सावली मुळातच उंचसखल असली पाहिजे असे ज्याप्रमाणे अनुमान करता येत नाही; त्याप्रमाणे दुष्ट लोकांच्या समाजात नीतिधर्माचे पराकाष्ठेचे शुद्ध स्वरूप आढळून येत नाही. म्हणून अपूर्णावस्थेतल्या समाजात आढळून येणारे नीतिधर्माचे अपूर्ण स्वरूपच मुख्य किंवा मूळचे होय असे म्हणता येत नाही. हा दोष समाजाचा आहे, नीतीचा नव्हे." (गीतारहस्य, सिद्धावस्था व व्यवहार, पान ३७४–३७५.)

नीतिनियमांची ही सापेक्षता केवळ बाह्य जगतात लोकव्यवहार सुरळीत चालावा आणि लोकसंग्रह व्हावा एवढ्यासाठीच मानावी लागते असे नाही; तर

अंतर्मुख होऊन वैयक्तिक पाप-पुण्याचा आणि आत्मिक उन्नतीचा विचार केला तरी देखील बाह्य आचरणाकडे आणि बाह्य परिणामांकडेच केवळ दृष्टी ठेवून निर्वाह लागत नाही, तर त्याच्याही पलीकडे जाऊन कर्त्याची बुद्धी कोणत्या प्रकारची आहे हे पहावे लागते. कारण वाईट बुद्धी ठेवून केलेले कर्म कित्येक वेळेला समाज-दृष्टचा अत्यंत उपकारक असे दिसते तसेच उलट अत्यंत सद्बुद्धीने केलेल्या कर्माचा विपाक परिस्थितीच्या अनपेक्षित घटनेमुळे विपरीत होऊ शकतो. म्हणून तात्त्विक दृष्टचा चांगले-वाईट ठरविण्याचा अखेरचा निर्णायक निष्कर्ष हा कर्त्याच्या शुद्ध बुद्धीवरच अवलंबून ठेवावा लागतो. या तात्त्विक अपरिहार्यतेचा दुरुपयोग करून अनेक दुष्कृत्ये करणारे लोक सद्बुद्धीची सबब दाखविण्याचा प्रयत्न करतात. "सैतानही आपल्या कृत्यांना बायबलचा आधार घेतो" ही म्हण प्रसिद्ध आहे; पण या दुरुपयोगाच्या भीतीसाठी कोणतेही तात्त्विक विवेचन करण्यास कचरू लागले तर कोणतेच विवेचन नीट करता येणार नाही

दुरुपयोगाच्या आक्षेपास उत्तर

लोकमान्य टिळकांनी या दुरुपयोगाची जाणीव ठेवूनच गीतारहस्यात विवेचन केलेले आहे. उदाहरणार्थ, पुढील उतारा पहा–

"कर्माकर्मनिर्णयार्थ कर्मांच्या बाहच फळाकडे लक्ष न देता कर्त्याच्या शुद्ध बुद्धीसच प्राधान्य दिले पाहिजे असा जो गीतेचा सिद्धांत आहे, त्यावर कित्येकांचा असा तर्कटी आक्षेप आहे की, कर्मफलाकडे न पाहता याप्रमाणे नुसत्या शुद्धबुद्धीचाच विचार करावयाचा म्हटले तर शुद्धबुद्धीच्या मनुष्याने कोणतेही दुष्कृत्य करावे असे प्राप्त होईल आणि मग त्यास सर्व दुष्कृत्ये करण्यास मुभा मिळेल... पण हे आरोप किंवा आक्षेप सर्वस्वी मूर्खपणाचे किंवा दुराग्रहाचे आहेत असे म्हणण्यास आम्हांस काहीच दिक्कत वाटत नाही" (गीतारहस्य, प्रकरण 'सिद्धावस्था व व्यवहार,' पान ३८०.) "कर्माच्या बाहच फळाचा विचार करीत बसू नये असे जेव्हा गीता सांगते तेव्हा त्याचा अर्थ वाटेल ते करा असा नाही; तर ज्याअर्थी बाहचतः परोपकार करण्याचे सोंग दंभाने, लोभाने कोणीही आणू शकतो, पण सर्वांभूती एक आत्मा हे ओळखिल्याने बुद्धीत जें स्थैर्य व समता येते तिचे सोंग आणता येत नाही, त्याअर्थी कोणत्याही कृत्याच्या योग्यायोग्यतेचा विचार करताना कर्माच्या बाहच परिणामापेक्षा कर्त्याच्या बुद्धीकडे योग्य नजर पुरविली पाहिजे, असे गीतेचे सांगणे आहे. थोडक्यात सांगणे असल्यास . नीतिमत्ता ही नुसत्या जड कर्मात नसून ती सर्वस्वी कर्त्याच्या बुद्धीवर अवलंबून असते, असा गीतेचा सिद्धांत आहे. परंतु या आध्यात्मिक सिद्धांतातील खरे तत्व न ओळखता कोणी वाटेल तें करू लागेल तर तो पुरुष राक्षसी किंवा तामसी होय, असे गीतेतच पुढे म्हटले आहे" (गीतारहस्य प्रकरण सिद्धावस्था व व्यवहार, पान ३८१.)

– केसरी, दि. २६–७–१९४९

साध्यानुकूल साधनविवेक

(लेखांक दुसरा)

'लोकसंग्रह' हे साध्य आजच्या नवीन "शुद्ध -- साधननिष्ठा" मानणाऱ्यांना संमत आहे. त्या लोकसंग्रहासाठी उपाय कोणते करावयाचे याविषयी शुद्धता राखली पाहिजे आणि ती राखण्याची काळजी लो. टिळकांनी घेतली नाही असे ते म्हणतात. शुद्ध नीतिनियम हे मुख्यतः सत्य आणि अहिंसा या दोन मूल-तत्त्वावर आधारलेले आहेत. लो. टिळकांनी 'कर्मजिज्ञासा' या प्रकरणात क्रमाने शुद्ध नीतिनियमांचा विचार करताना 'सत्य' आणि 'अहिंसा' या तत्त्वांना पहिले आणि दुसरे स्थान दिलेले आहे. हे नीतिनियम साधनांच्या बाबतीत कडकपणे पाळावयाचे हाच साधनशुद्धीचा अर्थ, टिळकांवर आक्षेप घेणारांचा आहे हेही उघड आहे. पण अंतिम स्वरूपाचे नीतिनियम साधनांच्या बाबतीत, विशेषतः लोकसंग्रह हे ध्येय साध्य होण्याच्या दृष्टीने वापरावयाच्या साधनांच्या बाबतीत पाळताना काही मर्यादा किंवा तारतम्य ठेवावे लागते, असे टिळकांनी प्रतिपादन केले आहे. साधनाच्या शुद्धतेमुळेच, साध्य प्राप्त करून घेण्यास ते निरुपयोगी ठरले तर त्याचे साधनत्वच नाहीसे होते. साधनशुद्धिवाल्यांची साधन-निष्ठा ही इतकी अप्रमाण असते की, शेवटी त्या साधनाचे साधनत्वच ते नाहीसे करतात म्हणजे एक प्रकारे त्याला शुद्ध करण्यासाठी त्याचा जीवच घेतात !

अपवादात्मक प्रसंग

गाडी ही खडखड वाजते हा तिचा दोष काढून टाकण्यासाठी म्हणून एखाद्याने चाके काढून फेकून दिली तर खडखड वाजण्याचा दोष निघून जाईल हे खरे; पण गाडीचे वाहनत्व हेच मुळी उरणार नाही ! कपडे स्वच्छ करण्यासाठी पाण्यात भिजवून ते आपटणे हे साधन होय. पण मूर्ख चाकराच्या ज्या प्रचलित लोककथा आहेत त्यांमध्ये कपड्याच्या चिंध्या होईपर्यंत त्याने हे काम चालविल्याचे एक उदाहरण असते. यात त्याचा जो वेडेपणा होतो तो असा की, कपडे स्वच्छ करावयाचे आहेत हे साध्य तो विसरतो आणि अप्रमाण साधननिष्ठ बनतो ! सत्य आणि अहिंसा ही पाळून लोकसंग्रह साधत नाही अशी अपवादात्मक परिस्थिती उत्पन्न होते. समाजाच्या पूर्वीच्या अवस्थेत असे प्रसंग अधिक येत असतील, आज ते कमी येत असतील; पुढे आणखी समाज चांगला झाला तर हे अपवादात्मक प्रसंग

त्याहूनही कमी होतील कदाचित्. पण या अपवादात्मक प्रसंगाचा संभव आहे तोपर्यंत या प्रसंगात कसे आचरण करावयाचे याचा निर्णय देणे नीतिशास्त्राला प्राप्त आहे. हे प्राप्त कर्तव्य जितक्या काळजीपूर्वक, खुलासेवार आणि अपसमजाचा धोका टाळून करता येईल तितके गीतारहस्यात टिळकांनी केलेले आहे

सुप्रसिद्ध कूटप्रश्न

पण साधनशुद्धीवाल्यांचा आग्रह असा आहे की, शुद्ध नीतिनियमांना परिस्थितीच्या प्रतियोगित्वाने उत्पन्न होणारे स्वाभाविक अपवाद हे मानावयाचेच नाहीत हा त्यांचा आग्रह एकांगी, भावनाप्रधान आणि निव्वळ अशास्त्रीय आहे. ह्या साधननिष्ठेची शाब्दिक पराकोटी गाठणारे गांधीजी यांना देखील हे अपवादात्मक प्रसंग टाळता आलेले नाहीत. त्यात त्यांना साधननिष्ठा सोडावी लागली. याचे समर्थन करण्याच्या वेळी भोवतालच्या परिस्थितीचा दोष असे म्हणण्याऐवजी "मी अपुरा आहे." असे ते म्हणत. या म्हणण्यामध्ये वैयक्तिक नम्रपणाचा प्रकर्ष दिसत असला तरी शास्त्रीय निर्विकारता दिसत नाही. उलट एक प्रकारचा सुप्त अहंकारच दिसतो. साधनांचा आग्रह साध्याला डावलूनही साधनाग्रही लोक चालवू लागले म्हणजे शेवटीं साधन हेच त्यांचे साध्य बनते. आणि त्याच्या शुद्धतेसाठी साध्याचा बळी देणे हे उलट साधन बनते ! उदाहरणार्थ, गांधीजींना एके वेळी विचारला गेलेला प्रसिद्ध कूटप्रश्न घ्या. "तुमच्या बहिणीवर अत्याचार करावयास आलेल्या माणसाला तुम्ही शब्दाने वळवून पहा; नंतर मध्ये पडून त्याच्या आघातांनी मरून जा." इतके गांधीजींनी सांगितल्यावर पृच्छकाने विचारले की, "अशा रीतीने मेल्यानंतर देखील अत्याचारी हा अत्याचार करीलच; त्याला तिने आत्मबलाने प्रतिकार केला तरीही अत्याचार थांबणार नाही," यावर गांधीजींचे शेवटचे उत्तर असे आहे की 'The victory will be of the victim and not of the oppressor.' ह्या उत्तराचा अचानक अप्रयोजकपणा बावळटांना प्रज्ञाहत करणारा ठरतो. पण हा तथाकथित अंतिम नैतिक विजय मिळेपर्यंत मन वळवणे, आडवे पडणे, मरून जाणे येथपर्यंतच्या अहिंसात्मक साधनांचे साध्य अत्याचार प्रत्यक्ष होऊ नये हे असते. शेवटच्या पायरीला मात्र वैचारिक हातचलाखीने ते साध्यच बाजूला सारून काल्पनिक नैतिक विजयाचे साध्य उभे केले जाते !

अहिंसेच्या कसोटीचा, भगिनीवरील अत्याचाराचा हा दृष्टांत गांधीजींच्या विवेचनात अनेक वेळा आलेला आहे. त्यांपैकी एका ठिकाणचा आधार दिला तरी आमचे पुढील विवेचन साधार आहे हे दाखवण्याचे काम भागण्यासारखे आहे. म्हणून पुढील इंग्रजी उतारा उद्धृत करीत आहोत त्याचा आशय वरील विवेचनात सर्व आलेला असल्यामुळे त्याचे वेगळे भाषांतर देण्याची आवश्यकता नाही.

आधारभूत उतारा

"And even at this late day, I was seriously asked whether Satyagraha did not at times warrant resistance by violence, as for instance, in the case of a sister whose virtue might be in danger form a desperado. I ventured to suggest that it was the completest defence wilhout irritation, without being ruffled to interpose oneself between the victim and the victimizer, and to face death. I added that this (for the assailant,' novel method of defence would, in all probability, exhaust his passion and he will no longer want to ravish the innocent woman, but would want to flee from her presence for very shame, and that if he did not, the act of personal bravery on the part of her brother would steel her heart for putting up an equally brave defence and resisting tke lust of man, turded brute for the while. And I thought I clinched my argument by saying that if, in spite of all the defence, the unexpected happened, and the physical force of the tyrant overpowered his victim, the disgrace would not be that of woman, but of her assailant, and that both she and her brother who died in the attempt to defend her virtue, would stand well before the throne of judgement. I do not warrant that my argument convinced my listener or that would convince the reader. The world, I know, will go on as before. But it is well at this moment of self examination to understand and appreciate the implications of the powerful movement of non-violence. All religions have emphasised the highest idea, but all have more or less permitted departures as so many concessions to human weakness."

–Young India 23 February 1921
Young India Vol. II, page
221 published by S. Ganesan

कसोटीच्या प्रसंगाची चिकित्सा

आता, आपल्या भगिनीवरील अत्याचारामध्ये शेवटपर्यंत म्हणजे तो अत्याचार होऊन जाईपर्यंत, पीडकाने कितीही दुष्टपणा केला तरी पीडित पक्षाने

मात्र अहिंसाच आचरली पाहिजे हा आग्रह धरणाऱ्या मनाचे काही अधिक पृथक्करण किंवा विश्लेषण करणे आवश्यक आहे. पराकोटीपर्यंतच्या अहिंसेचे हे समर्थन सामान्य माणसाच्या मनाला इतके धक्का देणारे असते की, तो त्या धक्क्याने विव्हल होऊन त्याची मती कुंठित होते. अहिंसा तत्त्वाच्या आग्रहापायी एखाद्या थोर व्यक्तीने एखाद्या असहाय्य स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराला त्या तत्त्वधुंदीमध्ये तिच्याच 'विजया' चे स्वरूप द्यावे ही गोष्ट सामान्य माणसाला विस्मयाच्या झटक्याने प्रज्ञाहत करते, त्याची विचारशक्ती गुदमरून जाते. त्याची तर्कबुद्धी पांगुळते, विषण्णतेने तो आपल्याला हे पटत नाही एवढे दर्शविण्यासाठी फक्त मान हलवतो ! पण या अत्याचाराला अहिंसात्मक विजयाचे स्वरूप देणारा किती निर्घृण असतो पहा. एका चलत्चित्रपटावर भगिनीवरील अत्याचाराचे उदाहरण प्रत्यक्ष दाखविले जात आहे आणि ते पहात सामान्य माणसे आणि पराकोटीचे अहिंसाग्रही बसले आहेत अशी क्षणभर कल्पना करा. सामान्य माणसे शेकडा शंभर त्या भगिनीच्या बंधूला म्हणतील 'अरे ! असा स्वस्थ काय बसलास प्रतिकार कर !' शेवटी अत्याचार झालेला दिसला तर ते त्या अत्याचाऱ्याच, धिक्कार करतील. स्वस्थ बसून प्रतिकार न करता मरणाऱ्या बंधूला धिक्कारतील आणि शेवटी अबलेवरील अत्याचाराच्या वेळी अश्रूपुरीत नयनांतून अर्धवट दिसणारे दृश्यही पाहू नये म्हणून डोळ्यांपुढे हात धरतील !

परात्परकोटीचे विडंबन

उलट अहिंसाग्रही माणसाला त्या अत्याचाऱ्याबद्दल राग येत नाही असे दिसेल. प्रतिकार न करता मेलेल्या बंधूसंबंधाने तो गौरव करील. शेवटी बिचाऱ्या स्त्रीवर अत्याचार झाला तरी तिची कीव येण्याऐवजी माझे 'अहिंसा' तत्त्व स्वच्छ आणि निष्कंलक आणि अपराजित राहिले हे उफराट्या विचारप्रणालीने सिद्ध करून त्याचा एक प्रकारचा आनंद मानीत राहील ! म्हणजे तो बंधू मेला त्याची याला क्षिती नाही; ती स्त्री अब्रूनिशी मेली याची खंत नाही. माझ्या 'अहिंसा' तत्त्वावर शितोडाही पडू न देता ते मी कसे राख् हाच त्याचा सर्वोच्च विचार. या बिकट प्रसंगातूनही दोघांचे जीव मेले तरी "अहिंसा तत्त्व" मात्र कसे न दुखावता बाहेर पडेल याची काय ती याला चिंता ! पण याला दुसरा तितकाच निर्घृण नि पाषाणचित्त मनुष्य भेटला तर तो म्हणेल की, "आता एकच गोष्ट उरली. जे पीडित झाले नि मेले त्यांच्या अहिंसेचा तुझ्या मताने विजय झाला ना ! ठीक ! मग आता हा हार घे आणि अहिंसेचा हा दिग्विजय मिळवण्याची सुवर्णसंधी देणाऱ्या त्या अत्याचाऱ्याच्या गळचात घालून त्याला उचलून डोक्यावर घे ! !" पराकोटीच्या आग्रहाला शेवटी परात्पर कोटीने विडंबन करूनच त्याला शमविणे शक्य असते.

लोकविलक्षणाची आवड

साप पुढे आला असता सामान्य मनुष्य त्याला ठार करतो 'अहिंसा' तत्त्वाग्रहाने दयाबुद्धी बधिर झालेला पराकोटीचा महंत म्हणतो की, "माझी अहिंसा इतकी उच्च झाली पाहिजे की या सर्पाने मला न चावता आपल्या वाटेने निःशंकपणे, मला न भिता, सावकाश गेले पाहिजे." पुढे हा मोकळा सोडलेला साप अनेकांना चावला तर त्यांच्या मृत्यूने त्यांच्या आप्तेष्टांना किती दुःख होईल याचा विचार सामान्य माणसाच्या मनात येईल. पुढील धोका टाळण्यासाठी या सापाला नाहीसे करणे प्राप्त आहे असे म्हणून त्याचा जीव घेण्याची आपत्ती खंत करीत स्वीकारील; दुःख करील की, अरेरे ईश्वराने इतक्या सुंदर प्राण्याला विषारीपणा का दिला! पण हे तर मामुली सरळ घास घेण्यासारखे झाले. हिंदुस्थानात ते आकर्षक नाही. जो डोक्यावरून किंवा पायाखालून हात घात घालून घास घेईल तो खरा अलौकिक अशी हिंदुस्थानातील लोकप्रवृत्ती आहे!

अहिंसेचा निर्दयपणा

प्लेगने माणसे मरत असता उंदरांचा नाश करण्याचा आत्यंतिक अहिंसाप्रणेत्यांची परवानगी मागितली. ती त्यांनी कोणत्या शब्दांत दिली हे लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणाले, "उंदरांना मारण्याने माझ्या अहिंसेला बाध येत नाही!" ही खरोखर हिंदुस्थानातली गौरवली जाणारी असामान्यता सामान्य बुद्धीचा मनुष्य काय म्हणेल? तो बहुधा उद्गार काढील की "ही साधी गोष्ट मला विचारावयास कशाला येता. ही तुमची परप्रत्ययनेय प्रवृत्ती योग्य नव्हे. असल्या गोष्टी तुम्ही मला विचारावयास धावता यामध्ये तुम्हांस आणि मलाही काही भूषण नाही. विचारण्यात वेळ दवडून काही प्लेगदूषित उंदिरांमुळे माणसे दगावली तर किती वाईट होईल. आता माणसांना वाचवण्याकरिता आणि त्यांना मृत्यू आल्यास इतर माणसांना जे दुःख होणार ते टाळण्यासाठी हा मुषकसंहार करून टाका. मोठी हिंसा टाळण्यासाठी ही लहान हिंसा कितीही दुःख झाले तरी करावी लागते, त्याला उपाय नाही." पण उंदीर मरो वा माणसे दगावोत माझे अहिंसातत्त्व तर बाधित होत नाहीना एवढीच काय ती आत्यंतिक अहिंसाग्रहीची चिंता. अशी कल्पना करा की, वरील भगिनीवरील अत्याचाराच्या चित्रपटामध्ये, सर्व प्रकार होऊन गेल्यावर अहिंसावादी मनुष्य त्या अत्याचाऱ्याबद्दल रागाचा एक शब्दही न बोलता त्या बंधु - भगिनींच्या प्रेताकडे बघून म्हणतो की, "तुम्ही आपल्या मरणाने निष्कलंक अहिंसेला शंभर टक्के यश मिळवून दिलेत याबद्दल धन्यवाद! तर त्याबद्दल सामान्य लोकांना काय वाटेल?

– केसरी दि. २–८–४९

मात्र अहिंसाच आचरली पाहिजे हा आग्रह धरणाऱ्या मनाचे काही अधिक पृथक्करण किंवा विश्लेषण करणे आवश्यक आहे. पराकोटीपर्यंतच्या अहिंसेचे हे समर्थन सामान्य माणसाच्या मनाला इतके धक्का देणारे असते की, तो त्या धक्क्याने विव्हल होऊन त्याची मती कुंठित होते. अहिंसा तत्त्वाच्या आग्रहापायी एखाद्या थोर व्यक्तीने एखाद्या असहाय्य स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराला त्या तत्त्वधुंदीमध्ये तिच्याच 'विजया' चे स्वरूप द्यावे ही गोष्ट सामान्य माणसाला विस्मयाच्या झटक्याने प्रज्ञाहत करते, त्याची विचारशक्ती गुदमरून जाते. त्याची तर्कबुद्धी पांगुळते, विषण्णतेने तो आपल्याला हे पटत नाही एवढे दर्शविण्यासाठी फक्त मान हलवतो ! पण या अत्याचाराला अहिंसात्मक विजयाचे स्वरूप देणारा किती निर्घृण असतो पहा. एका चलत्चित्रपटावर भगिनीवरील अत्याचाराचे उदाहरण प्रत्यक्ष दाखविले जात आहे आणि ते पहात सामान्य माणसे आणि पराकोटीचे अहिंसाग्रही बसले आहेत अशी क्षणभर कल्पना करा. सामान्य माणसे शेकडा शंभर त्या भगिनीच्या बंधूला म्हणतील 'अरे ! असा स्वस्थ काय बसलास प्रतिकार कर !' शेवटी अत्याचार झालेला दिसला तर ते त्या अत्याचाऱ्याच, धिक्कार करतील. स्वस्थ बसून प्रतिकार न करता मरणाऱ्या बंधूला धिक्कारतील आणि शेवटी अबलेवरील अत्याचाराच्या वेळी अश्रूपुरीत नयनांतून अर्धवट दिसणारे दृश्यही पाहू नये म्हणून डोळ्यांपुढे हात धरतील !

परात्परकोटीचे विडंबन

उलट अहिंसाग्रही माणसाला त्या अत्याचाऱ्याबद्दल राग येत नाही असे दिसेल. प्रतिकार न करता मेलेल्या बंधूसंबंधाने तो गौरव करील. शेवटी बिचाऱ्या स्त्रीवर अत्याचार झाला तरी तिची कीव येण्याऐवजी माझे 'अहिंसा' तत्त्व स्वच्छ आणि निष्कंलक आणि अपराजित राहिले हे उफराट्या विचारप्रणालीने सिद्ध करून त्याचा एक प्रकारचा आनंद मानीत राहील ! म्हणजे तो बंधू मेला त्याची याला क्षिती नाही; ती स्त्री अब्रूनिशी मेली याची खंत नाही. माझ्या 'अहिंसा' तत्त्वावर शितोडाही पडू न देता ते मी कसे राखू हाच त्याचा सर्वोच्च विचार. या बिकट प्रसंगातूनही दोघांचे जीव मेले तरी "अहिंसा तत्त्व" मात्र कसे न दुखावता बाहेर पडेल याची काय ती याला चिंता ! पण याला दुसरा तितकाच निर्घृण नि पाषाणचित्त मनुष्य भेटला तर तो म्हणेल की, "आता एकच गोष्ट उरली. जे पीडित झाले नि मेले त्यांच्या अहिंसेचा तुझ्या मताने विजय झाला ना ! ठीक ! मग आता हा हार घे आणि अहिंसेचा हा दिग्विजय मिळवण्याची सुवर्णसंधी देणाऱ्या त्या अत्याचाऱ्याच्या गळ्यात घालून त्याला उचलून डोक्यावर घे ! !" पराकोटीच्या आग्रहाला शेवटी परात्पर कोटीने विडंबन करूनच त्याला शमविणे शक्य असते.

लोकविलक्षणाची आवड

साप पुढे आला असता सामान्य मनुष्य त्याला ठार करतो 'अहिंसा' तत्त्वाग्रहाने दयाबुद्धी बधिर झालेला पराकोटीचा महंत म्हणतो की, "माझी अहिंसा इतकी उच्च झाली पाहिजे की या सर्पाने मला न चावता आपल्या वाटेने निःशंकपणे, मला न भिता, सावकाश गेले पाहिजे." पुढे हा मोकळा सोडलेला साप अनेकांना चावला तर त्यांच्या मृत्यूने त्यांच्या आप्तेष्टांना किती दुःख होईल याचा विचार सामान्य माणसाच्या मनात येईल. पुढील धोका टाळण्यासाठी या सापाला नाहीसे करणे प्राप्त आहे असे म्हणून त्याचा जीव घेण्याची आपत्ती खंत करीत स्वीकारील; दुःख करील की, अरेरे ईश्वराने इतक्या सुंदर प्राण्याला विषारीपणा का दिला! पण हे तर मामुली सरळ घास घेण्यासारखे झाले. हिंदुस्थानात ते आकर्षक नाही. जो डोक्यावरून किंवा पायाखालून हात घात घालून घास घेईल तो खरा अलौकिक अशी हिंदुस्थानातील लोकप्रवृत्ती आहे!

अहिंसेचा निर्दयपणा

प्लेगने माणसे मरत असता उंदरांचा नाश करण्याचा आत्यंतिक अहिंसाप्रणेत्यांची परवानगी मागितली. ती त्यांनी कोणत्या शब्दांत दिली हे लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणाले, "उंदरांना मारण्याने माझ्या अहिंसेला बाध येत नाही!" ही खरोखर हिंदुस्थानातली गौरवली जाणारी असामान्यता सामान्य बुद्धीचा मनुष्य काय म्हणेल? तो बहुधा उद्‌गार काढील की "ही साधी गोष्ट मला विचारावयास कशाला येता ही तुमची परप्रत्ययनेय प्रवृत्ती योग्य नव्हे. असल्या गोष्टी तुम्ही मला विचारावयास धावता यामध्ये तुम्हांस आणि मलाही काही भूषण नाही. विचारण्यात वेळ दवडून काही प्लेगदूषित उंदिरांमुळे माणसे दगावली तर किती वाईट होईल. आता माणसांना वाचवण्याकरिता आणि त्यांना मृत्यू आल्यास इतर माणसांना जे दुःख होणार ते टाळण्यासाठी हा मुषकसंहार करून टाका. मोठी हिंसा टाळण्यासाठी ही लहान हिंसा कितीही दुःख झाले तरी करावी लागते, त्याला उपाय नाही." पण उंदीर मरो वा माणसे दगावोत माझे अहिंसातत्त्व तर बाधित होत नाहीना एवढीच काय ती आत्यंतिक अहिंसाग्रहीची चिंता. अशी कल्पना करा की, वरील भगिनीवरील अत्याचाराच्या चित्रपटामध्ये, सर्व प्रकार होऊन गेल्यावर अहिंसावादी मनुष्य त्या अत्याचाऱ्याबद्दल रागाचा एक शब्दही न बोलता त्या बंधु - भगिनींच्या प्रेताकडे बघून म्हणतो की, "तुम्ही आपल्या मरणाने निष्कलंक अहिंसेला शंभर टक्के यश मिळवून दिलेत याबद्दल धन्यवाद! तर त्याबद्दल सामान्य लोकांना काय वाटेल?

– केसरी दि. २-८-४९

मात्र अहिंसाच आचरली पाहिजे हा आग्रह धरणाऱ्या मनाचे काही अधिक पृथक्करण किंवा विश्लेषण करणे आवश्यक आहे. पराकोटीपर्यंतच्या अहिंसेचे हे समर्थन सामान्य माणसाच्या मनाला इतके धक्का देणारे असते की, तो त्या धक्क्याने विव्हल होऊन त्याची मती कुंठित होते. अहिंसा तत्त्वाच्या आग्रहापायी एखाद्या थोर व्यक्तीने एखाद्या असहाय्य स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराला त्या तत्त्वधुंदीमध्ये तिच्याच 'विजया' चे स्वरूप द्यावे ही गोष्ट सामान्य माणसाला विस्मयाच्या झटक्याने प्रज्ञाहत करते, त्याची विचारशक्ती गुदमरून जाते. त्याची तर्कबुद्धी पांगुळते, विषण्णतेने तो आपल्याला हे पटत नाही एवढे दर्शविण्यासाठी फक्त मान हलवतो ! पण या अत्याचाराला अहिंसात्मक विजयाचे स्वरूप देणारा किती निर्घृण असतो पहा. एका चलत्चित्रपटावर भगिनीवरील अत्याचाराचे उदाहरण प्रत्यक्ष दाखविले जात आहे आणि ते पहात सामान्य माणसे आणि पराकोटीचे अहिंसाग्रही बसले आहेत अशी क्षणभर कल्पना करा. सामान्य माणसे शेकडा शंभर त्या भगिनीच्या बंधूला म्हणतील 'अरे ! असा स्वस्थ काय बसलास प्रतिकार कर !' शेवटी अत्याचार झालेला दिसला तर ते त्या अत्याचाऱ्याच, धिक्कार करतील. स्वस्थ बसून प्रतिकार न करता मरणाऱ्या बंधूला धिक्कारतील आणि शेवटी अबलेवरील अत्याचाराच्या वेळी अश्रूपुरीत नयनांतून अर्धवट दिसणारे दृश्यही पाहू नये म्हणून डोळ्यांपुढे हात धरतील !

परात्परकोटीचे विडंबन

उलट अहिंसाग्रही माणसाला त्या अत्याचाऱ्याबद्दल राग येत नाही असे दिसेल. प्रतिकार न करता मेलेल्या बंधूसंबंधाने तो गौरव करील. शेवटी बिचाऱ्या स्त्रीवर अत्याचार झाला तरी तिची कीव येण्याऐवजी माझे 'अहिंसा' तत्त्व स्वच्छ आणि निष्कंलक आणि अपराजित राहिले हे उफराट्या विचारप्रणालीने सिद्ध करून त्याचा एक प्रकारचा आनंद मानीत राहील ! म्हणजे तो बंधू मेला त्याची याला क्षिती नाही; ती स्त्री अब्रूनिशी मेली याची खंत नाही. माझ्या 'अहिंसा' तत्त्वावर शितोडाही पडू न देता ते मी कसे राखू हाच त्याचा सर्वोच्च विचार. या बिकट प्रसंगातूनही दोघांचे जीव मेले तरी "अहिंसा तत्त्व" मात्र कसे न दुखावता बाहेर पडेल याची काय ती याला चिंता ! पण याला दुसरा तितकाच निर्घृण नि पाषाणचित्त मनुष्य भेटला तर तो म्हणेल की, "आता एकच गोष्ट उरली. जे पीडित झाले नि मेले त्यांच्या अहिंसेचा तुझ्या मताने विजय झाला ना ! ठीक ! मग आता हा हार घे आणि अहिंसेचा हा दिग्विजय मिळवण्याची सुवर्णसंधी देणाऱ्या त्या अत्याचाऱ्याच्या गळचात घालून त्याला उचलून डोक्यावर घे ! !" पराकोटीच्या आग्रहाला शेवटी परात्पर कोटीने विडंबन करूनच त्याला शमविणे शक्य असते.

लोकविलक्षणाची आवड

साप पुढे आला असता सामान्य मनुष्य त्याला ठार करतो 'अहिंसा' तत्त्वाग्रहाने दयाबुद्धी बधिर झालेला पराकोटीचा महंत म्हणतो की, "माझी अहिंसा इतकी उच्च झाली पाहिजे की या सर्पाने मला न चावता आपल्या वाटेने निःशंकपणे, मला न भिता, सावकाश गेले पाहिजे." पुढे हा मोकळा सोडलेला साप अनेकांना चावला तर त्यांच्या मृत्यूने त्यांच्या आप्तेष्टांना किती दुःख होईल याचा विचार सामान्य माणसाच्या मनात येईल. पुढील धोका टाळण्यासाठी या सापाला नाहीसे करणे प्राप्त आहे असे म्हणून त्याचा जीव घेण्याची आपत्ती खंत करीत स्वीकारील; दुःख करील की, अरेरे ईश्वराने इतक्या सुंदर प्राण्याला विषारीपणा का दिला ! पण हे तर मामुली सरळ घास घेण्यासारखे झाले. हिंदुस्थानात ते आकर्षक नाही. जो डोक्यावरून किंवा पायाखालून हात घात घालून घास घेईल तो खरा अलौकिक अशी हिंदुस्थानातील लोकप्रवृत्ती आहे !

अहिंसेचा निर्दयपणा

प्लेगने माणसे मरत असता उंदरांचा नाश करण्याचो आत्यंतिक अहिंसाप्रणेत्यांची परवानगी मागितली. ती त्यांनी कोणत्या शब्दांत दिली हे लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणाले, "उंदरांना मारण्याने माझ्या अहिंसेला बाध येत नाही !" ही खरोखर हिंदुस्थानातली गौरवली जाणारी असामान्यता सामान्य बुद्धीचा मनुष्य काय म्हणेल ? तो बहुधा उद्‌गार काढील की "ही साधी गोष्ट मला विचारावयास कशाला येता. ही तुमची परप्रत्ययनेय प्रवृत्ती योग्य नव्हे. असल्या गोष्टी तुम्ही मला विचारावयास धावता यामध्ये तुम्हांस आणि मलाही काही भूषण नाही. विचारण्यात वेळ दवडून काही प्लेगदूषित उंदिरांमुळे माणसे दगावली तर किती वाईट होईल. आता माणसांना वाचवण्याकरिता आणि त्यांना मृत्यू आल्यास इतर माणसांना जे दुःख होणार ते टाळण्यासाठी हा मुषकसंहार करून टाका. मोठी हिंसा टाळण्यासाठी ही लहान हिंसा कितीही दुःख झाले तरी करावी लागते, त्याला उपाय नाही." पण उंदीर मरो वा माणसे दगावोत माझे अहिंसातत्त्व तर बाधित होत नाहीना एवढीच काय ती आत्यंतिक अहिंसाग्रहीची चिंता. अशी कल्पना करा की, वरील भगिनीवरील अत्याचाराच्या चित्रपटामध्ये, सर्व प्रकार होऊन गेल्यावर अहिंसावादी मनुष्य त्या अत्याचाऱ्याबद्दल रागाचा एक शब्दही न बोलता त्या बंधु - भगिनींच्या प्रेताकडे बघून म्हणतो की, "तुम्ही आपल्या मरणाने निष्कलंक अहिंसेला शंभर टक्के यश मिळवून दिलेत याबद्दल धन्यवाद ! तर त्याबद्दल सामान्य लोकांना काय वाटेल ?

– केसरी दि. २–८–४९.

लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यावर आणि विशेषतः त्यातील 'जशास तसे' या तत्त्वाच्या पुरस्कारासंबंधाने असा आक्षेप घेण्यात येत असे की, " आजच्या सर्व जगाची प्रवृत्ती ही अधिक सदयतेकडे चालली आहे, मनुष्याचे दुःख कमीत कमी कसे व्हावे यासाठी शास्त्रज्ञांचे यत्न चालू आहेत; अशा वेळी दुष्टांशी कडकपणाने वागण्याचे कठोर तत्त्व हे अर्थातच लोकांना आजच्या प्रवृत्तीशी विसदृश वाटते. " हा मोघम आक्षेप केवळ टिळकांच्या प्रतिपादनावरच नसून गीतेवरही घेण्यात येतो. पण याला उत्तर असे आहे की, प्रतिकारी किंवा प्रतियोगी वर्तनात देखील दयाबुद्धी आहे. कारण असे प्रतियोगी वर्तन न केल्यास पुढे जी दुःखे किंवा हिंसा यांची निर्मिती होईल ती प्रतियोगी वर्तन करणाऱ्याला अगाऊच दिसत असते आणि वेळीच थोडीशी हिंसा करून पुढील मोठी हिंसा टाळण्याचा प्रयत्न प्रतिकारी मनुष्य करीत असतो. उलट अहिंसेचा भलता आग्रह धरणारा मनुष्य हा केवळ तात्कालिक हिंसेकडे आणि ती टाळण्याकडे दृष्टी ठेवतो. तसेच, आपल्या अहिंसापालनाने दृष्टांकडून जी लगोलग हिंसा होईल तिच्याविषयी तो अत्यंत निर्घृण बनतो.

दयेतून निर्दयपणाची प्राप्ती

उदाहरणार्थ, मागील लेखांकामध्ये घेतलेले भगिनीवरील अत्याचाराचे उदाहरण घ्या. या उदाहरणामध्ये अत्याचारी माणसाला प्रथम त्या उदाहरणातील बंधूची प्रतिकार करण्याची शक्ती कळून येण्यापुरते विरोधाचे प्रदर्शन त्याने केले असते तर दोन जीवांच्या हत्या, एका जीवाचो अब्रू आणि एका जीवाचा अधःपात इतक्या गोष्टी टळणे संभवनीय होते. त्याऐवजी दोन जीवांचा घात, एका जीवाच्या अब्रूचे नुकसान आणि एका माणसाचा अधःपात या चारी गोष्टी झाल्या तरी अहिंसेचा नैतिक विजय झाला. या समाधानात आत्यंतिक अहिंसावादी गुंग राहतो. या चार प्रकारच्या दुष्परिणामांची क्षिती न बाळगता शुद्ध अहिंसेच्या नैतिक विजयाचे समाधान तो मानीत राहतो. मूळ दयेपासून निघालेल्या अहिंसा तत्त्वाचे पर्यवसान कळत न कळत शेवटी इतक्या निर्दयपणात होते. वरवर जे अकर्म दिसते ते मुळात कर्म असते, इत्यादी कर्माकर्माचा विरोधाभास गीतेने सांगितला आहे. तशाच प्रकारचा विरोधाभास हिंसा आणि अहिंसा, किंवा दया आणि निर्घृणता यांच्या संबंधातही उत्पन्न होतो. वरवर जी अहिंसा दिसते ती परिणामांचा विचार केला असता खरोखर मोठ्या हिंसेला कारण होते. उलट योग्य मर्यादेत प्रतिकारबुद्धीने केलेली अल्प हिंसा ही भावी महान् हिंसा टाळणारी म्हणून खरी अहिंसा आणि खरी दयाबुद्धी होय असे म्हणण्याचे प्रसंग अनेक वेळा येतात.

मिळती आत्यंतिक टोके

सामुदायिक अहिंसा-पालनात ज्या पक्षाला अहिंसा-पालनासंबंधाने आदेश द्यावयाचा त्या पक्षाची एकेरी हिंसा जी होत राहते तिच्याकडे आत्यंतिक अहिंसा-वादी दुर्लक्ष करीत असतो. याचे करण कोणतेही मानवी अंतःकरण हे आत्म-क्लेशाने केव्हातरी विरघळलेच पाहिजे, अशी त्याची " श्रद्धा " असते. या श्रद्धेला काहीएक पुरावा नाही आणि या श्रद्धेच्या नादाने अहिंसेचा विषय झालेल्या बाजूचे बळी तो देत असतो; शेवटी एखाद्या वेळेस ' शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड ' या म्हणीप्रमाणे प्रतिपक्षाचे अंतःकरण द्रवले नाही तर झालेले आत्मबलिदान पुरेसे झाले नाही असे म्हणण्याची त्या आत्यंतिकाची सिद्धता असते ! प्रतिपक्षाकडून गोळीबार झाल्याने एखाद्या माणसाच्या हातापायांतून गोळी गेली तर " ती त्याच्या छातीतून गेली असती तर मी त्यांचा अधिक गौरव केला असता " असे उद्‌गार या एकपक्षीय बलिदानांच्या नादी लागलेल्या उपदेशकांकडून निघतात ! अहिंसेची प्रेरणा मूळ दयाबुद्धीतून होत असेल हे खरे. पण ' आत्यंतिक टोके दोन्ही बाजूंची एकत्रित मिळतात ' अशी इंग्रजीत म्हण आहे, त्याप्रमाणे पराकोटीच्या अहिंसेच्या आग्रहाचे शेवटी निर्घृणपणात पर्यवसान होते.

दुहेरी फसवणूक

प्रतिकार न करता मरण्याच्या योगाने नैतिक विजय होतो हे दाखवण्यासाठी इतक्या प्रकारच्या आपत्ती उत्पन्न होतात त्यापेक्षा सौम्य उपायांनी अत्याचार थांबला नाही तर प्रतिकार करूनही तो थांबविला पाहिजे असे म्हणणे हेच साध्य निष्ठेला अधिक धरून आहे आणि प्रामाणिकपणाचे आहे. तसेच शुद्ध साधनात जे अपवाद अपरिहार्य होतात त्याचा दोष आपल्या अपुरेपणावर घेण्याने अखेरीस एक प्रकारचा अहंकारच वाढतो. मी अपुरा आहे असे म्हटले काय आणि जग अपुरे म्हटले काय, प्रत्यक्ष कृतीमध्ये बदल करावा लागतो हे खरेच, ते काही चुकत नाही. मात्र त्यामध्ये जगत्कल्याणाच्या निकषाऐवजी सर्व वेळी आत्म-परीक्षणाची दृष्टी पुढे करण्याची आवड ही काय ती दृष्टोत्पत्तीस येते. आणि शेवटी धड अहिंसाही पुरी नाही आणि जगत्कल्याणही नाही अशी दुहेरी फसवणूक पदरी पडते. गांधीजींनी दूध न घेण्याची प्रतिज्ञा केली होती. पुढे एका आजारात त्यांना दूध घेणे हे अपरिहार्य झाले. तेव्हा पेचप्रसंग निर्माण झाला. गांधीजींच्या आग्रहापुढे डॉक्टरांनीही हात टेकले. पुढे कस्तुरबांनी सुचविले की, प्रतिज्ञा करण्याच्या वेळी आपल्या मनामध्ये गाईचे दूध होते म्हणून बकरीचे दूध घेतल्यास चालेल. असा हा श्लेष तात्पुरता मानून गांधीजींनी बकरीचे दूध सुरू केले आणि जीव वाचविला, तरीही आपण एक पळवाट काढली आणि प्रतिज्ञा मोडली हे त्यांच्या मनाला बोचू लागले तेव्हा आपल्या आत्मचरित्रात त्यांनी असे लिहिले

आहे को " The will to live proved stronger than the devotion to truth. and for once the votary of truth compramised his sacred ideal by his eagerness to take up the satyagrah fight "

नैतिक शब्दच्छल

अशा रीतीने आपला पराभव मान्य करण्यात आणि आपला कमीपणा झाला असे लिहिताना देखील ' सत्याग्रह चळवळ करण्याची उत्कंठा ' हे त्याला कारण गांधीजींनी दिले आहे. म्हणजे जगण्याची इच्छा देखील पुढे सत्याग्रह करण्याच्या इच्छेमुळे प्रबळ होती. आणि त्या सत्याग्रहाने असंख्य लोकांचे हित साधत होते हे ध्वनित करण्याचा गांधीजींचा उद्देश स्पष्टपणे दिसतो. मात्र तसे स्पष्टपणे केले असता मोठ्या साध्यासाठी लहान साध्य आणि त्याचे साधन हे डावलेले आणि ते योग्य झाले असे म्हणावे लागेल. ते गांधीजींच्या अप्रमाण साधननिष्ठेत बसत नाही. यापेक्षा श्रीकृष्णांनी अर्जुनाला त्याने केलेली प्रतिज्ञा ही काही मर्यादेपर्यंतच पाळणे इष्ट आहे असे सांगितले, तेच सरळ वाटते. ती प्रतिज्ञा पुरी करण्यासाठी आपल्या वडील बंधूंवरच जर हत्यार चालविणे क्रमप्राप्त होत असेल तर ती प्रतिज्ञा झुगारून द्यावी ही श्रीकृष्णाची नीतीच अधिक प्रामाणिक, ठसठशीत आणि धर्मशील वाटते. गांधीजींनी न्यायालयातील अभियोग न लढविण्याचे ठरवून (Legal quibbing) 'कायदेशीर शब्दच्छल ' टाळला, पण अप्रमाण साधननिष्ठेने त्यांना जो अनेक वेळा नैतिक शब्दच्छल करावा लागला आहे त्याच्या मानाने पाहता कायदेशीर शब्दच्छल एकवेळ पुरवला असे वाटते !

जुन्या वादाचा निष्कर्ष

गौतम बुद्धाच्या वेळेला किंवा तत्पूर्वीपासूनही हिंसाहिंसेचे वाद या देशात अनेकशः झालेले आहेत, पण या ऐतिहासिक कालातील वादांमध्ये जीवदया आणि वैयक्तिक पापपुण्याची धार्मिक दृष्टी ही प्रमुख होती. अहिंसेचा हा सर्व वाद ज्ञानेश्वरीमध्ये एके ठिकाणी विस्तृतपणे आलेला आहे. पण ज्ञानेश्वरांना देखील शेवटी अहिंसेची व्याख्या कर्त्याच्या उद्देशावर अवलंबून ठेवून तो उद्देश लोककल्याणाचा असला पाहिजे असाच निष्कर्ष काढावा लागला आहे. " जगाचिया सुखोद्देशे । शरीर–वाचा–मानसे । राहटावे हेचि अहिंसे । रूप जाण ॥ " या एका ओवीत त्यांनी सर्व विवेचनाचे सार ग्रथित केले आहे. दुरुपयोग होईल हा आक्षेप घेतला तर त्यातून ज्ञानेश्वरही सुटणार नाहीत. कारण दुष्कृत्य करणारा दुष्ट मनुष्य देखील मी जगाच्या सुखोद्देशाकरिता वागत आहे असे म्हणू शकेल.

नवीन साधनेचे स्वरूप

धार्मिकदृष्ट्या पूर्वी या देशात झालेल्या वादाचे संकलन थोडक्यात गीतारहस्यामध्येही आलेले आहे पण गांधीजींनी या अहिंसा तत्त्वाला राजकीय मुक्तीचे

साधन म्हणून आणि जागतिक कलहाचे शमन करणारा रामबाण उपाय म्हणून नव्याने पुरस्कारिले. या नव्या स्वरूपामुळे जुन्या धार्मिक वादापेक्षाही निराळे असे वादाचे पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष निर्माण झाले त्यांचाच या लेखमालेमध्ये मुख्यत: परामर्श घेतलेला आहे. अहिंसा हे गांधीजींनी देशातील स्वराज्येच्छू लोकांपुढे त्या स्वराज्याचे साधन म्हणून पुढे केले असले तरी त्यांचे स्वत:चे मात्र ते साधन नसून साध्य होते. काँग्रेसवाले देशासाठी उपयुक्त म्हणून अहिंसा पत्करीत होते, तर उलट गांधीजींनी अहिंसा हीच देशापेक्षाही अधिक प्रिय मानली होती ! हिंदुस्थान देश हिंसेचा अनुयायी बनला तर कदाचित् तो देश आपण सोडूनही जाऊ असे आत्यंतिक उद्‌गार काढून त्यांनी हेच दर्शविले. हे उद्‌गार १९२० मध्ये म्हणजे राजकारणात या तत्त्वाचा प्रवेश करून देण्याच्या वेळीच त्यांनी काढले होते; असे :–

"If violence results from Non-Co-operation, or if Non-Co-operators resort to violence i. e. if India makes violence her creed and I have survived, I would not care to live in India. She will cease to evoke any pride in me."

'Young India'
Ist December, 1920,

मल्लीनाथीचे प्रकार

सत्य आणि अहिंसा या साधनांचा अप्रमाण आणि निरपवाद असा आग्रह धरला म्हणजे ती तत्त्वे प्रस्थापित करणे हेच एक महत्साध्य बनते. तत्त्वे धादांत फसल्याची उदाहरणे घडतात म्हणजे त्यांनी लोकहित किंवा लोकसंग्रह साधण्या-ऐवजी उलटाच प्रकार होण्याचे प्रसंग वारंवार येतात. अशा वेळी निरपवाद सत्य आणि अहिंसा या तत्त्वांना बाध येतो असे लोकाना उघड दिसते. तेव्हा लोकांच्या मनातील हा ग्रह काढून टाकण्यासाठी काही युक्त्या करणे अवश्य होते. त्यासाठी मग मल्लीनाथी, लटपट इत्यादी प्रकार कळत न कळत चालू होतात !" या मल्ली-नाथीचे प्रकार आता सर्वांच्या परिचयाचे झालेले आहेत. पण सकलितरीत्या त्यांची एकदा उजळणी विसराळूंसाठी तरी करणे अवश्य आहे. पहिली संपादणी अशी, हा सत्य-अहिंसेचा वरवर दिसणारा पराभव तात्पुरता असून असे अनेक पराभव घेत राहणे हेच अखेरच्या जयाचे साधन आहे, असे सांगण्यात येते. दुसरी संपादणी अशी की, पराजय होणे म्हणजे त्या तत्त्वाचा दोष नसून पराजित मनुष्य हा अपुरा आहे, तेव्हा पराजय ही आपल्या अपुरेपणाची खूण समजून आणि पराजय घेत राहणे हेच अपुरेपणातून पूर्णतेत जाण्याचे साधन समजून ते करीत रहावे असेही सांगण्यात येते. तिसरी मखलाशी अशी की, तो पराजय हाच मुळी नैतिक

जय आहे. आणि सत्य-अहिंसेचे भौतिक पराभव आणि नैतिक जय घेत घेत शेवटच्या पायरीला केव्हा तरी सत्य-अहिंसेचे भौतिक आणि नैतिक जय एकत्रित होतील. चौथी फसवणूक अशी की, या प्रयोगाच्या योगाने आपण आपला आत्मघात करून घेत असलो तरी त्या आत्मत्यागाने आपण जगाला मोठे मार्गदर्शन करीत आहोत आणि त्यातून मोठे जगकल्याण होणार आहे.

आत्मविरोधांची गुंतागुंत

निरपवाद सत्य–अहिंसा हे साधन लोकांना आचरण्यास सांगावयाचे आणि त्यायोगे फलप्राप्ती झाली नाही म्हणजे लोक अपुरे आणि अर्धवट होत असा मागाहून साक्षात्कार झाल्याचे दाखवावयाचे अशा यांच्या क्रमात काय होते ते पहा. प्रथम काही चांगले झाले तर ते प्रतिपक्षाच्या चांगुलपणामुळे झाले असले तरी किंवा परिस्थितीच्या परिपाकाने झाले असले तरी निरपवाद सत्य-अहिंसेचाच तो एकमेव परिणाम असे प्रतिपादन करावयाचे; तोपर्यन्त लोकांची पूर्णता किंवा अपूर्णता यांचा विचार नाही. ज्या क्षणापासून अपयशाला प्रारंभ झाला, त्या क्षणी लोकांच्या अपुरेपणाच्या सबबीचा उपयोग आपोआप चालू व्हावयाचा ! ही सर्व प्रतारणा करून काय पदरी पडते ते पहा. साधन हेच नवे साध्य बनून, ते नवे साध्य प्रस्थापित करण्याकरिता, जो शुद्ध आणि सरळ साधनांचा नियम पहिल्या पायरीला सांगितला तोच मुळी उधळला जातो ! म्हणजे पुनः शुद्ध साधने वापरावी हा नियमही त्याचा पुरस्कार करता करता बाधित होतो अशी ही एकप्रकारे आत्म-विरोधाच्या वलयांची गुंतागुंत आहे. ब्रिटिश राष्ट्राची मगरमिठी या राष्ट्रावर बसली असताना लोकांनी हे सर्व जंजाळ अगतिकतेने आणि इतर कसलेच खरे प्रभावी साधन सुलभ नसल्याने, चालवून घेतले ! म्हणजे हा गडबड गुंडा निमुटपणे चालवून आणि निभावून घेणे हे गौण साधन अपरिहार्य म्हणून व स्वातंत्र्याच्या साध्याकडे दृष्टी ठेवून राष्ट्राने पत्करले ! म्हणजे याही पायरीवर साधनशुद्धी न राहता चांगल्या साध्यासाठी गौण साधन निभावून घ्यावे असाच प्रकार झाला. आता स्वराज्यप्राप्तीनंतर पुनः हेच अप्रमाण व निरपवाद साधननिष्ठ लोक ते साधन स्वराज्यनंतरही पक्के करावे, यासाठी प्रयत्न करीत आहेत.

–– केसरी दि. ५–८–१९४९

सार्थ केळकरमत-विजय

आजच्या स्वरूपातील केसरी संस्थेचे विधाते आणि आद्य चालक गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांच्या लौकिक स्मृतीच्या वार्षिक गणनेने त्यांचा दुसरा स्मृतिदिन इंग्रजी दिनांकाप्रमाणे १४ ऑक्टोबरला झाला व पंचागाप्रमाणे तो दि. २१ ऑक्टोबर या दिवशी पडतो. आजच्या केसरी संस्थारूपी त्यांच्या सार्वजनिक कुटुंबातील आप्तांना लो. टिळकांबरोबर केळकरांची स्मृती ही तैलधारेप्रमाणे अखंड आहे आणि राहील. पण लौकिक दृष्टचा सार्वजनिक सोयीचा म्हणून वर्षदिन मानण्याचा प्रघात अशा आप्तांनाही व्यवहार्य ठरतो.

इंग्रजांचा पाय प्रत्यक्षपणे या देशातून निघाल्याने एक मोठा कालखंड संपला नि दुसरा चालू झाला. 'राजा कालस्य कारणम्' या न्यायाने केवळ राजकीयच नव्हे तर जीवनाच्या अनेकविध अंगांमध्ये हा नवा कालखंड चालू झाला. यांच्या संधिकालवर्षात नियतीने गांधी, जीना, भाई परमानंद, मुंजे आणि केळकर यांना जगन्नाटकाच्या जवनिकेत (पडद्यात) ओढून नेले. या झालेल्या घटनांचा खेद मानवी स्वभावानुसार ज्यांच्या ज्यांच्या अनुयायांना मोठ्या प्रमाणात पण इतरांनाही सामान्यतः वाटलाच.

अनेकांगी पुढारी

'इंग्रजांच्या या देशातील दीर्घकालीन घातक वर्चस्वाचे समूळ उच्चाटन करणे आणि पुनः देशाच्या स्वाभाविक जीवनाचे पुनुरुत्थान करण्याच्या भूमिकेवर देश यथायोग्यपणे आणून सोडणे, या एका विचाराने देशधुरीण १९४७ पूर्वीचो पन्नास-साठ वर्षे सदैव व्यग्र होते, त्या आपत्तीशी झगडणे आणि त्या आपत्तीतही भावी प्रगतीची बीजे जितकी रोवून ठेवता येतील तितको ठेवणे, या गोष्टीलाच देशातील ठळक व्यक्तींनी आपले मुख्य लक्ष्य मानले. या ठळक व्यक्तींपैकी काही केवळ राजकारणावर भर देणाऱ्या तर काही आपल्या शक्तीप्रमाणे एकेका प्रगतीच्या अंगावर आपले जीवन केंद्रित करणाऱ्या झाल्या.

पण जीवनाच्या बहुतेक किंवा सर्व अंगांचा परामर्ष घेऊन त्यांचे नियोजन, मार्गदर्शन आणि योगक्षेम यांच्याकडे पाहण्यास समर्थ अशाही काही विशेष व्यक्ती यांतून चमकल्या. गेल्या तीस वर्षांतील राष्ट्रीय जीवनामधील अनेक अंगांचा इतिहास जर गांधीजींना वगळून लिहावयाचा म्हटला तर लिहिता येणार नाही. रामावाचून रामायण लिहिण्यासारखे ते होईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे प्रांतिक

क्षेत्र घेतले तर याच तीस वर्षांच्या कालखंडाच्या अनेक क्षेत्रांतील इतिहास केळकरांना वगळून लिहू म्हणणे खोटे ठरेल.

दुर्दैवी मतसंघष

जुन्या काळच्या ज्योतिषावर गाढ विश्वास ठेवणाऱ्या एखाद्या मनुष्याचे जसे राजचे ग्रहमान पाहिल्यावाचून चालत नसे, तसेच या तीस वर्षांच्या काळात राष्ट्रीय क्षेत्रात गांधी काय म्हणतात आणि महाराष्ट्राच्या प्रांतिक क्षेत्रात केळकर काय म्हणतात याची दखल घेतल्याविना सार्वजनिक जीवनाचे पाऊल पडत नसे, असे स्थूलमानाने म्हणता येईल. या दोन क्षेत्रांतील हया सर्वस्पर्शी पुढाऱ्यांचा मतसमन्वय कधीच न होता सतत मतसंघर्षच झाला. एकमेकांसंबंधी प्रथम आदर आणि सदिच्छा भरपूर असताही हा संघर्ष उभयतांस टाळता आला नाही. शेवटी या विरोधाला हे दोघेही सत्प्रवृत पुरुष मनाने विटले.

गांधीजींसंबंधी शेवटची जी एक मुलाखत केळकरांनी दिली तिच्या प्रारंभी त्यांनी आपला निर्वेद व्यक्त केला आहे; कारण गांधीजींसंबधी, अपरिहार्य प्रसंग नसता, आगंतुकपणे काही बोलण्यामध्ये त्यांच्या भक्तांना कडू वाटणारे असे काही बोलणे येणारच. या मुलाखतीत गांधीजींचे गुणही केळकरांनी आपल्या मताप्रमाणे मान्य केले आहेत. पण नुसते गुणगान केले तर ती फसवणूक होईल आणि आपल्या मताप्रमाणे वाटतात ते दोष सांगितले तर 'गांधीनिंदक' म्हणून त्यांच्या भक्तांनी केळकरांची जी मनोमय 'कृष्ण' मूर्ती कल्पिली तिच्यावरच आणखी एक कोळशाचे पूट तेवढे चढणार ! अशी दुहेरी अडचण केळकरांना वाटली.

दोघांची तुल्य स्वमतनिष्ठा

या मुलाखतीत गांधीजींशी आपले कधीच जुळले नाही ही दुर्दैवाची गोष्ट म्हणूनच केळकरांनी सांगितली. उलट, केळकरांच्या निधनानंतर त्यांच्याविषयी गांधीजींनी काहीच कसे लिहिले नाही या चिंतेने व्यग्र होणारे पुण्यासही एक भोळसर चिंतातुर होतेच. त्यांच्या पाशाने शेवटी गांधींनी चार ओळी लिहून पाठवल्या; पण त्याही लिहून न लिहिल्यासारख्या होत्या; किंवा त्यात न लिहिलेलेच चाणाक्षाच्या मनश्चक्षूपुढे अधिक दिसणारे होते. आपला न्यायनिष्ठुर प्रामाणिकपणा आणि एका भक्ताने घातलेली गळ यातून मार्ग काढण्यास, अर्थशून्य लिहिणे हा एकच मार्ग गांधीजींना होता; कारण स्वमतप्रतिपादनाचे धैर्य घेतले तर गांधीजी आणि केळकर हे सारख्याच तोलाचे होते. मुझफ्फरनगरच्या एका परिषदेत पांढऱ्या टोप्यांचा सागर आणि गांधींचा पावलोपावली जयजयकार उसळत असताही तेथील भाषणात केळकरांनी सांगितले की, " Gandhiji is undoubtedly the greatest man in the world but he has not the monopoly of political wisdom."

(गांधीजी हे जगातले सर्वात थोर पुरुष हे खरे; पण राजकीय विवेकाचा मक्ता काही त्यांच्याकडे सोपवलेला नाही).

केळकर एकेक वाक्य इंग्रजीत बोलत होते आणि बॅ. असफअल्ली हे उर्दूत अनुवाद सांगत होते. तेव्हा वरील वाक्याचा अनुवाद सांगताना त्यांच्या अंगावर शिरशिरी आली आणि घशात आवंढा अडखळला. पण केळकरांनी शांतपणे आपला पुढील वाक्यौघ, त्यांचा अनुवाद संपताच चालू केला.

केळकरांचे प्राथमिक विजय

या संघर्षाच्या काळात जे केवळ माणसांची उंची मोजून आणि अनुयायांची संख्या मोजून ' मते ' ठरवणारे होते, त्यांच्यापुढे केळकर शून्यवत् ठरले ! मते हा शब्द आम्ही हेतुपूर्वक अवतरणात घातला आहे; कारण या लोकांच्या संचलन-स्वरूपी हातउचली नि तोंडपूजा या गोष्टींना 'मते' म्हणणेही चूक आहे. ज्यांना खरोखरच गांधीजींची मते पटली त्यांना केळकर शून्यवत् न होता मोठ्या अडसरा-सारखे किंवा त्यांच्या मार्गातील धोंड्यासारखे वाटले. त्यांनी केळकरांवर शाब्दिक प्रहार केले. त्यांचीच री ' मते ' नसणारांनी ओढली. या काळात संख्येने शेवटी केळकरांचा पराभव झाला. पण एकदा स्वराज्य पक्षाचे वेळी भारतीय क्षेत्रात आणि प्रतिसहकार पक्षाच्या वेळी प्रांतिक क्षेत्रात केळकर घसघशीतपणे यशस्वी झाले, ही गोष्ट कोणी दृष्टीआड करू नये.

१९२१ पासून सुबुद्ध महाराष्ट्रीय जीवनात केळकरयुग सुरू झाले. विवेक, तारतम्य, औचित्य, सावधानता, चौफेर दृष्टी, आत्यंतिक भावनेच्या वाऱ्यावर वाहून न जाता प्रत्येक विचार आणि साधन व्यावहारिक रोखठोक दृष्टीने पारखून घेण्याची चिकित्साबुद्धी हचा केळकरांच्या गुणविशेषांची छाप अनेक क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रात पडलेली दिसून आली. कोणत्याही क्षेत्रातील एकांगी विचार केळकरांनी मोडून काढला. मोघम भावनेला सार्वजनिक आवाहन करू पाहणारे लोक उरले नाहीत असे नाही. पण केळकरांनी सतत चालू ठेवलेल्या विवेकी बाण्याच्या प्रभावामुळे या लोकांना एका कोपऱ्यात हटावे लागले.

आंधळचा संख्याबलाची पूजा

विवेकाला विवेकानेच पराभूत करण्यात असमर्थ ठरलेले लोक शेवटी विवेकाचीच थट्टा करू लागले आणि केळकरांनी जाणत्या लोकांचे उघडलेले सार्वजनिक विवेकाचे डोळे धूळ फेकून किंवा फुंकर घालून मिटवण्याचे उद्योग कित्येकांनी केले. या आंधळचा प्रचारापुढे हार खाऊन केळकरांनी केव्हा तरी आपल्या विवेकबुद्धीचा निकष केवळ निर्वेदामुळे गुंडाळून ठेवावा अशा ईर्षेने हे प्रयत्न झाले. पण चोरांच्या

बाजारात मूल्यवान वस्तू मुठीत जशी घट्ट धरून ठेवावी, तसा केळकरांनी हा आपला विवेकाचा ठेवा शेवटपर्यंत राखला.

गतेतिहासात या गोष्टीमुळे या संघर्षातला एक हीनपणा आता स्पष्टच मांडलेला बरा. सुबुद्ध महाराष्ट्राला बौद्धिक भूमिकेवरून, केळकरांसारखे विवेचक बुद्धीचे पाठीराखे असेपर्यंत, पराभूत किंवा वश करणे शक्य नाही याची खूणगाठ मनोमन पटल्यामुळे शेवटी विवेकशून्यतेला उंचावून आंधळ्या संख्याबलाने केळकरांच्या विवेकाच्या क्षेत्राला डावलून वा दडपून मागे काढण्याचा प्रयत्न झाला. इंग्रजांनी, जाणते चळवळे वश होत नाहीत तेव्हा अजाणांना वश करून त्यांच्यावर मात करण्याची जी कारवाई केली तिच्या इतकेच हिडीस स्वरूप याही कारवाईला आहे. मात्र ब्रिटिशांचा हेतू अराष्ट्रीय आणि ही कारवाई करणाऱ्या स्वकीयांचा हेतू राष्ट्रीय होता. तसेच ब्रिटिशांच्या उद्धट अधिक्षेपाच्या पद्धतीपेक्षा थोडीशी हळुवार पद्धती स्वकीयांकडून या कामात उपयोजिली गेली. एरवी दूषित पूर्वग्रह उत्तेजित करण्याचे साधन दोघांनीही जवळजवळ सारखेच राबविले. त्यासाठी क्षणभर बुद्धिमंतांनीही आपली बुद्धी तीन पायऱ्या खाली उतरवून तिच्या जागी गावरानपणाला शृंगारून वर आणून बसविले.

लोकशाहीचे हीन स्वरूप

लोकशाही ही चांगली खरी; पण लोकशाहीचेही एक विकृत स्वरूप असते, त्याचे वर्णन मि. वेल्स यांनी पुढीलप्रमाणे केले आहे :–

"There is a base democracy just as there is a base aristrocracy, the swaggering aggressive disposition of the vulgar soul that admits neither superiors nor leaders. Its true name is insubordination; it resents rules and refinements, delicacies, differences and organizations, it dreams that its leaders are its delegates, it takes refuge from all superiority, all special knowledge, in a phautom ideal–People, the sublime and wonderful People."

खरी विवेकी लोकशाही कशी असावी याचे वर्णन सर राधाकृष्णन् यांनी "हिंदू जीवनदृष्टी" या पुस्तकामध्ये मार्मिकपणाने केले आहे ते असे :–

"Democracy is not the standardising of every one so as to abliterate all peculiarity. We cannot put our souls in uniform. That would be dictatorship. Democracy requires the equal right of all to the development of such capacity for good as nature has endowed them with. If we believe that every type means

something final, incaranating unique possibility; to destroy a type will be to create a void in the scheme of the world. Socicty is a living organism, one in origin and purpose, though manifold in its operations."

भस्मासुरी परिणाम

या उताऱ्यांचा संकलितपणे भावार्थ असा की, लोकशाहीत देखील एक कनिष्ठ प्रतीचा नमुना उत्पन्न होतो. त्यामध्ये लोकांच्या सर्वसाधारण कनिष्ठ पातळीहून उच्च काहीच नाही असे मानले जाते. लोक म्हणतील त्या साच्यात कोणतेही तारतम्य न मानता सर्वांना कोंबले पाहिजे, अशा प्रकारची तिची प्रवृत्ती असते. पुढारी म्हणजे आपल्या हातातली बाहुली असे ती समजते. ज्ञान किंवा कोणतीही उच्च गोष्ट डावलून लोकांचे भ्रामक आणि अद्‌भुत सामर्थ्य ही लोकशाही डोक्यावर घेते. पण याप्रमाणे सर्वांना एका साच्यात कोंबणे म्हणजे एकप्रकारे हुकूमशाहीच होईल. समाज ही एक सजीव वाढ आहे. तिचा हेतू एक असला तरी विविध रूपांनी समाजाच्या शक्ती प्रकट होत असतात. ही वैशिष्ट्ये नाहीशी करणे म्हणजे त्या समाजाला विफल करणे होय.

केळकरांना पराभूत करण्यासाठी अशीच विकृत लोकशाही, अंतिम आश्रय म्हणून, शेवटी त्यांच्या विरोधकांनी पत्करली. हिच्या प्रभावाने त्यांनी केवळ संख्याबलाचा विजय मिळविलाही; पण भस्मासुरासारखी ती उच्छृंखल लोकशाही पुढे आपल्या निर्मात्यांवरच उलटली. तिचे हे अनिष्ट स्वरूप अंशतः १९४२ साली व्यक्त झाले. पण ते संमिश्र असल्यामुळे मागाहून सारवासारवीने उजळ करता आले. तिचे अगदी नागडेउघडे स्वरूप १९४८ च्या फेब्रुवारीतील जाळपोळीत आणि घातपातात स्पष्ट झाले. स्वातंत्र्यप्रेम म्हणून १९४२ चा उद्रेक पुष्कळसा सोज्ज्वलपणाच्या पांघरुणात झाकता आला. १९४८ चा उद्रेक देखील गांधीप्रेमाच्या उदात्त कल्पनेने झाकण्याचा यत्न झाला नाही असे नाही, पण तो यत्न टिकला नाही. ही मोकाट सुटलेली वेडी लोकशाही कशी आवरावी याविषयी ती निर्माण करणारांना पंचाईत पडली, त्यांनाही अखेर हात टेकावे लागले.

नव्या घटनेतील डागडुजी

या विकृत लोकशाहीचे भय किंवा धसका नव्या राज्यघटनेतील सर्व-प्रौढ-मताधिकारामुळे निर्माण झाला. आता ते मान्य केलेले व्यापक मताधिकाराचे तत्त्व मागे घेता येत नाही, म्हणून राज्यघटनेच्या खालच्या टोकाला तो सार्वत्रिक मताधिकार नावाला कायम ठेवून, घाईघाईने वरच्या घटनेत प्रथम केलेल्या योजना बदलण्यात आल्या. सत्ता केंद्रित करण्यात आली आणि ही केंद्रे निवडलेल्या

माणसांच्या हातात ठेवण्याऐवजी नेमलेल्या लोकांच्या हातात ठेवण्यासाठी इष्ट ते बदल नव्या घटनेत करण्यात आले यांपैकी काही बदलांचे समर्थन करताना पं. नेहरूंनी स्पष्टच सांगितले की, गेल्या काही महिन्यांच्या अनुभवावरून आम्ही हे फरक सुचवीत आहोत. नेहरूंच्या या अनुभवामध्ये विकृत लोकशाहीचा काही महिन्यांत झालेला साक्षात्कार हाच प्रमुख असला पाहिजे. हे त्यांनी तितके स्पष्ट केले नसले तरी अनुमानाने सहज उमगण्यासारखे आहे.

या घटनेतील फेरबदलाच्या मुळाशी घटनेत अविवेकी सत्ता उत्पन्न न होता विवेकी सत्ता उत्पन्न व्हावी अशी काळजी आहे. केळकरांच्या विवेचकपणाला पराभूत करण्यासाठी ज्या अंधबळाचा उपयोग महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात करण्यात आला त्याचा उपयोग इतर प्रांतांतही निराळ्या कारणांनी थोडा थोडा झाला असला पाहिजे. म्हणूनच अविवेकी लोकशाहीला आळा कसा घालावयाचा याची विवंचना उत्पन्न झाली आणि त्यासाठी सोयीचे असे वेगळे घटनेचे पर्याय आदरणीय ठरले.

पण हे घटनात्मक उपाय, रोग झाल्यावर त्याला दाबून टाकणाऱ्या औषधांसारखे आहेत. मूळ सुबुद्ध विवेकी लोकशाही कशी निर्माण करावयाची हा प्रश्न त्यायोगे सुटत नाही. तो सोडवावयाचा असेल तर जी विवेचक बुद्धी तीस वर्षे केळकरांनी महाराष्ट्रामध्ये चिकाटीने आणि जयापजयाची क्षिती न बाळगता सतत अनेक क्षेत्रांत पेरली आणि जिची त्या वेळी कित्येकांना आपल्या राजकीय स्वार्थापुढे मोठी अडचण वाटली, तीच आता कृतज्ञता बुद्धी असेल तर केळकरांचे नाव घेऊन आणि नसेल तर ते मागे ठेवूनही कदाचित् याच लोकांना उत्पन्न करावी लागेल किंवा लागत आहे.

कृतज्ञतेचे क्रमप्राप्त कर्तव्य

आज विद्यार्थ्यांना, मजुरांना व मतदारांना अविचारी बेहोषपणापेक्षा विचाराच्या मर्यादा हव्या चांगल्या असे अनेक पर्यायांनी सत्ताधाऱ्यांना सांगावे लागत आहे. याच विवेचक बुद्धीचे 'अजीर्ण' केळकरांच्यामुळे महाराष्ट्रात झाले अशी कुरकूर याच मतप्रणालीमधल्या लोकांनी पूर्वी केली होती. म्हणून केळकरांनी अनेक क्षेत्रांत प्रगतीचे जे डोळस मार्ग दाखविले ते मार्ग अद्यापि इतिहासात गुंडाळून ठेवण्यासारखे झालेले नाहीत. पूर्वी केळकरांचे जे म्हणणे ऐकले नाही व जें लिहिणे वाचले नाही तेच आता उजळण्यासारखी वेळ निश्चित आलेली आहे. स्वराज्यानंतर सर्व कोरी पाटी होईल आणि आपल्यास हवे ते मनसोक्तपणे तिच्यावर लिहिता येईल ही आशा अनेक ठेचा खाऊन संपलेली आहे. 'ब्रिटिशांचे शेवटचे जहाज" या अचूक भविष्यवादी लेखात केळकरांनी १९४७ या वर्षी इंग्रज गेल्यानंतर काय परिस्थिती होईल याचे, १९३० मध्ये म्हणजे सतरा वर्षांपूर्वी,

संवादरूपाने केलेले दिग्दर्शन उदाहरणार्थ म्हणून आजही लोकांनी उघडून पहावे. त्यावरून आजच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यास अनेक बाबतींत केळकरांचे मार्गदर्शन काय होते हे पहाण्याची बुद्धी सहजच होईल.

धाडसी दूरदृष्टी

पुष्कळ वेळा आजचा तात्पुरता फड मारून नेणे आणि लोकांना शाश्वत हिताच्या दृष्टीने मार्गदर्शन करणे यांचा बिनतोड विरोध येतो. वेळ मारून नेण्याची कामचलाऊ दृष्टी ठेवली तर सवंग विजय लाभतो, पण चिर-मार्गदर्शनाचे काम गुंडाळून ठेवावे लागते. असा पेचप्रसंग केळकरांना गांधीयुगात सतत आला. त्या वेळी फड मारून नेण्याची नीती ज्यांनी पत्करली, त्यांनी आपल्या ठिकाणीच आपल्या बुद्धीचे मोठे कौतुक केले. त्यांना वाटले की, या वेळी निष्ठुरपणाने विवेकाच्या चौकटीत बसेल तेच बोलण्याने विजय हातचा जातो ही साधी गोष्ट केळकरांना कशी कळत नाही ! केळकरांच्यापेक्षा आपण अधिक चाणाक्ष व समयज्ञानी ठरलो किंवा आहोच असा कित्येकांना भ्रम झाला. पण ही साधी गोष्ट न कळण्याइतके केळकर निर्बुद्ध खास नव्हते. त्यांनी दूरवर विचार करून विवेकासाठी आणि स्थायी लोकहितासाठी उघड्या डोळ्यांनी तात्कालिक पराजय पत्करला. याचे एक उदाहरण देतो. १९२७ मध्ये पं. नेहरू यांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातून 'ब्रिटिशांचा संबंध तोडून पूर्ण स्वातंत्र्य' हा ध्येयवाद आणला. सर्वच त्या वेळी उत्साहित झाले. अशा वेळी तात्यासाहेबांनी एका भाषणात सांगितले की, " कितीही दूरवर दृष्टी फेकली तरी मला, दूरच्या क्षितिजावर देखील, ब्रिटिशांचा संबंध पूर्णपणे तुटलेले हिंदुस्थान दिसत नाही, " या वेळी केळकरांचे हे म्हणणे युक्तिवादाने खोडून काढण्यासारखे नसले तरी, 'हे ते कशाला बोलले ?' असे त्यांच्या कित्येक अनुयायांनादेखील वाटले. त्या वेळी अर्थातच 'सर्व लोक विरुद्ध एकटे केळकर' असा हा प्रसंग होता. त्यात नेहरूंचा प्रचंड विजय झाला, पण आज ब्रिटिश राष्ट्रकुलाशी, अनेक शाब्दिक वळणे घेऊन, संबंध चालू ठेवण्याची त्याच नेहरूंची धडपड पहात असताना तरी केळकरांच्या धाडसी दूरदर्शीपणाची आठवण न करणे कृतघ्नपणाचे ठरेल.

जयापजयाची आंदोलने

मतांचा जय आणि माणसांचा पराभव असाही विरोधाभास सार्वजनिक जीवनात होत असतो. उदाहरणार्थ, अलीकडे निघालेल्या धर्मातीतपणाच्या रक्षणाची काळजी घेणा-या एका लेखकाने म्हटले आहे की, हिंदुमहासभेचा पराभव झाला असला तरी तिच्या तत्त्वाचा जय होत चालला आहे. त्याला उदाहरणे म्हणून त्याने हिंदी आणि नागरीचा स्वीकार, भारत या नावाचा स्वीकार, महत्त्वाच्या मूलभूत उद्योगधंद्यांतून पाकिस्तानी लोकांचे उच्चाटन, इत्यादी गोष्टी दाखविल्या

आहेत. त्याचप्रमाणे केळकर हे जरी व्यक्तिशः किंवा पक्षशः शेवटी पराभूत झाले. तरी केळकरांच्या अनेक तत्त्वांचा विजय हा निश्चितपणे झालेला आहे. उलट' गांधीजींच्या जीवनात त्यांनी वैयक्तिक पुढारीपणात यशाचे शिखर गाठले असले तरी गांधींच्या तत्त्वानुसार आजचा कोणताच राज्यव्यवहार चालू नाही. नावाचा जयजयकार वा उच्चार काय तो चालू आहे. एकाच वेळी तात्कालिक आणि भविष्य-कालीन अशा दोन यशांची टोके गाठणे बहुतांशी दुरापास्त वाटते. म्हणून जया-पजयांची ही पारडी कालक्रमाने उलटीसुलटी फिरतात. ज्यांनी भावी कालाच्या दृष्टीने तात्पुरते अप्रिय आणि कटू असे मतप्रतिपादन पत्करले आणि त्याचा परिणाम पराभवरूपाने आपल्या जीवनात निर्धाराने सोसला त्यांना त्याच्या विनिमयात कालाच्या पलीकडच्या दुसऱ्या पारडचात न्यायबुद्धीने भारंभार मान्यता मिळणे न्याय्यच आहे. म्हणून केळकर-मतप्रणाली आज अनेकशः स्वीकार्य झाली आहे, हे मोकळचा मनाने पूर्वीच्या विरोधकांनाही मान्य करावयास हवे.

— केसरी, १८-१०-१९४९

संकीर्ण विनोद विमर्ष

अज्ञान आणि अतिरेक यांनी होणारी विनोदाची उत्पत्ती

अज्ञानाच्या प्रदर्शनामुळे किंवा आविष्कारामुळे उत्पन्न होणाऱ्या विनोदाचा एक वेगळा वर्ग कल्पिता येईल. विशिष्ट ज्ञानशाखेमध्ये ज्ञानी असलेला मनुष्य देखील इतर ज्ञानशाखांमध्ये अनभिज्ञ असेल आणि त्या अनभिज्ञतेचे अभावितपणे तो प्रदर्शन करील तर त्यातल्या ज्ञानी माणसांना त्याचे हसू येण्याचा संभव आहे. ही अनभिज्ञता त्याची त्याला दिसून आल्यावर त्यालाही त्यातला विनोद उमगेल. अनवधान किंवा विस्मरण यांच्या योगानेही जाणत्या माणसाच्या बोलण्यात व कृतीत क्षणैक अज्ञान दिसेल. अवधान किंवा स्मरण झाल्यावर त्याचे त्यालाच हसू येईल. अज्ञानीपणा लहान मुलात, अडाणी किंवा अशिक्षित माणसात, पूर्ण वेडचात किंवा अर्धवट वेडचातही दिसतो. विस्मरण व अनवधान हे क्षणिक अज्ञान असते. वेडचांचे अज्ञान त्याच्या मानसिक विकृतीमुळे उत्पन्न होते.

बालकांचा विनोद

लहान मुले आपल्या अल्प ज्ञानाच्या आधारावर चुकीची अनुमाने करतात; म्हणजे आपल्या परीने ती डोके किंवा शहाणपण चालवीत असतात. काही दंडक किंवा नियम मुलांना घालून दिले असता, त्यातील हेतू न समजल्याने बाहचतः नियम पालन करण्याच्या त्यांच्या वृत्तीने विनोदी प्रसंग येतो. दुसरीकडे जेवावयास गेले असता, 'वाढू का' असे विचारले तर 'नको नको' म्हणावे, हावरेपणाने मागू नये, असे मुलांना सांगितलेले असते. 'मुला, लाडू घालू का' असे वाढणाऱ्याने विचारले असता, 'नको' म्हणण्याचा दंडक व खाण्याची इच्छा यांच्या विरोधात मूल सापडते व पटकन् बोलून जाते की, "आईने नको म्हणावयास सांगितले आहे!" डोहाळ-जेवण किंवा श्राद्ध यांतला अर्थ न समजता, त्यात गोड खायला मिळते' एवढाच त्यातला ग्राह्य भाग उमगून, 'दरमहा श्राद्ध किंवा डोहाळ-जेवण का करीत नाही?' अशासारखे प्रश्न मुले विचारतात. मुलांच्या अज्ञानाने व अप्रयोजकपणामुळे त्यांच्या आईबापांवर किंवा पालकांवर अवघडपणा उत्पन्न करणारे प्रसंग येतात.

विद्यार्थ्यांचे प्रश्नोत्तरी विनोद

परीक्षांच्या उत्तरपत्रिकांतून विद्यार्थी आपले अज्ञान झाकण्यासाठी काहीतरी डोके चालवून जी उत्तरे देतात त्यांना इंग्रजीमध्ये 'हाऊलर्स' असा शब्द रूढ झाला

आहे. त्याला बरोबर मराठी प्रतिशब्द रूढ झाला नाही. 'हाऊलर्स' हा शब्दही मोठा अन्वर्थक आहे असे नाही. 'हाऊल' म्हणजे मोठा व कर्कश आवाज काढणे. जनावरांच्या किंवा वाऱ्याने उत्पन्न होणाऱ्या आवाजाला 'हाऊल' हे नाव दिले जाते. दक्षिण अमेरिकेतील कर्कश आवाज काढणाऱ्या एका जातीच्या माकडाला प्रथम 'हाऊलर' हे नाव रूढ झाले. पुढे ते 'घोडचूक' या अर्थाने रूढ झाले. पण ढोबळ चूक एवढाच त्याचा अर्थ राहिला नाही. सर्वच चुकीची उत्तरे हास्यास्पदच होतील असे नाही. इजिप्त देश आफ्रिका खंडाच्या दक्षिणेकडे आहे असे म्हटले किंवा मलिकंबर हा शिवाजीचा मंत्री होता असे म्हटले तर ढोबळ चूक होईल पण त्यापेक्षासुद्धा आपले अज्ञान झाकण्यासाठी काहीतरी डोके चालवून वेडेवाकडे उत्तर देण्याने जी चूक होते ती अधिक हास्यकारी असते. ढोबळ चुकांपेक्षाही असल्या अज्ञान झाकण्याच्या धडपडीमुळे हास्यास्पद होणाऱ्या उत्तरांना 'हाऊलर' हा विशेष शब्द लागू करण्यात येतो. उत्तर-प्रमाद, उत्तराभास, मूढोत्तर किंवा अज्ञानोत्तर असा काही प्रतिशब्द 'हाऊलर' या शब्दाला देता येईल. 'खंडांची नावे सांगा' या प्रश्नाला उत्तर 'श्रीखंड, वेखंड व दोरखंड' असे सांगून एक विनोदी चुटका विद्यार्थ्यांनीच बनवला आहे शालेय परीक्षांच्या इतिवृत्तांमध्ये कधीकधी परीक्षक या उत्तर-प्रमादांचे हास्यास्पद नमुने उद्धृत करीत असतात. अभ्यास करण्याचा आळस व परीक्षेमध्ये दडपून सुचेल ते उत्तर लिहिण्याची प्रवृत्ती यांमुळे या उत्तर-प्रमादांची उत्पत्ती होते. त्यातले अज्ञान आश्चर्यकारक असते व अज्ञान झाकण्याची वृत्ती अनपेक्षित व विनोदी अशा उत्तरांना कारण होत असते.

विनोदी व्याख्यांचे नमुने

उत्तर-प्रमाद म्हणून चुकीच्या व्याख्या पुढे येतात, पण मुद्दाम एखाद्या गोष्टीचे व्यंग दाखवण्यासाठीही चुकीच्या किंवा वेडयावाकडया व्याख्या करण्यात येतात. खोटे बोलण्यासाठी पगार देऊन परराष्ट्रात पाठवलेला मनुष्य म्हणजे राजदूत' अशी डॉ. जॉनसन् यांनी केलेली व्याख्या प्रसिद्ध आहे. 'रोज सकाळी कोणीतरी मुलाखत घेण्यास ज्याच्याकडे येतो तो पुढारी' किंवा "नेहमीच 'आणीबाणी'ची वेळ जो पुकारीत राहतो तो पुढारी" अशा व्याख्या या अज्ञानाने केलेल्या नसून त्या गोष्टीचे व्यंग काढण्यासाठी केलेल्या असतात. अध्यक्ष म्हणजे वक्त्याचे भाषण न ऐकणारा सभेतील एकमेव मनुष्य; स्वयंसेवक म्हणजे स्वतःची सेवा करण्यात म्हणजे वेष ठाकठीक ठेवण्यात जो बराचसा वेळ खर्च करतो तो, अशा प्रकारे दोषदर्शक व्याख्या मुद्दाम करतात. त्यामध्ये अज्ञान हे कारण नसून दोषदर्शनाचा हेतू हे कारण असते. क्वचित् चुकीने दिलेले उत्तर हे अभावितपणे व्यंगदर्शक होते. 'एकच पत्नी असण्याच्या समाजनियमाला काय म्हणतात?" अशा इंग्रजी प्रश्नाला 'मोनोगामी' असे उत्तर देण्याऐवजी 'मोनोटोनी' म्हणजे खऱ्या अर्थाने कंटाळ-

वाणेपणा – असे उत्तर विद्यार्थ्याने दिले. ते केवळ चुकीमुळे विनोदकारी नसून त्यातून अभावितपणे जे व्यंग दर्शविले गेले त्यामुळे आहे. विडंबनाचा हेतू नसताही प्रमादामुळे अनपेक्षितपणे येथे विडंबन झाले आहे.

मोठ्यांचे अज्ञान

ज्ञानी पण एककल्ली अशा संशोधकांचा वा प्राध्यापकांचा सामान्य गोष्टी-तील अडाणीपणा अथवा विसरभोळेपणा यांच्यामुळे त्यांची उक्ती किंवा कृती विनोदाला कारण होते. त्यांची सर्व बुद्धी त्यांच्या अभ्यासविषयात गढलेली व केंद्रित झालेली असते. गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढणारा शास्त्रज्ञ पंडित ऐझॅक न्यूटन याची दोन लाडकी मांजरे होती. एक लहान व एक मोठे होते. तो अभ्यासासाठी एकांत मिळावा म्हणून आपल्या खोलीचे दार बंद करून घेई. पण या लाडक्या मांजरांना आत येण्यासाठी त्याने दाराला एक मोठे व एक छोटे भोक करून ठेवले होते. एकच मोठे भोक करून ठेवले तर त्यातून दोन्ही मांजरे येऊ शकतील हा सामान्य विचार त्याला सुचला नाही.

वेडातील अकल्पित शहाणपण

पूर्णपणे वेडी माणसेही चुकून शहाणपणा करतात किंवा शहाण्या माणसाची अभावितपणे फजिती करतात. वेड्यांच्या उपचार-गृहातील व्यवस्था पाहण्यासाठी एक जाणता मनुष्य गेला होता. तिथे हिंडत असता एक वेडा त्याच्याकडे सारखा टक लावून पहात होता. शेवटी त्या माणसाला जिज्ञासा उत्पन्न झाली की, हा एक वेडा आपल्याकडे सारखा का पहात आहे ? पुढे जाऊन त्या वेड्याला त्याने याचे कारण विचारले. तेव्हा तो वेडा म्हणाला, " इतके दिवस मी येथे अडकून पडलो आहे, पण तू माझ्यासारखाच दिसत असताना तुला या लोकांनी आजवर कसे धरून येथे आणले नाही, याचे मी आश्चर्य करीत आहे व तुझ्यात वेगळे काय आहे हे न्याहाळून पाहण्याचा प्रयत्न करीत आहे ! " निष्कारण जिज्ञासेने या वेड्याला पृच्छा करणारा जाणता मनुष्य या वेड्याने अभावितपणे वेडा ठरविला.

गेल्या महायुद्धाच्या वेळी हिटलरविरुद्ध अनेक खऱ्या किंवा काल्पनिक निंदाव्यंजक गोष्टी प्रसृत केल्या जात होत्या. त्यांतलीच एक हिटलरने वेड्यांच्या उपचारगृहाला भेट दिल्याची कथा आहे. या सर्व वेड्यांना रांगेमध्ये हिटलरपुढे उभे राहून सलामी देण्यास पढवले होते. पण एक वेडा रांगेतून फुटून बाजूला उभा राहिला. त्याला हिटलरने " तू बाजूला का उभा राहिलास ? " असे विचारले तेव्हा त्याने उत्तर दिले की, " मी हिटलर नसल्यामुळे बाजूला उभा राहिलो

आहे !" ही गोष्ट खरीच घडली असेल तर असा संभव वाटतो की, "मी या लोकांसारखा वेडा नाही." असेच त्या वेडचाला म्हणावयाचे होते. वेडी माणसे-देखील "लोक मला वेडा म्हणतात पण मी वेडा नाही." असे आग्रहपूर्वक सांगणारी पुष्कळदा असतात. हिटलर येणार म्हणून या वेडचांची सरळ रांगेत उभे करण्याची रंगीत तालीम अनेक वेळा होऊन हिटलरचे नाव त्याच्या कानावर वारंवार पडले होते तेच चुकून त्याच्या तोंडात आले. "मी वेडा नाही" असे म्हणण्याच्या ऐवजी "मी हिटलर नाही" असे तो म्हणून गेला

ज्ञानाची हास्यास्पद सोंगे

जगव्यवहारात इतररीत्या सज्ञान असलेली माणसे पात्रतेच्या व ज्ञानकक्षेच्या पलीकडचे काम अंगावर घेतात. मग त्या स्थानाच्या पात्रतेचे सोंग त्यांना करावे लागते. पुस्तकी शिक्षण न घेतलेली पण व्यापारधंद्यातली श्रीमंत माणसे स्थानिक स्वराज्यामध्ये अधिकाराच्या स्थानी येऊ शकतात. निदान इंग्रजी राज्यात तरी ती येऊ शकत. प्रवेशपरीक्षा (शालान्त) पास झालेल्या लोकांकडून एका स्थानिक स्वराज्यातल्या नोकरीसाठी अर्ज मागवले होते. त्यांत एका पदवीधराने पदवी-परीक्षेचे प्रमाणपत्र जोडून पाठवले होते 'पण प्रवेश-परीक्षेचे प्रमाणपत्रं का पाठवले नाही ?' असे विचारणारे जुन्या इंग्रजी काळात अधिकारारूढ लोकनियुक्त लोक निर्माण झाले होते. पुस्तकी शिक्षण फारसे न मिळालेल्या पण व्यापारधंद्यातील प्रतिष्ठेमुळे शाळांची पाहणी करण्याचा अधिकार प्राप्त झालेल्या एका लोकनियुक्ता-वर शाळेच्या शेरे-बुकात शुद्धलेखनासंबंधी शेरा देण्याचा प्रसंग आला असता त्याने 'सूद लेकन साद्रण हाय' असा शेरा लिहिल्याची गोष्ट मागील पिढीत सांगत असत. आगगाडीच्या प्रवासात प्रतिष्ठित लोक इंग्रजी वृत्तपत्रे वाचतात, त्याचे अनुकरण करून ते वृत्तपत्र हातात उलटे धरून, जाणत्या माणसांमध्ये हास्यविषय झालेल्या इंग्रजी-अनभिज्ञ माणसाची कथाही गेल्या पिढीत सांगितली जात होती.

अतिरेकाने विनोदाची निर्मिती

'अति तेथे माती' अशी म्हण रूढ आहे. कोणतीही चांगली गोष्ट देखील योग्य मर्यादेपलीकडे गेली म्हणजे जी विकृती दिसू लागते ती अतिरेकाची किंवा अतिशयोक्तीची होय. काही निरुपद्रवी पण अयोग्य असा अतिरेक झाला म्हणजे हास्यास्पदाला उत्पन्न होतो. 'अति तेथे हास्यनिर्मिती' अशीही म्हण निर्माण करता येईल. अति सोवळेपणा, अति काटकसरीपणा, अति आळशीपणा, अति प्रशंसा, अति आदरभाव इत्यादींनी होणारे व कल्पिलेले विनोदप्रसंग सर्वांच्या परि-चयाचे आहेत. इंग्रजीमध्ये ज्यू व स्कॉच यांच्या चिक्कूपणावर आधारलेले अनेक विनोदी चुटके रूढ आहेत. कै. तात्यासाहेब केळकर यांनी गीतेसंबंधाने आदरभाव

पराकोटीला नेणारे ' गीता-राव ' हे पात्र निर्माण करून त्यावर एक विनोदी लेख लिहिला आहे. जाहिरातींमध्ये स्त्रियांच्या चित्रांचा अतिरेक होतो तो पाहून एकाने अशी व्याख्या केली की, ' जाहिरात म्हणजे स्त्रीचे चित्र देऊन प्रसिद्ध केलेली माहिती किंवा वस्तु-प्रशंसा. ' औषधांच्या प्रशंसेचे एकाने पुढीलप्रमाणे विडंबन केले आहे. केस काळे करणाऱ्या औषधामुळे म्हाताऱ्याचे पांढरे केस तर काळे झालेच, पण डोक्याला गुंडाळलेल्या धाबळीचेही कांबळे झाले. जखम बरी करणारे औषध लावले असता कुत्र्याचे तुटलेले शेपूट पुनः आले, इतकेच नव्हे तर शेपटाच्या तुकड्याला औषध लावल्याने शेपटाला कुत्रे आले !

विनोदाचा एक उपयोग

दोषाचा अतिरेक असंभाव्य कोटीपर्यंत गेलेला दाखवून सूक्ष्म दोषाचे स्वरूप वाचकांच्या लक्षात आणण्याचा हेतू साध्य होतो. रोगाचे सहजासहजी न दिसणारे जंतू मोठे करून दाखविणारी सूक्ष्मदर्शक काच जशी उपयुक्त ठरते, तसा अतिशयोक्तीने केलेल्या उपहासाचा उपयोग होतो. चांगल्या गोष्टींचा देखील अतिरेक मूळात सूक्ष्म असेल तर तो उमगण्यासाठी असंभाव्य अतिरेकाने त्याचा उपहास करणें हा उपाय आहे. कै. केळकरांनी निर्माण केलेले ' गीतारात्र ' हे ' तागी ' मुकटा उलटा नेसत ! ' तागी ' शब्दाच्या उलट ' गीता ' हा प्रिय असलेला शब्द ध्वनित होईल यासाठी ही गोष्ट ते करीत. हा विनोद असंभाव्यतेच्या कोटीपर्यंत नेलेला आहे. पण त्यायोगे गीताप्रेमाचा किंचित् होणारा अतिरेक मोठा करून दाखवला आहे. जे स्पष्टपणे म्हणणे बरे दिसणार नाही किंवा कदाचित् पटणार नाही, ते विनोदाच्या साधनाने सूचित केल्याने उमगेल व पटेल, असे प्रसंग येतात. चांगल्या गोष्टीचा प्रचार हिरीरीने किंचित प्रमाणाबाहेर होऊ लागला, म्हणजे तो आणखी पुढे पराकोटीला नेऊन त्याचे विडंबन होऊ लागते. या अत्युक्तीच्या उपहासाने मूळचा सूक्ष्म अतिरेक मोठा करून लोकांना पटवण्याचा हेतू विनोदी लेखक साधतात.

व्यंगचित्रातील अतिशयोक्ती

व्यंगचित्रे काढणारे चित्रकार देखील, त्या चित्रांचा विषय असलेल्या माणसामध्ये किंचित् उमगणारे जे वैशिष्ट्य असेल ते मोठे करून दाखवतात. मरहूम बॅ. जिना हे उंच व किडकिडीत होते. त्यांच्या संबंधाच्या विडंबक चित्रात ते अधिक किडकिडीत व उंच काढीत असत. श्री. चिंतामणराव देशमुख यांचे तरतरीत नाक हे वैशिष्ट्य आहे, पण विडंबक चित्रात ते मुळापेक्षा वाढवलेले असते. पं. नेहरूंचा खालचा ओठ किंचित पुढे आहे; तो व्यंगचित्रांमध्ये अधिक पुढे काढून दाखवलेला असतो. कै. डॉ. मुंजे यांची दाढी हे वैशिष्ट्य होते. व्यंगचित्रकार विनोदासाठी तिचे प्रमाण वाढवून ती चितारीत. केवळ विनोदी चित्रांनी लोकांना प्रिय

झालेले विलायतेतील 'पंच' हे पत्र होते. पुढें 'पंच' याचा अर्थच मुळी 'विनोदी चित्रांचे वृत्तपत्र' असा झाला. त्यावरून 'हिंदू पंच', 'हिंदी पंच', 'गुजराथी पंच' अशी वृत्तपत्रे राष्ट्रीय चळवळीच्या चालू शतक रंभीच्या काळात निघाली होती. अलीकडे दिल्लीचे 'शंकर्स वीकली' हे अशाच व्यंगचित्रांमुळे लोकप्रिय झालेले आहे. सूक्ष्म दोष मोठे करून त्यातला दोषाचा अंश लोकांच्या नजरेस आणणे हा पुष्कळच व्यंगचित्रांतला हेतू असतो. जे स्पष्ट बोलणे अवघड वाटेल ते चित्ररूप अगर वाक्यरूप विनोदाच्या आडपडद्याने दाखविता येते.

विनोद छटा

भौतिक जीवनामध्ये मोठ्या प्रमाणावर यांत्रिक साधनाने वस्तुनिर्मिती होऊ लागली, त्याच धर्तीवर विनोद-छटांची घाऊक व व्यापारी हेतूने निर्मिती सध्या होत आहे. सर्वच वाङमयामध्ये ही घाऊक व व्यापारी निर्मिती होत आहे. लघुकथांचे संच निरनिराळ्या प्रदेशात छापण्याचे हक्क विकणाऱ्या संस्था आहेत. तसेच माहितीचे लहानमोठे सचित्र लेख घाऊक विकणाऱ्या संस्था निघाल्या आहेत. या सर्वांमध्ये विनोदाची व्यापारी व घाऊक निर्मिती फार मोठ्या प्रमाणावर होऊ शकते. शहरी आयुष्यात राहत्या जागेचा संकोच असल्यामुळे छोट्या जागेत घडीने बसणाऱ्या वस्तूंची उपयुक्तता वाढली व त्यासाठी तशी थोडकी जागा अडविणाऱ्या वस्तूंची निर्मिती होऊ लागली. तसेच सध्याच्या घाईगर्दीच्या जीवनात ज्यांना वाचन करण्यास अगदी थोडा व धावता काल मिळतो. अशांची संख्या मोठी आहे. त्यांच्यासाठी संक्षिप्त विनोदांची सचित्र निर्मिती मुख्यतः झाली आहे. विनोदाचे मूळ कारण म्हणजे 'विकृती' या अनेक प्रकारच्या विकृतींचे एकेक सूक्ष्म बीज वेगळे काढून यामध्ये थोडक्यात मांडलेले असते. विनोदमूलक विकृतींचे जे वर्ग मांडता येतात त्यांमध्ये एकेक विनोद-छटा कोणत्या वर्गात बसते हे पाहणे बोधक ठरेल. अज्ञान, खोटी प्रौढी, विडंबनेच्छा, दोष झाकण्याचा प्रयत्न, आत्मविरोध, स्वभाववैचित्र्य, किंवा स्वभावाचा व्यत्यास, अनपेक्षित धूर्तता वा अनपेक्षित मूर्खता इत्यादी अनेक विकृतींच्या प्रकारांची सूक्ष्मात सुक्ष्म बीजे या घाऊक विनोद-छटांमध्ये दिसून येतात. नाट्यविषयाची जशी पूर्वी एकेरी व आटोपशीर अशी 'नाट्यछटा' निर्माण झाली, तशीच चुटक्यांपेक्षाही लहान अशा या विनोदछटांची टांकसाळच सध्या वृत्तपत्र-सृष्टीत चालू आहे.

गंभीर वाचनात तोंडी लावणे

विनोदाची ही बोचक कुसळेच म्हणावयाची. समाज व गृहव्यवस्था यांच्यातील चाली व संकेत माहीत असतील त्यालाच हा विनोद उमगणे शक्य असते. त्यातही त्याची छटा इतकी सूक्ष्म असते की, तोंडावर स्मिताची किंचित छटा

तेवढी उमटेल. खो खो हसण्यासारखा यात विनोद नसतो. क्षणभर मनाला गुदगुली होते व विनोदलहर चमकून जाते. स्मृतीमध्येही ती फार वेळ रहात नाही. गंभीर मजकुराच्या वाचनाचा वीट आला असेल तर तो घालवण्यापुरते हे विनोदाचे तोंडी लावणे असते. जड पक्वान्नांनी व खाद्यपदार्थांनी भरलेल्या ताटांमध्ये अगदी कडेला जशा चटण्या-कोशिंबिरी असतात, तशाच प्रकारे वृत्तपत्रांच्या पृष्ठांच्या टोकाला छटांची ही चित्रे उपयोगात आणतात.

घाऊक विनोदाचा व्यापार

भौतिक शास्त्रामध्ये कोणत्याही वस्तूंचे पृथक्करण करून त्यातील अगदी सूक्ष्म अणुपरमाणू शोधून वेगळे काढण्याची प्रवृत्ती आहे. याच पृथक्करणाचा आणि विश्लेषणाचा मार्ग सामाजिक व मानवी शास्त्रांमध्ये आला आहे. विनोदाच्या सूक्ष्म छटा या वेगळ्या काढून, दोन-तीन चित्रांत वा एकाच चित्रात मांडण्याची प्रथा सध्या प्रचलित झाली आहे. एकच प्रसंग व त्यातील एकच उत्तर-प्रत्युत्तर असे तीन किंवा चार विनोदी चित्रांत समाविष्ट करून त्याचे शेकडो पर्याय दैनिकातून रोज एक याप्रमाणे क्रमशः देण्याची कल्पना आता रूढ व सवयीची झाली आहे. या विनोदी चित्रांचा घाऊक व्यापारही सुरू झालेला आहे. शेकड्यांनी किंवा हजारोंनी अशा चित्रांचे साचे तयार करून ते वृत्तपत्रांना घाऊकपणे विकणाऱ्या संस्थांनी विनोद-छटांचा हा व्यापारच चालू केला आहे. किंचित् अनपेक्षित असे प्रत्युत्तर, आत्मविरोधाचा प्रसंग, वेडेपणाच्या किंवा आचरटपणाच्या छटा व्यक्तविणारे घरगुती प्रसंग यांमध्ये असतात. ' टाइम्स ' मधील प्रसिद्ध ' पॉप ' चित्रमालिका हे याचे नमुनेदार उदाहरण सांगता येईल. पाश्चात्त्य जीवनात उत्पन्न झालेल्या विनोदछटांची चित्रमाला पाहून भारतीय पत्रांनी भारतीय जीवनात अशाच प्रकारे सूक्ष्म विनोदाचे प्रसंग वा उत्तर-प्रत्युत्तरे यांची क्रमशः चित्ररूपाने मांडणी करण्याचा उपक्रम चालू केला आहे. वाङ्मयातील परिचित विनोदी व्यक्तिरेखां-मुळे बंडूनाना व पांडूतात्या, दाजी, गुंड्याभाऊ इत्यादी काल्पनिक व्यक्ती विनोदी लेखकांनी सजीव व परिचित केल्या, तशाच ' पॉप ' सारख्या विनोदी व्यक्ती या चित्रांनी परिचित केल्या.

विनोदी आरसे-महाल

विलासी लोक आनंदासाठी आरसे-महाल बांधीत, पण विनोद-निर्मितीसाठी विकृत प्रतिबिंबे दाखविणाऱ्या आरशांचा महाल असतो. याला ' लाफिंग गॅलरी ' किंवा ' हशाचे दालन ' म्हणतात. सरळ-सपाट आरशात आपण आपल्याला पाहिले तर हसू येत नाही. पण नाना प्रकारे वेड्यावाकड्या आरशांमुळे प्रतिबिंबात अनेक तऱ्हेच्या विकृती उत्पन्न होतात. शरीराचा कोठला तरी भाग प्रमाणाबाहेर मोठा

झालेला दिसतो. विकृतीची अनुभूती म्हणजे विनोद, ही व्याख्या अशा हास्योत्पादक आरसे-महालात अधिक पटते. सरळ रूप दाखविणाऱ्या आरशाचा प्रकार एक, पण विकृत रूप दाखविणाऱ्या आरशांचे प्रकार अनेक किंवा असंख्य असू शकतात. तसेच विनोदांच्या प्रकारांचे आहे. म्हणून विनोदाचे वर्गीकरण करून त्याचे उदाहरणांनी स्पष्टीकरण करण्यासाठी केलेले लेखनही हवे तितके लांबवता येईल. पण त्यायोगे ते कंटाळवाणेही वाटू लागेल. अर्थात् कोठेतरी मर्यादातिक्रम न करता थांबले पाहिजे, म्हणून ही लेखमाला येथेच थांबवली आहे.

—प्रसाद, जुलै १९५७

मृत्युंजय सावरकर

भारतीय स्वातंत्र्यार्थ सशस्त्र क्रांतिवादाचे प्रणेते आणि जयिष्णू हिंदुराष्ट्र-वादाचे अध्वर्यू स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर यांचा ७७ वा वाढदिवस गेल्या दि. २८ मे या दिवशी अनेक ठिकाणी हिंदुत्वनिष्ठांनी साजरा केला. त्यांच्या वयाच्या २८ व्या वर्षी ब्रिटिश राज्याने त्यांना दोन जन्मठेपींची, एकामागून एक भोगावयाची शिक्षा दिली. त्या शिक्षेच्या त्या वेळच्या गणनाप्रमाणे त्यांना **पन्नास** वर्षे कारागृहात काढावी लागणार होती आणि त्यांचा संभाव्य मुक्ततेचा दिन२३ डिसेंबर १९६० हा सांगण्यात आला होता ! हा दिवसही हिंदुसभेने " मृत्युंजय दिन " ह्या अन्वर्थक नावाने साजरा करण्याचे ठरविले आहे. या समारंभानिमित्त एक कार्यक्रम म्हणून वीर सावरकरांच्या आठवणी गोळा करून प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला असून त्यासंबंधाचे विनंतीपत्र याच अंकात दुसरीकडे दिले आहे.

वीर सावरकर यांची आजची शारीरिक क्षीणता आणि ढासळलेले प्रकृति-मान पाहिले तर हा महापुरुष बहुतांशी आपल्या प्रबळ इच्छाशक्तीने जगत आहे असे वाटल्याविना रहात नाही. अशाही स्थितीत आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण आणि आपल्या शक्तीचा उर्वरित प्रत्येक कण आपल्या ध्येयवादाच्या आणि तत्पोषक कार्याच्या प्रसारार्थ ते व्यतीत करीत आहेत, याचे नवल वाटते. किंबहुना वीर सावरकरांचा आजवरचा जीवनक्रमच एकामागून एक नवलपूर्ण आणि अद्‌भुत कर्तृत्वाने आणि बुद्धिवैभवाने नटलेला आहे. कारावासामध्ये त्यांना एका अधि-काऱ्याने " तुमची सुटका २३ डिसेंबर १९६० ला होणार, " असे टोचून म्हटले असता, " होय, त्या दिवसापर्यंत ब्रिटिश राज्य राहिले तर ?" असे दुर्दम्य आशा-वादी उत्तर त्यांनी दिले असे सांगतात. या वेळी खरोखर " मी स्वतः तोवर जिवंत राहीन तर " असे म्हणण्याचे एखाद्या सामान्य माणसाला सुचले असते. वीर सावरकर यांच्या त्या संभाव्य संकल्पित मुक्ततादिनापूर्वीच ब्रिटिश राज्याचा अंत पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले आणि तो मुक्ततादिन स्वतंत्र भारतात स्वतंत्र नागरिक म्हणून पाहण्याचे भाग्यही त्यांना २३ डिसेंबर १९६० ला लाभणार आहे.

वीर सावरकरांचा बारा वर्षे अंदमानवास आणि तेरा वर्षे रत्नागिरीची स्थानबद्धता आणि अट-बद्धता संपून १९३७ मध्ये ते पूर्ण मुक्त झाल्यावर एका प्रसंगी काही समाजवादी तरुण कार्यकर्त्यांनी त्यांचा सन्मान केला. पण त्या वेळी

सन्मानकर्त्यांनी म्हटले की, १९०७-८ या वर्षातल्या सावरकरांचा आम्ही आदर करत आहोत. १९३७-३८ च्या नव्हे ! याला वीर सावरकरांनी तात्काळ अशा आशयाचे उत्तर दिले की, " १९०७-८ च्या सावरकरांजवळ जाण्यासही त्या काळातले बहुसंख्य तरुण भीत होते. अत्यंत अल्पसंख्येनेच त्यांना तरुण अनुयायी लाभले; मोठ्या संख्येने प्रगटपणे तरुणांनी त्या काळातल्या सावरकरांचे गुणग्रहण करण्याचा सुरक्षित प्रसंग १९३७-३८ मध्ये आला. तेव्हा १९३७-३८ च्या सावरकरांचे गुणस्मरण करण्याचा काल आणखी बहुधा तितक्याच वर्षांनी येईल, अशी तुमच्या उदाहरणाने आशा वाटते. "

१९०७-८ मध्ये भारताला सशस्त्र क्रांतीने स्वतंत्र करण्यासाठी गुप्त मंडळचा स्थापन करण्यातली वीर सावरकरांची साहसी गरुडझेप १९३७-३८ मध्ये आदरणीय मानणाऱ्या काही लोकांना १९३७-३८ मधला त्यांचा हिंदुराष्ट्रवाद हा आदरणीय वाटत नव्हता. इतकेच नव्हे, तर तो आपल्याला दुरूनही चिकटू नये याविषयी ते सावधानता कटाक्षाने ठेवीत होते ! आजही पुष्कळांची तशीच वृत्ती आहे. भारतीय स्वातंत्र्यार्थ सशस्त्र क्रांतीचे उत्थान करण्यात जे शूरत्व, साहस आणि त्याग यांचे तेज आहे ते हिंदुराष्ट्राच्या उत्थानाच्या प्रयत्नांमध्ये नाही, अशी पुष्कळांची समजूत आहे.

पण आमच्या मते १९०७ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध शस्त्रबलाने उठावणी करण्यामध्ये जी कल्पनेची झेप, त्याग आणि दुर्दम्यतेची चमक होती त्यापेक्षा अधिक अनाकलनीय, अधिक साक्षेपपूर्ण, अधिक त्यागाची अपेक्षा असलेली निष्ठा हिंदुराष्ट्राच्या पुनरुत्थानाच्या प्रयत्नात आहे. ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानातून घालवून हिंदुस्थान स्वतंत्र करण्याच्या आकांक्षेपेक्षा कितीतरी अधिक व्यापक आणि अधिक कंटकमय, अधिक चिकाटीची आणि त्यागाची अपेक्षा असलेली हिंदुराष्ट्राच्या पुनरुत्थानाची कल्पना आहे. ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र क्रांतीच्या मार्गाला ब्रिटिशांनी उत्पन्न केलेल्या शबल विधिमंडळातील निवडणुकीत निवडून येण्याने विशेष साहच होण्यासारखे नव्हते तद्वतच स्वतंत्र भारताच्या विधिमंडळातून पुढील पाच वर्षे कसा राज्यकारभार चालवावयाचा याच्या मानचित्रात सावरकरांचा संपूर्ण हिंदुराष्ट्रवाद कोंबता येणे कठीण आहे. हिंदुराष्ट्राच्या ध्येयरूपी विराट पुरुषाची काही बोटेच त्या आलेखामध्ये मावू शकतील !

तो सर्व ध्येयवाद संकुचित क्षेत्रात चालवू पाहणे म्हणजे वटवृक्ष एखाद्या कुंडीमध्ये लावून वाढवता येईल अशी आशा करण्यासारखे आहे. इतकेच नव्हे तर, वीर सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद आणि त्यांचे सायुध, सशक्तिक स्वरूप, हिंदुमहासभेसारख्या राजकीय संस्थेमध्येही मावण्यासारखे नाही. सशस्त्र क्रांतिवाद हा काँग्रेसच्या व्यासपीठावर येण्यासारखा नव्हता. त्यासारखेच काही अंशी हे तारतम्य

आहे. हिंदूंचे ऐक्य, सुधारणा आणि त्यांचे संघटन यादेखील हिंदुराष्ट्रवादाच्या पूर्णावताराच्या प्राथमिक पायऱ्या आहेत. हिंदुसभेची राजकीय संघटना, तिच्याद्वारा निवडणुकी लढवून आजच्या लोकसत्तेच्या प्रणालीवर प्रभाव पाडण्यासाठी प्रयत्न, सामाजिक सुधारणेचे प्रयत्न, शुद्धीचे प्रयत्न हे सर्व नकोत असे आम्हांस म्हणावयाचे नाही. वीर सावरकरांच्या हिंदुराष्ट्राच्या उत्थानाच्या मार्गातल्या त्या केवळ अंशभूत प्राथमिक पायऱ्या आहेत, एवढेच आम्हांस दाखवावयाचे आहे. त्यांच्या हिंदुराष्ट्रविषयक ध्येयाच्या पूर्णावताराचे ते केवळ आगमनसूचक अंशावतार म्हणता येतील.

वीर सावरकरांचे हिंदुध्वज-गीत हे हिंदुमहासभेच्या सभा-समारंभातून म्हटले जाते. त्यात " अखिल हिंदुविजय ध्वज " हा पुनः उभवण्याची जी कल्पना आहे आणि ती ऐतिहासिक कालातील अधून मधून चमकलेल्या हिंदू शक्तीच्या ज्या उद्रेकाशी जोडलेली आहे; त्यांतल्या सर्व भावांनिशी अखिल-हिंदु-विजय हा दृष्टीच्या टप्प्यात तरी थोडाफार येईल, त्या वेळी १९३७–३८ चे सावरकर उघडपणे सन्माननीय होतील ! आज वीर सावरकरांची देशात होणारी उपेक्षा आणि बहुसंख्य लोकांना त्यांचे होणारे विस्मरण याविषयी त्यांचे भक्त खंत मानतात. हे मनुष्यस्वभावानुसार क्षम्य आहे. पण तशी अपेक्षा करणे हे काही अंशी गरुडाच्या भरारीमागे पोपटांच्यासारखा कळप धावताना दिसावा असे इच्छिण्यासारखे आहे. पूर्णांश सुवर्णाची चीप हीणमिश्रित सुवर्ण-चलनासारखी मधुर वाजून सर्वांना सहज हाताळता यावी अशी अपेक्षा करण्यासारखे आहे.

रत्नागिरीला अटींनी बांधलेल्या अवस्थेत हिंदूंमधील सामाजिक समता आणि ऐक्य यांसाठी ब्रिटिश शासनाला आक्षेप घेता येणार नाही आणि अटीत पकडता येणार नाही अशा पद्धतीने त्यांनी मर्यादित चळवळ चालवली असताच ' ऐक भविष्याला ' हे गीत त्यांनी लिहिले. रत्नागिरी हिंदुसभेच्या वृत्तांतामध्ये ते गीत प्रसिद्ध झाले आहे.

हे समग्र गीत आमच्या स्मृतीनुसार पुढीलप्रमाणे आहे :–

ऐक भविष्याला । भव्य भीषणाला ।
विगता भयहता वर्तमान काला ।
हिंदुजाति ही ज्यासाठी चालली रणाला ।।
एक-एकला जो तो । होउनिया एकचि तो ।
कोटि कोटि हिंदुजाति । सज्ज या क्षणाला ।।
सहनशीलता स्तंभ । तडकुनि विक्राळजृंभ ।
प्रगटवीत नवनृसिंह । हाणिताचि घणाला ।।

आजवरी छळ करिसी । तो तो तू अजि हरिसी ।।
दुःशासन कशीपु कंस । गणि न ती कुणाला ।।
सिंहासनि स्थापु देव । प्राणांची देवघेव ।
आपुलिया अस्तित्वा । लावुनी पणा ।।
होऊनिया मुक्त स्वतां । करील मुक्त ती जगता ।
ममतेच्या समतेच्या । सुजन रक्षणा ।।

या गीतामधील भव्य कल्पना रत्नागिरी येथील सामाजिक सुधारणेच्या पुरस्काराला लागू पडत नाही. त्या सामाजिक कार्यक्रमांसाठी हिंदुजातीचा नरसिंह प्रकट होण्याचे प्रयोजन नव्हते. रत्नागिरीच्या स्थानबद्धतेमधील अटींचा भंग करणारे हे गीत आहे असा आक्षेप कोणी घेतल्यास तो निवारण्यासाठी "ममतेच्या, समतेच्या सुजनरक्षणा"चे अंतिम उद्दिष्ट त्यात बसवले आहे.

याचे प्रत्यंतर पुढील एका प्रसंगावरून येण्यासारखे आहे. १९३९ मध्ये हिंदुमहासभेच्या वतीने भागानगर निःशस्त्रप्रतिकाराचा लढा चालू असता वीर सावरकरांनी हेच पूर्वी रत्नागिरी हिंदुसभेच्या इतिवृत्तामध्ये छापलेले पुराणे गीत हाताने लिहून मागील छपाईचा संदर्भ न सांगता, आमचेकडे केसरीत प्रसिद्धीला पाठवले आणि आम्ही ते नवे समजूनच छापले ! हिंदुजातीच्या भव्यभीषण भविष्य-कालीन रणाची हचा गीतातील कल्पना केवळ सामाजिक सुधारणेपुरती असती तर भागानगर चळवळीच्या वेळी त्याच्या प्रसिद्धीचे कारण नव्हते. आणि तेव्हाही झाले तरी भयहत अशा वर्तमानकालाला सावरकर केवळ भविष्य सांगत आहेत, प्रत्यक्ष ते रण चालू असल्याची कल्पना त्या गीतात नाही. कदाचित् १९२७–२८ पेक्षा १९३९ मध्ये ते भव्यभीषण भविष्य भयभीत वर्तमानकालाला थोडेसे अधिक उमगेल म्हणून ते गीत पुनः नव्यासारखे छापण्यास सावरकरांनी धाडले इतकेच. 'विगत' वर्तमानकाल म्हणजे काय ? अनेक संधी घालवलेल्या भूतकाळाच्या जाणिवेने एकप्रकारे वैयर्थ्याच्या भावनेने भारावलेला वर्तमानकाळ अशी त्यात कल्पना आहे.

वीर सावरकरांच्या कल्पनेतील हिंदुजातीचे हे भव्यभीषण भविष्य खंडित–भारत झाल्यावरही " हे सिंधू मी तुला विसरणार नाही, मग मी वेडा ठरेन अगर भविष्यवादी ठरेन " हचा त्यांच्या स्मरणीय उद्‌गारामध्ये थोडेसे डोकावले आहे. त्यात खऱ्या मृत्युंजय सावरकरांच्या अंतःकरणातील खोलखोल ध्येयवादाची मूर्ती दिसते. ती आजच्या संघटनांत, राजकीय पक्षांत वा निवडणुकांच्या घोषणात मावण्यासारखी किंवा रेखाटण्यासारखीही नाही. ती मूर्ती प्रत्यक्षात प्रगटेल किंवा भंगेल त्या वेळी सावरकर वेडे का भविष्यवादी (प्रॉफेट) हे ठरणार आहे !

– तरुण भारत, पुणे, १–६–१९६०

कोंडीत सापडलेला आसाम

सर्व भारतच आज एकप्रकारे असाहाय्य स्थितीत आहे. ही असहायता आंतरराष्ट्रीय क्षेत्रापासून अंतर्गत आर्थिक क्षेत्रापर्यन्त पसरलेली आहे. सत्तेच्या बाहेर असलेल्या सामान्य नागरिकाला किंवा विरोधी पक्षाच्या सभासदालाच केवळ नव्हे तर सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्याही लोकांना ही असहायता जाणवत आहे.

आसामचेच उदाहरण घ्या. भारताचे हे एका टोकाला पडलेले फाळणीमध्ये पूर्व-पाकिस्तानचा प्रदेश मध्येच येऊन भारतापासून तुटक झालेले आणि एका जमिनीच्या पट्टीव्यतिरिक्त भारताच्या दळणवळणास पारखे झालेले असे राज्य आहे. नेफा प्रदेश हा खरोखर आसाम राज्यात मोडणारा. पण सीमेवरील संरक्षण-व्यवस्थेसाठी तो आसामपासून तोडला गेला. नागप्रदेश हादेखील आसामचाच भाग होता. पण तेथे कित्येक वर्षे चाललेल्या मिशनऱ्यांच्या कारवायांकडे दुर्लक्ष केल्यामुळे भारतापासून फुटून निघण्याची प्रवृत्ती तेथे फोफावली. त्यांतल्या त्यात काही नाग लोक भारतातच पण वेगळे राज्य मागण्याच्या मताचे होते. त्यांच्याशी तडजोड करून वेगळे नागराज्य निर्माण करण्यात आले. निवडणुकी होऊन ते वाटचाल करू लागले, तरीही पिझोच्या बंडखोरांना पाकिस्तानी साहच्य मिळून केव्हा काय उत्पात घडून येईल, याचा नियम नाही. त्यानंतर गारो, लूशाई इत्यादी टेकड्यांचा जो प्रदेश आहे, त्यातील लोकांची नाग प्रदेशाप्रमाणे वेगळ्या राज्याची मागणी केली आहे. आसामातच राहून पुष्कळशी अंतर्गत स्वायत्तता त्यांना देण्याची तडजोड श्री. नेहरूंनी या लोकांना सुचविली असून त्याच्यावर ते विचार करीत आहेत. काही लोकांना ही योजनादेखील अमान्य आहे. गारो टेकड्यांत पाकिस्तानातील हिंदू आणि ख्रिस्ती आदिवासींची मोठ्या प्रमाणावर वसाहत झाल्यावर श्री. नेहरूंची तडजोड अमान्य करून टेकड्यांच्या स्वतंत्र राज्याची मागणी जोराने पुढे येण्याचा संभव आहे.

गेल्या रविवारी गृहमंत्री श्री. नंदा यांनी आसामला भेट दिली. गोहत्ती येथे आसाम प्रदेश काँग्रेस समितीचे एक शिष्टमंडळ त्याना भेटले. त्या शिष्टमंडळाने अनेक कहाण्या आणि मागण्या गृहमंत्र्यांपुढे ठेवल्या. या शिष्टमंडळाचे प्रमुख आसाम काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्री. शरदच्चंद्र सिंह हेच होते. सर्व मागण्या आणि गाऱ्हाणी ग्रथित करणारे विस्तृत लेखी निवेदनच त्यांनी श्री. नंदा यांना सादर केले. अधिकारारूढ काँग्रेस पक्षाच्या आसाममधील संघटनेला मुख्य व्यग्रता

आसामात लाखांनी जे पाकिस्तानी घुसलेले आहेत त्याच्यासंबंधाची आहे. खरोखर हे पाकिस्तान्यांचे आक्रमण गेली दहा वर्षे चालू आहे. पण सत्ता राखणे आणि तिची फळे चाखणे एवढ्याच स्वार्थी उद्योगात गढलेल्या काँग्रेसवाल्यांनी हे दुखणे चालढकलीने अनावर होऊन दिले आणि आता ते अगदी गळ्याशी आल्यावर त्यांची धडपड चालू झालेली आहे !

त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, पाकिस्तानी लोकांना बाहेर काढण्याचे काम अधिक वेगाने झाले पाहिजे. त्यांच्या मते या कामाला एक वर्षाची मर्यादा अटळपणे घालून मार्च १९६५ च्या आत सर्व घुसलेले पाकिस्तानी बाहेर घालवण्याची योजना राज्याने करावी. बाहेर घालविण्यात येणारे पाकिस्तानी खरेच घुसलेले आहेत का येथलेच आहेत, याचा निर्णय करण्यासाठी सहा-सात न्यायमंडळे उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक बाबतीत काटेकोर न्याय-निर्णय करून एक एक मनुष्य बाहेर घालवावयाचा या पद्धतीने गोगल–गायीसारखे मंद काम होणार आहे. त्याची गती वाढविण्याची विनंती काँग्रेसवाल्यांनी केली असली, तरी राज्याला ते आता कठीणच जाणार आहे. मग श्री. नंदा काहीही तोंडी आश्वासन देवोत !

आसाम काँग्रेस समितीने आपल्या निवेदनात अशीही विनंती केली आहे की, नवीन पाकिस्तानी लोक घुसू नये यासाठी सीमेवरील चौक्यांची संख्या वाढवावी आणि त्या चौक्या अधिक सबळ कराव्यात. एक वर्षाची मर्यादा घालून सर्व पाकिस्तानी घालवून द्यावयाच्या योजनेचा स्वीकार श्री. नंदा यांनी केल्याचे दिसत नाही. फक्त नवीन लोक अडविण्याची अधिक काळजी घेतली जाईल, असे मोघम आश्वासन त्यांनी दिल्याचे समजते.

या पाकिस्तान्यांना घालविण्याच्या बाबतीत राज्याचा हात मंद झाला आणि तसाच मंद राहणार याचे कारण पाकिस्तानाने घातलेला धाक ! स्वतः अन्यायाने घुसलेले लोक बाहेर काढणे हाच त्याच्यावर भारताचा मोठा अन्याय झाला म्हणून पाकिस्तानाने ओरड केली ! बाहेर काढलेल्या लोकांना पाकिस्तानात गेल्यावर तेथील हिंदूंची घरे आणि मालमत्ता लुटण्यास पाकिस्तानाने प्रोत्साहन दिले. श्री. भुट्टो यांनी मान्य केल्याप्रमाणे आसाम आणि त्रिपुरा यातून घालवून दिलेल्या पाकिस्तान्यांनीच परत जाऊन अल्पसंख्याकांवर अत्याचार केले, हे उघडपणे सांगण्यात भुट्टो यांची धमकी अगदी स्पष्ट आहे. ती अशी की, आणखी पाकिस्तान्यांना घालवून द्याल, तर असेच आणखी अत्याचार पाकिस्तानातील हिंदूंवर होणे अटळ आहे. भारत आणि पाकिस्तान यांतील हिंदू आणि मुसलमान हे 'होस्टेजेस' सारखे म्हणजे एकमेकांसाठी जीव ओलीस ठेवलेले मानू नयेत, असे भारतीय काँग्रेसश्रेष्ठ नित्य सांगत असतात. पण त्यांनी काहीही म्हटले तरी पाकिस्तानाने तेथील हिंदूंचे

जीव ओलीस ठेवण्याची ही प्रक्रिया निर्दयपणे कृतीत आणलेली आहे. भारतापासून तुटक असलेला आसाम खाऊन टाकावयाचा अशी पाकिस्तानची पहिल्यापासून पद्धतशीर योजना ठरलेली आहे. आसाम आणि त्रिपुरा या भागांत अद्याप तीन लक्ष तरी पाकिस्तानी आहेत. नंदा आणि चालिहा यांचे पितर जरी स्वर्गातून उतरले तरी त्यांना घालविणे कठीण आहे. कारण ते परत जाताच पूर्व पाकिस्तानातील हिंदूंवर आणखी अत्याचार होणार अशा धाकाची टांगती तलवार पाकिस्तानाने भारतावर धरलेली आहे. भारतीय सत्ताधाऱ्यांची त्यायोगे कोंडी झालेली आहे. पण दहा वर्षांच्या भोंगळचा अनास्थेने त्यांनीच ती ओढवून घेतलेली आहे

याच आसामच्या असाहाय्य अवस्थेमध्ये आसाम आणि त्रिपुरा यांच्या पूर्व-पाकिस्तानाकडील सीमेवर पाकिस्तानी सैन्याने प्रक्षोभक हालचाली चालू केल्याचे वृत्त आले आहे. अवजड सैनिकी सामग्री या भागात आणली असून हेलिकॉप्टर, विमाने उतरविण्यासाठी जागा तयार करण्यात आलेल्या आहेत. फेनी नदीच्या उत्तरतीरावर पाकिस्तानी सैनिक मोठ्या प्रमाणावर एकत्रित करण्यात आलें आहेत. सैनिकी तळ उभारून खंदक खणण्याचे आणि रस्ते बांधण्याचे काम चालू आहे. त्रिपुरा राज्याने गेल्या काही दिवसांत पूर्व पाकिस्तानाकडे अनेकश: निषेध-पत्रके पाठवली. कारण भारतीय सीमेत घुसून तेथील खेडचांत प्रक्षोभक कृत्ये पाकिस्तानी सैनिकांनी चालू केली आहेत. त्यायोगे उत्पन्न होणारी स्फोटक परिस्थिती थंड करण्यासाठी दोन्ही बाजूंकडील सैनिकी अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी अशा सूचना त्रिपुरा राज्याने केल्या. पण त्या पाकिस्तानाने फेटाळून लावल्या. कारण उघडच आहे. भारताच्या अंगाने स्फोट तरी होणार कोणता ? केवळ निषेधपत्रकांचा आणि विनंतीपत्रांचा ! त्या पत्रांचा ढीग पाकिस्तानाच्या केराच्या टोपलीत पडला आहे. त्यात भर पडली तरी पाकिस्तानाला काही चिंता करण्याचे कारण नाही.

आसामच्या सीमेवर चालू केलेली ही नवी प्रक्षोभक सिद्धता केवळ पूर्व-पाकिस्तानात लोकशाहीच्या मागणीची जी चळवळ सुरू आहे तिला शह देण्यासाठी पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांनी चालू केली आहे, अशी फसवी कारणमीमांसा भारतीय वृत्तसंस्थांकडूनच हेतुपूर्वक प्रसारित करण्यात येत आहे. भारतीयांच्या डोळचांत धूळ टाकण्याचा हा अश्लाघ्य प्रयत्न आहे. काश्मीरप्रमाणेच आसामही घशात घालण्याचे पाकिस्तानाचे उद्दिष्ट उघड आहे. दोन्हीकडून सैनिकी आक्रमणाचे छोटे उपद्रव सुरू आहेत. हे एक अघोषित कूटयुद्ध आहे. पाकिस्तान हे केवळ भारताची अडवणूक करून गुंडगिरीने मिळविले, ते केवळ पहिल्या पायरीसारखे होते. पाकिस्तान म्हणजे पुढची उडी मारण्याचो जागा आहे (जंपिंग ग्राउंड,) ही गोष्ट इस्लामी पुढारी त्या वेळी उघडपणे सांगत होते. " हंसके लिया पाकिस्तान, लढके

लेंगे हिंदुस्थान " अशा घोषणा त्या वेळी केल्या जात होत्या. ही पुढची उडी लवकर सुरू झाली नाही, याला कारण भारताची दक्षता नसून पाकिस्तानाचीच राज्यघटना करण्यात झालेले घोटाळे आणि अंतर्गत कलह हे होय. पाकिस्तान झाले म्हणजे सर्व उपद्रव संपले असे मूर्खपणाने भारतीय पुढारी आणि सत्ताधारी त्या वेळी मानीत होते. ती चुकीची समजूत आहे असे सांगणारे लोक " संकुचित जातीय वृत्तीचे " म्हणून त्या वेळी त्यांची अवहेलना करण्यात आली.

प्रा. ओवेन यांनी म्हटल्याप्रमाणे, काश्मीर पाकिस्तानला दिले तरी त्याची भूक शमणार नाही आणि त्याचा अघोरी उपद्रव थांबणार नाही. काश्मीरमागून आसामचा ग्रास ठरलेला आहे. तेथे पाकिस्तानी लोक घुसवण्याची पहिली पद्धतशीर कारवाई यशस्वी झालेली आहे. त्यानंतर हजारींनी निर्वासित तिकडे लोटून दुसरा गोंधळ चालू केलेला आहे. लगेच तिसरे पाऊल सीमेवर सैन्याची सिद्धता आणि छोटे उपद्रव याचे. ते चालू झाले आहे. त्यांची पावले योजनापूर्वक पडत आहेत. आमचे सत्ताधारी मात्र घसरत चालले असून " आम्ही खंबीर आहोत " अशा थापा लोकांना मारीत आहेत.

——तरुण भारत, पुणे, १९-३-१९६४

ख्रिश्चन देवदासींची करुण कहाणी

भारतामध्ये गेल्या शतकात आणि चालू शतकाच्याही आरंभीच्या काळात देवाला लहानपणीच मुलगी वाहून, तिला आजन्म अविवाहित राहून 'देवदासी' किंवा 'मुरळी' बनवावयाची चाल अनुक्रमे बंगालमध्ये व महाराष्ट्रातील हरिजन-वर्गात प्रामुख्याने होती. सार्वत्रिक सुधारणेमुळे या अनिष्ट चाली आता मागे पडल्या आहेत. परक्या मिशनऱ्यांनी पूर्वकाली अशा अनेक अनिष्ट चालींवर कडक टीका करून हिंदुधर्माविषयी घृणा उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. हिंदू लोकांनी आपल्या-वर शाब्दिक हल्ले होत असता, हल्ले करणाऱ्यांच्या चालीचा शोध केला नाही.

ख्रिस्ती, विशेषतः रोमन कॅथॉलिक पंथामध्ये, आजही एक मुलगी बालपणा-पासून देवाला वाहून तिला नन् (जोगीण) करण्याची प्रथा मोठ्या प्रमाणावर चालू आहे. अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशातही ती चांगलीच प्रचलित आहे एकदा 'ननरी' अथवा 'कॉन्व्हेंट' मध्ये ही मुलगी टाकली म्हणजे ती जवळजवळ बंदिवासात पडते. बाहेरच्या जगाशी तिचा संबंध तुटतो. हा एक लादलेला संन्यास असतो. कॉन्व्हेंटमधील 'मदर सुपीरियर'चा तिच्यावर अनियंत्रित अधिकार चालतो. लहानशा अपराधाबद्दल हवी ती शिक्षा देण्यात येते. चांगली वस्तू पहावयाची नाही, चांगले गाणे ऐकावयाचे नाही, कारण त्यायोगे ईश्वरमग्नतेत व्यत्यय येतो, असे तिच्यावर निर्बंध असतात.

काही वर्षांपूर्वी फ्रेंच कॉन्व्हेंटमधून लपूनछपून एक नन् बाहेर पडली आणि अमेरिकेत गेली. तिथे तिने कॉन्व्हेंटमधील करुण कहाणीचे पुस्तक लिहून, 'मेरिया मंक' या टोपण नावाने प्रसिद्ध केले. थोड्याशा अपराधाबद्दल मदर सुपीरियने तिला एका गादीवर पडावयास सांगितले. नंतर तिच्यावर आणखी चार-पाच गाद्या टाकल्या व त्यावर चढून नाचण्याचा हुकूम मदर सुपीरियने इतर नन्सना दिला. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी अनेक कॉन्व्हेंटस् उद्ध्वस्त करण्यात आली. काही ठिकाणी भ्रष्टाचारजन्य अर्भकांची हाडे जमिनीत आढळली !

पण हा जुना इतिहास झाला. आजच्या अमेरिकेतही बालपणापासून कोंडल्या गेलेल्या अनेक नन्स पळून बाहेर जातात. त्यांची संख्या दरसाल वाढत आहे. १९६६ मध्ये एकूण तीन हजार सहाशे नन्स बाहेर पडल्या. यांपैकी वीस-पंचवीस नन्सच्या भेटी व मुलाखती घेऊन, त्यांची मनःस्थिती आणि उद्गार देणारा एक विस्तृत लेख श्री. रॉबर्ट ब्लेअर कायसर या लेखकाने न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध 'लेडीज्

होम जर्नल' या मासिकाच्या एप्रिल १९६७ च्या अंकात प्रसिद्धीला आहे. पळून बाहेर आलेली एक नन्, मॅक एलरॉय, म्हणते की, 'पत्नी व माता होण्याची मला इच्छा होती आणि या भावना देवानेच मला दिल्या आहेत असे मला वाटते.' आता बाहेर येऊन तिने विवाह केला आहे व तिला दोन लहान मुली आहेत. सध्या ती वेन्स्टर कॉलेज नावाचे मुलींचे विद्यालय चालवीत आहे. केवळ पंचवीस-तीस वर्षे वयाच्या नन्स बाहेर पडतात असे नाही, तर वीस वर्षे कॉन्व्हेंटमध्ये कोंडलेले आयुष्य काढलेल्या चाळीसपन्नास वर्षांच्या वयस्क नन्सही बाहेर पडतात. चाळीस वर्षांची जॅक्वेलीन ग्रनन ही वीस वर्षे कॉन्व्हेंटमध्ये काढल्यानंतर बाहेर पडली. 'रोमन कॅथॉलिक ऑर्डर' सोडण्याची परवानगी तिने पोपकडून मिळवली, तरीही अमेरिकन सनातनी ख्रिस्ती लोकांनी तिची निंदा केलीच. धर्मावरचा विश्वास उडाल्याने त्या बाहेर पडतात असे नाही, तर बाहेरच्या जगात आपल्याला चांगले धार्मिक आयुष्य घालवता येईल अशा कल्पनेने त्या बाहेर पडतात.

नन्स हयाट नावाची २५ वर्षे वयाची नन म्हणते, "मी बाहेर पडले तर अधिक ख्रिस्तीपणा माझ्यात येईल असे मला वाटले. ख्रिस्ताकडे पाठ फिरवण्याचा प्रश्नच नव्हता. पण मला चुका करण्याचे स्वातंत्र्य पाहिजे होते." कॉन्व्हेंटमध्ये एकाकी कोंडलेले जीवन गेल्यामुळे, प्रथम मला बाहेर रस्त्यावरून चालण्याचेदेखील भय वाटे,' असे नॅन्सी मिलर नावाची तरुण नन् म्हणते. ती आता निग्रो लोकांच्या कॉलेजमध्ये काम करीत आहे आणि काळचा निग्रो लोकांच्या समान अधिकार मिळविण्याच्या चळवळीत भाग घेत आहे. नन्सच्या कोंडलेल्या आयुष्यासंबंधी ख्रिस्ती धर्मगुरुंपैकी काहींना आता घृणा वाटू लागली आहे. १९६३ डिसेंबरमध्ये एक प्रसिद्ध बेल्जन प्रीस्ट कार्डिनल स्यूनेन्स यांनी 'दि नन् इन् द वर्ल्ड' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात त्याने जगातल्या सर्व नन्सनी कॉन्व्हेंटमधून बाहेर पडावे व जगात अधिक उपयुक्त आयुष्य वेचावे, असे आवाहन केले आहे. तो आपल्या पुस्तकात म्हणतो, "नन्स समाज पुष्कळ अंशी एका किल्लेकोटात बंदिस्त असल्यासारखा वाटतो. या किल्ल्याभोवतीच्या खंदकावरून टाकण्याचा पूल क्वचित व भीतभीत टाकण्यात येतो. नन्चे आयुष्य संकुचित होते व तिने काळजी घेतली नाही तर ते काही चौरस यार्डांपुरते मर्यादित होते. आजच्या जगाशी संपर्क न ठेवणे यात धार्मिकता आहे अशी समजूत यात दिसते. ती आजच्या काळाशी विसंगत (अॅनाक्रॉनिझम्) आहे. बाहेर पडल्यास नन्स चर्चचीच नव्हे तर मानव-जातीची अधिक सेवा करू शकतील."

—अमृत, जुलै १९६९

माझ्या पिढीने पाहिलेल्या वृत्तपत्रांच्या पिढ्या

जुनी पिढी. म्हणजे साधारणतः ७०–७५ वर्षे वयाची पिढी. माझे वय आज ७४ वर्षांचे म्हणून मी त्याच पिढीतला. या पिढीच्या लोकांचे वृत्तपत्रवाचन १९०८–१० पासून चालू झाले त्या काळात पुण्यात ज्ञानप्रकाश आणि मुंबईत इंदुप्रकाश अशी दोनच मराठी दैनिके होती. ती दोन्ही नेमस्त पक्षाची होती. राष्ट्रीय पक्षाची साप्ताहिके 'केसरी' व 'काळ' ही होती. देशात दोनच राजकीय पक्ष–नेमस्त व राष्ट्रीय किंवा मवाळ व जहाल. राजकारणात लक्ष घालणारे लोकच बहुधा या वृत्तापत्रांकडे वळत. त्यांचा खप दहा-वीस हजारांचा जेमतेम असे. राजकारणाव्यतिरिक्त नेमस्त पक्षाच्या वृत्तपत्रात सामाजिक सुधारणावाद तर जहाल पक्षाच्या वृत्तपत्रात सनातनीपणा किंवा संस्कृति-रक्षणवाद प्रगट होत असे. नेमस्त ते सर्व समाजसुधारक आणि जहाल ते सर्व सनातनी असाच ठोकळ मानाने भेद पडलेला होता.

टिळकयुग

१९०५ ते १९२० पर्यंतचे वृत्तपत्रांचे युग हे 'टिळक-युग' म्हणता येईल. १९०८च्या दडपशाहीत बहुतेक सर्व राष्ट्रीय किंवा जहाल वृत्तपत्रांवर खटले होऊन संपादकांना तुरुंगवासाच्या शिक्षा झाल्या. त्यात बंद झालेली काही वृत्तपत्रे परत निघाली नाहीत. महाराष्ट्रात इंग्रजी दैनिके फक्त दोनच, मुंबईला निघणारी. 'टाइम्स' व जुना मुंबई क्रॉनिकल. क्रॉनिकल हे राष्ट्रीय पक्षाला पोषक दैनिक टिळक युगानंतर पुढे आले.

आगगाड्या, तारायंत्रे, पोस्ट, नगरपालिका निवडणुका या गोष्टी ब्रिटिश राज्यातल्या नमुन्यावर निघाल्या. तोच नमुना वृत्तपत्रांपुढे होता. "टाइम्स" हे नाव लंडनच्या टाइम्सवरून निघालेले. त्याच नमुन्यावर मराठी 'काळ' निघाला. इंग्लंडचे 'पंच' हे विनोदी वृत्तपत्र, त्याच्या आधारे केवळ विनोदी लेख व चित्रे देणारी 'हिंदु-पंच' हे मराठी आणि 'हिंदी-पंच' हे हिंदी पत्र चालू झाले.

त्याचप्रमाणे आमच्या पिढीला "अग्रलेख", "पत्रकर्त्याच्या स्फुट सूचना" हे शब्द लहान वयात नवीनच होते. संपादकीय पानाचा तो नमुना इंग्लंडच्या वृत्तपत्रावरूनच घेण्यात आला होता. पत्रकार आपल्याला 'मी' असे न म्हणता "आम्ही", "आमचे मत" इत्यादी बहुवचनी उल्लेख करतो हेही एक नवलच होते, ते विलायती नमुन्यामुळेच आलेले होते.

गांधीयुग

१९२१ पासून गांधी-युग आले. टिळकयुगात टिळक काय म्हणतात याचेकडे सर्वांचे लक्ष असे. गांधीयुगात गांधीजींच्या 'यंग-इंडिया' व पुढे 'हरिजन' या साप्ताहिकांतील गांधीवचने सर्व वृत्तपत्रांत टिळकयुगापेक्षाही अधिक व्यापक प्रमाणात उद्धृत करण्यात येत. स्वराज्याचा लढा चालू असण्याने सर्व राजकीय वृत्तपत्रांचा भर ब्रिटिश राज्य, नोकरशाही आणि अधिकारीवर्ग यांच्यावर टीका करण्याचा असे. गांधीयुगात महाराष्ट्रात टिळकपक्ष व गांधीपक्ष असा पक्षभेद पंधरा वर्षेपर्यंत तरी होता. मुख्य वाद कौन्सिलात जावे का असहकार करावा यावर होता. टिळक पक्षाला 'नवे मवाळ' असे निंदाव्यंजक नाव आले.

आकर्षकतेत वाढ

टिळकयुगात ललित साहित्याला वाहिलेली नियतकालिके म्हणजे 'मनोरंजन' मासिक, 'करमणूक' साप्ताहिक ही होती. पारमार्थिक विषयाचे 'मुमुक्षु' हे मासिक व मुलांसाठी प्रथम 'बालबोध' व नंतर 'आनंद' मासिक होते. बिलायती वृत्तपत्रांप्रमाणे ललित विषय, लघुकथा, पारमार्थिक चर्चा, बालविभाग इत्यादी गोष्टी मराठी दैनिकांत येण्याला १९४५-५० या काळात प्रारंभ झाला. खून, अपघात, खटले या गोष्टींची विस्तृत वृत्ते येण्यासही त्याच काळापासून सुरुवात झाली, ठळक वार्तांचे दोन स्तंभ, तीन स्तंभ व्यापणारे मथळेही चालू झाले.

वाचकांच्या तऱ्हा

पूर्वी वृत्तपत्रे थोडी असल्याने वाचक या टोकापासून त्या टोकापर्यंत ती वाचीत. साधारणतः १९४५-५० या काळापासून अनेक विषय दैनिकांतून, त्यांच्या रविवार आवृत्तींमधून आणि मोठ्या साप्ताहिकांतून येऊ लागले. या काळापासून सर्वच्या सर्व मोठे दैनिक सर्वांनी वाचणे अशक्य झाले. जाहिराती पाहणारे निराळे, ठळक वार्ता वाचून काही संपादकीयांवर ओझरती नजर टाकणारे निराळे, ते वाचून शिवाय चर्चात्मक किंवा माहिती देणारे लेखही समग्र वाचणारे त्याहून थोडे, कोणी केवळ खेळ-सामने वाचणारे, कोणी केवळ व्यंगचित्र पाहणारे, कोणी केवळ लघुकथा वाचणारे असे वर्ग पडले.

वाचणे आणि चाळणे

छापून आले ते सर्वच्या सर्व वाचले गेले असे म्हणता येत नाही. तसेच वाचलेले ध्यानात राहिले असेही म्हणता येत नाही. वृत्तपत्रवाचनापेक्षाही ती उलथीपालथी करून चाळणे या गोष्टीचे प्रमाण अधिक असते. पहिल्या पानावरील ठळक वार्ता पाहून एकदम शेवटचे खेळासंबंधाचे किंवा रविवारच्या व्यंगचित्रा-

वलीचे पान पाहणारे पुष्कळ ! वृत्तपत्रात सदरे आणि विभाग अनंत झाले आहेत. जो तो आपल्यापुरते वाचून वृत्तपत्र बाजूला टाकतो.

प्रगती का अधोगती

सर्वसामान्य वाचकांचा आज ललित विषयांकडे अधिक ओढा आहे. माहिती व बोध घेणारे वाचक ५ घेतले तर त्यामानाने मनोरंजनार्थ वाचणारे ५० म्हणजे दसपट तरी भरतील. आमच्या काळात फार चांगले होते आणि आज अधोगती झाली आहे असे म्हणणारे वयस्क लोक भेटतात. त्यांचे ते म्हणणे निव्वळ भावनात्मक असते. वृत्तपत्रे आज सर्व प्रकारची माहिती देण्याची शिकस्त करीत आहेत. वाचकांना जे जे पाहिजें ते सर्व आपल्या वृत्तपत्रात आणण्याचा त्यांचा सतत प्रयत्न आहे. आजचे संपादनकार्य पूर्वीपेक्षा अधिक क्लिष्ट आणि काळजीचे झाले आहे. पूर्वीइतके सोपे राहिले नाही. आणि त्या दृष्टीने पाहता वृत्तपत्रांची सर्वंकष प्रगती झालेली आहे, असेच म्हणावे लागेल.

–तरुण भारत, पुणे, २५ मे १९७२

२५ डिसेंबर ७४ : धर्मसाम्य दिवस

ख्रिस्तजयंती – गीताजयंती - ईदचा मिलाफ

यंदाचा २५ डिसेंबर वैशिष्ट्यपूर्ण ठरणारा आहे. दर वर्षी हा दिवस नाताळ म्हणून ख्रिश्चन बांधव साजरा करतात, पण यंदा मात्र या दिवशी मोक्षदा एकादशी (गीताजयन्ती) आणि ईद हे हिंदु-मुस्लिमांचे उत्सव २५ तारखेलाच येत आहेत. त्यामुळे हा दिवस धर्मसाम्य दिवस म्हणून गृहीत धरावयास हरकत नाही. याच संदर्भात सुप्रसिद्ध विचारवंत व तरुण भारतचे माजी संपादक श्री. ग. वि. केतकर यांनी या लेखात तिन्ही धर्मांतील साम्यस्थळे दाखवण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.

दि. २५ डिसेंबरला श्रीख्रिस्तजयंती आहे, त्याच दिवशी इस्लामीयांची ईद आहे तसेच त्या दिवशी मार्गशीर्ष शुद्ध एकादशी ही हिंदू पंचांगातली मोक्षदा एकादशी आहे, तोच गीताजयंतीचा दिवस मानला जातो. ख्रिस्ती पचांग हे सौर वर्षावर आधारित आहे, त्यातील महिन्यांचा चंद्राशी काही संबंध नाही. इस्लामी पंचांगात १२ चांद्रमासांचे वर्ष मानतात आणि ते सौर वर्षाशी जुळते करून घेतलेले नाही. हिंदू पंचांग बारा चांद्रमासांचे वर्ष धरते पण सौरवर्षाशी जुळवून घेण्यासाठी चार वर्षांनी एक अधिक मास धरतात. असे असल्यामुळे येत्या २५ डिसेंबरला जी तीन दिनविशेषांची जुळणी झाली आहे ती पुन्हा १०० वर्षांत तरी येईल की नाही हे सांगता येत नाही. म्हणून ही जुळणी यंदा एक अपूर्व अशी आहे.

हीच एक पर्वणी

सर्व धर्मांतील साम्यस्थळे दाखवण्याची हीच पर्वणी आहे. हजरत महमंद पैगंबर (स) यांनी अल्लाचे वर्णन पवित्र कुराणात असे केले आहें की, जो मनाच्याही पलीकडे आहे आणि ज्याच्या प्रभावाने मन चालते तो अल्ला होय. हे वचन आणि ' यन्मनसान मनु ते येनैवाहुर्मनो मतम् । तदेव ब्रह्म त्वं विद्धि । ' हे उपनिषदातील वचन एकमेवच आहे. आदिमानव आदामपासून पैगंबरापर्यंत सर्व जगामध्ये सर्व प्रदेशांत ईश्वराने आपले लक्षावधी प्रेषित पाठवले. काहींची नावे कुराणात सांगितली आहेत, पण सर्वांची सांगितली नाहीत असे कुराणामध्येच म्हटले आहे. याचे कारण अनुमानाने सहज ओळखण्यासारखे आहे. हजरत इब्राहिम (अब्रॅहॅम), हजरत मुसा (मोझेस), हजरत अयूब (जोब), हजरत ईसा (येशू) हे अरबस्तानलगतच्या प्रदेशांत होऊन गेले. त्यांची नावे परिचित होती. पण जगातील दूरदूरच्या प्रदेशांत अल्लाने जे प्रेषित किंवा नबी पाठवले, लाखांनी

मोजण्याइतक्या संख्येने पाठवले त्यांची नावे तेथील लोकांस परिचित नव्हती म्हणून सांगितली नाहीत. सर्व नबी किंवा प्रेषित आदिमानवाच्या काळापासून जे जगभर झाले त्या प्रत्येकाचे किताब म्हणजे ग्रंथ किंवा पुस्तके आहेत, म्हणून त्यांच्या अनुयायांना किताबी अशी संज्ञा पैगंबर देत. ज्यू आणि ख्रिस्ती यांना किताबी म्हणतात. जे ईश्वरावर विश्वास ठेवीत नाहीत त्यांना काफर किंवा काफिर अशी संज्ञा आहे. कुफा म्हणजे ईश्वरावर (अविश्वास) किंवा निरीश्वरवाद. हिंदू हे काफिर नाहीत, किताबी आहेत, कारण हिंदूंचे प्रेषित व त्यांचे किताब आहेत, असे मी अनेक जाणत्या मुसलमानांना म्हटले असता ते अमान्य करीत नाहीत.

मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात लो. टिळकांच्या प्रसिद्ध उद्‌गारांची शिळा बसवली, तिचे उद्‌घाटन न्यायमूर्ती छगला यांनी केले. तेव्हा ते म्हणाले, माझ्या जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणजे गीतारहस्यात लोकमान्यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान होय. इस्लामी असूनही ते असे म्हणू शकतात याचे कारण पैगंबरानेही अल्लाची बदगी करा असे परोपरीने सांगितले आहे. हैदराबादचे मौलवी महमंद याकूब यांनी जे कुराणाचे मराठी भाषांतर केले आहे, त्याच्या प्रस्तावनेत, पैगंबराचा मार्ग हा निवृत्तिमार्ग आहे का प्रवृत्तिमार्ग आहे असे प्रश्न उपस्थित करून, तो प्रवृत्तिमार्गच आहे असा निर्णय दिला आहे.

कुराणाचे मराठीकरण

१९६१ या वर्षी मी पुण्याच्या तरुण भारतमध्ये 'हिंदूंचे कुराणवाचन' या विषयावर लेखमाला लिहिली. तिची कात्रणे मी अनेक मुसलमानांना दिली, अनेकांनी ती वाचली. तिच्यावर कोणीही आजवर आक्षेप घेतलेला नाही. या लेखमालेमध्ये मी पवित्र कुराणाचा जो 'अल् फतीहा' म्हणून छोटा उपक्रमाध्याय किंवा नमनाध्याय आहे, त्याचे मराठी कवितेत रूपांतर करून छापले. पुढे ते अमृतसारख्या मासिकामध्येही स्वतंत्रपणे छापले. अनेक मराठी मुसलमानांनी आपल्या उरुसामध्ये ती कविता छापून वाटण्याची अनुज्ञा माझ्याकडे मागितली व मी ती दिली. प्रत्यक्ष काय झाले ते मला समजले नाही. विनोबांकडे कविता पाठवली, त्यांनीही तिला प्रशंसापत्र दिले आहे. ही कविता अशी–

परमदयाळू परमकृपाळू परमेशाचे नाम स्मरा ।
अखंड स्तवनाचा तो भोक्ता विश्वस्वामी नच विसरा ।।
महादयार्णव करुणाघन तो तोच कृपेचा झरा ।
पापपुण्य गणनेच्या काळी सर्व समर्थही तोच खरा ।।
दास तयाचे आम्ही सारे प्रार्थु त्याच्या आधारा ।
विनवू त्याला देई सन्मति दावुनि आम्हा मार्ग बरा ।।

नको मार्ग तो होई ज्याने अवकृपा तव नीचतरा ।
किंवा भ्रांतीने जे चळती नको तयांचा मार्ग बुरा ।।

विनोबांच्या प्रशस्तिपत्रासह हे गीत नभोवाणीवर म्हणा अशा विनंतीसह पाठवले असता, त्यांला मात्र लगोलग नकार मिळाला. हे सर्व सांगण्याचे कारण धर्मसमन्वयाचे माझे उद्दिष्ट नवे नाही, दहा-पंधरा वर्षांइतके जुने आहे.

हिंदूंचा वृथा अभिमान

हिंदू लोक अभिमान बाळगतात की सातासमुद्रापलीकडील पाश्चात्त्य विद्वानांनी आमच्या वेदांचा, आमच्या गीतेचा अभ्यास करून त्याची भाषांतरे १८ व्या शतकाच्या अखेरपासून क्रमशः केली. मग जे इस्लामी आणि ख्रिस्ती गेली हजार दोन हजार वर्षे, या हिंदूंनी 'आपल्या' मानलेल्या देशात, शेजारी-शेजारी वास्तव्य करून आहेत, त्यांच्या धर्मग्रंथांचे ज्ञान हिंदू कितपत करून घेतात ? तसे केल्याने आपले हिंदुत्व ढासळेल असे त्यांना वाटत असेल तर त्यांच्याइतके न्यूनगंडग्रस्त तेच असे म्हणावे लागेल ! त्या शेजाऱ्यांच्या ग्रंथांसाठी 'सातासमुद्रापलीकडे' जावयास नको. त्यांचे ग्रंथही आटोपशीर आहेत व देशी भाषांतून त्यांची भाषांतरेही झालेली आहेत. इसवी सनाच्या पहिल्या शतकातच सेन्ट थॉमस भारतात आला व त्याने केलेले अनुयायी 'सेंट थॉमस ख्रिश्चन' अद्याप दक्षिणेकडे आहेत. ख्रिस्ती-धर्माचे भारतात पाऊल रोमपेक्षाही अगोदर तीन-चार शतके पडलेले आहे.

"आपले सर्वस्व गरिबांना देऊन टाका व मगच माझे अनुयायी व्हा" असे बजावणाऱ्या परमहंस परिव्राजक श्रीख्रिस्ताचे मूठभरच अनुयायी झाले. भिक्षु-संघासारखा त्यांचा संघ होता. त्यांचा वेश म्हणजे, एका वस्त्राला डोळचांपुरते भोक पाडून केलेली कफनी (न शिवलेले कापड). सर्व सारख्या वेशात असता त्यांच्यात मिसळून श्रीख्रिस्त बहुजनहितार्थ परिक्रमा करीत असता त्याच्या विरोधकांना ओळखू न येण्याइतका सरमिसळ झाला होता. जुडास या एका शिष्याने विश्वासघात करून शत्रूपुढे त्याला उघड केले. भगवान बुद्धाच्या भिक्षुसंघाइतकाच श्रीख्रिस्ताच्या या भिक्षुसंघाबद्दल हिंदूंना आदर वाटला तर काही लगेच ते ख्रिस्ती होत नाहीत.

ख्रिस्त हाही परमयोगी

आत्मोपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमोमतः ।।

या गीतेच्या परमयोगाच्या व्याख्येनुसार श्रीख्रिस्त हाही परमयोगी होता असे मानल्याने गीतेवरील माझी निष्ठा मुळीच कमी होत नाही. वीर सावरकरांनी

आपल्या 'सप्तर्षी' काव्यामध्ये ख्रिस्ताच्या स्तुतिपर पुढील दोन आर्या लिहिल्या आहेत.

निर्मल हिमशीतल यद्वचनी भवतप्त जीव हो यावा ।
धाडी देव कधीतरी सत्याचे तो देवदूत शोभावा ।।
त्या शांत दान्तभगवत् यश पावन येशूच्या पदा नमुनी ।
पुनरुत्थाना सत्यचि घे करूनि आत्मदान मुनी ।।

'भगवत् यश पावन' हे विशेषण 'ब्लेसेड् इन् धि ग्लोरी आफ दि लॉर्ड'चे सुंदर भाषांतर आहे. या स्तुतीने सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा डागाळली काय ? या आर्या मी फादर लेदर्लेला म्हणून दाखवल्या तेव्हा त्यानेही आदराने मान डोलावली.

–दैनिक गावकरी, अहमदनगर, २२–१२–१९७४

गोमांस आणि माघमास

दि. १९ जानेवारीच्या 'लोकप्रभे'तील श्री. गौतम शिंदे यांच्या संशोधनात्मक लेखाला पूरक व आनुषंगिक असा हा लेख आहे. वेदकालात सर्वच वैदिक आर्य मांसाशन आणि गोमांसदेखील निषिद्ध मानीत नव्हते हे स्पष्टच आहे. पण महाभारत लिहिले गेले त्या काळात, म्हणजे त्या काळापर्यंत, अशी परिस्थिती आली की, ब्राह्मणांनी मांसभक्षण पूर्ण सोडले ! क्षत्रियांमध्ये मांसभक्षण आणि गोमांसभक्षणही चालू राहिले होते. पुढे गोमांसाला बंदी सर्व हिंदूंमध्ये होण्याला श्रीकृष्णाची वाढती पूज्यता हे कारण झाले असावे. गोकुळातल्या श्रीकृष्णमहात्म्यामुळे गोवंशाबद्दल पूज्यता वाढत गेली, असे दिसते. पूज्यतेच्या वर्तुळामध्ये ब्राह्मण आणि गायी यांची सांगड घालण्यात आली ! ब्राह्मणांबरोबरच गायीचेही पूजन होऊ लागले. गोरक्षण हे पुण्य समजले गेले. छत्रपती शिवाजीमहाराजांनी 'गोब्राह्मण प्रतिपालक' हे बिरुद धारण केले. तेव्हापासून आजवर गोरक्षण, गायीची पूज्यता आणि तिन्ही वर्णांमध्ये गोमांसाची निषिद्धता चालू आहे. पारठ्या म्हणजे दूध न देणाऱ्या गायी या फारसा चारा न घालता रस्त्यावर मोकाट सोडण्यात येतात. त्या रस्त्यावरील केरकचऱ्यात मिळेल ते खात चाललेल्या असतात. त्या तेलकट कागद, केळ्याच्या साली, इतकेच नव्हे तर माल भरलेल्या खोक्यातील वेष्टणाचे रस्त्यावर इतस्ततः टाकलेले गवतही खात कसेबसे आपले जीवन कंठीत असतात ! हे सर्व शहरात चालू आहे. रस्ता हीच आमची 'कचरा पेटी' आहे आणि केरकचरा रस्त्यावर हवातसा फेकणे हा आमचा अनेक 'जन्मसिद्ध अधिकारां'पैकी एक आहे ! शहरातील भटक्या आणि कशाबशा जगत असलेल्या गायी चाललेल्या असता त्यांना हात लावून नमस्कार करणारे अनेक लोक आहेत. हा विचित्र 'गोपूजनाचा प्रकार अनेक ठिकाणी चालू आहे.

महाभारतातील अडचणीचे श्लोक

ही केवळ त्रोटक प्रस्तावना झाली. आज ज्या समजुती आहेत, त्या तशाच वेदकालात आणि महाभारतकालातही होत्या असे डोळे मिटून मानणे चूक आहे.

निर्विकार संशोधनाचे फलित अप्रिय वाटले तरीही ते बाजूला सारणे बरोबर नाही. भारतामधील मांसाशनाच्या प्रदीर्घ इतिहासातील केवळ एका विशिष्ट अशा प्रथेचा, जो महाभारतांमध्ये पुरावा मिळतो तो मनोरंजक वाटणारा म्हणून या लेखाच्या द्वारे मांडावयाचा आहे. गोमांस खाण्याचा निषेध आणि गोमांसाशनाची रूढता यांच्या संघर्षामध्ये केव्हातरी एक कालखंड असा आला असावा

की त्यामध्ये फक्त माघ महिन्यात गोमांस खाण्याची अनुज्ञा उरली असावी. त्या अनुमानाला आधारभूत असे दोन श्लोक महाभारतात आढळतात. एक युद्धपर्वात आणि एक अनुशासनपर्वात. हे श्लोक असे–

अर्जुनस्य इमे बाणाः न इमे बाणाः शिखंडितः।
कृतन्ति मम गात्राणि माघमासे गवां इव ॥ १ ॥
गृहस्वेहावबद्धानां नराणां अल्पमेधसां।
कुस्त्री खादति मांसानि माघमासे गवां इब ॥ २ ॥

पहिला श्लोक भीष्मांच्या तोंडचा आहे. शिखंडीला पुढे करून त्याचे मागून अर्जुन भीष्मांवर बाण सोडीत होता. शिखंडी हा नपुंसक म्हणून उलट त्याचेवर बाण सोडावयाचे नाहीत हा दंडक भीष्म पाळीत होते. अर्जुनाच्या एकतर्फी हल्ल्याने घायाळ झालेले भीष्म म्हणतात की, " हे बाण अर्जुनाचे आहेत, शिखंडीचे नाहीत. कारण माघ महिन्यामध्ये गायीचे अवयव जसे कापतात, तसे हे बाण माझे अवयव कापीत आहेत. " यावरून माघ महिन्यात गायींना कापीत ही रूढी स्पष्ट होते. त्याच माघ महिन्यापुरती गोमांस खाण्याची मुभा होती हे दुसऱ्या श्लोकावरून उमगते.

हास्यास्पद टीकाकार

या दुसऱ्या श्लोकाचा अर्थ असा की, केवळ घरामध्ये आपले सर्वस्व मानणाऱ्या, म्हणजे घरकोंबड्या, पुरुषांचे मांस दुर्वर्तनी स्त्री, माघ महिन्यात गायीचे मांस खातात, तशा रीतीने खाते. तात्पर्य असे दिसते की, हा घरकोंबडा मनुष्य वाईट स्त्रीच्या जाचाने खंगत कृश होत जातो. जणू काय ती स्त्री त्याचे मांस खाते, माघ महिन्यात गायीचे मांस जसे खातात तसे ! म्हणजे केवळ या एका महिन्यात गोमांस खाण्यास मुभा असल्यामुळे त्या महिन्यात खूप गायी कापल्या जात आणि भरपूर गोमांसावर लोक ताव मारीत ! कारण पुढील महिन्यापासून अकरा महिने गोमांस वर्ज्य ! अलीकडे चातुर्मासात कांदे खावयास ब्राह्मणांस बंदी असल्यामुळे त्याचे आधी 'कांदेनवमी' करून मनमुराद कांदे खात असत तशातलाच हा प्रकार दिसतो. नंतर अलीकडच्या काळात महाभारतावर टीका लिहिणाऱ्या नीळकंठ चतुर्धर (म्हणजे नीळकंठराव चौधरी) या टीकाकाराला या दोन्ही श्लोकांवर टीका लिहिण्याची फार पंचाईत झाली ! माघ महिन्यात गायी कापतात आणि गायीचे मांस भरपूर खातात हे श्लोकांमध्ये स्पष्ट दिसत असता, ती अप्रिय वाटणारी गोष्ट डावलण्याचा या टीकाकाराने हास्यास्पद प्रयत्न केला आहे.

खेकडी व मगर

'माघमासे गवां इव' या अडचणीच्या शब्दांतील पहिले दोन शब्द त्या टीकाकाराने एकत्र 'माघमासेगवां' असे केले! आणि टीका लिहिली की, "माघमा कर्कटी प्रोक्ता सेगवा मकरी स्मृता" म्हणजे 'माघमा' व 'सेगवा' असे शब्द तोडले! माघमा म्हणजे खेकडी! आणि 'सेगवा' म्हणजे मगर! खेकडा व मगर एकमेकांशी झटापट करताना एकमेकांचे अवयव तोडून मांस खातात त्याप्रमाणे अर्जुनाचे बाण अवयव तोडतात आणि कजाग स्त्री घरवशा नवऱ्याचे मांस खाते, अशी उपमा या टीकाकाराने कल्पिली! ती मुळीच जुळणारी नाही, अत्यंत गैरलागू आहे. तसेच 'माघमा' म्हणजे खेकडी व 'सेगवा' म्हणजे मगर असे शब्दच संस्कृतात इतरत्र कोठेही सापडत नाहीत. संस्कृत कोशात हे शब्द येतात तेथे केवळ नीळकंठ चतुर्धर टीकेचाच दाखला दिलेला असतो. दुसरा कोठलाच संदर्भ मिळत नाही. व्याकरणाच्या दृष्टीने पाहिले तरीही 'माघमासेगवाः' असा बहुवचनी विसर्ग शेवटी पाहिजे. पण मुळात 'वा' अक्षरावर अनुस्वार आहे, त्याचेपुढे विसर्ग नाही! एकूण नवे शब्द बनवून, उपमेची मोडतोड करून आणि व्याकरण पायाखाली तुडवून नीळकंठराव चौधरी यांनी साधले काय? तर माघ महिन्यापुरती एकेकाळी गायी मारण्याची व त्यांचे मांस खाण्याची मोकळीक होती या गोष्टीच्या स्पष्ट पुराव्यावर हरताळ फासला! अप्रिय वाटणारा धादांत इतिहास दडपण्याचा केविलवाणा निष्फळ प्रयत्न केला!

लोकमान्य टिळकांचे संशोधन

पण ऐतिहासिक दृष्ट्या, केवळ माघ महिन्यातच गोमांस खाण्याची व बाकी अकरा महिन्यांत ते वर्ज्य करण्याची, ही विचित्र चाल पडली तरी कशी, असा प्रश्न पडतो. याचे संशोधन लोकमान्य टिळकांनी केलेले आहे! हे वाचून अनेक 'टिळक-पूजकां' ना धक्का बसण्याचा संभव आहे. लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगातील लिखाणात गीतारहस्याच्या लिखाणाव्यतिरिक्त जी इंग्रजी टिपणे लिहिली ती सर्व एकत्रितपणे 'वेदिक क्रॉनालजी अँड वेदांग ज्योतिष' या इंग्रजी ग्रंथात, टिळकांनंतर 'टिळक बंधूंनी, म्हणजे त्यांच्या दोन पुत्रांनी, प्रसिद्ध केली आहेत. त्या कोपऱ्यात पडलेल्या ग्रंथातील एका कोपऱ्यात पडलेले छोटेसे टिपण या विषयावरच आहे. 'गवाम् अयनम् किंवा Cows Walk असा त्याला मथळा असून ते केवळ दोन पृष्ठांचे आणि आधारनिर्दिष्ट करणारे असे टिपण आहे. त्यात महाभारतातील वर दिलेले माघमासातील गोहत्येचे श्लोक मूळ संस्कृतातच पूर्व-निर्देशासह दिलेले आहेत.

टिळकांच्या शोधाचा शोध

त्यातच प्रथम ' मघासुगावो हन्यंते फाल्गुनीषुच उह्यते ' हे वेदवचन दिलेले आहे. पूर्वी वेदकालामध्ये दोन अयनांच्या वर्षाला गायीच्या चालण्याची उपमा ' शवाम् अयनम् ' या शब्दाने दिली जात होती असे दिसते. या वेदवचनाचा अर्थ " मघा नक्षत्रावर रात्री कमी वेळाच्या होतात व फाल्गुनी नक्षत्रावर त्या वाढतात " असा काहीतरी मुळात असावा, असे टिळकांच्या टिपणावरून माझे अनुमान आहे. मूळ ज्योतिषविषयक असा या वचनाचा खरा अर्थ लोपून " मघासुगावो हन्यंते " यावरून माघ महिन्यात गायी मारण्यास वैदिक अनुज्ञा आहे, असा ओढून ताणून काढला गेला. व महाभारत कालामध्ये माघ महिन्यात गोमांस खाण्याची चाल पडली, असे अनुमान टिळकांना मांडावयाचे आहे असे वाटते. महाभारतातले वरील दोन श्लोक आणि ' मघासु गावो हन्यंते ' हे वेदवचन एका टिपणात टिळक एकाखाली एक देतात यावरून हे अनुमान निघते. टिपणावरून मोठा लेख लिहिण्यास पुढे तुरुंगातून सुटल्यावर टिळकांना वेळ झाला नाही. नीळकंठ चतुर्धरांच्या टीकेची टिळकांनी कशी वासलात लावली असती हे आता केवळ तर्कानेच करावे लागते !

– लोकप्रभा, दि. ९ फेब्रुवारी १९७५

शुद्धीने हिंदूंचीही शुद्धी

प्रथम आर्यसमाज आणि नंतर काही काळाने हिंदुसभा यांनी हिंदूंतून परधर्मात गेलेल्यांना परत स्वधर्मामध्ये घेण्याची चळवळ सुरू केली. एकदा धर्माबाहेर गेलेल्यांना पुनः हिंदू धर्मात घ्यावयाचे नाही. असा हिंदूंचा हट्ट होता. परंतु हिंदुत्वनिष्ठ संस्थांचा प्रचार आणि तदनुकूल परिस्थितीचा रेटा यांच्यामुळे गेल्या पन्नास वर्षात तो चुकीचा आग्रह वितळून गेला आहे. पण सर्वसामान्य हिंदूंमध्ये अद्याप दोन टोकांची दोन माणसे आहेत. एका टोकाचे निष्क्रिय उदासीन लोक घाबऱ्या घाबऱ्या पृच्छा करतात की, " तुम्ही या शुद्धीच्या वार्तांना प्रसिद्धी कशाला देता ? " त्यांना वाटते की इतर धर्मांचे लोक त्यायोगे विचलित होतील, म्हणजे त्यांचा राग आपल्यावर ओढवेल. त्यांना उत्तर असे की इतर धर्मांचे लोक पुष्कळ जागृत असून तुम्ही प्रसिद्ध केले नाही तरी शुद्धीकरणाची नोंद ते घेतातच. ही शुद्धीची म्हणजे हिंदूकरणाची गोष्ट आता सर्रास रूढावली आहे हे उदासीन हिंदूंच्या डोक्यात ठसवावयास प्रसिद्धीकरण अवश्य झाले. आणि आता तर ज्या हिंदूकरणाची प्रसिद्धी होणे बिनघोक असेल तेवढ्याचीच प्रसिद्धी होते. कित्येक हिंदूकरणे अप्रसिद्धच राहतात. वरवर त्रोटक वाचन करणाऱ्या हिंदूंच्या स्मृतीमध्ये मलकाना रजपूतांची स्वामी श्रद्धानंदानी केलेली शुद्धी आणि गोव्यातील गावडयांची धर्मभास्कर मसूरकर महाराजांनी केलेली सामुदायिक शुद्धी या असतात. पण अलीकडे विशेष शुद्धीकरणे होत नाहीत अशी त्यांची समजूत असते. त्यांना मी सांगतो की, गोरेगावच्या मसूराश्रमाची इंग्रजी ' मसूराश्रम पत्रिका ' आणि त्याच संस्थेकडून प्रकाशित होणाऱ्या ' धर्मभास्कर ' या मासिकांचे अंक पहा. त्यांच्या प्रत्येक अंकामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या शुद्धीवार्तांवरून दृष्टिक्षेप टाका म्हणजे तुम्हाला शुद्धीकरणे कशी क्रमशः चालू आहेत हे समजेल.

विश्व हिंदू परिषद या संस्थेनेही शुद्धीकरणाचे कार्य चालविले आहे. त्या संस्थेच्या दिल्लीहून निघणाऱ्या ' हिंदू-विश्व ' मासिकामध्ये नित्य त्या संस्थेच्या द्वारा होणाऱ्या हिंदूकरणाची माहिती दिलेली असते. तीही त्रोटक वाचन करणाऱ्या हिंदूंनी दृष्टिक्षेपात घ्यावी. याव्यतिरिक्त हिंदू-तरुण-मंडळ अशासारख्या काही संस्थाही शुद्धीकरणे घडवून आणतात. हिंदू धर्मात येणारा हा प्रवाह अगदी नगण्य असा नाही. दिल्लीला ' अखिल भारतीय शुद्धीसभा ' अशीही एक संस्था चालू आहे. यांपैकी कोणत्याही संस्थेने गेल्या पन्नास वर्षातील शुद्धीवृत्तांचे शोधपूर्वक संकलन करून या काळात किती लोक हिंदू धर्मात आले याचा आकडा प्रसिद्ध

करावा. त्यायोगे स्वतःच्या प्रपंचाव्यतिरिक्त इकडे तिकडे थोडी दृष्टी टाकणाऱ्या 'तटस्थ' हिंदूंचा भ्रमनिरास होईल. हा हिंदूकरण प्रवाह आता थांबत नाही. थांबणार नाही. कारण त्या कार्यामध्ये अनेक त्यागी आणि जीवनसमर्पित कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

आता सरळ हिंदूकरण म्हणा

हिंदूंनी हे हिंदूकरणाचे कार्य निदान १९२५ पूर्वी शंभर वर्षे म्हणजे ब्रिटिश राज्य प्रस्थापित झाल्यापासून तरी करावयास हवे होते; पण या शंभर वर्षांत एकदा धर्माच्या बाहेर जाऊन परधर्मामध्ये गेला म्हणजे त्याला कोणत्याही मार्गाने पुनः आत घेणे हे पाप समजले जात होते. एक शतकपर्यंत यासंबंधात घोर निद्रिस्त असलेले हिंदू एकदम ताडकन जागे झाले नाहीत. हळूहळू डोळे किलकिले करीत आळोखेपिळोखे देत पूर्ण जाग येण्यास त्यांना आणखी २५ वर्षांचा काळ लागला. खरोखर, बेशुद्ध पडलेले हिंदू शुद्धीवर आले, म्हणून शुद्धी हे नाव अन्वर्थक ठरते, सुस्त हिंदूंना जड पावलांनी एक पाऊल पुढे टाकावयास लावण्यासाठीही जुन्या शास्त्रार्थाचा कीस काढावा लागला. देवल स्मृतीचा आधार शोधून दाखवण्याचे कार्य श्री. महादेवशास्त्री दिवेकर, पद्मनाथशास्त्री पालये, कोगजेशास्त्री इत्यादी परिवर्तनवादी शास्त्रीमंडळींनी केले. हिंदुसभेने ते उचलले आणि एक प्रमुख कार्यक्रम म्हणून त्याला स्थान दिले. हिंदुमहासभेच्या अखिल भारतीय अध्यक्षस्थानापर्यंत पोचलेले वयोवृद्ध नेते श्री. शं. रा. तथा मामा दाते यांनी हजारांनी शुद्धीकरणे केलेली आहेत. आता केवळ पूर्वी हिंदू असलेलेच नव्हेत तर कधीही हिंदू वंशामध्ये नसलेले लोकही हिंदू धर्मात येत आहेत. गेल्या मे महिन्यात मसूराश्रमाने एका ज्यू युवतीची शुद्धी केली. म्हणून आता सरळ हिंदूकरण हेच नाव रूढ करावे.

सुधारणांचे परिणाम

जातीयता गेली पाहिजे, संमिश्र विवाह झाले पाहिजेत असे म्हणणारे हिंदू त्या गोष्टींना हिंदू-संघटन असे नाव देण्याचे टाळतात. वस्तुतः अस्पृश्योद्धार, वन्य जातींची उन्नती, जातींची समानता इत्यादी 'सामाजिक' सुधारणा करू म्हणणारे हिंदू हे हिंदुत्वच बळकट करीत असतात, मात्र 'हिंदू' नाव घेणे हेच जातीय अशी भीती उत्पन्न झाली असल्यामुळे त्या गोष्टींना हिंदुसघटन हे नाव देण्याचे टाळले जाते. पण परिणामी तेच होते. या सर्व 'हिंदू' हे नाव टाळून 'सामाजिक' नावाने, हिंदूंच्या एकतेचाच पर्यायाने, लेखी-तोंडी प्रचार करणाऱ्यांसाठी हे सांगणे प्राप्त आहे की, हिंदूकरणामुळे सर्वधर्म समानत्वाचा प्रसार होतो आणि जातींच्या मर्यादांचा कडवट कठोरपणाही भुसभुशीत केला जात असतो. गेल्या फेब्रुवारी अखेरपासून जूनच्या मध्यापर्यंत मसूराश्रमाने जी एकूण १६ हिंदूकरणे केली त्यांतले

नवहिंदू हे अनेक जातींमध्ये समाविष्ट होत आहेत. यासाठी त्यांची पुढील त्रोटक जंत्री देत आहे. १) वधू रोमन कॅ. ख्रिस्ती युवती व वर नाभिक हिंदू समाजातील युवक (फेब्रु). २) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचे लग्न हिंदूंतल्या गोसावी समाजातील युवकाशी (२० मार्च). ३) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचा विवाह मराठा समाजातील युवकाशी (२ एप्रिल). ४) सीरियन ख्रिश्चन युवतीचा कोकणस्थ ब्राह्मण युवकाशी (१७ एप्रिल). ५) केरळीय मुस्लिम युवतीशी गौड सारस्वत युवकाचा विवाह (२७ एप्रिल). ६) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचा विवाह हिंदू कोळी समाजातील युवकाशी (१० मे). ७) रो. कॅ. युबतीचा कुडाळ देशकर ब्राह्मणाशी विवाह (१६ मे). ९) ज्यू युवतीचा त्वष्टा कासार युवकाशी विवाह (२९ मे). १०) रो. कॅ. पदवीधर युवतीचा विवाह दैवज्ञ समाजातल्या युवकाशी (३१ मे) ११) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचा चर्मकार समाजातील युवकाशी विवाह (६ जून) १२) प्रॉटेस्टंट ख्रिश्चन युवतीचा हिंदू भंडारी युवकाशी विवाह (१८ जून). १३) सुन्नी मुस्लिम पदवीधर शिक्षिकेचा देशस्थ ब्राह्मण युवकाशी विवाह (१९ जून).

सामाजिक जागृती

या विवाहांमुळे सर्व जातींमध्ये जागृती होते. इतर धर्मांतून आलेल्या लोकांशी संपर्क आल्यामूळे सर्वधर्म सामंजस्यही उत्पन्न होते. यांपैकी कित्येक विवाहांच्या प्रसंगी दोन्ही धर्मांतले लोक उपस्थित असतात हेही लक्षात घेणे अवश्य ठरेल. अलीकडेच महाराष्ट्रातील एक राजकारणी पुढारी जाताजाता बोलून गेले की, शुद्धीची काही आवश्यकता नाही. त्यांनी शुद्धी हे एक प्रकाराचे धार्मिक कार्य एवढीच दृष्टी ठेवली असावी. धर्म शुद्धीकरणाची आजवरची अनेकानेक वर्षातली उदाहरणे बारकाईने पाहिली तर हे हिंदूकरणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर सामाजिक समता आणि जागृती घडवीत आहे हे सुज्ञांना दिसून येईल.

— साप्ताहिक विवेक, रविवार दि. २९ जुलै १९७९

शब्दशोध : ध्वजचिन्ह व वाहन

पूर्वीच्या काळामध्ये प्रत्येक रथीमहारथी योद्धयाचा स्वतःचा वेगळा ध्वज किंवा निशाण असे. या निशाणावर एखाद्या प्राण्याची आकृती म्हणजे चित्र काढलेले असे, श्रीकृष्णाच्या ध्वजावर गरुड पक्ष्याचे चिन्ह असे. या विशिष्ट ध्वजावरून त्या त्या ध्वजाचा वापर करणाऱ्यांची नावे प्रचलित आणि रूढ झाली. श्रीकृष्णाचे 'गरुडध्वज' हे नाव रूढ आहे. 'गोविन्दो गरुडध्वजः' (अमरकोश) पुढे लोकांनी कल्पना चालवून गरुड हे श्रीकृष्णाचे वाहन बनवले. 'गरुड-वाहन' हा शब्द विष्णूच्या नामावलीत अमरकोशाने दिलेला नाही, पण लोककल्पनेने ध्वज चिन्हाचे वाहन बनवले. आणखी कल्पना चालवून रामापुढे जसा मारुती, शिवमंदिरामध्ये जसा नंदी तसाच विष्णुमंदिरात मनुष्यदेहधारी पण गरुडाच्या चोचीसारखे नाक असलेला समोरच्या छोट्या डंबरीमध्ये गरुड म्हणून बसवण्यात आला. म्हणजे गरुड हा लांब नाक असलेला मानव बनविला. तो लोकांच्या दृष्टीपुढे असल्याने, लांब नाक असलेल्या माणसालाही 'गरुडनाक्या' असे लोक म्हण लागले. विष्णूच्या चित्रामध्ये बहुधा तो गरुड पक्ष्यावर आरूढ झालेला दाखवतात. लांबनाक्या मनुष्याकृती गरुडाच्या खांद्यावर बसलेला दाखवीत नाहीत.

अर्जुनाच्या ध्वजावर 'कपि' म्हणजे वानराचे चित्र होते, म्हणून त्याचे 'कपिध्वज' हे नाव रूढ झाले. ते गीतेमध्येही पहिल्या अध्यायात आलेले आहे. पण अर्जुनाने मात्र गीतेमध्ये कोठेही 'श्रीकृष्णा, हे गरुडाध्वजा' असे संबोधलेले नाही. गरुडाची जी नावे अमरकोशामध्ये आहेत त्यांत मात्र त्याला 'विष्णुरथ' असे नाव आढळते. अर्जुनाला मात्र कधी कोणी 'कपिवाहन' बनवले नाही. त्याच्या ध्वज-चिन्हाचे वाहन झाले नाही. मदनाला मनुष्यरूप दिले तेव्हा त्याच्या ध्वजावर 'मासा' किंवा 'मगर' असल्याच्या कल्पना आल्या. मदनाला 'मकरध्वज' आणि 'मीनकेतन' अशी दोन्ही नावे रूढ आहेत. पण या जलचरांचे वाहन करून तो हिंडतो असे वर्णन नाही, त्याला 'मकरवाहन' बनवले गेले नाही. 'उंदीर' हा देखील प्रथम गणपतीच्या ध्वजावरील चिन्ह म्हणून असला पाहिजे. त्याला 'आखुपत्र' म्हणजे उंदराचा ध्वज असे नाव होते. पण पुढे ध्वजचिन्हाचे वाहन करण्याने गणपतीला 'मूषकवाहन' असे म्हणू लागले. पण उंदरावर बसलेल्या गणपतीचे चित्रण करणे केवळ अशक्यच होते म्हणून तसे चित्र सहसा दिसत नाही. गणपतीच्या मंदिरामधूनही गरुड-हनुमंत-नंदी यांच्याप्रमाणे उंदीरमूर्ती आलेली दिसत नाही.

— रविवार सकाळ, दि १८-११-१९७९

नवहिंदू हे अनेक जातींमध्ये समाविष्ट होत आहेत. यासाठी त्यांची पुढील त्रोटक जंत्री देत आहे. १) वधू रोमन कॅ. ख्रिस्ती युवती व वर नाभिक हिंदू समाजातील युवक (फेब्रु). २) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचे लग्न हिंदूंतल्या गोसावी समाजातील युवकाशी (२० मार्च). ३) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचा विवाह मराठा समाजातील युवकाशी (२ एप्रिल). ४) सीरियन ख्रिश्चन युवतीचा कोकणस्थ ब्राह्मण युवकाशी (१७ एप्रिल). ५) केरळीय मुस्लिम युवतीशी गौड सारस्वत युवकाचा विवाह (२७ एप्रिल). ६) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचा विवाह हिंदू कोळी समाजातील युवकाशी (१० मे). ७) रो. कॅ. युबतीचा कुडाळ देशकर ब्राह्मणाशी विवाह (१६ मे). ९) ज्यू युवतीचा त्वष्टा कासार युवकाशी विवाह (२९ मे). १०) रो. कॅ. पदवीधर युवतीचा विवाह दैवज्ञ समाजातल्या युवकाशी (३१ मे) ११) रो. कॅ. ख्रिस्ती युवतीचा चर्मकार समाजातील युवकाशी विवाह (६ जून) १२) प्रॉटेस्टंट ख्रिश्चन युवतीचा हिंदू भंडारी युवकाशी विवाह (१८ जून). १३) सुन्नी मुस्लिम पदवीधर शिक्षिकेचा देशस्थ ब्राह्मण युवकाशी विवाह (१९ जून).

सामाजिक जागृती

या विवाहांमुळे सर्व जातींमध्ये जागृती होते. इतर धर्मांतून आलेल्या लोकांशी संपर्क आल्यामूळे सर्वधर्म सामंजस्यही उत्पन्न होते. यांपैकी कित्येक विवाहांच्या प्रसंगी दोन्ही धर्मांतले लोक उपस्थित असतात हेही लक्षात घेणे अवश्य ठरेल. अलीकडेच महाराष्ट्रातील एक राजकारणी पुढारी जाताजाता बोलून गेले की, शुद्धीची काही आवश्यकता नाही. त्यांनी शुद्धी हे एक प्रकाराचे धार्मिक कार्य एवढीच दृष्टी ठेवली असावी. धर्म शुद्धीकरणाची आजवरची अनेकानेक वर्षातली उदाहरणे बारकाईने पाहिली तर हे हिंदूकरणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर सामाजिक समता आणि जागृती घडवीत आहे हे सुज्ञांना दिसून येईल.

— साप्ताहिक विवेक, रविवार दि. २९ जुलै १९७९

शब्दशोध : ध्वजचिन्ह व वाहन

पूर्वीच्या काळामध्ये प्रत्येक रथीमहारथी योद्धयाचा स्वतःचा वेगळा ध्वज किंवा निशाण असे. या निशाणावर एखाद्या प्राण्याची आकृती म्हणजे चित्र काढलेले असे, श्रीकृष्णाच्या ध्वजावर गरुड पक्ष्याचे चिन्ह असे. या विशिष्ट ध्वजावरून त्या त्या ध्वजाचा वापर करणाऱ्यांची नावे प्रचलित आणि रूढ झाली. श्रीकृष्णाचे 'गरुडध्वज' हे नाव रूढ आहे. 'गोविन्दो गरुडध्वजः' (अमरकोश) पुढे लोकांनी कल्पना चालवून गरुड हे श्रीकृष्णाचे वाहन बनवले. 'गरुड-वाहन' हा शब्द विष्णूच्या नामावलीत अमरकोशाने दिलेला नाही, पण लोककल्पनेने ध्वज चिन्हाचे वाहन बनवले. आणखी कल्पना चालवून रामापुढे जसा मारुती, शिवमंदिरामध्ये जसा नंदी तसाच विष्णुमंदिरात मनुष्यदेहधारी पण गरुडाच्या चोचीसारखे नाक असलेला समोरच्या छोटचा डंबरीमध्ये गरुड म्हणून बसवण्यात आला. म्हणजे गरुड हा लांब नाक असलेला मानव बनविला. तो लोकांच्या दृष्टीपुढे असल्याने, लांब नाक असलेल्या माणसालाही 'गरुडनाक्या' असे लोक म्हण लागले. विष्णूच्या चित्रामध्ये बहुधा तो गरुड पक्ष्यावर आरूढ झालेला दाखवतात. लांबनाक्या मनुष्याकृती गरुडाच्या खांद्यावर बसलेला दाखवीत नाहीत.

अर्जुनाच्या ध्वजावर 'कपि' म्हणजे वानराचे चित्र होते, म्हणून त्याचे 'कपिध्वज' हे नाव रूढ झाले. ते गीतेमध्येही पहिल्या अध्यायात आलेले आहे. पण अर्जुनाने मात्र गीतेमध्ये कोठेही 'श्रीकृष्णा, हे गरुडाध्वजा' असे संबोधलेले नाही. गरुडाची जी नावे अमरकोशामध्ये आहेत त्यांत मात्र त्याला 'विष्णुरथ' असे नाव आढळते. अर्जुनाला मात्र कधी कोणी 'कपिवाहन' बनवले नाही. त्याच्या ध्वज-चिन्हाचे वाहन झाले नाही. मदनाला मनुष्यरूप दिले तेव्हा त्याच्या ध्वजावर 'मासा' किंवा 'मगर' असल्याच्या कल्पना आल्या. मदनाला 'मकरध्वज' आणि 'मीनकेतन' अशी दोन्ही नावे रूढ आहेत. पण या जलचरांचे वाहन करून तो हिंडतो असे वर्णन नाही, त्याला 'मकरवाहन' बनवले गेले नाही. 'उंदीर' हा देखील प्रथम गणपतीच्या ध्वजावरील चिन्ह म्हणून असला पाहिजे. त्याला 'आखुपत्र' म्हणजे उंदराचा ध्वज असे नाव होते. पण पुढे ध्वजचिन्हाचें वाहन करण्याने गणपतीला 'मूषकवाहन' असे म्हणू लागले. पण उंदरावर बसलेल्या गणपतीचे चित्रण करणे केवळ अशक्यच होते म्हणून तसे चित्र सहसा दिसत नाही. गणपतीच्या मंदिरामधूनही गरुड-हनुमंत-नंदी यांच्याप्रमाणे उंदीरमूर्ती आलेली दिसत नाही.

-- रविवार सकाळ, दि १८-११-१९७९

शब्दशोध : इंग्रजीचे सुप्त आक्रमण

शास्त्रीय प्रगतीमुळे रोज नवी शास्त्रीय उपकरणे आणि वस्तू लोंढचासारख्या येत आहेत. त्यांची इंग्रजी नावे मराठीत तशीच राहणार. ती बदलणे शक्य नाही. मोठ्या शहरांतील बाजारपेठांतल्या पाटचा या नागरी लिपीत असल्या तरी त्यांतले अर्धेअधिक शब्द इंग्रजीत असतात. हे 'आक्रमण' म्हटले तरी ते टाळणे शक्य नाही. उलट असे म्हणता येईल की एका भाषेच्या समुद्रात नदीप्रमाणे अनेक भाषांचे शब्द मिसळत असतात. पण नदीचे काही समुद्रावर 'आक्रमण' म्हणता येत नाही, संमिश्रण म्हणणे अधिक योग्य.

इंग्रजी भाषेतील समृद्ध ग्रंथभांडार आणि वृत्तपत्रे याच्या योगाने अनेक सुशिक्षित माणसे, विचार इंग्रजीत आणि लेखन मराठीत करतात. यामुळे जे इंग्रजी वाक्प्रचार मराठीत आले आहेत ते ओळखूसुद्धा येत नाहीत. "अमक्याला अमुक कलमाखाली पकडले आणि जामिनावर सोडले," "अमक्याच्या अध्यक्षतेखाली एकाचे रामायणावर" व्याख्यान झाले. हा इंग्रजी शब्दयोगी अव्ययांचा उपयोग जुन्या मराठीत अपरिचित होता. माझ्या लहानपणी वयस्कर माणसे विचारीत, "काहो अध्यक्षाच्या खुर्चीखाली सभा झाली आणि रामायणाच्या पुस्तकावर व्याख्याता उभा होता काय?"

पण मूळ इंग्रजी असे कित्येक वाक्प्रचार मराठीत अगदी बेमालूम रूढ झाले आहेत. उदाहरणार्थ, दुष्टचक्र (व्हिशस सर्कल), दृष्टिकोन (अँगल् ऑफ व्हिजन), सिंहाचा वाटा (लायन्स् शेअर), नक्राश्रू (क्राकोडाईल टियर्स) पांढरा हत्ती (व्हाइट एलिफंट), अक्षरशः (लिटरली), शृंगापत्ती (हॉर्नस् ऑफ ए डायलेमा), उच्चभ्रू (हाय् ब्रो), दलित (डिप्रेस्ड) काटेरी मुकुट (क्राउन झॉफ थॉर्नस्), स्तंभलेखक (कॉलम्निस्ट), पूर्वग्रह (प्रेज्युडिस), इत्यादी.

इंग्रजीत छपाईच्या चुका किंवा मुद्रण-प्रमाद याला 'प्रिंटर्स डेव्हिल्' असा शब्द रूढ आहे. त्यावरून 'अमृत' मासिकाने 'मुद्राराक्षस' असा शब्द रूढ केला. 'राक्षस' या नावाचा नंदाचा प्रधान होता. त्याची 'मुद्रा' चोरून खोटे आज्ञापत्र प्रसृत करून चाणक्याने त्याला पराभूत केले. म्हणून 'मुद्राराक्षस' हे संस्कृत नाटकाचे नाव झाले. त्याचा छपाईच्या चुकांशी काहीही संबंध नाही.

'त्रास घेणे' हा शब्दप्रयोग मूळ इंग्रजी 'टेक ट्रबल्' या शब्दावरून आला आहे. मूळचे मराठी वापरावयाचे तर 'कष्ट करणे' असे म्हणावयास पाहिजे. 'त्रास घेत नाहीत' असा प्रयोग ह. भ. प. मामा दांडेकर यांनीही सार्थ ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत केला आहे. तसाच 'निर्णय घेतला' हा शब्दप्रयोगही मूळ इंग्रजीतून येऊन रूढ झाला आहे. मूळच्या मराठीत 'निर्णय केला' असे म्हणावयास पाहिजे.

— रविवार सकाळ, दि. १३-१-१९८०

शब्दशोध : समाहार-द्वंद्व समास

दोन वस्तुनामे एकत्र जोडून तशा अनेक वस्तूंचा सामुदायिक अर्थ व्यक्त करता येतो. अशा शब्दजोडयांना संस्कृतमध्ये समाहार-द्वंद्व समास असे म्हणतात. असे समाहार द्वंद्वाचे प्रकार संस्कृतपेक्षाही मराठीत अधिक आहेत असे दिसते.

' पानसुपारी ' या जोड शब्दांच्या उल्लेखात केवळ पान आणि सुपारी या दोनच वस्तू अभिप्रेत नसतात, त्यात समानार्थ येणाऱ्या अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. ' चहापाणी ' या शब्दाचा अर्थही अल्पउपाहार इतका विस्तृत होतो.

दोन समानार्थक शब्द जोडूनही व्यापक अर्थ सूचित करण्याची तर खूपच उदाहरणे आहेत. ती अशी :- जेवणखाण, बाजारहाट, केरकचरा, वस्त्रप्रावरण, कामधंदा, लाजलज्जा, भाजीपाला, ठावठिकाणा, भांडीकुंडी, दागदागिने, फळ-फळावळ, पूसतपास, चूकभूल, इत्यादी.

क्वचित् दोहोपैकी एक शब्द निरर्थकही असू शकतो पण अशी उदाहरणे थोडी आहेत. उदा. कापडचोपड, कपडालत्ता, वास्तपुस्त इत्यादी.

पाणी या शब्दाचा उपयोग असाच काही अंशी निरर्थक जोड म्हणून होतो असे दिसते. उदा. पीकपाणी, नशापाणी, धंदापाणी, पाटपाणी इत्यादी.

तोच शब्द एका ' ब ' या वर्णाची भर घालून जोडण्याने मराठीत समाहार-द्वंद्व अनेक होतात. संस्कृतमध्ये ते फारसे नाहीतच. नमुन्यासाठी तशा प्रकारच्या जोडशब्दांना योजून केलेली दोनचार वाक्ये देतो. त्याला धंदाबिंदा नाही तरी तो जगतो कसा ?, त्याला ताबबीप आलेला असावा, पण त्याने पत्ताबित्ता कळवलेला नाही, येथून गेल्यावर त्याने पत्रबित्र काहीच पाठवले नाही.

इंग्रजीत समास फारसे होत नाहीत. पण ' ॲण्ड ' या उभयान्वयी अव्ययाचा उपयोग करून दोन वस्तूंच्या निर्देशाने तशा अनेक वस्तू सूचित केल्या जातात. उदाहरणार्थ, ' बॅग ॲण्ड बॅगेज, ' बेअर ॲण्ड टेअर ' मराठीत या अर्थाची शब्दजोड करता येते. उदा. ' तूटफूट, ' बाडबिस्तारा ' इत्यादी.

– रविवार सकाळ, दि. ३–२–१९८०

शब्दशोध : मराठीतील प्रादेशिक प्रयोग


मराठी भाषा ही एक म्हटली तरी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागांत वेगवेगळे शब्दप्रयोग रूढ आहेत. इतके की, तो प्रयोग योजणारा मनुष्य अमक्या प्रदेशातला आहे, ही गोष्ट हटकून समजते. पुण्यामध्ये फळे विकणारा एक हातगाडीवाला, त्याच्याकडून फळे घेत असताना, त्याच्या मित्राला म्हणाला, " इतका कुटाणा कशाला ? " तेव्हा मी त्याला लगेच विचारले, " तू नगरचा का ? " तो म्हणाला " होय, पण तुम्ही कसे जाणले ? " तेव्हा मी त्याला ' कुटाणा ' हा शब्द ' खटाटोप ' या अर्थाने नगरला वापरला जातो त्यावरून ओळखले, असे सांगितले. नागपूरकडील वृत्तपत्रांत, एखादा उपक्रम किंवा कार्यक्रम थांबला किंवा स्थगित झाला, या अर्थाने ' ठप्प झाला ' हा शब्दप्रयोग खूपच प्रचुर आहे. मध्य-महाराष्ट्रातील वृत्तपत्रे तो प्रयोग केव्हा केव्हा करतात, पण तेव्हाही त्याचा वेगळेपणा या प्रदेशात उमगून येतोच. नागपूरच्या लगत हिंदी भाषिक प्रदेश आहेत. यामुळे काही हिंदी प्रघात नागपूरच्या मराठीमध्ये अवतरलेले आढळून येतात. " त्याचे पुस्तक मी देऊन टाकले " असे आपण पुण्या-मुंबईकडे म्हणतो. पण नागपुरी मनुष्य " देऊन दिले " असे म्हणतो. त्याचे वेगळेपण उमगते. हिंदीमधील ' दे दिया ' या प्रयोगावरून ते नागपुरी मराठीत आले आहे. अलीकडे दळणवळण वाढल्याने आणि छापील संसाराच्या विस्तारामुळे मराठीत पुष्कळच उच्चारसादृश्य आले आहे. पण पन्नास साठ वर्षांपूर्वीच्या काळात कोकणातून देशावर आलेले लोक आणि बहुतांशी विद्यार्थी नाकात बोलत आणि देशावर त्यांची चेष्टाही होई. असाच एक शाळकरी मुलगा त्या काळात नुकताच देशावर आला होता. त्या काळात डोक्यावर फक्त लहानशी शेंडी ठेवून बाकीचा गोटा करीत. तो त्या मुलाच्या डोक्यावर दोन ठिकाणी जास्तच गुळगुळीत होता. असे का झाले म्हणून विचारता तो म्हणाला, " टेमक्यावर गावले. " त्याचा आशय अनुमानाने समजला. डोक्याच्या उंचवटचाच्या भागावर हजामत अधिक गुळगुळीत झाली असा त्याचा आशय होता. सापडला या अर्थाने " गावला " हा शब्द अद्यापही कोकणीच आहे. पूर्वीच्या कोकणी लोकांच्या प्रभावाने आलेले अनुस्वार देशावर ' अनुच्चारित ' झाले आणि छापील संसारातून लोपले आहेत. बावी किंवा बावडी म्हणजे विहीर हा शब्दही कोकणीच राहिला आहे.

नगरमध्ये सामान्य लोक कोणी आजारी असल्यास, " त्याचं दुखतंय " असे म्हणतात. " काय दुखतंय " असे विचारता, पुन्हा तेच म्हणतात, कारण त्यांचा

तो प्रयोग सर्वसामान्य आजारीपणाचा द्योतक असतो. दुखणाईत म्हणजे आजारी हे तर सर्व मराठी प्रदेशात रूढ आहे, पण 'नगरी' प्रयोग खटकतो.

काही शब्दप्रयोग पुणेरी विद्यार्थ्यांतच केवळ विशेष रूढ दिसतात. "अमुक विद्यार्थी सहलीला येत नाही" असे कळल्यावर, 'त्याची नको पर्वा' या अर्थाने 'उडत गेला' असा प्रयोग बहुधा पुणेरी विद्यार्थ्यांत आढळतो. आता तो इतर प्रदेशांतही गेला असेल. कोकणी मुलाची खोडी करण्यासाठी त्याच्या हातातले प्रवासी गाठोडे ओढले असता, तो म्हणतो 'माझे बोचके घेऊ नको' सर्व प्रदेशात हिंडणाऱ्यांना असे अनेकानेक प्रादेशिक प्रयोगभेद सांगता येतील.

– रविवार सकाळ, दि. ६–४–१९८०.


मराठी ग्रंथ संग्रहालय शाखे
2029
निबंध
13/3/82
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

स्वतः काही तरी करावे

– ग. वि. केतकर

फार पूर्वीपासून, म्हणजे पोस्टकार्डाचे मूल्य सहा पैसे होते तेव्हापासून – मी स्वतः आचरीत असलेली एक स्वल्प गोष्ट अनेकांना सांगत आलो आहे. स्वतःच्या वैयक्तिक प्रपंचापलीकडे ज्यांना काहीच करावयाची इच्छा नाही असे लोक थोडे. पण बरेच लोक आपल्या जीवनकलहातील मर्यादित कक्षेमध्ये आपण काय करणार, असे विचारीत असतात. आपल्याला काहीच करता येण्यासारखे नाही अशी समजूत करून ते आपल्याला सामाजिक कर्तव्यातून सोडवून घेत असतात. एरवी शिळोप्याच्या गप्पा-गोष्टीत अमक्या तमक्याने अमुक-तमुक करावयास पाहिजे अशा ' परस्मैपदी ' अपेक्षा ते व्यक्त करीत असतात.

फक्त तीस पैसे

मी अशा लोकांना सांगत आलो आहे की, " सामाजिक जीवनात जे लक्षच घालीत नाहीत त्यापेक्षा तुम्ही लक्ष घालणारे चांगले. जीवनकलहातील व्यग्रतेने आपल्या अल्प शक्तीनुसार काही करण्यासारखे नाही, असे तुम्ही म्हणता. पण मी तुम्हांला करण्यासारखी एक अगदी सोपी गोष्ट सांगतो. " असे म्हणून मी सुचवीत असे की, एक वर्षात समाजाच्या दृष्टीने चांगले काम करणाऱ्या पांच व्यक्ती तरी तुम्हाला आढळणे अशक्य नाही, मग अशा लोकांना वर्षामध्ये पाच अभिनंदनपर कार्डे पाठवा. त्या वेळी कार्डाची किंमत सहा पैसे असल्याने फक्त तीस पैसे खर्च होतील असे मी सांगत असे.

उत्तेजन हवे असते

मी सांगत असलेली स्वल्प गोष्ट तेव्हापासून ध्यानात ठेवून आचरणात आणणारे एक गृहस्थ मला नगर येथील वास्तव्यात नुकतेच भेटले. पण काही लोक पूर्वी असेही भेटले की, माझ्या सूचनेवर त्यांची प्रतिक्रिया अशी की, " त्याने काय होणार आहे ? आमची कार्डे वाचून ते फाडून टाकतील ! " **लोकांनी आपल्याला चांगले म्हणावे ही लोकेषणा सर्वांमध्ये असते आणि एका सत्कृत्याबद्दल कोणी अभिनंदन केले तर तो मनुष्य अधिक सत्कृत्ये करण्यास प्रवृत्त होईल. निदान चांगले करणाऱ्या माणसाला काही काळ आनंद होईल, हे फळ काही थोडे नव्हे.** असे मी त्यांना सांगत आलो आहे. लोक कथा-कादंबऱ्या वाचतात, पण गोष्ट किंवा

कादंबरी आवडली तर त्या लेखकाला पत्र पाठवणारे व उत्तेजित करणारे थोडे; विशेषत: नव्या लेखकांना असे, उत्तेजन हवे असते.

पाव शतकापूर्वीचे पत्र

पण हा सर्व ' पूर्व-रंग ' मी अशासाठी सांगितला आहे की, त्याच्या उत्तर-रंगामध्ये मला एक आख्यान सांगावयाचे आहे. पंचवीस वर्षांपूर्वी मुंबईला पठाणाच्या भयंकर सावकारीशी झगडा करून त्या सावकारीचे उच्चाटन करणारे श्री. ज्ञानेश्वर राऊत हे कार्यकर्ते होते. त्यांनी या कार्याच्या अनुभवावर आधार-लेल्या ' कर्जमुक्त व्हा ' या पुस्तकाचा प्रकाशन-समारंभ मुंबईला १९५४ च्या फेब्रुवारीत झाला होता. त्या वेळी मी त्यांना अभिनंदनपर पत्र पाठवले होते. ते स्वातंत्र्यसैनिकही आहेत. कौटुंबिक आपत्तीमुळे सध्या ते मुंबई सोडून मु. भाडळे, ता. कोरेगाव, जि. सातारा या ठिकाणी – आपल्या मूळ गावी – राहतात. तेथे त्यांना अलीकडे समजले की माझे वास्तव्य नगर येथे असते. तेथील पत्त्यावर त्यांनी मला ७ जुलै १९७९ ला कार्ड लिहिले. ते पत्ता बदलून मला मिळाले. आपण नि:स्वार्थी-पणाने पठाणाची सावकारी हटवण्याचे मुंबईस जे कार्य केले त्याला सर्व संपादकांनी उत्तेजन दिले, असे त्यांनी लिहिले. त्या वेळी ' केसरी ' मध्ये आलेल्या " सावकारी यमपाश " या लेखाची आठवण त्या पत्रात त्यांनी करून दिली. कौटुंबिक निराशेच्या आजच्या परिस्थितीतही " पठाणी सावकारीचा बीमोड होऊन कार्याची पूर्तता केली " हे समाधान त्यांनी व्यक्त केले. १९५४ च्या फेब्रुवारीतील माझ्या त्यांचेकडे गेलेल्या अभिनंदनपर पत्राचाही त्यांनी उल्लेख केला. आणि ते पत्र आपल्या ' फायली 'मध्ये अद्याप आहे, असे लिहिले !

एक योजलेला कार्यक्रम

पंचवीस वर्षांपूर्वीची ही गोष्ट मी विसरून गेलो होतो. तेव्हा माझ्या त्या जुन्या पत्राची प्रत करून मला पाठवा अशी मी श्री. ज्ञानेश्वर राऊत यांना विनंती केली. त्यांनी लगेच प्रत करून पाठवली, त्यातला गाभा पुढे उद्धृत करीत आहे. " आपण लिहिलेल्या ' कर्जमुक्त व्हा ' या पुस्तकाच्या प्रकाशन-समारंभाची आमंत्रणपत्रिका मिळाली. मी या समारंभास उपस्थित राहू शकत नाही. तरी या पत्राने आपले अभिनंदन करून समारंभास सुयश चिंततो. कर्जनिवारण-तडजोड मंडळ सुरू करून चिकाटीने जे कार्य चालविले त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. या कामी आपण सर्व तऱ्हेची झीज सोसली आहे हेही मला माहीत आहे " (दि. १५–२–१९५४). पण एवढ्यावरच हे आख्यान संपले नाही. श्री. राऊत हे गेल्या ऑगस्टमध्ये पुण्यास आले असता येथील " पूना गेस्ट हाऊस, लक्ष्मीरोड, पुणे २ " या माझ्या सध्याच्या पत्त्यावर येऊन भेटले. सुदैवाने त्या वेळी चांगल्या

कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात नेहमी व्यग्र असलेले पुण्याचे श्री. रा. स. भट हे मजकडे आले होते. त्यांचा श्री. राऊत यांच्याशी परिचय झाला. ऑक्टोबर १९७९ मध्ये त्यांच्या वयाची ७५ वर्षे पुरी होत आहेत. त्या निमित्ताने त्यांना पुण्यास बोलवून त्यांचा प्रगट सन्मान करण्याची आणि त्या निमित्ताने त्यांचे कार्य लोकांपुढे मांडण्याची योजना श्री. रा. स. भट यांनी आखली. श्री. ज्ञानेश्वर राऊत यांनीही या समारंभास येण्याचे मान्य करून आपल्या कार्याची हकीगत लिहून पाठवली

पुना गेस्ट हाऊस, लक्ष्मीरोड, पुणे २
धर्मभास्कर, जानेवारी १९८०

गीतेतला आवडता श्लोक

... मला गीताधर्म हा जागतिक धर्म होण्याच्या व्यापक दृष्टीने अठराव्या अध्यायातील ४६ वा श्लोक अधिक आवडतो. तो असा –

यतः प्रवृत्तिर्भूतानाम् येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च सिद्धिं विन्दति मानवः ।।

यात ईश्वराचे विशिष्ट नामाभिधान नाही, ज्यापासून सर्व सजीव-निर्जीव सृष्टी प्रसृत झाली – मग तो, गॉड म्हणा, अल्ला म्हणा, परमात्मा म्हणा, विष्णू म्हणा – तसा कोणताही विशिष्ट नामनिर्देश या श्लोकात नाही. स्वकर्म हे जगातील कोणत्याही समाजव्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीला असतेच. या स्वकर्माच्या योगाने सृष्टि-कर्त्याची पूजा होते. येथेही मनन, जपन असा विशिष्ट उल्लेख नाही. ! ' अभ्यर्च ' हा व्यापक शब्द योजला आहे. तद्वतच सिद्धी हा शब्द सर्वसमावेशक आहे. कोणी स्वर्ग मानो, कोणी निर्वाण मानो, ' सिद्धी ' या शब्दात त्याचा अंतर्भाव होतो. तसेच हा श्लोक मानवांकरता आहे; मानवजातीइतका त्याचा विस्तार होतो पहिल्या अर्ध्यामधील परमेश्वराचे व्यापक अर्थाचे वर्णन आहे त्याला ' ज्ञान ' म्हणता येईल. दुसऱ्या चरणात ' स्वकर्माने अभ्यर्चन ' सांगितल्याने त्यात कर्म व भक्तिभाव यांचा समावेश होतो. हा व्यापक संग्राहक श्लोक म्हणून मी सर्वात चांगला ठरविला आहे... ... ...

गीतादर्शन, ऑगस्ट ८०

जादूचे चौकोनावर संस्कार

जादूच्या चौकोनासंबंधाने ब्रिटिश आणि अमेरिकन विश्वकोशांमध्ये आकृतींसह विवेचन आहे. ज्ञानकोशामध्येही ते आहे. 'कुहक गणित' नावाचे एक पुस्तक जुन्या ग्रंथांचा संग्रह असलेल्या काही व्यक्तींकडे आहे. त्यातही या चौकोनांची माहिती दिली आहे. हा एक आकड्यांचा खेळ आहे. त्यांत मोठे गणितत्त्व असे काही नाही असे ज्ञानकोश म्हणतात. या चौकोनांवर किंवा चौकटींवर मी काही "आकडे-संस्कार" करून पाहिले. ते विश्वकोशातून नाहीत तेही गमतीचे वाटतात म्हणून या लेखामध्ये दिले आहेत.

विषम आकड्यांचा वर्ग, म्हणजे स्क्वेअर, यांच्या सर्व चौकटी होतात. म्हणजे ९, २५, ४९, ८१ अशा घरांच्या, म्हणजे $३^२$, $५^२$, $७^२$, $९^२$ या घरांच्या चौकटी होतात. पण सम आकड्यांच्या वर्गसंख्येइतकी घरे असलेली एकच चौकट $४^२$ म्हणजे १६ घरांचीच फक्त होऊ शकते. $६^२$, $८^२$. $१०^२$ म्हणजे ३६, ६४ १०० या घरांच्या जादूच्या चौकटी (म्हणजे उभ्या, आडव्या आणि तिरप्या पट्ट्यांची एकच बेरीज येणाऱ्या चौकटी) होऊ शकत नाहीत. विषम आकड्यांच्या वर्गाच्या इतकी घरे असलेल्या जादूच्या चौकटी मांडण्याची एक ठराविक रीत आहे. ती सर्वात छोट्या अशा नऊ घरांच्या चौकटीवरून बसवलेली आहे. विश्वकोशांमधून ती दिलेली आहे.

सर्वात लहान म्हणजे नऊ घरांची चौकट एकच आहे. ती म्हणजे :–

८	१	६
३	५	७
४	९	२

ही चौकट चार रीतीनी फिरवून किंवा त्या रीती आरशापुढे धरून वेगळ्या भासणाऱ्या चौकटी होतात. पण मुळात एकाच चौकटीचे ते भासमान पर्याय आहेत. या चौकटीवर मी एक संस्कार करून पाहिला. तो असा की १ ते ३ आकडे लिहावयाचे आणि पुढील प्रत्येकी तीन आकड्यांचे जागी १ ते ३ हेच आकडे घालावयाचे. या सस्काराने पुढील पर्याय उपलब्ध होतो :–

२	१	३
३	२	१
१	३	२

यामध्ये सर्व पट्ट्यांची बेरीज सहा येते. फक्त मधल्या एका तिरप्या पट्टीतच २ या आकड्यांची लांबण लागते.

पण पंचवीस घरांच्या १ ते २५ आकडे भरलेल्या जादूच्या चौकटीवर हा संस्कार केला तर असा दोष राहात नाही. पंचवीस आकड्यांची जादूची चौकट पुढीलप्रमाणे आहे :—

१७	२४	१	८	१५
२३	५	७	१४	१६
४	६	१३	२०	२२
१०	१२	१९	२१	३
११	१८	२५	२	९

यावर तसा संस्कार केला तर पुढील चौकट येते :—

२	४	१	३	५
३	५	२	४	१
४	१	३	५	२
५	२	४	१	३
१	३	५	२	४

यामध्ये मात्र सर्व पट्ट्या निर्दोष म्हणजे १५ ही बेरीज देणाऱ्या होतात; उभ्या ४, आडव्या ४ आणि तिरप्या २ ही पट्ट्यांची बेरीज एकच येते आणि कोणत्याही आकड्याची पुनरुक्ती एकाच पट्टीत होत नाही.

असाच संस्कार ७² म्हणजे ४९ घराच्या चौकटीवर केला तर तशीच निर्दोष चौकट लाभते. मात्र ९² म्हणजे ८१ घरांच्या चौकटीवर तो संस्कार केला तर फक्त एका तिरप्या पट्टीत आकड्यांची पुनरुक्ती होण्याचा दोष राहतो, सर्व बेरजा मात्र एकच येतात.

११² म्हणजे १२१ घरांची १ ते १२१ आकडे मांडलेली चौकट घेतली आणि तोच 'संस्कार' केला तर १ ते ११ एवढेच आकडे ११ पट्ट्यांत बसवलेली चौकट लाभते. ती निर्दोष असते. एकाही पट्टीत तोच तो आकडा येत नाही. प्रत्येक पट्टीची बेरीज ६६ येते.

१३² म्हणजे १६९ घरांचा व तितकेच आकडे असलेला चौकोन घेतला व त्यात सर्व १ ते १३ आकडे येण्याचा वरीलप्रमाणे संस्कार केला तर सर्व पट्ट्यांमध्ये १ ते १३ आकडे येऊन कोठेच एका आकड्याची द्विरुक्ती होत नाही. सर्व पट्ट्यांची बेरीज ९१ येते,

१५² म्हणजे २२५ घरांच्या व तितकेच आकडे असलेल्या चौकटीमध्ये वरीलप्रमाणे 'संस्कार' करून १ ते १५ आकडे भरले म्हणजे सर्व पट्ट्यांची बेरीज १२० अशी सारखी येते. मात्र ९ आणि ८१ घरांच्या चौकटीप्रमाणे केवळ एका तिरप्या पट्टीमध्ये तेच आकडे पुन्हा येतात. म्हणजे ९, ८१ जाणि २२५ घरांच्या चौकटीत एका तिरप्या पट्टीत तेच आकडे पुन्हा येतात. पण २५, ४९, १२१, व १६९ म्हणजे ५², ७², ११² व १३² अशा घरांच्या चौकटीवर वरील 'संस्कार केला तर सर्व पट्ट्यात कोणत्याही आकड्याची द्विरुक्ती होत नाही व बेरजा सारख्याच येतात.

समसंख्येच्या वर्गाइतकी घरे असलेली जादूची चौकट फक्त ४² = १६ घरांचीच होते. उभ्या, आडव्या, तिरप्या अशा सर्व ओळींची बेरीज ३४ होणाऱ्या सोळा घरांच्या १ ते १६ आकडे बसवलेल्या अशा जादूच्या चौकटी एकूण ५८ इतक्या होऊ शकतात. या चौकटीकडे प्राचीन काळात अनेक लोकांचे लक्ष वेधले गेले होते. मोठी इमारत टिकाऊ व्हावी यासाठी तांत्रिक उपाय म्हणून बांधकाम करणारे लोक एका भितीवर चौकट कोरीत असावे. कारण ग्वालेरच्या किल्ल्याच्या भितीवर ही चौकट कोरलेली आहे तशीच खजुराहो मंदिराच्या भितीवरही कोरलेली आहे. (महाराष्ट्र ज्ञानकोश). त्याचप्रमाणे अशी एक चौकट कशी बनवावी हे सांगणारा एक संस्कृत श्लोक प्रचलित आहे, तो असा –

वांच्छाकृतार्थं कृतहीनमेकं ।
द्विके ग्रहे षोडश सप्त नागे ।
तिथौ दिशायां प्रथमेच कोष्टे ।
द्विसप्त षट्–त्रि अष्ट–कु वेदबाणाः ॥

वांच्छाकृत म्हणजे ३४ ही बेरीज सर्वत्र व्हावी हे इच्छित, त्याचे 'अर्धे' म्हणजे १७, त्यातून एक वजा करा (कृतहीनमेकं) म्हणजे १६ हा आकडा येतो' तो (द्विके) म्हणजे वरून मोजून दुसऱ्या खान्यात घाला. यापुढे 'हीनमेकं' करीत जावयाचे १५ हा आकडा 'ग्रहे' म्हणजे नवव्या घरात घाला. पुढे १४ हा आकडा 'षोडश' म्हणजे शेवटच्या सोळाव्या घरात घाला. पुढील १३ व १२ हे आकडे सातव्या व आठव्या घरात (सप्तनागे) घाला. पुढे ११ हा आकडा 'तिथौ' म्हणजे पंधराव्या घरात घाला. पुढे १० हा आकडा 'दिशायां' म्हणजे दहाव्या घरात घाला आणि ९ 'प्रक्ष्मे' म्हणजे पहिल्या घरात हा आकडा बसवा. असे केले म्हणजे ज्या अर्ध्या पट्टचा कोऱ्या उरतात त्यांत (कोष्टे), २ व ७ (द्विसप्त), ६ व ३ (षट्–त्रि), ८ व १ (अष्ट–कु; कु = पृथ्वी) आणि ४ व ५ (वेद, बाणाः) असे आकडे बसवा म्हणजे चौकट पूर्ण होते.

९	१६	२	७
६	३	१३	१२
१५	१०	८	१
४	५	११	१४

या विशिष्ट चौकटीला मी 'संस्कृत चौकट' हे नाव वरील श्लोकाधारे देतो. ग्वालेर व खजुराहो येथील चौकटींचे आकडे मात्र या संस्कृत चौकटीहून भिन्न आहेत. त्यावरून असे दिसते की १६ घरांच्या अनेक उपलब्ध चौकटींपैकी कोणतीही चौकट बांधकामाच्या टीकाऊपणासाठी कोरली जात असावी. १६ घरांच्या जादूच्या अनेक चौकटी असताना एकाच प्रकारच्या चौकटीवर प्राचीन संस्कृत श्लोक का रचला जावा, हा प्रश्न सहजच मनात येतो. मी करून पाहिलेले 'संस्कार' या संस्कृत चौकटीवर जसे जुळतात तसे इतर बऱ्याच चौकटींवर जुळत नाहीत.

परफेक्ट स्क्वेअर

उदाहरणार्थ, उभ्या–आडव्या मिळून ८ ओळी आणि तिरप्या दोन ओळींची बेरीज प्रत्येकी ३४ येत असली म्हणजे त्या चौकटीला 'पूर्ण चौकट' (परफेक्ट

स्क्वेअर) असे इंग्रजी ज्ञानकोशात सांगतात. पण याव्यतिरिक्त मधल्या चार आकड्यांची बेरीज, टोकाच्या चार आकड्यांची बेरीज, मधल्या आणि समोरा-समोरच्या अशा चार आकड्यांची बेरीज ३४ च येणारे चौकोन कमी आहेत. त्यांना मी 'परिपूर्ण चौकोन' म्हणतो. संस्कृत चौकोन असा परिपूर्ण आहे.

आणखी एक संस्कार असा की, चार संस्कृत चौकोन चार बाजूला एकेक असे सलग करून मांडावेत म्हणजे ही चौसष्ट घरांची मोठी चौकट बनेल. त्याच्या पोटातले सर्व, म्हणजे १६, चौकोन हे 'पूर्ण' चौकोन होतात. सोळा घरांइतके एक चौकोनी भोक कागदाच्या मध्ये पाडावे व हा कागद या चौसष्ट घरांच्या मोठ्या संयुक्त चौकटीवरून फिरवावा, म्हणजे ताडून पाहता येईल.

तिसरा संस्कार जो या लेखाच्या आरंभास विषम वर्गाच्या चौकटीवर केला आहे तोच. तो असा की, १ ते ४ हे आकडे जसेच्या तसे लिहा, पण ५ ते ८ आकड्यांच्या जागी पुनः १ ते ४ लिहा, ९ ते १२ ऐवजी १ ते ४, तसेच १२ ते १६ च्या ठिकाणी १ ते ४ असे लिहिले तर, १ ते ४ आकड्यांची सोळा घरांची चौकट मिळते. तीत सर्व उभ्या, आडव्या, तिरप्या ओळींची बेरीज १० हीच येते. तसेच मधोमध असलेल्या चार आणि टोकाच्या चार आकड्यांची बेरीजही १० च येते; आणि आकड्यांची पुनरुक्ती होत नाही. संस्कृत चौकोनाला हा संस्कार लागू पडतो इतकेच नव्हे तर चार संस्कृत चौकोन एकत्र मांडून जी ६४ घरांची मोठी चौकट होते, तिच्यात मिळणाऱ्या १६ घरांच्या चौकटींनाही वरील न्याय लागू पडतो.

-- रविवारची लोकसत्ता, दि. १७-८-१९८०

केसरीची शंभर वर्षे : लोकजीवन आणि 'केसरी'

कै. ग. वि. केतकर यांचा व केसरीचा संबंध उणापुरा ४० वर्षांचा. सहसंपादक, संपादक, विश्वस्त इ. अनेक स्थाने त्यांनी भूषविली. मृत्युपूर्वीच त्यांच्याकडून हा लेख घेतला होता. केसरी शताब्दीच्या निमित्ताने तो मुद्दाम देत आहोत.

—संपादक

दि. ४ जानेवारी १८८० ला महाराष्ट्राच्या या वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकजीवनाशी निगडित असलेल्या वृत्तपत्राचा पहिला अंक निघाला आणि गेली शंभर वर्षे 'केसरी' हे समाजाने मानलेले अग्रगण्य वृत्तपत्र भरगच्चपणे वाटचाल करीत आहे. प्रस्तुत लेखक हा एक जुन्यात जुना आणि विद्यमान असलेला संपादक आहे. पण तेवढ्याने मला काही प्रथमपासूनची माहिती असणे शक्य नाही. केसरी माझ्या जन्मापूर्वी १८ वर्षे जन्मला आणि त्यानंतरही चोवीस वर्षांनी माझा सहसंपादक या नात्याने केसरीशी संबंध आला. १९२२ मध्ये मी केसरीमध्ये दाखल झालो. मात्र तत्पूर्वी ८ वर्षांपासून, म्हणजे १९१४ पासून, मी विद्यार्थीदशेत केसरीबाडग्यातच होतो. त्या काळामध्ये लोकमान्य टिळक सोमवारी संध्याकाळी लेखनिक बोलावून त्याला 'केसरी' चे अग्रलेख सांगत. असे अनेक अग्रलेख मी ऐकलेले आहेत. केसरीचा पहिला अंक मंगळवार दि. ४ जानेवारी १८८० मध्ये निघाला तेव्हापासून टिळकांच्या स्वर्गवासापर्यंत आणि पुढेही काही वर्षे केसरी मंगळवारचा साप्ताहिकच होता. पहिल्या अंकाच्या पहिल्या पृष्ठाचे छायाचित्र केसरीत छापले गेले आहे. तो आकार आजच्या केसरीच्या सुमारे एक-चतुर्थांश इतकाच होता. एका पृष्ठात दोनच स्तंभ आणि तेही जाड टाइपात असत हे त्यावरून दिसून येईल. पुढे मी दहा वर्षांचा असताना, म्हणजे १९०८ सालापासून, नाशिकला माझ्या पितृगृही केसरी पाहिलेला आहे. त्याचा आकार आजच्या केसरीहून मोठा होता पण चारच पाने असत. नावाचा ठसाही आजच्या नावाच्या ठशापेक्षा मोठा होता. त्या वेळी दोन्ही बाजूला सिंह नव्हते. कागदही काळसर असे. पण अलीकडे मधून मधून दैनिक 'केसरी' ला काळा कागद द्यावा लागत असे तितका काळा नव्हता.

टिळकांचा बंदिवास

१९१४ मध्ये टिळक मंडालेहून सुटून आले. आणि मी महाविद्यालयीन शिक्षणासाठी टिळकांच्या घरी गायकवाडवाड्यात विद्यार्थीदशेत राहिलो तेव्हापासून माझा केसरीशी निकट संबंध आला. टिळक तुरुंगात असताना संपादक श्री. तात्यासाहेब केळकर होते पुढेही त्यांचे नाव संपादक म्हणून राहिले. पण टिळक मधून मधून अग्रलेख देत ते त्यांच्या भाषेवरून लोकांना सहज समजणारे होते. १९०८ मध्ये लो. टिळकांना सहा वर्षांची भयंकर शिक्षा झाली तेव्हा सर्व देश हळहळला. त्याचे आधीपासूनच राष्ट्रीय पक्षाच्या वर्तमानपत्रांवर खटले सुरू झाले होते. आणि बहुतेक सर्व संपादकांना लहानमोठ्या शिक्षा झाल्या होत्या. केसरी समवेतच 'काळ', 'भाला', 'देशसेवक' इत्यादी वृत्तपत्रांवर राजद्रोहाचे खटले भरून त्यांच्या संपादकांना तुरुंगात टाकण्यात आले होते. बंगालमधील 'नवशक्ती', 'संध्या' इत्यादी राष्ट्रीय वृत्तपत्रांच्या संपादकांना शिक्षा झाल्या, त्या वेळचे सन्मित्र समाजातील पदाचे एक कडवे मला आठवते ते असे–

'नवशक्ती संध्यापत्र । शिक्षेचे चालू सत्र ।
पेटली आग सर्वत्र । जाळी कैकांना ।।'

टिळक सहा वर्षांची शिक्षा संपवून परत येतील का ? असा संदेह लोकांना व्यग्र करीत असे –

षट्वर्षाधिक षण्मासांनी ।
आलो दैवे जरि परतोनी ।
भेटेन तुम्हा प्रेमाने ।।

त्या वेळच्या मेळचातल्या पदाने हीच लोकांची चिंता व्यक्त झाली होती. ही पदे ऐकणाऱ्या समाजाचे डोळे त्या वेळी अश्रुपूर्ण होत असत. १९०८ च्या सार्वत्रिक दडपशाहीमुळे सर्व वातावरणात स्मशान-शांतता वावरत होती. टिळक सुटल्यावरही त्यांना आता पूर्वीसारखी चळवळ करणे अशक्य असून त्यांनी आता संन्यास घेऊन धर्म-संकीर्तन करावे अशा अर्थाचे लिखाण नेमस्त पक्षाच्या वृत्तपत्रांतून आले होते. वर दिलेल्या मेळचाच्या पदामध्ये 'षट्वर्षाधिक षण्मासांनी' असा काळनिर्देश आलेला आहे. याचे कारण १८९७-९८ चा तुरुंगवास १८ महिन्यांचा असताना, पुन्हा राजद्रोह केला तर उरलेली सहा महिन्यांची शिक्षा भोगण्याच्या अटीवरच त्यांची एक वर्षाने सुटका झाली होती. पुढे या अटीतून सरकारने त्यांना मुक्त केले. म्हणून जनतेच्या दृष्टीने टिळकांची सुटका अपेक्षेच्या मानाने सहा महिने लवकर झाली.

कडक लेखांचे प्रसंग

पुण्यातील रँडसाहेबाच्या प्लेग हटवण्याच्या निमित्ताने झालेल्या धुमाकुळाविरुद्ध टिळकांनी कडाडून लिहिले. पुढे चाफेकरांनी रँडसाहेबाचा खून केला. टिळकांच्या लेखामुळे चाफेकर खुनास प्रवृत्त झाले अशा समजुतीने सरकारने केसरीवर खटला भरला आणि दीड वर्षाची शिक्षा ठोठावली. पुढे मुझफरपूरचे बाँबप्रकरण झाले. त्यासंबंधी लिहिलेल्या केसरीतील तीन लेखांवरून टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली. केसरीतील या तीन अग्रलेखांचे मथळे असे होते– (१) देशाचे दुर्दैव, (२) बाँबचे रहस्य, (३) हे उपाय टिकाऊ नव्हेत. यांपैकी फक्त पहिला अग्रलेख टिळकांचा होता, पुढचे दोन कृष्णाजीपंत खाडिलकर यांचे होते. टिळक हे कायदेपंडित असल्याने त्यांचे लेख शक्य तो कायद्याला बगल देऊन लिहिलेले असत. प्रथम पाहिल्या लेखाचे इंग्रजीत भाषांतर झाले. आणि तेवढ्यावरून आरोप ठेवून हायकोर्टाकडे खटला पाठवावयाचा असा सरकारी बेत होता. पण तेवढ्या एका लेखावरून 'केसरी' ला दोषी ठरवता येणार नाही असा सल्ला आयत्या वेळी सल्लागारांनी दिला. म्हणून आरोप ठेवण्याचे वेळी एका लेखाचेच फक्त इंग्रजी भाषांतर दाखल करून इतर दोन लेख मूळ मराठीतच दाखल केले गेले. पुढे हायकोर्टात त्यांचे इंग्रजी भाषांतर झाले. कायद्याला वळसा घालण्याच्या दृष्टीने बचावाला उपयुक्त वाक्ये मधून मधून घालण्याचे चातुर्य टिळकांच्या लिखाणात असे. खाडिलकर हे कायद्याचा अभ्यास केलेला नसल्याने त्यांच्या लेखांत हे बारकावे साधत नसत हे स्वाभाविक होय. टिळकांनी हायकोर्टात स्वतःच बचायाचे भाषण केले, त्या वेळी त्यांना हे दोन लेख अडचणीचे वाटले असले पाहिजेत.

टिळकांचे तेजोवलय

सुस्थ पंडित सुखासीनतेत राहून टीका-टिप्पणी करणारे असतात. तसे टिळकांच्या काळातही भरपूर होते. 'टिळकांचे राजकारण म्हणजे काय ? कडक लिहिणे आणि तुरुंगात जाणे, याने का स्वराज्य मिळणार आहे ?' अशा अर्थाची टीका करणारे लोक होते 'टिळक हे आपले डोके दगडावर आपटून घेत आहेत.' ही नेमस्तांची उक्ती तर प्रसिद्धच आहे. १९०५ च्या वंगभंगाच्या चळवळीपासून ब्रिटिश राज्याविरुद्ध सडेतोड आणि जनतेच्या भावनांना तोंड फोडणारे लिखाण आणि भाषणे मुख्यतः महाराष्ट्र, पंजाब आणि बंगाल येथे सुरू झाली. टिळकांची निर्भीड भाषणे आणि राजसत्तेवर सरळ आघात करणारे लेख आणि त्याच्या समवेतच सरकारविरोधी राष्ट्रीय पक्षाची आणि त्याच्या ठसठशीत कार्यक्रमांची उभारणी यामुळे १८९७ पासून, टिळक म्हणजे केसरी आणि केसरी म्हणजे टिळक, असे भावनात्मक समीकरण लोकमानसात रूढ झाले. १९२० मध्ये टिळक निवर्तल्यावरही टिळकांचे तेजोवलय 'केसरी'भोवती नित्याचे राहिले. महाराष्ट्रात

एक काळ असा होता की 'केसरी' या शब्दाचा अर्थच महाराष्ट्रातील ग्रामीण भागात 'वर्तमानपत्र' असाच झाला होता. टिळकांनी अनेकवार आपले जीवित धोक्यात घालून आपला बाणा राखला. १८९७-९८ च्या एका वर्षाच्या खडतर तुरुंगवासात जाण्यापूर्वीचे त्यांचे छायाचित्र आणि तेथून सुटका झाल्यानंतरचे छायाचित्र अशी समोरासमोर त्या काळात छापण्यात आली होती. आपल्या तुरुंगवासातील हालासंबंधी वर्णन करीत बसणे हे टिळकांच्या स्वभावातच नव्हते. पण. १९०३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'आर्क्टिक होम इन् धि वेदाज्' या इंग्रजी ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी काही अनुषंगाने एकच वाक्य लिहिले आहे की –

'Political prisoners were treated no better than ordinary convicts in those days.' पुढे मंडालेच्या भयंकर जीवघेण्या उष्ण हवेत सहा वर्षे काढल्यानंतर त्यांचे शरीर तर अगदीच क्षीण झालेले होते. मंडालेहून त्यांनी पाठवलेल्या एका पत्रात अशा अर्थाचे वाक्य आहे की 'हा मार्च महिना आला, येथून जूनअखेरपर्यंत हवेतील उष्मा सारखा चढत जाऊन असह्य होणार. पण याला आता तोंड देणे प्राप्तच आहे.' टिळक शरीराने खचले तरी मनाने मात्र शेवटपर्यंत कधीच खचले नाहीत.

टिळकनिधनानंतर

टिळकांच्या निधनानंतर, टिळकांपुढे ज्यांचे काही चालले नाही आणि त्यांच्या आघाताने जे विव्हल झाले होते अशा अनेक लोकांनी टिळकांचा पक्ष आणि टिळकांचे केसरी पत्र नाहीसे करण्याची ही सुसंधी आहे असे मनात धरून केसरीवर व टिळकपक्षावर हल्ले चढविले. तशात महात्मा गांधी यांच्या मार्गामध्ये विधिमंडळात जाऊन प्रतियोगी सहकारिता करण्याचे तत्त्व बसत नव्हते. टिळकांचे धोरण चालवून त्याचे समर्थन करण्याचे अवघड काम तात्यासाहेब केळकर यांच्यावर येऊन पडले. चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूसारखे ते लढले. प्रतिकूल कालामध्ये आपल्या मतावर खंबीरपणे उभे राहिले. विधिमंडळातून प्रवेश करून त्या साधनाने राष्ट्रीय चळवळ बलिष्ट करणे या मताची काहींनी सभ्यपणे तर पुष्कळांनी अतिशय असभ्यपणे अवहेलना केली. कै. न. चिं. केळकर या काळातल्या अनेकांगी विरोधाला शरण न जाता ताठ उभे राहिले. असभ्य लिखाणांना आणि वक्तव्यांना तर्कशुद्ध आणि समर्पक उत्तरे देत राहिले. शेवटी केळकरांच्या मताचा विजय झाला. 'Parliamentary mentality has come to stay' अशा शब्दांत, ते मत नापसंत असताही, गांधीजींना निर्वाळा देणे प्राप्त झाले. त्या वेळी केसरीने 'सार्थ केळकरमत विजय' असा अग्रलेख लिहिला होता. स्वतः केळकर प्रचंड बहुमताने दिल्लीच्या केंद्रीय विधिमंडळावर निवडून गेले. जम्नादास मेहता, नारायणराव गुंजाळ यांच्यासारखे टिळकमार्गी लोक मुंबईच्या विधिमंळात गेले.

टिळकांनी ज्याप्रमाणे राजकारणासमवेतच वैदिक-काल-संशोधनाचे काम केले तद्वतच केळकरांनी राजकारण व पत्रकारिता सांभाळून, निर्धाराने चालवून साहित्यामध्येही अग्रपूजेचा मान आणि 'साहित्यसम्राट' ही, लोकांनी दिलेली उत्स्फूर्त पदवी मिळवली. केसरीतील हे 'केळकर-पर्व' १९२० ते १९४७ पर्यंत चालले आणि त्यातही केळकरांनी 'केसरी'च्या प्रतिष्ठेत भरच टाकली.

देशाचे विभाजनपूर्वक स्वातंत्र्य अवतरले त्या वेळी केळकर हे निवृत्त होते. पण १९४८ च्या जानेवारीतील गांधीहत्येच्या भीषण प्रसंगापूर्वी ते स्वर्गवासी झाले होते. त्या वेळी 'केसरी' संस्थेवर आलेल्या बिकट समस्यांना तोंड देण्याची पाळी मुख्य संपादक आणि विश्वस्त म्हणून माझ्यावर आली. अर्थात् तात्यासाहेब करंदीकर आणि अण्णासाहेब भोपटकर या दोघा वयस्क विश्वस्तांचा मला पाठिंबा होता. केळकर-कालखंडाच्या उत्तरार्धात, मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्यांपुढे असहाय अशी दिसणारी शरणागती गांधीजींनी पत्करली. खिलाफतीच्या चळवळीशी हातमिळवणी करण्यापासूनच गांधीजींची ही अगतिकता दिसत होती. पुढे ब्रिटिशांनी हिंदू-मुसलमानांच्या संबंधात जो 'कम्यूनल ॲवार्ड' म्हणून निर्णय दिला तो उघडपणे मुसलमानपक्षपाती असला तरीही गांधीजींच्या पुढारीपणाखाली काँग्रेसने त्यासंबंधी गुळमुळीत धोरण स्वीकारले. तेव्हा केळकरांना हिंदूंची न्याय्य बाजू घेऊन उभे रहावे लागले. असहकारितेच्या बाबतीत कौन्सिल बहिष्काराच्या गांधीजींच्या धोरणाला जसा 'केसरी'ने विरोध केला तसाच या वेळीही केळकरांच्या नेतृत्वाने 'केसरी' ने गांधीजींच्या पडखाऊ धोरणाला विरोध केला.

सावरकर युग

स्वराज्यप्राप्तीसाठी मुसलमानांना संतुष्ट करून राष्ट्रीय स्वातंत्र्य-यत्नामध्ये सहभागी करणे अपरिहार्य मानून त्यासाठी मुसलमानांचा अनुनय, हिंदुहिताचा वाटेल तसा बळी देऊन, करावयास पाहिजे. या गांधी णीत आणि काँग्रेसने पत्करलेल्या धोरणाने मुसलमानांचा अडमुठेपणा सतत पोसला गेला. त्यांच्या जातीय सवलतींच्या मागण्या वाढत गेल्या. त्यांचा हिंदुमहासभेने प्रतिकार केला. या वेळी वीर सावरकरांसारखे तेजस्वी महापुरुष हिंदूंची कणखर भूमिका ठणकावून मांडण्यास पुढे आले. स्वराज्यप्राप्तीसाठी मुसलमानांविना हिंदूंचे काही नडत नाही. एकटे हिंदू देखील स्वातंत्र्यप्राप्ती करून घेण्यास समर्थ आहेत. असा हिंदूंमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे वीर सावरकर यांनी जे प्रभावी प्रयत्न केले त्याला 'केसरी' ने सतत पाठिंबा दिला. 'केसरी' मधील केळकर युगाचा उत्तरार्ध केळकर-सावरकर युग असा जोड उल्लेख करणे अन्वर्थक होईल. सावरकरांनी प्रेरित केलेल्या निःशस्त्र प्रतिकाराच्या आंदोलनामध्ये 'केसरी'

प्रथम क्रमांकाचा सहायक झाला. वीर सावरकरांच्या सन्मानार्थ आणि गांधी-खून-खटल्यातील बचावार्थ निधी जमवण्यात आले. त्यामध्ये केसरीचा सिंहाचा वाटा होता.

दैनिक केसरी

केळकरांच्या काळात 'केसरी' आठवड्यातून दोनदा, म्हणजे मंगळवारी आणि शुक्रवारी, निघू लागला होता. पुढे रविवारच्या केसरीची त्यात भर पडली. श्री. जयंत टिळक यांच्या हाती केसरीची धुरा १९५० मध्येच आली. पण त्यांनी तात्यासाहेब करंदीकर आणि अण्णासाहेब भोपटकर यांच्याकडे वडीलकीमुळे असलेल्या नेतृत्वाला सांभाळूनच वाटचाल केली. पुढे त्यांनी 'केसरी' दैनिक केला आज वृत्तपत्र आणि मतपत्र या दोन्ही दृष्टींनी दैनिक पत्रांना अग्रस्थान प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत इतक्या वेगाने घडामोडी चालल्या आहेत की पूर्वीप्रमाणे केवळ साप्ताहिके जनतेला आकलन होण्यासारखे सर्व घडामोडींचे धावते चित्रण करू शकत नाहीत. पूर्वी 'ज्ञानप्रकाश' आणि 'सकाळ' या दैनिक वृत्तपत्रांनी महाराष्ट्रात दैनिके वाचण्याची वाचकांची प्रवृत्ती वाढती ठेवली होती. त्या वाढत्या प्रवृत्तीचे पूरण करण्यासाठी श्री जयंतराव टिळकांनी केसरी योग्य वेळी 'दैनिक' केला. व्यवसायाच्या दृष्टीने त्याला 'ग्रंथप्रकाशन' विभागाची जोड देऊन अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. केसरीचा व्याप आज कितीतरी पटींनी आढला आहे. आज लोकांना राजकीय व सामाजिक मते बनवण्याची वृत्तपत्रांव्यतिरिक्त साधने अधिक प्रचुर आणि प्रबळ आहेत. यामुळे लोक आधीच आपली मते बनवतात आणि मग त्या मतांचा परिपोष करणाऱ्या वृत्तपत्रांकडे वळतात. वृत्तपत्रे त्या मतांना पोषक अशी माहिती आणि समर्थक असे कोटिक्रम पुरवितात.

मुक्त पत्रकारिता

मी १९५० मध्ये केसरीचे मुख्य संपादकत्व आणि विश्वस्तपद सोडले तरी १९५६ अखेरपर्यंत केसरीतच उपसंपादक म्हणून काम करीत राहिलो. १९५७ ते १९६४ पर्यंत आठ वर्षे मी 'तरुण भारत' दैनिकाचा संपादक म्हणून काम केले. 'पण आजवर मुक्त पत्रकार (फ्री लॅन्स जर्नालिस्ट) म्हणून मी 'केसरी' आणि 'तरुण भारत' या दोन्ही पत्रांशी संबंध लेखक या नात्याने चालू ठेवला आहे. यामुळे १९१४ ते १९८० पर्यंत सहासष्ट वर्षे माझा 'केसरी' शी संबंध आहे, मी माझ्या लेखांसाठी 'केसरी' च्या संपन्न ग्रंथशाळेचा उपयोग सतत केला आहे. 'तरुण भारत' मध्ये मी १९६१ साली 'हिंदूंचे कुराणवाचन' अशी लेखमाला लिहिली त्या वेळी कुराणाची मराठी व इंग्रजी भाषांतरे मी 'केसरी' ग्रंथालयातूनच आणली होती. डॉ. बाबासाहेब आंबडकरांच्या बौद्ध धर्मासंबंधाच्या ग्रंथावर मी

'तरुण भारत' मध्ये लेखमाला लिहिली त्या वेळीही तो ग्रंथ मी 'केसरी' ग्रंथशाळेतूनच आणला होता. काँग्रेस पक्ष आज ज्याप्रमाणे गांधी व नेहरू यांची पुण्याई मानतो त्याप्रमाणेच 'केसरी'च्या मागे टिळक आणि केळकर यांच्या पुण्याईचा वारसा आहे. गेल्या शंभर वर्षामध्ये 'केसरी'ची वाटचाल झाली तिचा धावता परामर्श देखील एका लेखात आवरणे दुरापास्त आहे. 'तरुण भारत'चे संपादक श्री. देवधर यांनी मला जेव्हा 'केसरी'च्या शताब्दीच्या निमित्ताने लेख लिहिण्याची विनंती केली तेव्हा मला पुष्कळ विचारांचा आणि घटनांचा एका लेखात कसा काय आटोप होणार याची पंचाईत पडली. हात आवरीतच हा लेख संपविला आहे. तरीही वयस्कवाचक 'अमुक गोष्टीचा वा तमुक घटनेचा उल्लेख का नाही ?' अशी विचारणा करणारे निघतीलच, पण त्याला इलाज नाही.

—तरुण भारत, पुणे, दि. ४–१–१९८१

प्रश्नोक्त - उत्तर - माला

—ग. वि. केतकर.

संस्कृतमध्ये "कं संजधान कृष्णः" इ. प्रश्नातच उत्तर मिळणारे सुभाषित आहे. "कंसं जधान कृष्णः" अशी पदे पाडली म्हणजे प्रश्नातूनच उत्तर मिळते. 'कृष्णाने कोणाला मारले ?' असा एका पदजुळणीचा अर्थ होतो; वर दुसऱ्या प्रकारे जुळणी केली असता 'कृष्णाने कंसाला मारले' असे उत्तर लाभते. सध्या संस्कृत जाणणारे वाचक कमी म्हणून सर्व सुभाषित देत नाही. मराठीमध्ये अशी रचना करण्याचा मी प्रयत्न करू लागलो, सोपे 'आर्या' वृत्त घेतले. होता होता 'एकूण ४०' आर्या जुळल्या, त्या देत आहे. ज्या शब्दांवरून उत्तरार्ध लाभतो ते ठळक केले आहेत.

शिप्याला व्यवसायी फक्त शिलाईच लाभते गमते ।
परि **का पडे** न कळता इतर तया लाभ शेवटी कळते ॥१॥

चोराया यात्रिक - धन तस्कर झटती अनेक मार्गस्थ ।
द्रव्य **कशामधि** ठेवुनि यात्रिक होतात मानसी स्वस्थ ॥२॥

मूल्य सुवर्णा मोठे न्यूनाधिक होतसे परी होणे ।
सुवर्णकार क्षणि ते पारखताती **कसे** कुशल जाणे ॥३॥

अग्नीमधून निघता लोहशलाका दिसे मलीन किती ।
का नसताच चकाकी पुढती ती येतसे तिच्यावरती ॥४॥

तांबूलामाजी दिसे पान चुन्याच्या पुढे जरी धवल ।
का तेच मुखामाजी चर्वण करताच होतसे लाल ॥५॥

बाला हाती पुस्तक शोक रसात्म धरूनि वाचितसे ।
का जळ नेत्रामधुनी पडता त्याच्यात कृष्णवर्ण दिसे ॥६॥

न्यायालयि दैनंदिन विधिज्ञ करिती विवाद निःसीम ।
फल तेथ **काय** दावी धनलाभाचे तयांस वृक्षसम ॥७॥

कृत्रिम नागर जीवनी नाना व्याधी जनास पीडिति ते ।
कोठे उपचारांचे स्थान असे ते कळे सुवैद्याते ॥८॥

स्वर्लोकी सिंहासनि अमरी इंद्रास अर्पिले स्थान ।
का मानले तया हो थोर तपस्वीजनात पद हीन ॥९॥

जलतरण-कला तरुणा अभ्यासे होतसे सुसाध्य जरी ।
का तरता प्रथम जलि अडकाठी येतसे तयास तरी ॥१०॥

पिळदार देह करण्या मलखांबी योजिल्या अनेक उड्या ।
कैची त्यामाजि उडी सर्वाधिक वाकवी शरीर गड्या ॥११॥


इतिहासी गतकालिक रसना रजपूत वीर-गुण गाते ।
शौर्याचे अल्पवयी यश लाभे त्यामध्ये कुणाला ते ।।१२।।
यमनियम पाळुनी तें साधक झटती मनोजयासाठी ।
परि का मना तयांना समर्थ करण्यास येत अडकाठी ।।१३।।
नानाविध आकृतिना भूमिती-शास्त्रात लाभते स्थान ।
कोणाला त्यामाजी सर्वाधिक लाभला असे मान ।।१४।।
व्यायामे पुष्ट बने रोगे वा क्षीण होतसे काय ।
काय औषधोपायी निवळे हे वेगळे वदू काय ।।१५।।
अपुरी भाजीस पडे व्यर्थ न तरी काकडीस दवडावे ।
तीतून काय रस तो लाभे गृहिणीस हे असे ठावे ।।१६।।
भरपूर पीक येता धान्यासीं परि महर्गता मोठी ।
कोठे शोधुनि कारण अधिकारी काढिती तयासाठी ।। १७ ।।
बघता सुंदर नारी बोलावे वाटते तिच्या जवळी ।
कायरता मनुजा परि खेची मागे तया सदाकाळी ।। १८ ।।
जलधारांनी सिंचित ओव्या वस्त्रात देखता नारी ।
काय करी आकर्षण वस्त्राहुन तेधवा जना भारी ।। १९ ।।
स्वातंत्र्यप्राप्तीस्तव उपाय जे शोधतात परतंत्र ।
इतिहास विथि कारण एकच सांगे तयास सर्वत्र ।। २० ।।
श्री अष्टभुजा देवी दुर्लभ भक्तास पावण्या असता ।
का पावयास लागे शेळी भक्ता जना तिच्याकरिता ।। २१ ।।
हरि तोषविण्या लोकी का मुकती सर्व साधने करिता ।
शास्त्राने तत्त्वाने त्यांना नाकारिली यशोगाथा ।। २२ ।।
काय सुशोभित वस्त्रे घेऊन नट नाटकात सजवीती ।
आकर्षित प्रेक्षकजन करण्यासाठीच ही असे रीती ।। २३ ।।
का शीतल जल अंगी पडता धर्मिष्ट होति संतुष्ट ।
हिंदू परंपरेचे कारण त्यालागी सापडे स्पष्ट ।। २४ ।।
आठवीतुनी मुलगी नववीमध्ये असे जरी गेली ।
परि मैत्रिणी विनोदे म्हणती ती सातवीतची उरली ।। २५ ।।
कां कण सोन्याचे ते शंभर केवळ जरी तिच्याजवळी ।
म्हणती बहु श्रीमंतिण तिजला जन भोवती सदाकाळी ।। २६ ।।
साठ गडावर सैनिक लढता मृत होय एक गोळ्यांनी ।
एकूण साठ उरले, मौज अशी अंकनाम-अभिधानी ।। २७ ।।

अर्पुन राष्ट्रा **सावर कर देहां** कष्टवून जे गेले ।
त्यांचे परि अद्यापि कित्येका नच महत्त्व कळलेले ।। २८ ।।
तीन मिळविता एका चौथेपण येतसे जरी गणिती ।
तीन मिळविता एका एकाकीपण कसे उरे जगती ।। २९ ।।
सोडी पाठ करोनी जरि वाङ्मय स्वकीय भाषेचे ।
राही अज्ञानि तो कैसा हे कूट नच कुणा साचे ।। ३० ।।
ये का जनार्दनाची गीते गाण्यात सर्वथा गोडी ।
प्रश्नीच उत्तर मिळे शब्दांची तोड जोडिता थोडी ।। ३१ ।।
न मुनि तया मानितसे तरी कृपा याचितो उभयहस्ती ।
शब्दांची रचना ती जुळवून घ्यावे तदुत्तरा हाती ।। ३२ ।।
मामा म्हणतो त्यासी मारी शत्रू जरी तया काठी ।
संस्कृत भाषा तोंडी त्याच्या बसली खिळून यासाठी ।। ३३ ।।
कंसात कृष्णलेखी जरि दिसले भारतात शत्रुत्व ।
कंसांस कृष्ण लेखी मात्र परी बघती लोक गौणत्व ।। ३४ ।।
सुवर्णसूत्रांमध्ये रचिती शास्त्रे जरी महाज्ञानी ।
तैशा सूत्री नारी तन्वाभरणात गुंफी अज्ञानी ।। ३५ ।।
एकुण वीस कुटुंबिय पाळाया जो गरीब नच शकला ।
परी **एकतीस** दिसतो पाळाया तो समर्थ झालेला ।। ३६ ।।
येती कामी जे जे गृहकार्यी त्या न कोणी मानि मृत ।
युद्धी म्हणती ' **कामी आले** ' जे जाहलेत यात मृत ।। ३७ ।।
पंचवीस संभावित गावीचे पाहुणे घरी आले ।
प्रातःकाळी उठुनी स्नाना **बावीस** सर्व ते गेले ।। ३८ ।।
एकूण वीस तेथून परतुन जेवून तृप्त ते झाले ।
तेवीस परत फिरता वीस आपुल्या घरीघरी गेले ।। ३९ ।।


शेवटच्या दोन आर्या एकत्रित घ्यावयाच्या आहेत, ' एकूण चाळीस ' आर्या झाल्या असे म्हणण्यातही श्लेष आहे.

यांतले सर्वच श्लेष किंवा द्व्यर्थी रचना सारखीच सुगम झालेली नाही. काही सहज तर काही ओढून ताणून अर्थ घ्यावे लागतील, अशी सरमिसळ झाली आहे. पण अशाच प्रकारे कोणी चाळीसावी आर्या जुळविण्याचा प्रयत्न करून पहावा म्हणजे त्यातला अवघडपणा त्याला उमगेल.

– निशिगंध, जुलै १९७०



भाग ३ : सूची



लेख-सूची वाचण्यापूर्वी–

- लेखांची विषयवारी / वर्गवारी स्थूलमानानं केली आहे. वाचनालयातील पद्धतीप्रमाणे 'संदर्भ पहा' अशा नोंदी नाहीत, तशा केल्या असता सूचीच्या पानांची संख्या फार वाढली असती.
- जिज्ञासूंसाठी लेखांच्या उपलब्धतेविषयी थोडा खुलासा :– बहुतेक प्रकाशनांकडे जुन्या अंकांच्या फायली उपलब्ध आहेत; 'तरुण भारत पुणे' आणि 'दैनिक भारत' यांचे अंक कमीजास्त प्रमाणात 'पानशेत'मुळे नष्ट झाले आहेत. तसेच 'वसंत'कडे १९७५ पूर्वीचे अंक उपलब्ध नाहीत. केसरी व लोकसत्ता कार्यालयात लेखांची सूची उपलब्ध आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ-वाचनालयात अनेक प्रकाशनांचे जुने अंक, कै. केतकरांची पुस्तकं ('डबलबार' खेरीज) आणि अनेक लेखांची कात्रणं उपलब्ध आहेत. शासकीय ग्रंथालय, मुंबई व पुणे येथेही जुन्या फायली मिळतात.
- सूचीतील 'मथळा' या स्तंभातली संक्षिप्त रूपे–

आ–का–त्रा : आम्हास काय वाटते.
रा–नि–टि– : राष्ट्रमूल निष्ठांच्या टिप्पणी
रा–स्व–सं : राष्ट्रीय स्वत्व संग्रह
वि–भी–स्म : विसर भोळ्यांसाठी स्मरणगाठी.
(केळ) : कै. केळकर यांच्या समग्र वाङ्मयात घेतला गेला होता.
(गी च) : 'गीतार्थ चर्चा' या पुस्तकात समाविष्ट
(टि भा) : 'लो. टिळकांची भाषाशैली' या पुस्तकात समाविष्ट
(डब) : 'डबलबार' या पुस्तकात समाविष्ट.
(हिंदू) : 'हिंदुत्वाची राष्ट्रीय मीमांसा' या पुस्तकात समाविष्ट.

- सूचीतील 'प्रकाशन' या स्तंभातली संक्षिप्त रूपे–

आ विज्ञा–आत्मविज्ञान	किर्लो–किर्लोस्कर
कु समा–कुलाबा समाचार	गी दर्श–गीतादर्शन
चि म ज–चित्रमयजगत्	जी विका–जीवन विकास
झारप–झारापकर	तत्त्व मं–तत्त्वज्ञान मंदिर
त भा ना–तरुण भारत, नागपूर	त भा पु–तरुण भात, पुणे
त हिंदू–तरुण हिंदू	द महा–दक्षिण महाराष्ट्र
दी लक्ष्मी–दीप लक्ष्मी	ध भा–धर्म भास्कर
नव–नवनीत	निशि–निशिगंध

म टा–महाराष्ट्र टाइम्स
म वि प–महाराष्ट्र विज्ञान परिषद
म सा प–महाराष्ट्र साहित्य पत्रिका
र लो स–रविवारची लोकसत्ता
लो प्र–लोकप्रभा
लोशि–लोकशिक्षण
लो स ना–लोकसत्ता नाशिक
श्री नंदा–श्रीनंदादीप
स साध–सर्वोदय साधना
सावर–सावरकर
ज्ञान प्र–ज्ञानप्रकाश
मन मो–मनमोहन
महा वि–महाराष्ट्र विस्तार
मा मनो–मासिक मनोरंजन
र स–रविवार सकाळ
लो मि–लोकमित्र
लोस लोकसत्ता
वा शोभा–वाङ्मयशोभा
श्रीसर–श्रीसरस्वती
सा लक्ष्मी–साहित्य लक्ष्मी
साष्टी स–साष्टी समाचार

लेख-सूची

आठवणी-आत्मनिवेदन

दिनांक	मथळा	प्रकाशन
२३-११-२३	निवडणुकीच्या काळातील काही मनोरंजक अनुभव	केसरी
१-२-४१	कै. बाबा विद्वांस यांची स्मृतिचित्रे	सह्याद्री
मे ४४	डॉ. मुंजे यांच्या काही स्मृती	,,
२५-१२-४५	भिडेशास्त्री यांचे पुण्यस्मरण	केसरी
नोव्हें. ४७	न. चिं. केळकर : विनोद, वचने आणि कोटचा	सह्याद्री
मे ४८	डॉ. मुंजे यांच्या काही स्मृती	सह्याद्री
२२-७-४९	आवश्यक वैयक्तिक निवेदन (संघ-बंदी)	केसरी
२३-८-४९	'लोकमान्यांपासूनच मी सार्वजनिक कार्याची स्फूर्ती घेतली'	,,
सप्टें. ४९	आत्मनिवेदन (सत्कारप्रसंगीचे)	सह्याद्री
११-१०-४९	सैनिकी विद्यालयाची वीरभूमी (काही उज्ज्वल स्मृती)	केसरी
नो. डिसें. ५०	माझे माझ्यासंबंधी	वा शोभा
१९-१२-५०	सरदारांच्या भेटीची स्मृती	केसरी
दीपा. ५८	ज्योतिष खोटे म्हणावे तर	त भा पु
सप्टें. ५९	माझे बालपण	अमृत
५-६-६०	महाराष्ट्रातील व्याख्यानानुभव	त भा पु
१२-६-६०	महाराष्ट्रातील प्रवासानुभव	,,
दीपा. ६१	अकरा वर्षांनी सांगतो (विवाहाविषयी)	बलवन्त
दीपा. ६१	इंग्रजीने केला मराठी भ्रतार	त भा ना
दीपा. ६१	माझ्या विवाहाची सत्यकथा	सा लक्ष्मी
२५-३-६२	सर्पदंशाची विलक्षण कहाणी	त भा पु
१६-६-६३	संपादकीय कार्यातील आठवणी	,,
२६-१-६६	माझ्या स्थानबद्धतेची कारणमीमांसा	सावर.
२४-४-६६	राजकीय अस्पृश्यतेचे अनुभव	विवेक
मे ६६	मला भेटलेले लोक	सावर.
जुलै ६६	माझी स्थानबद्धता-पूर्वार्ध	पैंजण

दिनांक	मथळा	प्रकाशन
ऑग. ६६	पुण्यातील सत्यनारायण प्रकरण–उत्तरार्ध	पैंजण
दीपा. ६६	सचिवालयातील सुपारी	त भा पु
फेब्रु. ६८	सत्यनारायण प्रकरणातील अटक	पैंजण
२-५-६८	गांधी-हत्या चौकशीची लांबण कशी लागली (पत्रक)	मराठा
ऑग. ६८	पद्यमय राजकीय स्मृती	अमृत
दीपा. ६८	कोठेंतरी खोलवर–काही आठवणी	सोबत
२९-१२-६८	अमला पूर्वार्ध	सोबत
५-१-६९	अमला–उत्तरार्ध	”
१२-१-६९	गोष्टी सांगेन–तीन शेवटच्या भेटी	”
२६-१-६९	गोष्टी सांगेन (विविध आठवणी)	”
२-२-६९	गोष्टी सांगेन– ‘ नरोबा कुंजरोबा ’ इत्यादी	सोबत
२३-२-६९	गोष्टी सांगेन–सैनिकीकरण इत्यादी	”
१-७-७०	केतकर–रेडमंड राणी तो क्या करेगा मुरारजी ?	वसंत
दीपा. ७०	बंदिगृहातील बोधक संवाद	बलवन्त
८-११-७०	कपूर कमिशन व केतकर	विवेक
ऑग. ७१	लोकमान्य टिळकांचे पहिले नातवंड	निशि
२५-५-७२	माझ्या पिढीने पाहिलेल्या वृत्तपत्रांच्या पिढ्या	त भा पु
१९-६-७३	शिवनीच्या तुरुंगात गुरुजींशी चर्चा : काही स्मृती.	”
१९-१०-७४	केवळ माझ्यापुरतेच स्पष्टीकरण	साधना
१२-१-७५	सौ. अमलाबाईचा काकवली	त भा पु
१६-७-७८	संपलेल्या प्रकरणातील गप्पागोष्टी	विवेक
२३-७-७८	सामाजिक अस्पृश्यतेचे किस्से	र लोस
१७-९-७८	चहापाणी– एक सत्यकथा	”
दीपा. ७८	उजळत्या आठवणी	दी लक्ष्मी
५-११-७८	पदयात्रा– जवळिकीचे माध्यम	र लोस
१९-११-७८	चुकून पडल्या गाठी	विवेक
४-१-८०	शीख, काळे ख्रिस्ती आणि केसरी	केसरी
१६-७-८०	लोकमान्य टिळकांच्या देशभक्तीचा पगडा	केसरी

धर्म :– इस्लाम, ख्रिस्ती, बौद्ध, धर्म–समन्वय

दिनांक	मथळा	प्रकाशन
९–११–५१	हिंदुस्थानांत नुकतेच आलेले उपद्रवी आक्रमक मिशनरी	केसरी
१९–११–५१	जिहोबाचे साक्षी व हिंदी ख्रिस्ती	भारत
२४–११–५१	ख्रिस्तोपदेश व हिंदू संत	राष्ट्रधर्म
२२–५–५३	परकी मिशनऱ्यांना विरोध का ?	केसरी
२९–११–५३	काश्मिरात ख्रिस्ताचे थडगे	केसरी
" "	इस्लामी राज्याचा अर्थ	"
डिसें. ५३	गोऱ्या मिशनऱ्यांचा काळा इतिहास	एकता
१७–१–५६	परदेशी मिशने व भारतीय ख्रिस्ती	केसरी
२०–१–५६	जेझुइट लोकांची कणिक-नीती : धर्मप्रसारार्थ भली-बुरी साधने राबविली	"
६–५–५६	परक्या मिशऱ्यांना घरचा आहेर	केसरी
२२–७–५७	मिशनरी संस्थांतील शिक्षक	त भा पु
२९–७–५७	सत्यशोधनाच्या नावाने लपंडाव (ख्रिस्ती मिशनरी)	"
सप्टें. ५७	ख्रिस्ती असहिष्णुता व हिंदू सहिष्णुता	एकता
१–९–५७	ख्रिस्तीकरणाचे गौडबंगाल	त भा पु
१५–९–५७	ख्रिस्ती-चरित्र, इतिहास की पुराण ?	"
दीपा. ५७	भारतातील मिशनरी कार्याचे स्वरूप	"
२७–१०–५८	दीक्षास्थानावरील धर्मचक्र (नागपूर बौद्धपरिषद)	"
दीपा. ५८	भारतीय ख्रिस्त्यांना धार्मिक स्वराज्य पाहिजे	बलवंत
१०–११–५८	परक्या मिशनऱ्यांचे जाळे	त भा पु
१४–११–५८	परक्या मिशनऱ्यांचे पाठीराखे	"
२९–१२–५८	ख्रिस्त-जयती व हिंदू	"
२–२–५९	वसईतील ख्रिस्ती कोळी	"
९–२–५९	कुंभकर्णाची जांभई (मिशनरी-कार्य)	"
१३–२–५९	काकांचा घातकी स्तुतिपाठ (मिशनरी-कार्य)	"
१५–२–५९	आ-का-वा- हिंदू-बौद्ध समन्वय	
३–३–५९	अहमदियांची हिंदू व्याख्याने	"
७–६–५९	बुद्धजयंतीमासानिमित्त बोध	त भा पु
२०–१२–५९	खोटी ख्रिस्तजयंती म्हणजे खरी संक्रांत – ले. १	त भा पु
२७–१२–५९	खोटी ख्रिस्तजयती म्हणजे खरी संक्रांत – ले. २	"

दिनांक	मथळा	प्रकाशन
३-१-६९	खोटी ख्रिस्तजयंती म्हणजे खरी संक्रांत – ले. ३	त भा पु
१७-१-६०	खोटी ख्रिस्तजयंती म्हणजे खरी संक्रांत – ले. ४	,,
२५-१-६०	इस्लाम आणि एकपत्नीत्व	,,
१४-२-६०	मेंडोझाच्या कहाणीपासून बोध	,,
२८-२-६०	आ-का-वा – बौद्ध आणि हिंदू यांचे सहोदरत्व	,,
६-६-६०	नवबौद्धांना तात्त्विक सूचना	,,
१९-६-६०	भारतीय इस्लामचा मार्ग – ले. १	,,
२६-६-६०	भारतीय इस्लामचा मार्ग – ले. २	,,
२९-६-६०	बौद्धांविषयी दोन परिसंवाद	,,
१४-८-६०	बौद्धधर्म सोपा नाही	त भा पु
१५-९-६०	इस्लामी सामाजिक सुधारणा	त भा पु
१८-९-६०	बौद्ध भिक्षुसंघ आणि ज्यू भिक्षुसंघ	,,
२५-१२-६०	भिन्न धर्मातील गूढ साम्य	त भा पु
३०-१-६१	इस्लामी सामाजिक सुधारणा	,,
११-३-६१	इस्लामी समाजसुधारणा	,,
१८-४-६१	केनडी व रोमन कॅथॉलिक	,,
वा. सं. ६१	धार्मिक पंचशीलाची निकड	सा. लक्ष्मी
४-६-६१	बुद्धाचा दात	त भा पु
२५-६-६१	परदेशी धर्माचे देशी अवतार	,,
२७-६-६१	आदिवासींचे ख्रिस्तीकरण	,,
२-७-६१	ख्रिस्ती-धर्माचे शुद्धीकरण	,,
२-९-६१	राजधर्माचा खरा अर्थ (बौद्ध - ब्रह्मदेश)	,,
३-९-६१	भारत आणि इस्लाम	त भा पु
१०-९-६१	हिंदूंचे कुराण वाचन	,,
१७-९-६१	कुराणाचे भारतीय स्वरूप – ले. १	,,
२४-९-६१	कुराणाचे भारतीय स्वरूप – ले. २	,,
२७-११-६१	ख्रिस्ती धर्मसंस्थांची महासभा	,,
